स. ग्रं. सं. ठाणें.
विषय प्रवास
सं. क्र. ७४०

शरच्चंद्र गोखले

# आकाश पेले

RFBK-0026664

संदर्भ
भू-प्रवास
६४०
२६६६४
१०।९।९२

थ संग्रहालय, ठाणे
तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
ीम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे

5 MAY 199
26 MAY 1993
7 AUG 1993
31 AUG 199
17 SEP 1996
1 JAN 1997
१९।९९
६।६।९९
(क्र. मा. पहा)
१०००० - ११ - ८९
२३।६।९९

भू-प्रवास
क्र. ६४१
२६६६४

# आकाशपत्रे

शरच्चंद्र गोखले

RFFBK-0026664

श्रीविद्या प्रकाशन
२८० शनिवार, पुणे ३०

आकाशपत्रे

प्रकाशक
दा दि कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

© शरच्चद्र गोखले

प्रकाशन काल प्रथमावृत्ती
१ जून १९९२

मुख्यपृष्ठ कमल शेडगे

मूल्य सत्तर रुपये

'मजिरी' टाईपसेटर्स
पुणे - ९

मुद्रक
उल्हास लाटकर
अक्षर चितामणी
टिळक रोड, पुणे ३०

ज्या आंतरराष्ट्रीय संस्थांच्यामुळे मला जग पाहण्याची संधी मिळाली आणि ज्या तत्त्वज्ञ मित्राच्याकडून जग कसे पाहावे याची दृष्टी मिळाली त्या सर्वांना हे पुस्तक अर्पण करीत आहे.

# प्रस्तावना

केसरीचे सपादकपद घेतल्यानतर रविवारच्या अकात दोन नवीन सदरे सुरू करावीत असे ठरले राजकीय आणि आर्थिक घडामोडींवर आधारित एखाद्या विषयातील तज्ज्ञाशी मनमोकळच्या गप्पा माराव्यात या कल्पनेतून 'मैफल' हे सदर सुरू झाले या सदराला मुलाखती असे म्हणता येणार नाही 'मैफल' या कल्पनेत, विषयतज्ज्ञ आणि सपादक हे दोघेही अभ्यासू वृत्तीने सहभागी होत असतात या दृष्टीने फ्रेंच 'कॉम्पीअर' हा शब्द अधिक अर्थबोधक, सपादकाच्या भूमिकेशी अधिक मिळताजुळता आहे, असे वाटते या लेखाचे सकलन 'वेध सत्तान्तराचा' आणि 'भारताचा राजकीय परिसर' या पुस्तकातून प्रसिद्ध झालेले आहे

दुसरे सदर ''आकाशपत्रे'' या शीर्षकाखाली एकाआड एक रविवारी लिहू लागलो केसरीचा सपादक झालो तरी माझी आतरराष्ट्रीय कामे चालूच होती त्यामुळे देशोदेशी हिंडणे चालू होते त्या प्रवासात चर्चा- परिषदात कधी एखादे विलक्षण व्यक्तिमत्त्व भेटे तर कधी एखादा प्रसग मनाला चटका लावून जात असे अशा व्यक्ती, असे प्रसग किंवा असे अनुभव शब्दबद्ध करणारे हे सदर होते ज्या वेगाने हा प्रवास घडतो, भौगोलिक सीमा आकुचन पावतात त्या वेगामुळेच आकाशपत्रातील विषयाचा आवाका आणि सदर्भ विस्तारत गेले या आकाशवेगाचे जसे तोटे आहेत, तसेच फायदेही आहेत जिनिव्हाहून सकाळी १० ३० चे विमान घेतले की सकाळच्या कोवळ्या बर्फाळ उन्हात आल्प्स पर्वतावरच्या कमानदार बाधेसूद रेषा पाहताना कालिदास जिला 'हिमगौरी' म्हणतो त्या सौंदर्याचा प्रत्यय येतो तर नेपाळमध्ये गौरीशकरासारख्या उच्च हिमशिखराना सामोरे जाताना

हिमालयाचे रुद्र स्वरूप मनाला भयचकीत करते एखाद्या हॉटेलात राहात असताना त्याला आग लागली किंवा एखाद्या ठिकाणी आपले तिकीट, पैसे, सारे काही हरवले म्हणजे काय अवघड प्रसग ओढवतो हे या लेखात शब्दबद्ध केले आहे जपानमध्ये अणुबॉम्बचा स्फोट झाल्यानतर जे मरणताडन झाले त्यात आलेले भीषण अनुभव त्या त्या लोकाच्याकडून ऐकताना सारे जीवनच हादरून गेल्यासारखे वाटते, त्याचे चित्रण यात आहे दोन्ही हात नसलेला माणूस आपले जीवन घडवतो, एखादा माणूस सारे आयुष्य कुष्ठकार्यासाठी झोकून देतो, हे सारे न्याहाळत असताना अनेक नवीन नवीन प्रयोग मग ते विज्ञानातले असोत किंवा सेवाकार्यातले असोत अत करणाला भिडतात ऑस्ट्रेलियातील गर्भकोश सक्रात करण्याचा प्रयोग, अमेरिकेतील मानवी देह गोठवून टिकवण्याचा प्रयोग असो वा कॅन्सर रुग्णाचा शेवटचा दिस गोड व्हावा म्हणून अवेदना आश्रमाची धडपड असो, हे प्रयत्न वाचकाच्यापर्यंत पोचवावे ही माझी धडपड होती

विज्ञानाने माणसाचे प्रश्न जसे सोडविलेले आहेत तसे गुतागुतीचेही करून ठेवलेले आहेत या प्रश्नाची उत्तरे माणुसकीच्या आधारानेच शोधावी लागतात म्हणून माणसाच्या आयुष्यातल्या प्रश्नाची उत्तरे शोधण्याकरिता विचाराचे क्षितिज आभाळाइतके मोठे करायचे पण वास्तवातले भान मात्र सुटू द्यावयाचे नाही असा हा अवघड तोल आहे पाहिलेले एखादी वास्तू मग ते मार्क ट्वेनचे घर असो किंवा मलेशियातील गढी असो, विसरू म्हणता विसरता येत नाही म्युनिक किवा व्हिएन्नासारखे शहरही आपल्याला कायम खुणावत राहते, किंवा सामोवा किंवा श्रीलकेसारख्या देशातील निसर्गसौंदर्याची मोहिनी मनावर कायमची राहते नेपाळमधला बोरिस असो, जपानमधला आत्मसन्मानासाठी झुझणारा अपग उमिमोतो असो ही जबरदस्त माणसे आहेत ही माणसे, ह्या वास्तु हे अनुभव मनाला भिडतात हे सारे अनुभव पत्रातून लिहावेत, आपल्या स्नेह्या - सोबत्याना कळवावेत असे वारवार वाटे, परतु पायाला चक्र असल्यामुळे लिखाण नेहमीच होणे शक्य होत नसे मग कधीतरी मनात येई की, आपण आभाळाचाच कागद करून जर पत्र लिहिले तर जगात कुठेही असणाऱ्या आपल्या आप्त - स्वकीयाना, मित्राना हे वाचता येईल कोणीतरी कुठेतरी वाचतील केसरीमधून वाचकाना आपल्या अनुभवात सहभागी करता येईल प्रत्यक्ष अनुभव नव्हे पण त्याचे प्रतिबिंब तरी शब्दरूपात त्याच्यापर्यंत पोचवता येईल या इच्छेने हे लेखन केले आहे भेटलेल्या माणसाची

प्रयोगशीलता, त्याची विज्ञानाची झेप, त्याची धडपड आणि त्याचबरोबर त्याच्यातल्या काहीजणानी एकान्तात ढाळलेले अश्रू हे जरी यातून वाचकाना जाणवले तरी या लिहिण्याचे सार्थक झाले असे मी मानतो

हे लिखाण एकत्र करण्यामध्ये माझे सहकारी श्री कुमार अकलूजकर आणि आल्हाद गोडबोले याची मोठीच मदत झाली 'लौकर लेख द्या' हा धोशा त्यानी लावला नसता तर हे लिखाण घडूच शकले नसते हे लिखाण लिहून घेणारी लघुलेखिका अर्चना भुजले हिचेही आभार मानायला हवेत पुस्तक उत्तम प्रकारे काढल्याबद्दल आमचे मित्र श्री मधुकाका कुलकर्णी यानाही धन्यवाद!

२६।३।९२ डॉ शरच्चंद्र गोखले

# अनुक्रमणिका

## भाग १


| | | |
|---|---|---|
| १ | टॉवरिंग इन्फर्नो | ३ |
| २ | जेव्हा सर्व काही चोरीला जाते | ८ |
| ३ | स्वाभिमानी उमिमोतो | १४ |
| ४ | माणुसकी भाड्याने मिळत नाही | १७ |
| ५. | न घडलेला विमान अपघात | २१ |
| ६ | शेवटचा दिस गोड व्हावा! | २५ |
| ७ | जेव्हा इतिहास जागा होतो | ३० |


## भाग २


| | | |
|---|---|---|
| ८ | रामकथा अन्य देशातील | ३९ |
| ९ | रामकथेचा आविष्कार | ४५ |


## भाग ३


| | | |
|---|---|---|
| १० | आठवण जळणाऱ्या दोन दिवसाची | ५३ |
| ११ | अखेरचा सम्राट | ५८ |
| १२ | चित्राक्षरातून फुलणारी व्यंगचित्रे | ६४ |
| १३ | सत्याच्या शोधात झेन चित्रकला | ६९ |
| १४ | स्वप्नरंगातल्या बाहुल्या | ७७ |


## भाग ४


| | | |
|---|---|---|
| १५ | पुरुषाची दुनिया आणि स्त्री | ८३ |
| १६ | छंद हेरगिरीचा | ८८ |
| १७ | किमया देह गोठवण्याची | ९३ |
| १८ | 'आई कुणा म्हणू मी?' | ९७ |
| १९ | फोन आणि टीव्ही आभाळातसुद्धा | १०१ |

## भाग ५


| | | |
|---|---|---|
| २० | सारे काही वृद्धासाठी । | १०९ |
| २१ | वृद्धाची स्वप्ननगरी | ११४ |
| २२ | अधारलेले आयुष्य उजळते तेव्हा | ११९ |


## भाग ६


| | | |
|---|---|---|
| २३ | जिम परतलाच नाही । | १२७ |
| २४ | रशियन उमरावाची आनदगाथा | १३१ |
| २५ | मनात कोरलेले बॉरिसचे हास्य | १३८ |


## भाग ७


| | | |
|---|---|---|
| २६ | जगावेगळे असेल सुदर | १४७ |
| २७ | अलहम्ब्राचा राजवाडा | १५१ |
| २८ | भारलेली गढी | १५७ |
| २९ | लडनमधील प्रतिसृष्टी | १६३ |

# आकाशपत्रे

भाग पहिला

# प्रसंग

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं-प्रवास
ग्रा. क्र. ७६०
२६६६६
२०।८।८२
मुं. ठाणा (स्थळ ग्रंथ)

# १.

# टॉवरिंग इन्फर्नो

काही वर्षांपूर्वी मी एक चित्रपट पहिला, त्याचे नाव 'टॉवरिंग इन्फर्नो' किंवा जळणारा मनोरा एका बहुमजली हॉटेलमध्ये, सर्वांत शेवटच्या मजल्यावर उद्घाटनाचा समारभ चालू असताना आग लागते इतक्या उच इमारतीवर पाण्याचा मारा आगीचा बब करू शकत नाही त्यामुळे आगीत अडकलेल्या लोकाच्या झालेल्या दयनीय अवस्थेचे ते भयकारी चित्र होते टोकियोमध्ये तो चित्रपट मी पाहात असता माझ्या मनात उगीचच अनामिक शकेची एक पाल चुकचुकत होती की, आपल्या प्रवासात आपण बहुमजली हॉटेलातून राहतो अशा वेळेला तिथे आग लागली तर आपले काय होईल ? अर्थात कामाच्या रगाड्यामध्ये मनात आलेली शका आणि भीती फार काळ जवळ बाळगायला वेळच नसतो

टोकियोमधल्या किओ प्लाझा नावाच्या एका प्रचड हॉटेलात मी ७८ व्या मजल्यावर राहात होतो तो मोसम वादळी असल्याकारणाने 'टायफून' म्हणजे वादळे आणि त्याबरोबर धरणीकप होण्याचा सभव आहे असे वर्तमानपत्रे सागत होती त्या मध्यरात्री मी मधेच जागा झालो तो एका विलक्षण आवाजाने भितीच्या एका कोपऱ्यापासून विमान सुरू झाल्यासारखा जो आवाज होई तो खोलीच्या तीन बाजूनी जाऊन विराम पावत असे मला कळेना काय चालले आहे खोलीतील दिवे गेले होते खिडकीचे पडदे सारून मी बाहेर पाहू लागलो तो धुवाधार पाऊस शहराला झोडपत होता इतका प्रचड काळोख की डोळ्यात बोट घातले तरी दिसू नये पार

खाली रस्त्यावर दिव्याचे फक्त ठिपके दिसत होते इतक्या प्रचड वेगाने वादळी वारे वाहात होते की, हॉटेलच्या इमारतीचा ७८ वा मजला त्या वादळी वाऱ्याच्या सुसाट वेगाने थोडाफार हेलकावत होता मला काहीच सुचेना म्हणून मी कपडे घालून बाहेर पडलो सुदैवाने पर्यायी ऊर्जाव्यवस्थेवर लिफ्ट चालू होती म्हणून लिफ्टमधून तळमजल्यावर आलो तळमजल्यावर स्वागतकक्षातील व्यवस्थापकाला विचारले तेव्हा तो म्हणाला, "तुम्ही अजिबात काळजी करू नका भ्यायचे काही कारण नाही जेव्हा प्रत्यक्ष वादळ (टायफून) होईल त्या वेळी आम्ही तुम्हाला सावध करू "

'टायफून' हा मूळ शब्द चिनी आहे, तो म्हणजे ताय फुग यावरून 'टायफून' हा इग्रजी शब्द आणि 'तुफान' हा हिंदी शब्द आला असावा टायफूनमध्ये इतक्या जोराने वारा घोंघावत राहतो की, घराच्या काचा फुटतात, प्रचड वृक्ष उन्मळून पडतात विजेच्या ताराचे खाब कोसळून आगी लागतात सर्वसामान्य माणसाना घरातून बाहेर न पडण्याची सूचना दिली जाते अर्थात व्यवस्थापकाच्या खुलाशाने वरकरणी समाधान झाले तरी पुन्हा ७८ व्या मजल्यावर जावे की नाही यासारखा विचार करत मी तिथेच उभा राहिलो रस्त्यात डोकावून पाहिले तर पोलिस, गाड्या, मोटारी बाजूला नेऊन ठेवत होते रस्त्यावरची वाहतूक पार बद झाली होती वर जायचा धीर होईना म्हणून तळमजल्यावरील विश्रातिगृहात मी थोडा वेळ कॉफी पीत बसलो आणि शेवटी कटाळून धीर करून पुन्हा खोलीत गेलो. माझ्या खोलीत घुमणाऱ्या, भितीतून सुसाट धावत जाणाऱ्या त्या आगगाडीसारख्या आवाजाने मला केव्हा झोप लागली ते माझे मलाच कळले नाही

दुसऱ्या वेळेला मी एका बहुमजली हॉटेलात मनीलाला राहात असताना भर दुपारी तीन - साडेतीनला दुसऱ्या मजल्यावरील बँकेच्या खोलीतून काळ्या धुराचे लोटच्या लोट येऊ लागले मी दुसऱ्या मजल्यावरच असल्यामुळे तळमजल्यावर जाऊन रस्त्यावर उभा राहिलो पाच दहा मिनिटातच ती आग आटोक्यात आली कोरियाची राजधानी सेऊल येथे ज्या हॉटेलमध्ये मी नेहमी उतरत असे त्या हॉटेलात आग लागली सुदैवाने मी त्या वेळी मुबईत होतो पण त्या आगीचे वर्णन वाचताना, मी जर तेथे असतो तर काय घडले असते याचा विचार मनात येतच राहिला त्या हॉटेलातील राहणाऱ्या एका माणसाने स्वत ला गादीमध्ये गुडाळून घेऊन अकराव्या मजल्यावरून उडी मारली ती गादी विजेच्या तारावर पडली आणि पेटली त्यात त्या

माणसाचा अंत झाला. त्या आगीमध्ये जवळ जवळ ७० ते ८० माणसे प्राणाला मुकली होती. अलीकडेच दिल्लीमध्ये 'सिद्धार्थ' हॉटेलमध्ये लागलेली आग ही अशीच होती. बहुमजली इमारतीला लागलेली आग कशी विझवावी हा मोठाच प्रश्न महानगरपालिकाच्या पुढे उभा आहे. गेल्या महिन्यात दिल्लीला 'अन्सलभवन' या इमारतीला लागलेल्या आगीच्या वेळी हेलिकॉप्टरने पाणी घालण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु हेलिकॉप्टरच्या पख्यामुळे आग अधिकच भडकली गेली आणि त्या हेलिकॉप्टरला परत मागे बोलवावे लागले.

प्रत्यक्ष आगीत सापडण्याचा प्रसंग मात्र माझ्यावर एकदाच आला आणि ते चित्र माझ्या डोळ्यासमोर अगदी स्पष्टपणाने उभे आहे. मलेशियामध्ये कुआलालपूरला 'हिल्टन' हॉटेलमध्ये मी उतरलो होतो. 'हिल्टन' हॉटेल फार सुंदर बांधलेले आहे. तळमजल्यावर पाठीमागच्या बाजूला खूप मोठे स्वयंपाकघर आहे, आणि तिथून जेवण मुख्य इमारतीमध्ये आणले जाते. एकाच वेळी अडीच ते तीन हजार माणसांची जेवणाची व्यवस्था असल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर गॅस सिलेंडर्स तेथे साठविलेले असतात. मुख्य भोजनघरातून हे स्वयंपाकघर दिसू नये म्हणून तेथे एक कृत्रिम बगीचा करून वरून जाळी लावून, त्यामध्ये तऱ्हेतऱ्हेचे गाणारे रंगीत पक्षी, मोर ठेवलेले आहेत. म्हणजे जेवताना त्या पक्ष्यांच्या लीला बघण्यात भोजकाचा वेळ चांगला जातो. मी तेथे राहात असताना एके दिवशी रोजच्याप्रमाणे सहा वाजता उठून आवरून व्यायाम करत होतो. त्याच वेळी आगीच्या बंबाचा सायरन ऐकू येऊ लागला. 'हिल्टन' हॉटेल हे मुख्य रस्त्यावर असल्यामुळे रुग्णवाहिका किंवा बंब कुठेतरी जात असेल अशी माझी समजूत झाली. परंतु एक - दोन करता करता एकापाठोपाठ सहा वेळेला बंबाचा सायरन मी ऐकला. तरीही मी शांत होतो. कारण खिडकीतून स्वच्छ आभाळ दिसत होते. हळूहळू सूर्योदय होण्याचे चिन्ह दिसत होते. याच वेळी पाखरांचा कर्कश आवाज येऊ लागला. तरीही मला वाटले की, बंबाच्या आवाजामुळे पाखरे घाबरून केकाटत असतील. माझा व्यायाम शांतपणाने चालला होता. थोड्या वेळाने लावलेल्या दाराच्या खालच्या फटीतून धूर आत येऊ लागला. आणि त्या वेळी माझ्या मनात शंका आली की, आपल्याच हॉटेलात कदाचित आग लागली तर नसेल ना? मी भराभर कपडे केले, ज्यात पासपोर्ट होता, विमानाचे तिकीट होते, ती 'ॲटची केस' हातात घेतली. इतक्यात कुणीतरी प्रत्यक्ष दाराच्या जवळ येऊन दार ठोठावून सांगत

गेला की, हॉटेलला आग लागली आहे लिफ्टचा वापर न करता ताबडतोब जिन्याने खाली जा माझ्या खोलीच्या दाराच्या उजव्या बाजूला जिना होता म्हणून दार उघडून बाजूला केले तो धुराचा एक प्रचड लोट तेथून वर जात आहे असे मला दिसले मी तोंडावर रुमाल धरला आणि निघालो अग्निशामकदलाचा एक माणूस मला सागत होता की, उजव्या जिन्याचा वापर न करता डाव्या बाजूने जा मी डाव्या बाजूच्या जिन्याने धावत पळत चौदा मजले खाली निघालो जिन्यावर अक्षरश. मॅरेथॉन रेस चालली होती त्यावेळी त्या हॉटेलमध्ये सरासरी अकराशे माणसे होती त्यामुळे कपडे घातलेली, कपडे न घातलेली, लहान मुले खाद्यावर घेऊन जाणाऱ्या स्त्रिया, काय करावे याचे भान न राहिल्यामुळे प्रचड सुटकेस घेतलेले परदेशी, उघडे अमेरिकन्स, जीव घेऊन धावणाऱ्या या माणसाच्या प्रवाहात चौदा मजले खाली किती लवकर आलो हे कळलेच नाही कारण वरून येणाऱ्या माणसाचा रेटा इतका मोठा होता की, मला वाटते आम्ही आपोआप खाली सरकत होतो तळमजल्याला एखाद्या रणमैदानाचे स्वरूप आले होते अर्ध्या चडड्या घातलेले व्यवस्थापकीय कर्मचारी, हेल्मेट घातलेले जवान आणि पोलिस यानी केलेल्या पाण्याच्या प्रचड माऱ्यामुळे त्या सबध हॉटेलच्या स्वागत कक्षाला आणि भोवतालच्या परिसराला एखाद्या तळ्याचे स्वरूप आले होते पक्ष्याच्या किकाळ्या शात झाल्या होत्या आणि आम्ही सारे प्रवासी बाहेर बागेत उभे राहून ही आग कशी लागली असावी याविषयी तर्क - वितर्क करीत होतो सुदैवाने हॉटेलच्या मुख्य इमारतीला फारसा धोका झाला नव्हता परतु स्वयपाकघर मात्र सपूर्णपणे जळून गेले होते गॅस सिलेंडर्सचा स्फोट झाल्यामुळे ही आग लागली असे आम्हाला सागण्यात आले माझ्या शेजारच्या खोलीमध्ये आफ्रिकेतील एक गुजराती कुटुब होते सर्व स्थिरस्थावर व्हायला सकाळचे साडेदहा वाजले, आणि त्या वेळी ध्वनिक्षेपकावरून प्रवाशानी आपापले सामानसुमान सुरक्षित आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी आपापल्या खोल्यात जावे असे व्यवस्थापकाकडून सागण्यात आले धूर आणि जळालेले सामान याच्या वासामुळे अजूनही तेथे भीतीची भावना मनावर एक बोजा आणत होती त्यामुळे लिफ्टच्या समोर उभे राहिल्यावर, वर जायचे की नाही असा प्रश्न आमच्या सर्वांच्या डोळ्यासमोर होता ती गुजराती स्त्री हॉटेलच्या मालकाला सागत होती, "आम्ही वर जात नाही तुम्हीच सामान खाली आणून द्या आम्ही आता इथे राहात नाही" अर्थात थोडी समजूत घालून त्याना वर पाठविण्यात आले

वर गेल्यावर अर्थात पुन्हा एकदा थोडासा शांतपणा आणि स्थिरपणा आला सुदैवाने त्याच संध्याकाळी मला कुआलालपूर सोडावयाचे असल्यामुळे फारसा प्रश्न नव्हता हॉटेलचा व्यवस्थापक सांगत होता की, झालेल्या अपघाताबद्दल आम्हाला फार खेद होतो कालच्या रात्रीचे, आजचे जेवण घेण्याचे आम्ही कोणाला पैसे लावणार नाही अर्थात प्रवासी म्हणत होते तुम्ही आता वर पैसे दिले तरीसुद्धा आम्हाला आता इथे राहणे आवडणार नाही

• • •

२.

# जेव्हा सर्व काही चोरीला जाते

परदेशप्रवासात सगळ्यात मोठा धोका कुठला असेल, तर आपला पासपोर्ट, ट्रॅव्हलर्स चेक्स आणि विमानतिकीट हरवण्याचा यातील काही जरी हरवले, तरी काय यातनातून जावे लागते, हे ते भोगणाऱ्यालाच कळेल आमचे एक मित्र, केंद्र सरकारचे समाजकल्याण सल्लागार श्री मेहेर नानावटी एकदा न्यूयॉर्कला सभेसाठी गेले होते त्या वेळी या सर्व वस्तूची खूप काळजी घ्यावी, या बुद्धीने त्यानी झोपण्यापूर्वी पासपोर्ट, तिकीट आणि ट्रॅव्हलर्स चेक्स रात्री उशीच्या खाली ठेवले ठेवताना ते चुकून उशीच्या अभ्र्याच्या आत गेले सकाळी उठल्यावर छान गरम पाण्याने टब भरून त्यात पडून स्वत चा शीण घालवावा म्हणून त्यानी टबात गरम पाणी सोडले दाढी होईपर्यंत टब भरले पाणी किती गरम आहे हे न बघताच त्यानी टबमध्ये अग टाकले पाणी इतके गरम होते की त्यात मेहेरचे अग भाजून निघाले आणि त्याना प्रथमोपचारासाठी रुग्णालयात न्यावे लागले दुपारी त्याला हॉटेलमध्ये परत आणले गेले आणि नतर तो पासपोर्ट वगैरे शोधायला लागला त्या वेळी त्याच्या लक्षात आले की, हॉटेलच्या व्यवस्थेप्रमाणे उशा, पलगपोस, अभ्रे यात्रिक धुलाईसाठी पाठविण्यात आले होते पासपोर्ट, चेक्स साऱ्याचा एव्हाना लगदा झाला होता. शोधूनही ते सापडले नाहीत मेहेरला यानतर सर्व कागदपत्रे पुन्हा जमविण्याची जी काही यातायात झाली, जो मनस्ताप झाला त्याचे वर्णन करणे अशक्य आहे.

माझ्याबाबतीत प्रसग घडला तो जरा वेगळा मनिलाच्या समाजकल्याण

मत्र्याच्या परिषदेचा आणि समाजकल्याण अधिवेशनाचा तो शेवटचा दिवस -शनिवार- होता परिषद सपल्यावर सर्व स्थानिक कर्मचाऱ्याचा पगार द्यावा म्हणून बँकेतून पाच हजार डॉलर्सचे ट्रॅव्हलर्स चेक्स रोकडे करून आणले आणि हातातल्या ॲटॅचीमध्ये ठेवले सुदैवाने माझा पासपोर्ट आणि विमान तिकीट विमान कपनीत पुष्टीकरणासाठी पाठविले होते सभा सपल्यानतर मनिला दूरचित्रवाणीचे लोक आमच्या मुलाखती ध्वनिचित्राकित करायला हॉटेल 'मनिला'त आले माझे ऑफिस तेथेच होते दूरचित्रवाणीच्या चिकित्सक छायाचित्रकाराना चित्रीकरणासाठी माझी खोली पसत पडली नाही ते म्हणाले, 'आपण शेजारच्या अध्यक्षाच्या खोलीत जाऊन चित्रीकरण करु टेबलावर माझी हातबॅग किंवा अटॅची ठेवून मी शेजारच्या खोलीत चित्रीकरणासाठी गेलो त्या काळात फिलिपाइन्स देशात अस्वस्थता असल्यामुळे आणि अनेक मत्री तेथे राहात असल्यामुळे आमच्या सर्व कार्यालयावर लष्करी गस्त होती चित्रीकरण करून आम्ही परत आलो आणि खोलीवर जाण्याकरिता मी ॲटॅची बघू लागलो तो टेबलावर बॅग नाही बॅगेत पाच हजार डॉलर्सचे प्रवासी चेक्स व थोडी रोकड आणि काही महत्त्वाचे कागद होते बॅग नाही म्हटल्यावर माझ्या पोटात गोळाच उभा राहिला कारण परिषदेच्या वृत्तान्ताचा मसुदाही त्याच बॅगेत होता दाराशी बदूक घेऊन उभ्या राहिलेल्या रक्षकाला मी विचारले, "बॅग काय झाली ?"

तो अगदी साधेपणाने म्हणाला, "इथे इतके लोक येत - जात होते, त्यातल्या कोणी तरी नेली असावी"

माझा राग अनावर होऊन मी त्या रक्षकाला विचारले, "त्या वेळी तू काय करत होतास ?"

तितक्याच शातपणे तो म्हणाला, "मी पहारा देत होतो"

मला वाटले मी बॅग खोलीत, रेस्टॉरटमध्ये चुकून विसरलो असेन सगळीकडे बघून आलो, पण बॅग नव्हतीच

आतराष्ट्रीय नोकरीत दाखल झाल्यावर मी सघटित केलेली ती पहिलीच मोठी परिषद परका देश, त्यात हे पाच हजार डॉलर्स चोरीला गेलेले, मगळवारी परत जाण्यापूर्वी लोकाचे पगार कसे देणार, हॉटेलचे बिल कसे भागवणार या विचारानी मी हैराण झालो भारतीय राजदूताना फोन केला, पण सहानुभूती दाखविण्यासाठी ते इतकेच म्हणाले, "अहो या शहरात गुन्हेगारी फार आहे आपणच जपून असायला

हवे ''

आधी चोरी त्यात आपल्या तथाकथित गलथानपणावर उपदेश, मी कातावलो होतो हरवलेल्या ट्रॅव्हलर्स चेक्सचे नबर मी कुठे तरी व्यवस्थितपणे ठेवलेले होते, पण कुठे ठेवले तेही आता आठवेना मुबईला फोन लागेना शेवटी बायकोला एक लाबलचक तार ठोकली की चेक्सचे नबर शोधून तसे मला आणि न्यूयॉर्कला कळवावे औपचारिकता म्हणून पोलिसात तक्रार नोंदविली शनिवारी रात्री भारतीयाच्या जेवणाला गेलो नाही, कारण मनच थाऱ्यावर नव्हते दुसऱ्या दिवशी रविवार बँका बद ऑफिसेस बद खिशात काय पन्नास - साठ डॉलर्स असतील तेवढीच पुजी तो रविवारचा दिवस हा एक भयकर दिवस होता स्नेहीसोबती पुन.पुन्हा सागत होते की, तुम्ही काही काळजी करू नका बँकेत कळवले की लगेच बदली चेक्स मिळतात पण ज्याला हा पहिल्यादाच अनुभव असेल, त्याचे समाधान आश्वासनाने कसे होणार? शिवाय मनात ही भीती की, चोरणाऱ्याने माझी खोटी सही करून त्यातल्या अर्ध्या पैशाची जरी खरेदी केली किंवा रोख घेतले तर ते परत कसे मिळणार? बँकेला रिपोर्ट मिळण्यापूर्वीच पैसे चोराने जर वापरले तर काय करायचे? आणि बँक तर रविवारी बद आपली भीती ही पुष्कळदा अज्ञानातून निर्माण होते हे खरे! शेवटी दीड लाख भरायचे कसे? पर्यायी चेक मिळाले तर ठीक, नाहीतर काय करायचे ही चिता

शेवटी जबरदस्तीने माझ्या मित्रानी गाडीत घालून मनिलाची प्रख्यात भातसशोधन सस्था बघायला नेले सस्था बघून, निघण्यापूर्वी, आभाराच्या भाषणात मी म्हणालो की, सस्कृत वचन आहे, ''तडुल. प्रस्थमूल '' कोणत्याही कामाची सुरुवात तादळाने किंवा एका अर्थाने धनाने व्हावी लागते त्यावाचून काही घडत नाही हे बोलताना मला जाणवत होते की, माझे सगळे तादूळ हरवलेले आहेत, चोरीला गेलेले आहेत रविवारची रात्रही अशाच अवस्थेत जाणार असे वाटत होते सध्याकाळी हॉटेलवर परत आलो तो एक पहिला सुखद धक्का बसला माझे तेथील भारतीय मित्र आणि सिटी बँकेचे सध्याचे आतरराष्ट्रीय उपाध्यक्ष श्री एम एम बेलूर हे आणि दुसरे एक मित्र हॉटेलवर येऊन गेले होते आणि फक्त मलाच कळावे म्हणून शुद्ध मराठीत चिठ्ठी ठेवली होती चिठ्ठी अशी होती की, ''पैसे गेल्याने तुम्ही फार चितेत आहात, असे समजले, पण तुम्ही काळजी करू नका गरज पडली तर आम्ही तुम्हाला पाच हजार डॉलर्स उसने देऊ तुम्ही मुबईहून परत पाठवा, पण ही वेळ

येणार नाही, कारण उद्या बँकेत आल्यावर नवे चेक्स देणे शक्य आहे तुम्ही इतक्या काळजीत असलेले आम्हालाच बघवत नाही''

ज्याना मी एम एम म्हणतो ते हे आमचे मित्र मला काळजी अशी वाटत होती की, परदेशात मला विकले तरी पाच हजार डॉलर्स कोण देणार? त्यामुळे या चिठ्ठीने मला खूपच दिलासा मिळाला रात्री थोडीतरी झोप लागली

तरी मनावर ओझे होतेच सोमवारी सकाळी एकदा लवकर उठून बँकेत फोन करावा म्हणून पहाटे उठून बसलो साडेसातच्या आधी फोन करणे शिष्टाचाराला धरून होणार नाही, म्हणूनच फोन केला नाही बरोबर साडेसात वाजता फर्स्ट सिटी बँकेच्या व्यवस्थापकाच्या घरी फोन केला योगायोग असा, त्याचे नाव होते 'मिस्टर स्टोलन' (चोरलेले)। त्याना मी सागितले, ''स्टोलनसाहेब माझे दहा हजाराचे ट्रॅव्हलर्स चेक्स चोरीला गेलेले आहेत आणि मला आज सर्व स्थानिक बिले भागवायची आहेत चेक्सचे क्रमाक मुबईहून मागवलेले आहेत एव्हाना तुमच्या बँकेत तार आली असेल, तेव्हा काही तरी करून मला बदली चेक्स देण्याची व्यवस्था करा''

मला माझ्या डोक्यावर आभाळ कोसळल्यासारखे वाटत होते पण श्री स्टोलन शात होते ते म्हणाले, ''डॉक्टरसाहेब, तुम्ही उगाच चिता करू नका आमची बँक आमच्या ग्राहकाची खूप काळजी करते तुम्ही साडेनऊ वाजता बँकेत या एक दोन फॉर्म भरा आणि त्यातली पाऊण रक्कम आम्ही लगेच देऊ उरलेली तुम्हाला उद्या देऊ '' या बातमीने मला जवळजवळ हर्षवायू होण्याची वेळ आली होती मनात आले झकासपैकी ब्रेकफास्ट करावा आणि मगच बँकेत जावे पण शकेखोर भारतीय मन सागू लागले अरे, जर बँकेत काही अडचण आली आणि पैसे नाही मिळाले तर हॉटेलचे बिल मात्र वाढत राहील त्यापेक्षा चहाच घेतलेला बरा शेवटी चहा घेऊन तयार झालो आणि साडेनऊ वाजता बँकेत गेलो श्री स्टोलन यानी खूप आगतस्वागत केले आणि खरोखरच अर्ध्या तासाच्या आत तीनचतुर्थांश बदली चेक्सच्या स्वरूपात रक्कम दिली ते म्हणाले की, तुम्ही उगाच काळजी करत होता ट्रॅव्हलर्स चेक हरवणे, चोरीला जाणे असे पुष्कळदा घडते आम्हाला त्याची सवय आहे. मी मनात म्हणालो पण आम्हाला सवय नाही हीच तर खरी गोम आहे

बँकेमधली माणसे इतकी चागली वागू शकतात याच्यावर भारतीय माणसाचा सहसा विश्वासच बसत नाही आपल्याकडे बँकेत आपला चेक वटवायला गेले, तरी

खिडकीमागची ती सुदरी किंवा तो महापुरुष आपण कोणी शकराचार्य कुर्तकोटी असल्याचा आविर्भाव करून बसतो पैसे आपले, घेणारे आपण पण देणारा गृहस्थ मात्र आपल्यावरच अनत उपकार करतो आहोत असा चेहरा ठेवून बसतो

अशीच एकदा गम्मत जपानमध्ये झाली थोडे विषयातर करून सागतो जपानी कार्यक्रमाच्या नतर आमच्या न्यूयॉर्कच्या ऑफिसने दिलेला पाच हजार डॉलर्सचा चेक वटवायला मी जपानी बँकेत गेलो टोकिओतील बँकासुद्धा फार सुदर आहेत फुलझाडे, पिंजऱ्यामध्ये ठेवलेले गीत पक्षी, सुहास्यवदना स्वागतिका याच्याकडे पाहून आपण बँकेत आलो आहोत की रेस्टॉरटमध्ये आलो आहोत याचा सभ्रम पडतो चेक दिल्यानतर बँकेचे अधिकारी जणू काही त्याच्याच हातून थोर अपराध झाला आहे, असा दु.खी चेहरा करून अत्यत मृदू आवाजात मला म्हणाले, ''सर, या चेकवरची तारीख चुकून पुढल्या वर्षाची पडलेली आहे तेव्हा ही रक्कम मिळण्याकरिता आपल्याला एक वर्ष तरी थाबावे लागेल '' आली का पचाईत, तेव्हा पुन्हा एकदा मला पैसे आज मिळणे किती आवश्यक आहे, याचे वर्णन करून सागितले नतर तो गृहस्थ म्हणाला, ''एक करता येईल, आम्ही या चेकची फोटोकॉपी करून तुम्हाला देतो न्यूयॉर्कच्या बँकेत आपल्या सस्थेचे खाते आहे त्यात पुरेसे पैसे आहेत आणि ही रक्कम देण्यात जर काही गोंधळ झाला, तर त्याची जबाबदारी माझ्यावर आहे असे जर पत्र दिले तर आम्ही हा चेक वटवून देऊ '' त्याच्या म्हणण्याप्रमाणे त्यानीच टाईप करून आणलेल्या पत्रावर मी सही करून पत्र दिले आणि पाच - सात मिनिटात मला पैसे मिळाले

यानतर सोमवारी दुपारी मनिलाचे व्यवस्थापक मला सागू लागले की, एक माणूस तुमची हरवलेली अॅटॅची केस घेऊन आला आहे तो म्हणतो की, ती त्याला मासळी बाजारात फेकून दिलेली आढळली या दोन दिवसात माझे तिकीट, पासपोर्ट पुष्टीकरण करून परत आले होते चेक्स सर्व मिळाले होते हा माणूस चोरीची रिकामी बॅग परत करून त्याच्या बदल्यात काही बक्षीस मागत होता. हॉटेलचे व्यवस्थापक म्हणाले, ''काहीतरी देऊन टाका पचवीस एक डॉलर्स पुरेत '' मी म्हटले, ''मुबईला घेतलेल्या या माझ्या बॅगेला मुळातच इतके कमी पैसे पडले आहेत की वर आणखी पचवीस डॉलर्स देण्याची मला आवश्यकता वाटत नाही '' काही तरी द्याच असा तो आग्रह करत होता म्हणून शेवटी पाच डॉलर्स वर सुटका झाली पण पैसे हरवलेली ती शनिवारची दुपार आणि सर्व सामान परत मिळालेली ती

सोमवारची दुपार या तीन दिवसात मनाच्या ज्या अवस्थेतून मी गेलो, त्याचे वर्णन काय करावे ? मात्र माणसाचे सर्व काही जेव्हा चोरीला जाते तेव्हा माणसाला आधार उरतो तो फक्त परमेश्वराचा, स्वत चा आणि स्नेहसबधाचा याचा भरपूर अनुभव यावेळी मी घेतला

■ ● ●

३.

# स्वाभिमानी उमिमोतो

अपग वर्षानिमित्त कार्यक्रमाचे नियोजन करण्याकरता सयुक्त राष्ट्रसघाने बँकाक इथे एक सभा बोलाविली होती या सभेचे अध्यक्ष म्हणून जपानी ससदेच्या एका अपग सभासदास बोलावण्यात आलेले होते त्याचे नाव —जाऊ द्या क्षणभर ते उमिमोतो आहे असे मानू या आपल्याकडे अमिताभ बच्चन किंवा राजेश खन्ना हे जसे लोकप्रिय अभिनेते आहेत (आता खासदार) तसेच उमिमोतो हे उत्कृष्ट नटगायक आहेत, आता खासदार आहेत एकदा पारपरिक जपानी रगभूमीवर गात असताना ते रगमचावरून वीस फूट खाली पडले आणि त्यात त्याच्या पाठीचा कणा मोडला आता जन्मभर त्याना चाकाच्या गाडीतून जाण्यावाचून गत्यतर नाही चेहरा एखाद्या सूर्यफुलासारखा टवटवीत, उत्साही आहे, पण पाय मात्र पागुळलेले आहेत आवाजाची झेप आणि लयकारी अजून ताजीतवानी आहे

सयुक्त राष्ट्रसघाच्या सभागृहामध्ये साडेनऊ वाजता देशोदेशीचे प्रतिनिधी उमिमोतो याची वाट बघत बसले होते कोणी म्हणे ते आलेले आहेत, कोणी म्हणे ते येणार नाहीत पण काही तरी गडबड खास होती थोड्या वेळाने उमिमोतो आपल्या दोन चाकी ऊर्जाचलित गाडीमधून सभागृहात आले ही गाडी बॅटरीवर पण वेगाने चालणारी होती आणि त्या गाडीची बैठक लिफ्टसारखी उच होणारी होती त्यामुळे व्यासपीठावर भाषण करताना 'पोडियमसमोर' ते उभे असल्यासारखेच वाटत होते

आपल्या भाषणाच्या सुरुवातीला ते म्हणाले, ''मला यायला उशीर झाला,

याबद्दल मी आपल्या सर्वांची प्रथम माफी मागतो अपगाचे प्रश्न सोडविण्याकरिता काय करावे याचा विचार करण्याकरिता आज आपण येथे जमलो आहोत मी माझी मोटार स्वत चालवतो ही मोटार बँकाकच्या या सयुक्त राष्ट्रसघाच्या इमारतीसमोर आल्यानतर माझ्या लक्षात आले की, या इमारतीला उच पायऱ्या आहेत अपगाची गाडी आत नेता यावी यासाठी इमारतीला उतार केलेला नाही तेव्हा मी वर येणार कसा ? सयुक्त राष्ट्रसघाच्या कार्यालयातील माणसानी मला उचलून पायऱ्यावरून आणले आणि नतर आम्ही लिफ्टमधून येथे आलो मला उचलून न्यावे लागले याची मला फार शरम वाटली माझ्या स्वाभिमानाला धक्का लागला म्हणून नव्हे, तर जगातल्या साऱ्या अपगाची अपगता दूर व्हावी म्हणून ज्या बैठकीसाठी आम्हाला निमत्रण दिले, त्या सयुक्त राष्ट्रसघाच्या इमारतीमध्येच अपगाना सुलभ पोहोच (ॲक्सेस) नसावी याचे फार दु ख वाटले अपग माणसे ही इतराच्या सारखीच आहेत, असा विश्वास सयुक्त राष्ट्रसघाचा जर असेल, तर ही सभा बोलावण्यापूर्वी ही साधी व्यवस्था का करता आली नाही ? जेव्हा जपानी ससदेमध्ये मी निवडून आलो त्या वेळी सभापतींनी शपथ घेण्याकरिता मला व्यासपीठावर बोलावले तिथेही पायऱ्या नव्हत्या आणि मला उचलून न्यावे लागले मी सभापतींना म्हणालो की, सभागृहात आज पहिल्यादा आणि शेवटचेच मला उचलले गेले उद्यापासून अपगाना लागणाऱ्या सुविधा जर या इमारतीत नसतील, तर मी या सभागृहात येणार नाही आणि सभासदाच्या मूलभूत हक्काचा तो भग आहे, असे मला वाटेल मला सागायला आनद वाटतो की, दुसऱ्या दिवसापर्यंत जपानी ससदेच्या इमारतीत योग्य असा तात्पुरता उतार बाधून झाला होता आणि त्यानतर सर्व इमारतींना कायमची अशी सोय करण्यात आली आहे शारीरिक अपगासाठी उतार, वेगळ्या बाथरूम्स, मूक - बधिरासाठी विजेच्या खुणा, पायाने चाचपून रस्ता शोधण्यासाठी अधाना वेगळ्या फरश्या आता बसविलेल्या आहेत या साऱ्यामुळे अपगाचे सर्व प्रश्न सुटतील असे नाही पण समाजाची जाणीव त्यातून दिसते मला सयुक्त राष्ट्रसघाच्या कार्यालयाला असे सागायचे आहे की, दुपारच्या सभेला येण्यापूर्वी येथे तात्पुरता तरी उतार जर नसेल, तर याही सभेला मी येणार नाही

सुदैवाने दुपारी सभा भरण्यापूर्वीच इमारतीला तात्पुरता लाकडी उतार करून ठेवलेला होता या एका प्रसगातून त्या खासदाराच्या स्वाभिमानाची आणि जिद्दीची मला ओळख पटली

त्यानतर आम्ही अगदी चागले मित्र बनलो त्याच्या पत्नी याही चागल्या गायिका आणि अभिनेत्री आहेत त्या माझ्या मित्राची देखभाल फार चागली करतात दोघेही अजून फार सुदर गातात सौ उमिमोतो यानी या अपघातानतर त्याना सोडले नाही घटस्फोट दिला नाही उलट त्या दोघामधले प्रेम आता चद्रकलेप्रमाणे वाढतच आहे नव्या राजकरणात तो चागला रमला आहे तो उत्तम बोलतो सामान्य माणसे आणि अपग याच्या प्रश्नात रस घेतो. सौ उमिमोतो अजूनही रगभूमीवर काम करतात पण उमिमोतोच्या सदैव पाठीशी राहतात

एकदा त्याच्या घरी जेवणानतर त्या दोघानी मला जुन्या जपानी शाहिरी वाङ्मयातील द्वद्वगीत पियानोवर म्हणून दाखविले रग आणि रगेलपणा याला रसवतीची जोड मिळाली की लावणी होते अशी एक व्याख्या आहे व्हीलचेअरवर बसलेले उमिमोतो पियानोवर गात होते त्याच्या डोळ्याना डोळे जुळवून त्याची प्रेयसी, सखी, पत्नी गात होती साथ देत होती दोन तानपुरे उत्तम जुळले की, एकाचा सूर दुसऱ्यावर आपोआप झकारत यावा, तसे वाटत होते ती सध्याकाळ आणि ते सुगधी सूर अजूनही मनात रेंगाळत आहेत

• • •

४.

# माणुसकी भाड्याने मिळत नाही

एकेकाळी व्हिएटनामचे युद्ध जारी असताना मला दक्षिण व्हिएटनामला जाण्याचा प्रसग आला, सायगावमधल्या समाजकल्याण विद्यालयाचे उद्‌घाटन करण्याकरिता मला तिथे बोलावण्यात आले होते उत्तर व्हिएटनाम हा कम्युनिस्ट भाग आणि दक्षिण व्हिएटनाम हा अमेरिकी वर्चस्वाखालचा भाग अशी ही विभागणी होती व्हिएटनामचे युद्ध जिकावे यासाठी अमेरिकी शासनाने आपले सर्वस्व तिथे ओतले होते अमेरिकी मदत योजना आणि अमेरिकी सैन्य, यानी व्हिएटनाम अक्षरश व्यापून टाकले होत या युद्धातून तीनच गोष्टी निष्पन्न झाल्या, एक म्हणजे खुद्द अमेरिकेत आपल्या तरुण मुलाना व्हिएटनाममध्ये लढाईवर पाठवू नये अशी अमेरिकी पालकांनी प्रचड चळवळ उभारली दुसरी गोष्ट म्हणजे व्हिएटनाममध्ये गेलेल्या अमेरिकी तरुण सैनिकाना अफू आणि इतर मादक द्रव्याचे व्यसन लागले आणि अमेरिकेत अंमली पदार्थांचा विलक्षण प्रसार झाला तिसरी गोष्ट म्हणजे सामान्य जनता जर ध्येयाने भारलेली असेल आणि सघटित असेल तर अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राचासुद्धा पराभव करू शकते असा आतरराष्ट्रीय राजनीतीचा नवा धडा निर्माण झाला

'किलिग फील्डस्' या नावाच्या नव्या चित्रपटात ही कथा फार प्रभावीपणे सागितली गेली आहे

मी ज्या वेळी सायगावला पोहोचलो त्या वेळी युद्धाचे अखेरचे पर्व सुरू झाले होते सर्वत्र स्टेनगन घेतलेले अमेरिकी आणि व्हिएटनामी सैनिक गस्त घालत होते.

बाँबहल्ले चालू होते, सरकारी पाहुणा म्हणून, ज्या विश्रामधामात माझी व्यवस्था केली होती, तिथे रात्री उकाड्यामुळे झोप येईना म्हणून मी खोलीतून व्हराड्यात आलो, तो समोर स्टेनगन घेतलेले तीन व्हिएटनामी सैनिक दिसले माझ्या रक्षणाची इतकी काळजी पाहून, मला स्वत.बद्दलची धास्ती अधिकच वाटायला लागली सकाळी मी समाजकल्याण विद्यालयात गेलो उद्घाटनाच्या वेळी, समोर बसलेले बहुतेक विद्यार्थी कमरेला पिस्तुल अडकवून आलेले होते प्रास्ताविक करणाऱ्या माणसाने भगवान बुद्धाच्या शिकवणीचा उल्लेख करून शांतता आणि समाजकल्याण याचे नाते काय हे सागण्याचा प्रयत्न केला मागे बुद्धाचे चित्र, समोर पिस्तुले घेतलेले हे विद्यार्थी मला तरी युद्धाच्या छायेत असलेले ते सारे वातावरण विलक्षण वाटत होते

देशादेशातील युद्धाची राजनीती आणि माणसामाणसाच्या व्यवहारामधली मूल्ये व नीती याचा अशा वेळेला सघर्ष उभा राहतो काही वेळा तो इतका जबरदस्त असतो की, त्या वेळी माणसाचे आयुष्य उद्ध्वस्त होईल की काय अशी भीती वाटू लागते विद्यालयाच्या उद्घाटनानतर आम्ही समाजकल्याण कार्यालयापाशी आलो, त्या वेळी तिथे दाराशी एक जगी मारामारी जुपलेली होती एक अमेरिकी तरुण सैनिक आणि त्याच्या बाजूला एक व्हिएटनामी मुलगी उभी होती त्याच्यासमोर पाचसात व्हिएटनामी मुले जोरजोरात फ्रेंचमध्ये बोलत होती शिव्या देत होती हातवारे करत होती भाडणाला मारामारीचे वळण लागणार असे स्पष्ट दिसत होते समाजकल्याण सचालकानी मध्ये पडून काय चालले आहे याची चौकशी सुरू केली त्या वेळी असे कळले की, त्या अमेरिकी तरुण सैनिकाने पैसे देऊन त्या व्हिएटनामी मुलीला एका सध्याकाळपुरते भाड्याने घेतले होते तो व्हिएटनामी मुलगा रागारागाने म्हणत होता की, ''या अमेरिकी सैनिकानी व्हिएटनाममध्ये येऊन, पैशाच्या बळावर आमच्या मुलींना वेश्या बनविण्याचा धदा चालविला आहे आमच्या देशातील मुली म्हणजे हे लोक समजतात तरी कोण ?''

यावर तो अमेरिकन मुलगा सागत होता की, ''व्हिएटनामची लढाई काय आमच्या बापाची लढाई आहे काय ? आमचे घरदार सोडून या देशात येऊन आमचा जीव गमवावयाची आम्हाला हौस आहे काय ? तुमच्या रक्षणासाठी या लढाईत पडलो येथे आल्यानतर जर असे वाटले की, एखाद्या सध्याकाळी आपण मजा करावी तर यात काय चुकले ? त्यासाठी या मुलीला मी रोख पैसे मोजले आहेत ती मुलगी काही फुकट माझ्या बरोबर येत नाही '' तो व्हिएटनामी मुलगा म्हणत होता

की, "पैशाच्या बळावर मुली भाड्याने घ्यायच्या आणि आमच्या समाजाच्या परपरेची, नीतीची होळी करायची हीच तुमची पद्धत आज आम्ही मोडूनच काढणार आहोत"

समाजकल्याणाचे प्रमुख या भाडणात मध्ये पडेपर्यंत त्या व्हिएटनामी मुलाने कमरेचे पिस्तुल काढून त्या अमेरिकी मुलावर झाडले उजव्या हाताला गोळी लागून, जखमी होऊन तो खाली पडला भराभरा पोलिस आले आणि त्या व्हिएटनामी मुलाला अटक करण्यात आली परतु ॲम्ब्युलन्स तेथून जाईपर्यंत तो अमेरिकी सैनिक ओरडत होता की, "तुमच्या देशाचे स्वातत्र्य राखावे म्हणून आमचा जीव आम्ही का गमवावा ? मी पैसे देऊन जर चैन विकत घेतली तर काय चुकले ?"

आणि तो व्हिएटनामी मुलगा ओरडत होता, "अमेरिकी पैशाने सर्व काही विकत घेता येत असेल, पण आमच्या मुली विकत घेता येणार नाहीत" मी मनातल्या मनात, विचार करत राहिलो की, अमेरिकेने व्हिएटनाममध्ये आणलेले अमेरिकी तरुण सैनिक हे 'भाडोत्री' होते अर्थाअर्थी त्याचा काहीच सबध नसलेली लढाई ते लढत होते चैन म्हणून एक शरीर त्या मुलीच्या समतीने तो भाड्याने घेत होता ही भाडोत्री मूल्ये आणि शाश्वत मूल्ये यात सघर्ष उभा राहिला होता पण खरोखर यात कोण चुकत होते ?

दोन बलाढ्य राष्ट्रानी आपली लढाई दुसऱ्याच्या अगणात भाडावी, तसा हा रशिया आणि अमेरिकेचा बनाव होता एकाच व्हिएटनामचे दोन भाग होऊन एक भाग रशियाच्या वर्चस्वाखाली आणि दुसरा भाग अमेरिकेच्या वर्चस्वाखाली भाऊबदकीने एकमेकाशी लढू लागले पण त्या वावटळीत कॅलिफोर्नियातील हा तरुण आणि सायगावची ती मुलगी सापडली होती ज्या काळात विश्वविद्यालयात शिकायचे त्या वयात स्टेनगन घेऊन तो झाडाझुडपातून लढत होता ज्या वयात गायचे, हसायचे, झोपाळ्यावाचून झुलायचे त्या वयात ही मुलगी वेश्या झाली होती व्हिएटनामच्या या मुलाला मुलींची मैत्री माहीत होती पण भाडोत्री शरीरविक्रय म्हणजे काय हे माहीत नव्हते

थायलड, ब्रह्मदेश याच्या उत्तरेच्या बाजूला अफू निर्माण करणारा 'सोनेरी त्रिकोण' आहे त्यातून येणारी अफू, गाजा इथूनच निर्माण होणारी हेरॉईनची सवय अमेरिकी मुलाना लागली दोन्ही बाजूच्या बाजारात काहीच उपलब्ध नव्हते पाव दुर्मिळ, चहा महाग, त्या काळामध्ये व्हिएटनामी जनतेला दारिद्र्याची झळ इतकी लागली की त्याचे चटके टाळण्याकरिता मुली सहजपणे देहविक्री करायला तयार होत

असत  दोन महाकाय देशाच्या लढ्यात कोवळी तरुण मुले आणि मुली जीवनाचे एक नवीन बाजारू तत्त्वज्ञान शिकत होते  पैसा हे सर्वस्व  पैशाने सर्व काही मिळते  पैसा ही गरजेची आणि नीती ही सोयीची गोष्ट आहे

ज्या ज्या ठिकाणी अमेरिकी सैनिकाच्यासाठी रेस्ट अँड रिक्रिएशन सेंटर्स किंवा करमणुकीची केंद्रे उघडण्यात आली त्या सर्व ठिकाणी म्हणजे सायगाव, मनिला, बँकॉक या ठिकाणी, त्या काळामध्ये झालेली, नाईट क्लबच्या, मसाज पार्लर्सच्या सख्येमधली वाढ लक्षणीय होती  त्या काळात स्त्रीदेहाचा बाजार सुरू झाला  त्याचा परिणाम आजपर्यंत ही शहरे भोगत आहेत  मादक पदार्थ, वेश्याव्यवसाय, जुगार, अनिर्बंध अनैतिक व्यवहार या साऱ्याचा कर्करोग जणू या शहराना लागला  अमेरिकी समाजकल्याणाच्या पद्धतीप्रमाणे व्हिएटनामध्ये या प्रश्नाच्या मुळापर्यंत जाऊन प्रश्नाची सोडवणूक कशी व्हावी याचा विचार करण्याऐवजी वरकरणी उपाय केले जाऊ लागले  त्यामुळे वेश्याव्यवसायाला लागलेल्या मुलींच्याकरिता सल्लामसलत केंद्रे काढण्यात आली  पण या मुली या धद्यात ओढल्या जाणार नाहीत यासाठी मात्र फारसे काही केले गेले नाही  कारण ते राजकारणाला सोयीचे नव्हतो  उलट अमेरिकी सैनिकाच्या सुखसोयींच्या नावाखाली शरीरविक्रयाला अप्रत्यक्ष उत्तेजनच दिले गेले

व्हिएटनामहून परत येताना माझ्या मनापुढे ते चित्र पुन  पुन्हा उभे राही आणि मी स्वत लाच विचारत राहिलो, की ही तरुण मुले कोणासाठी लढत आहेत ? कुणासाठी जीव साडत आहेत ? भाडोत्री सैनिक म्हणून कशासाठी आली आहेत ? या मुलाना मादक द्रव्यापासून कोण वाचवणार ? सहज आणि स्वस्त पैसे मिळतात म्हणून या व्हिएटनामी मुलींनी दिलेली आपल्या देहाची किंमत शेवटी त्यानाच किती महागाईची ठरणार आहे  भगवान बुद्धाच्या आशीर्वादित भूमीवर चाललेल्या आतरराष्ट्रीय राजकारणाच्या मस्त हत्तींच्या साठमारीत, सामान्य तरुण मुलामुलींच्या आयुष्याचा चुराडा होत आहे आणि आम्ही विसरत चाललो आहोत की, माणसे भाड्याने मिळतात, माणुसकी मिळत नाही !

• • •

५.

# न घडलेला विमान अपघात

आजकाल विमानाने जाणे ही इतकी रोजची सवयीची गोष्ट झाली आहे, की या प्रवासात काही धोका असू शकतो हे आपण विसरूनच जातो तीनशे - साडेतीनशे माणसे घेऊन हा हवाई राजवाडा वर उडून जातो याचे कौतुक त्यामागचे विज्ञान समजूनसुद्धा फार वाटते तीच गोष्ट हॉटेलात राहण्याची थोड्या दिवसापुरते घरापासून दूर असलेले घरच ते तिथेसुद्धा काही धोका असू शकतो हे आपल्या मनाला पटतच नाही

गेल्या वर्षीचीच गोष्ट आहे फिनलडमध्ये हेलसिकीच्याबाहेर आतरराष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक होती शेवटचा दिवस होता २१ जून वर्षातला सर्वात मोठा दिवस जसजसे आपण उत्तर ध्रुवाजवळ जाऊ तसतसे पहिल्या सहा महिन्यात दिवस मोठे आणि उरलेल्या सहा महिन्यांत रात्री मोठ्या होऊ लागतात २१ जूनला सध्याकाळी आमची सभा सपली तेव्हा सध्याकाळ झाली होती अर्थात घड्याळाप्रमाणे कारण बाहेर टळटळीत दुपार पुण्याला दुपारी १२ वाजता असावे असे लख्ख ऊन होते अर्थात ऊन म्हणण्यापेक्षा प्रकाश होता रात्रीची जेवणे झाली आणि दुसरे दिवशी व्हिएन्नाला जायचे म्हणून मी लवकर झोपायचा प्रयत्न करत होतो झोप येत नव्हती, कारण बाहेर लखलखीत सूर्यप्रकाश होता, खोलीचे पडदे लावले तरीसुद्धा मध्यरात्री बाहेर लखलखणारा सूर्यप्रकाश मनाला जाणवत होता त्यामुळे धड झोप नाही, धड जागेपणा नाही अशी अस्वस्थता होती हा सूर्यप्रकाश

असत  दोन महाकाय देशाच्या लढ्यात कोवळी तरुण मुले आणि मुली जीवनाचे एक नवीन बाजारू तत्त्वज्ञान शिकत होते  पैसा हे सर्वस्व  पैशाने सर्व काही मिळते पैसा ही गरजेची आणि नीती ही सोयीची गोष्ट आहे

ज्या ज्या ठिकाणी अमेरिकी सैनिकाच्यासाठी रेस्ट अँड रिक्रिएशन सेंटर्स किंवा करमणुकीची केंद्रे उघडण्यात आली त्या सर्व ठिकाणी म्हणजे सायगाव, मनिला, बँकॉक या ठिकाणी, त्या काळामध्ये झालेली, नाईट क्लबच्या, मसाज पार्लर्सच्या संख्येमधली वाढ लक्षणीय होती  त्या काळात स्त्रीदेहाचा बाजार सुरू झाला  त्याचा परिणाम आजपर्यंत ही शहरे भोगत आहेत  मादक पदार्थ, वेश्याव्यवसाय, जुगार, अनिर्बंध अनैतिक व्यवहार या साऱ्याचा कर्करोग जणू या शहराना लागला  अमेरिकी समाजकल्याणाच्या पद्धतीप्रमाणे व्हिएटनामध्ये या प्रश्नाच्या मुळापर्यंत जाऊन प्रश्नाची सोडवणूक कशी व्हावी याचा विचार करण्याऐवजी वरकरणी उपाय केले जाऊ लागले  त्यामुळे वेश्याव्यवसायाला लागलेल्या मुलींच्याकरिता सल्लामसलत केंद्रे काढण्यात आली  पण या मुली या धंद्यात ओढल्या जाणार नाहीत यासाठी मात्र फारसे काही केले गेले नाही  कारण ते राजकारणाला सोयीचे नव्हतो  उलट अमेरिकी सैनिकाच्या सुखसोयींच्या नावाखाली शरीरविक्रयाला अप्रत्यक्ष उत्तेजनच दिले गेले

व्हिएटनामहून परत येताना माझ्या मनापुढे ते चित्र पुन  पुन्हा उभे राही आणि मी स्वतःलाच विचारत राहिलो, की ही तरुण मुले कोणासाठी लढत आहेत ? कुणासाठी जीव साडत आहेत ? भाडोत्री सैनिक म्हणून कशासाठी आली आहेत ? या मुलाना मादक द्रव्यापासून कोण वाचवणार ? सहज आणि स्वस्त पैसे मिळतात म्हणून या व्हिएटनामी मुलींनी दिलेली आपल्या देहाची किंमत शेवटी त्यानाच किती महागाईची ठरणार आहे  भगवान बुद्धाच्या आशीर्वादित भूमीवर चाललेल्या आतरराष्ट्रीय राजकारणाच्या मस्त हत्तींच्या साठमारीत, सामान्य तरुण मुलामुलींच्या आयुष्याचा चुराडा होत आहे आणि आम्ही विसरत चाललो आहोत की, माणसे भाड्याने मिळतात, माणुसकी मिळत नाही!

• • •

५.

# न घडलेला विमान अपघात

आजकाल विमानाने जाणे ही इतकी रोजची सवयीची गोष्ट झाली आहे, की या प्रवासात काही धोका असू शकतो हे आपण विसरूनच जातो तीनशे - साडेतीनशे माणसे घेऊन हा हवाई राजवाडा वर उडून जातो याचे कौतुक त्यामागचे विज्ञान समजूनसुद्धा फार वाटते तीच गोष्ट हॉटेलात राहण्याची थोड्या दिवसापुरते घरापासून दूर असलेले घरच ते तिथेसुद्धा काही धोका असू शकतो हे आपल्या मनाला पटतच नाही

गेल्या वर्षीचीच गोष्ट आहे फिनलडमध्ये हेलसिकीच्याबाहेर आतरराष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक होती. शेवटचा दिवस होता २१ जून वर्षातला सर्वांत मोठा दिवस जसजसे आपण उत्तर ध्रुवाजवळ जाऊ तसतसे पहिल्या सहा महिन्यात दिवस मोठे आणि उरलेल्या सहा महिन्यात रात्री मोठ्या होऊ लागतात २१ जूनला सध्याकाळी आमची सभा सपली तेव्हा सध्याकाळ झाली होती अर्थात घड्याळाप्रमाणे कारण बाहेर टळटळीत दुपार पुण्याला दुपारी १२ वाजता असावे असे लख्ख ऊन होते अर्थात ऊन म्हणण्यापेक्षा प्रकाश होता रात्रीची जेवणे झाली आणि दुसरे दिवशी व्हिएन्नाला जायचे म्हणून मी लवकर झोपायचा प्रयत्न करत होतो झोप येत नव्हती, कारण बाहेर लखलखीत सूर्यप्रकाश होता, खोलीचे पडदे लावले तरीसुद्धा मध्यरात्री बाहेर लखलखणारा सूर्यप्रकाश मनाला जाणवत होता. त्यामुळे धड झोप नाही, धड जागेपणा नाही अशी अस्वस्थता होती हा सूर्यप्रकाश

काय काय जादू करतो याचा अनुभव मी घेतला होता  अगदी उत्तरेकडे, सूर्यास्त होताना, खाली जाणारे सूर्यबिंब दिसतच नाही  लखलखणारे सोन्याचे आभाळापर्यंत पोचणारे सात खांब ध्रुव प्रदेशात दिसतात ते पाहून मी दिपून गेलो होतो  उषा, अरुण आणि सूर्य असा प्रकाशभेद या बर्फाळ प्रदेशात मी पाहिला होता  पण ही भगभगीत रात्र वेगळीच  रात्री २॥ ला सूर्य मावळला आणि ३, ३॥ ला परत उगवला  शेवटी झोपेचा नाद सोडून मी कामाचे कागद बघत राहिलो  दुसऱ्या दिवशी पहाटे एअरपोर्टवर लवकर पोहोचावे म्हणून मी सकाळीच हेलसिकीला जायला निघालो

ऑस्ट्रियन एअरलाईन्सने हेलसिकी ते व्हिएन्ना हा प्रवास तसा लहानच, ३, ३॥ तासांचा  त्यामुळे व्हिएन्नाला आम्ही दुपारी १२ वाजता पोहोचू अशी अपेक्षा  मी मनातून विचार करत होतो की, विमानात थोडी न्याहारी करावी आणि झोपेची सारी कसर भरून काढावी, कारण व्हिएन्नातही दुपारी दोन महत्त्वाच्या सभा होत्या  ठरल्याप्रमाणे विमान वेळेवर सुटले, न्याहारी झाली आणि मी जराशी डुलकीसुद्धा घेतली  जागा झालो तो पट्टे बाधा या घोषणेमुळेच  मला वाटले आम्ही व्हिएन्नाला पोहोचलो  पण पाहिले ते विमान एकसारखे वरखाली गचके घेत होते आम्ही चक्राकार फिरत होतो  मला वाटले व्हिएन्नाची धावपट्टी मोकळी नसेल म्हणून आम्ही वरच्यावर फेऱ्या घालतो आहोत  पण तसेही दिसेना  आमच्या विमानाच्या स्वागतिकेला विचारले तेव्हा ती म्हणाली की, विमानात काही तांत्रिक बिघाड आहे, पण काळजीचे कारण नाही  अर्थात एवढ्याने कोणाचेच समाधान होण्यासारखे नव्हते  आमच्या रांगेत पूर्वी विमानचालक असलेला एक माणूस होता तो जरासा कॉकपीटमध्ये जाऊन पण आला  पण त्याचा चेहरा पाहिल्यावर मात्र मला वाटू लागले की, तांत्रिक बिघाडापेक्षा हे प्रकरण जरा जास्त दिसते  तो म्हणाला आपले विमान व्हिएन्नाला न उतरता जवळपासच्या "ग्रात्स" नावाच्या गावाकडे वळवण्यात आले असावे  तसे पाहिले तर ग्रात्ससुद्धा लांब नाही असे निदान नकाशावर वाटले  पुन्हा विमान गचके खातखात निघाले  मध्येच वाटत होते की विमानाच्या पोटातून काही खडबड खडबड ऐकू येते आहे  एखादे दार उघडत नसले की त्याला जोर लावल्यावर जसा आवाज येतो तसा आवाज येत होता  कदाचित हा माझ्या मनाचाही खेळ असेल  सारे प्रवासी खूप बैचेन झाले होते  माझ्या मागच्या वृद्ध स्त्रीने बायबल काढून प्रार्थनेला सुरुवात केली होती  खिडकीपाशी बसलेली एक फिनीशबाई डोळे घट्ट मिटून भोवती काही घडतच नसावे अशी कल्पना करून

काहीतरी पुटपुटत होती आणि तीच्या माडीवरचे मूल आगठा चोखत टकटका सगळ्याकडे पाहात होते आणि हसत होते जगबुडीच्या वेळी वटपत्रावर बाळकृष्णाने हसावे तसे मनातल्या मनात, माझ्या चितेचा डोंगर क्षणोक्षणी वाढत होता

इतक्यात आमच्या कप्तानाने घोषणा केली की विमानाची चाके अडकलेली आहेत ती बाहेरच येत नाहीत, त्यामुळे आपण व्हिएन्नाच्या ऐवजी ''ग्रात्स'' नावाच्या गावी उतरणार आहोत कदाचित ग्रात्सला पोहोचल्यावर उतरताना तुम्हाला थोडा धक्का बसेल या घोषणेचा प्राकृत अर्थ असा की विमानाला पोटावर उतरावे लागेल (बेली लँडिंग करावे लागेल) अशा तऱ्हेच्या क्रॅश उतरण्यामध्ये विमानात आग लागण्याचा सभव फार विमानाचा तोल साभाळता आला नाही तर मोठा अपघात होण्याची शक्यता फार इत्यादी तपशील आमच्याच रागेतल्या एका भूतपूर्व विमान-चालकाने दिला कॅन्सर झालेल्या रोग्याला रोगाचे नाव ऐकू नये असे वाटावे त्याचप्रमाणे आम्हा साऱ्या प्रवाशाना हा तपशील ऐकायला नको होता तरी तो सागतच राहिला आपण आता ग्रात्स शहराच्यावर आलेलो आहोत पण विमानात जर खूप इधन शिल्लक असले तर बेली लॅडिंगनतर स्फोट होतो म्हणून जास्तीत जास्त हवेत राहून इधन सपवायचा विमान चालकाचा बेत दिसतो माझ्या अवैज्ञानिक मनात हजार प्रश्न उभे राहिले इधन आधीच सपले तर? जमिनीवर उतरल्यावर स्फोट होत असेल तर पाण्यात का उतरू नये? कुठल्याच प्रश्नाला माझ्याजवळ उत्तरे नव्हती मनामध्ये 'बा पाडुरगा' म्हणून देवाची आळवणी सुरू झाली होती मनात आले ग्रात्ससारख्या शहरात किंवा जवळच्या समुद्रात हे विमान पडले तर ती बातमी वाचताना आपल्या घरच्या मडळींना त्यात मी आहे हे कळणार कसे? कारण त्याच्या दृष्टीने आणि माझ्या वेळापत्रकाप्रमाणे मी व्हिएन्नाला जाणार होतो मला वाटले याहून वाईट ते मरण काय, जे घडलेले आप्तमित्राना कळणारही नाही खर तर पुढल्या आठवड्यातच मी घरी पोहोचणार होतो बरोबर घेतलेली साडी, नातवडासाठी घेतलेली चॉकलेट, खेळणी साऱ्याचाही शेवट असाच कोणालाही न भेटता मरायचे हा विचारच भयकर होता

पण बघता बघता विमानाचा वेग कमी होऊ लागला उड्डाणाची उची घसरू लागली खालचा विमानतळ दिसू लागला शेवटचा प्रयत्न म्हणून विमानाची चाके बाहेर काढण्याकरता विमान-चालकाची धडपड सुरू झाली, आणि इतक्यात घोषणा आली की आपले विमान ग्रात्सला उतरत आहे पण स्वागतिकेच्या चेहऱ्यावरून ते

निश्चित कसे उतरत आहे याची कल्पना येईना पोटात आलेला गोळा, घशातला आवंढा आणि मुकी देवाची प्रार्थना अशा अव्यस्थेत खुर्चीचे हात घट्ट पकडून आम्ही बसलो होतो क्षणा दोन क्षणात गचके खात एकदा डाव्या बाजूला तर एकदा उजव्या बाजूला डोलत विमान एकदाचे जमिनीवर टेकले आणि भरधाव धावून थाबले माझ्या शेजारच्या बाईने आता डोळे उघडले होते आणि डोळचातून टपाटपा अश्रू ओघळत होते मांडीवरच्या मुलाला त्याचेही काही नव्हते ते आपले खुदूखुदू हसत रडणाऱ्या आईकडे बघत होते खिडकीतून पाहिले तर आमच्याभोवती आगीचे बब, रुग्णवाहिका याचा वेढा पडला होता विमानाचे दरवाजे उघडायचाच अवकाश, बुडणाऱ्या बोटीवरून उंदीर पळावेत तसे सारे प्रवासी भराभरा बाहेर पडले विमानतळाकडे जाताना एखाद्या भयकारी वस्तूकडे बघावे तसे मागे वळून ते विमानाकडे एक चोरटा कटाक्ष टाकत होते विमानतळावर आम्हाला फळाचा रस दिला, जरा बसवले आणि त्या विमान कपनीचा प्रतिनिधी म्हणाला की तुमच्यापुढे दोन पर्याय आहेत आम्ही दुसरे विमान बोलावले आहे ते अर्ध्या तासात येईल, त्यातून तुम्ही व्हिएन्नाला जाऊ शकता किंवा इथे बस तयार आहे त्या बसने व्हिएन्नाला जाऊ शकता बसने पोहोचायला वेळ लागेल इतकेच विमानात झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे तुमचा वेळ वाया गेला, तुम्हाला जो त्रास झाला त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत पुन्हा तांत्रिक बिघाड हा शब्द ऐकल्यावर बहुतेक सर्व प्रवाशानी तात्पुरता तरी विमानाचा धसका घेतला होता त्यामुळे काही न बोलता सर्वांनी आपले हातसामान उचलले आणि बसकडे चालू लागले वेळ लागला तरी चालेल पण पृथ्वीचा सपर्क सुटायला नको असेच साऱ्याना वाटत होते तो प्रतिनिधी इतकेच म्हणाला की तुमचे सामान बसमध्ये भरायची व्यवस्था केली आहे आम्ही बसमध्ये बसलो आणि बस व्हिएन्नाला निघाली ते मूल असणाऱ्या बाईने पुन्हा डोळे घट्ट मिटले, मागले काही न आठवण्यासाठी

• • •

६.

# शेवटचा दिस गोड व्हावा !

मुबईला बाद्रा येथे 'अवेदना शाति' नावाची पाटी असलेली एक सुदर इमारत आहे मरणोन्मुख रुग्णाना दिलासा देण्यासाठी काढलेल्या या सस्थेत मी गेलो त्यावेळी सिस्टर ॲना माझ्या स्वागताला पुढे आल्या या सन्यस्त तरुण मुली मरणाच्या छायेत राहूनसुद्धा, चित्ताची शाती ढळू न देता इतक्या हसतमुखाने रुग्णाची सेवा करत राहतात, याचे मला अपरपार कौतुक वाटते सिस्टर ॲनाच्या बरोबर मी ही सस्था पाहिली रुग्णालय असूनही, देवाचे देवघर जितके स्वच्छ असावे तितकी ही सस्था स्वच्छ आहे सर्वत्र प्रकाश, समुद्रावरची मोकळी हवा, प्रत्येक रुग्णाला आपल्या कॉटच्या पलीकडे स्वतत्र सज्जा त्यातून सहजपणाने जीवनाचा अथाग सागर आणि परमेश्वरी आभाळाची निळाई दिसते प्रत्येक रुग्णाच्या कॉटच्या पायथ्याशी रोज सकाळी नवीन उमललेल्या फुलाची कुडी आणून ठेवतात सारेच वातावरण शात आणि प्रेममय आहे या सस्थाचालकाच्या मताने वेदनेवर विजय मिळवायचा असेल तर तो प्रेमानेच मिळवता येतो, किंबहुना जिथे प्रेम आहे तिथे वेदना असूच शकत नाही पचवीस स्त्री व पचवीस पुरुष रुग्णाची व्यवस्था असलेल्या या अवेदना सस्थेत कोणत्याही रुग्णाकडून एक पैसाही घेतला जात नाही

ही सस्था निघाली कशी याची माहिती सागताना सिस्टर ॲना म्हणाली की, मुबईच्या टाटा कॅन्सर हॉस्पिटलचे डॉ ल्युसिटो डिसूझा नावाचे ख्यातनाम सर्जन आहेत अनेक वर्षे या क्षेत्रात काम करीत असताना त्याच्या लक्षात असे आले की, ज्या वेळी कॅन्सरच्या रुग्णासाठी वैद्यकीय दृष्टीने काहीही करणे शक्य नसते त्या वेळी

त्या रुग्णाला खरी गरज असते ती सुश्रूषेची आणि प्रेमाची कोणीतरी वेदनेवर हळुवार फुकर घालण्याची अशा वेळी रुग्णाला वाटत असते की, सारे जग उदास, अधारवाणे आहे पण या निराश अधारामागे कुठेतरी आनदाची प्रकाशरेषा असते शाततेचा हा शुभ्र प्रकाश बघावयाचा असेल तर त्यासाठी या उदास पडद्यापलीकडे पाहायला हवे ज्या रुग्णाना कॅन्सरने मरणाच्या सान्निध्यात आणून ठेवले आहे त्या रुग्णाना टर्मिनल किंवा अतिम स्वरूपाचे रुग्ण असे म्हटले जाते ही अखेरची उदासी केवळ त्या रुग्णाच्या मनावर असते असे नाही, तर ती छाया साऱ्या घरावर पडलेली असते एक प्रकारे रोगाविरुद्धची लढाई आपण हरलेलो असतो, पण तरीसुद्धा आपण त्या रुग्णाची सेवा करू शकतो त्याच्या शरीराची वेदना कमी करता आली नाही तरी त्याच्या मनाला दिलासा देऊन हा शेवटचा दिस तरी गोड व्हावा म्हणून प्रयत्न करता येतो ही शाती मिळावी, हा आनद मिळवावा यासाठी या अवेदना सस्थेचा अट्टाहास आहे

सिस्टर ॲनाबरोबर मी बोलत असतानाच एक पारशी बाई आत आल्या मी त्याना विचारले तुम्ही काय करता ? त्या म्हणाल्या की, मी एका बँकेत अधिकारी आहे, पण या सस्थेत स्वयसेवक म्हणून मी आठवड्यातून चार वेळेला येते ती म्हणाली की मी या रुग्णाची नखे कापते मी म्हटले त्यातून काय होते ? ती म्हणाली की, नखे कापता कापता रुग्ण बोलायला लागतात या अवस्थेत रुग्णाना खरी गरज असते ती, कोणीतरी त्याचा हात धरून विचारायची की बाबा तुमचे कसे आहे ? हे काम करण्यात त्या रुग्णाच्या चेहऱ्यावर जो आनद मला दिसतो, त्यात मला सर्व काही भरून पावते

ही सस्था सुरू करणारे डॉ डिसूझा म्हणाले, '' या सस्थेची कल्पना एका रुग्णाबरोबर झालेल्या सवादातून मला सुचली हा रुग्ण मला म्हणत होता, डॉक्टर काहीही करा पण मला माझ्या घरी पाठवू नका '' टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये अनेक रुग्णाच्या मनाचा हा टाहो मी अहोरात्र ऐकत असे कॅन्सर रोगाच्या तज्ज्ञाच्या आयुष्यात असा प्रसग अनेक वेळेला येतो की, ज्यावेळी आपल्या वैद्यकीय ज्ञानाच्या मर्यादा जाणवू लागतात, उपचाराचे रस्ते बद होतात अशा वेळी गभीर चेहरा करून त्या रुग्णाला किंवा त्याच्या नातेवाइकाला असे सागण्यात येत की, ''आता आपण घरी जा या रुग्णालयात उपचार म्हणून आणखी काही करता येणे शक्य नाही '' हे सागणे म्हणजे खरोखर समोरच्या परिस्थितीपासून तोंड फिरवणे हा त्याचा अर्थ आहे आणि मग आपला पराभव कोणाच्या तरी पदरात घालायचा म्हणून त्याला घरी

घालवायचे  हे सारे घडले तरीसुद्धा तो रुग्ण हा एक जिवत माणूस असतो  हे सागितल्यानतरहि कित्येक वर्षे ही माणसे काही वेळेला जगत राहतात  रोगाबरोबरची लढाई हरल्यानतरसुद्धा ही माणसे जगत राहतात केवळ आपल्या मरणाची वाट पाहात  ही वाट पाहण्यामध्ये असणारी निराशा, एकटेपणा, उदासीनता आणि याबरोबरच असणारी शारीरिक वेदना हाच खरा या मरणोन्मुख रुग्णाचा प्रश्न आहे कॅन्सरसारख्या अवघड रोगावर उपचार केला आणि त्या लढाईत यश आले नाही तरी त्या अपयशानतरसुद्धा जे जगणे असते ते प्रतिष्ठेचे असायला हवे असे रुग्णाना वाटते प्रतिष्ठेने जगणे जितके महत्त्वाचे असते तितकेच प्रतिष्ठेने मरणे हेही महत्त्वाचे आहे जॉर्ज मेंझिस याने याचे वर्णन फार सुदर केलेले आहे  तो म्हणतो, "जे लोक आपल्याला समजू शकतात, आपली काळजी करतात, त्याचा हात आपल्या मस्तकावर असताना येणारे मरण हे शतजन्मापेक्षा सुदर असते " एकापरीने आपल्या माणसाच्या सान्निध्यात, त्याच्या मायेच्या उबदार छायेत मरण येणे यामध्येच व्यक्तिगत जीवनाचा सुदर शेवट आणि समाधान आहे

एखादा माणूस गरीब असतो, रेडिओ थिरपी, केमो थिरपी किंवा शल्यक्रियेने सारे प्रयत्न करून झाले तरी कर्करोगाचे विषाणू त्याच्या सवेदनावाहिन्यातून घर करतात  त्याचा घसा शल्यक्रियेने उघडला जातो आणि काळ - विवरासारखा तो तसाच उघडा राहतो  त्याला मरणप्राय यातना होत असतात  त्याची पत्नी गयावया करून सागत असते की, त्याला घरी पाठवू नका, यात ती कठोर हृदयी असते असे मुळीच नाही, पण झोपडीत एका खोलीच्या ससारात या माणसाची देखभाल कोण करणार ? हा तिचा व्यवहारी प्रश्न असतो  त्या एकाच खोलीत त्याची सहा मुले राहात असतात  घरचा भाकरी मिळविणारा कर्ता पुरुष मृत्युशय्येवर पडल्यावर त्या बायकोलाच मान ताठ करून त्या घराचा बोजा उचलायचा असतो  या रुग्णाच्या जखमेतून येणारी दुर्गंधी या एका खोलीत मावणे शक्य नसते  या साऱ्याचा परिणाम घरातल्या मुलावर काय होईल ? त्याला रुग्णालयात ठेवून घेत नाहीत  खासगी नर्सिंगहोममधे ठेवणे त्याना परवडण्यासारखे नसते  घरी ठेवणे अशक्य असते, अशा वेळेला त्याने या दुर्दैवी अवस्थेत कुठे मरावे ? त्याच्या मरणाला प्रतिष्ठा, शाती द्यावयाची असेल तर प्रेम आणि माया याशिवाय दुसरे औषध नाही  काही लोक म्हणतात या लोकाना इच्छा - मरणाने मरू द्यावे, पण हा मार्गही सर्वांना उपलब्ध नसतो  या साऱ्या अडचणीवर उतारा म्हणून अवेदना आश्रमाची स्थापना बाद्रा येथे झाली

येथे येणारे रुग्ण आपल्या मर्जीनुसार घरी जाऊ शकतात, परत येऊ शकतात कारण या अवस्थेत त्यांना औषध एकच आणि ते वेदनाशामक मॉर्फिनच्या गोळ्या देण्याचे एका वेळी सात दिवसाइतक्या गोळ्या देऊन रुग्णाला घरी जाऊ दिले जाते त्याने सात दिवसानतर येऊन पुन्हा औषध घ्यायचे कारण अधिक वेदनाशामक गोळ्या दिल्या तर त्याचा दुरुपयोग होण्याचा सभव असतो. अवेदना आश्रमात राहणे, खाणे, कपडेलत्ते सारे स्वच्छ, उत्तम आणि मोफत आहे महाराष्ट्रातील समाजाच्या औदार्यावर ही सस्था चालली आहे याविषयी बोलताना मला एक परदेशातले उदाहरण आठवले एक स्त्री डॉक्टर तिचे पहिले पती कॅन्सरने वारले तिने दुसरे लग्न केले दुसरे पतीही कॅन्सरने वारले असे असूनही स्त्री एका कॅन्सर हॉस्पिटलमध्ये अशा रुग्णाचे उपचार धैर्याने करते आहे

मरण म्हणजे काय ? हा तात्विक प्रश्न जितक्या गभीर स्वरूपात इथे उभा राहतो तितका कोठेच नाही रुग्णाला मरणासाठी मनाची तयारी करावी लागते, म्हणजे काय करावे लागते याविषयी बोलताना सिस्टर ॲना म्हणाली की, अनेक रुग्णाना कॅन्सर म्हणजे काय हेच माहीत नसते अनेक रुग्णाना आपल्याला कॅन्सर झाला आहे आणि आपण मरणार आहोत हे मान्यच नसते कित्येक रुग्ण हट्टीपणाने सागत राहतात की, मला कर्करोग झालेला नाही कॅन्सर आहे म्हणून सागून त्याचे शेवटचे दिवस दु खी तरी कशाला करायचे !

आतापर्यंत या सस्थेत १५०० रुग्ण येऊन गेले दरवर्षी साधारणपणे ५०० नवीन रुग्ण येतात फार लवकर जातात एकच रुग्ण येथे २४ महिने राहिला. एक रुग्ण व्हीलचेअरवरून घरी गेला आणि येताना चालत आला, पण नतर मात्र झपाट्याने खचला या सस्थेत ९ सिस्टर्स आणि १८ परिचारिका आहेत इतक्या लहान वयात या सिस्टर्स हसतमुख, स्थिरचित्त राहू शकतात याचे फार कौतुक वाटते सस्थेचा खर्च दरमहा ७५,००० रुपये आहे पुष्कळसा खर्च वेदनाशामक औषधावरच होतो इथे छोटेसे ऑपरेशन थिएटरसुद्धा आहे पुष्कळदा नातेवाईक येतात, रुग्णाच्या जवळ बसतात, काही खाऊ घालतात, त्यांना बरे वाटते एका रुग्णाच्या डोळ्याला काचबिंदू झाला होता मरणाच्या महाद्वारात उभ्या असलेल्या या माणसाचे ऑपरेशन करावयाचे की नाही असा प्रश्न होता तो रुग्ण म्हणाला, "मला ऑपरेशन करावयाचेच मला जग बघावयाचे आहे" त्याचे ऑपरेशन केले ऑपरेशन झाल्यानतर रोज सकाळी सिस्टरबरोबर तो हाच खेळ खेळायचा की बोट एक दिसतात की दोन

मला वाटते असे काम करावयाचे असेल तर पैशापेक्षा प्रचड सेवाभाव आणि सेवेवर भक्ती असायला हवी केवळ भाडोत्री काम अशा ठिकाणी होऊच शकत नाही रुग्णांच्या नातेवाइकाना इथे राहू दिले जात नाही दिवसभर त्यानी केव्हाही भेटायला यावे पुष्कळदा रुग्ण अशा अवस्थेत असतो की, त्याला हाक मारली की त्याला वाटते मोसबीचा रस घ्यायचा आहे म्हणून तो तोंड उघडतो आपल्याशी कोणी बोलू इच्छीत आहे, आपल्या घरातल्या माणसासारखे कोणी वागवीत आहे, हे प्रथम त्याला खरेच वाटत नाही फलाशारहित कर्म असावे त्याचप्रमाणे फलाशारहित सेवा सर्वार्थाने कुठे असेल तर ती अशा सस्थात दिसते

अशाच तऱ्हेची सस्था आता गोव्यामध्ये सुरू झाली आहे दिल्ली येथे सुरू होत आहे अवेदना - आश्रम किंवा 'हॉस्पिस' ही चळवळ भारतात रुजते आहे अशा तऱ्हेची दुसरी एक सस्था केरळमध्ये सुरू झालेली मी पाहिली या 'सेवाश्रम' सस्थेत मला एक रुग्ण भेटला, त्याचे नाव राममूर्ती कथकली नृत्याचा राष्ट्रीय कीर्तीचा तो कलाकार आहे, परतु सध्याच्या या अवस्थेत त्याला पाहिले तर राजपुत्र सिद्धार्थ ज्या जरेला, ज्या दु खाला, ज्या मरणाला भिऊन ससाराचा त्याग करून गेला ते सारे याला एकत्रित भेटले असावे असे वाटते मला भेटलेली दुसरी रुग्ण थेरेसा मला म्हणाली की, आज मला छान वाटते बाहेर आल्यावर डॉक्टर म्हणाले की, थेरेसा २४ ताससुद्धा जगू शकेल असे मला वाटत नाही एक वृद्ध डोक्यावर पाघरूण घेऊन झोपला होता सिस्टर दुआथव्हील त्याला हाका मारीत होत्या डोक्यावरचे पाघरूण काढायला तो तयार नव्हता, कारण कर्करोगाने त्याचा चेहरा इतका विरूप झाला होता की, परमेश्वर किंवा सिस्टरशिवाय दुसऱ्या कोणी तो पाहावा असे त्याला वाटत नाही

मला इतकेच वाटले की, या रुग्णाना मरणाचे सामर्थ्य मिळणे जितके अगत्याचे आहे तितकेच या रुग्णाकरिता जगण्याचे, त्याची सेवा करण्याचे सामर्थ्य या सिस्टर्सना परमेश्वराने देणे आवश्यक आहे, कारण त्याचा हा सगळा अट्टाहास एका दिशेने चालला आहे आणि तो उद्देश म्हणजे 'शेवटचा दिस गोड व्हावा '

• • •

७.

# जेव्हा इतिहास जागा होतो

गेल्या आठवड्यात कोचीनला गेलो होतो इथे नवीन काय झाले आहे अशी चौकशी करता, माधवन नायर प्रतिष्ठानाने, केरळम् किवा केरळ राज्याचा तीन हजार वर्षांचा इतिहास, मेणाच्या मूर्ती, वातावरण निर्मिती आणि त्यावरची परिणामकारक टिपणी याद्वारे आणि प्रकाश आणि ध्वनीच्या माध्यमातून दाखवले आहे असे सागण्यात आले श्री माधवन नायर हे नाव खूप ओळखीचे वाटत होते, पण काही लक्षात येईना पण इतके सुदर मूर्तिसग्रहालय आणि इतिहासाचे नाट्यरूप बघायला हवे म्हणून आम्ही ' केरळ इतिहास सग्रहालया'त गेलो हिरव्यागार बगीच्याच्या तोंडाशी हे सग्रहालय बाधले आहे दोन मजली गोल इमारतीच्या दाराशीच, काळ्या रगाची, डावा पाय पुढे टाकून, उजव्या हातातला परशू वर करून आव्हान देणारी 'परशुरामाची' अत्यत सुदर मूर्ती आहे श्री माधवन नायर याना भेटायचे आहे असा निरोप देऊन आम्ही सग्रहालयात शिरलो आत अधार आहे पण वरून टाकलेल्या एका प्रकाशझोतात, पाढरी जरीकाठी साडी, लाब जाडजूड वेणीत अबोली माळलेल्या, हातात पूजेचे तबक, त्यातली पेटती निराजने, आणि त्याला साजेसा सावळ्या सुदर मुखमडलावर सात्विक भाव प्रत्यक्ष केरळकन्या समोर स्वागताला उभी आहे असे वाटावे इतकी सुदर आणि जिवत अशी ही मूर्ती आहे या सग्रहातल्या सर्वच मूर्ती आणि मूर्तिचित्रे श्री करमान राजगोपाल या शिल्पकाराने केली आहेत मूर्तिचित्राचे हे देखणे प्रदर्शन आणि त्यातून जागा होणारा इतिहास पाहून बाहेर

पडताना हे सारे घडवणाऱ्या इतिहास- सशोधक माधवन नायर याचे कौतुक करावे का त्या शिल्पकाराला दाद द्यावी अशा सभ्रमात आपण पडतो इतिहासाबद्दल लिहिताना थॉमस कार्लाइल याने म्हटले आहे की, ''असख्य जीवनचरित्राचा साराश म्हणजेच इतिहास '' या अर्थाने या प्रदर्शनातील व्यक्तिचित्रे आणि प्रसग याच्या माध्यमातून केरळचा इतिहास आपल्या डोळ्यासमोर जिवत उभा राहतो प्रत्यक्ष मनुष्याच्या आकाराचे हे पुतळे करून, त्याच्या जीवनातला समरप्रसग प्रत्यक्ष निर्माण केला आहे या पुतळ्यामागची घरे, झाडे, प्राणी, सारे सारे जिवत वाटावे इतके हे चित्रशिल्प वास्तवसदृश आहे गेल्या तीन हजार वर्षांत जे राजे, सेनापती, सामान्य माणसे, ज्यानी ज्यानी केरळचा इतिहास समृद्ध केला, ज्यानी ज्यानी केरळची सास्कृतिक परपरा वाढीला लावली त्या त्या सर्वांची प्रसगचित्रे या सग्रहालयात आहेत बहुतेक सर्व प्रसग नाट्यमय असल्यामुळे तो देखावा पाहताना, त्यावर कमी जास्त पडणारा प्रकाशझोत आणि कथाप्रसग सागणारा, वर्णन करणारा नाट्यमय आवाज यानी या इतिहासाच्या प्रत्येक प्रकरणाचा मनावर ठसा पडतो

प्रा श्रीधर मेनन नावाचे केरळचे एक थोर, जाणते, इतिहासकार आहेत त्यानी 'केरळचा इतिहास आणि तो घडविणारे' या शीर्षकाचे एक सुदर मलयाळम् पुस्तक प्रसिद्ध केले आहे त्या पुस्तकातील प्रकरणानुसार ही प्रसगरचना केलेली आहे पाठ्यपुस्तकाच्या छापील पानात मृतवत पडलेल्या इतिहासाला पुन्हा जिवत करावा म्हणून ही सारी धडपड एक प्रसग सपला की अधार होतो पुढच्या प्रसगावर प्रकाशझोत टाकला जातो आणि शैलीदार इग्रजीत पुढला प्रसग सागितला जातो प्रत्येक माणूस आपापल्या परीने धडपडत असतो जीवनाच्या लढाईत समाजाच्या परपरेत थोडीफार का होईना भर घालतो या साऱ्या जीवनचरित्राचे सार काढले की त्याचा इतिहास होतो इतिहास म्हणजे रूक्ष, सनावळ्या, तहनाम्याची कलमे, आणि कोरड्या वशावळ्या नाहीत तर तो चालत्याबोलत्या माणसानी घडवलेल्या समाजाचे प्रतिबिब आहे म्हणूनच इतिहास म्हणजे केवळ राजकीय इतिहास नव्हे तर तो जिवत लोकाचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय इतिहास आहे या धारणेतूनच जे ए ग्रीन या इतिहासकाराने आपल्या पुस्तकाला 'इग्रजी लोकाचा इतिहास' –इग्लडचा इतिहास नव्हे– असे समर्पक नाव दिले. भौतिक सुधारणा (सिव्हिलिझेशन) ही मूठभर सर्जनशील लोकाची निर्मिती असते पण बहुजन समाज जी जगतो, पोसतो ती सस्कृती टॉयनबीच्या या सिद्धान्तामुळे इतिहासाकडे पाहण्याची आपली दृष्टी

बदलते जुन्या काळी इतिहास- सशोधनाला परपरागत दृष्टिकोणाची मर्यादा पडल्यामुळे कोणाचा जन्म किती साली झाला यातच त्याचे सशोधन गुरफटून गेले त्या समाजाची परपरा, सस्कृती हा खरा मूलस्रोत आहे या कालप्रवाहाच्या काठी कोण्या राजाने किल्ले तट बाधले असतील, कोण्या सताने देऊळ उभारून गाथा लिहिली असेल, कोठे लढाई झाली असेल, पण काठावरच्या या खुणा कमी महत्त्वाच्या, काल नदीचा, समाजगगेच्या प्रवाह खरा महत्त्वाचा हे ज्याने जाणले तो खरा इतिहासकार

माधवन नायर हा इतिहासकार अशा वेगळ्या घडणीतला आहे म्हणूनच त्याच्या दृष्टीने केरळचा इतिहास हा पृथ्वीवरच्या या उबदार स्वर्गाचा इतिहास आहे इथे भूमी बारा महिने चोवीस तास हिरवीगार आहे प्रचड डोंगर, नद्या, दऱ्या, सारे निसर्गाचे वरदान आहे समुद्र तर चोवीस तास केरळचे पदस्नान घडतो आहे नारळी-पोफळीच्या प्रचड झावळ्यामधून – खराखुरा – मलयज शीतल वारा सुखावतो आहे बोटींतून मैलोन्मैल भटकताना त्या नावाड्यानी गायलेला स्वरघोष पाण्याच्या लाटावरून ऐकू येतो आहे मधूनमधून वाजते चर्चची घटा, मशिदीची बाग आणि सकाळ-सायकाळ शुद्ध सस्कृत उच्चारातले शाकर गीत किवा देवी-स्तोत्र देवळात प्रचड समया तेवत ठेवून मधे प्रयोग होतो तो कथकली, किवा मोहिनी आटम् किवा आरगेत्रम् तीन हजार वर्षांचा हा सस्कृतिक इतिहास दाखवत आहेत माधवन नायर महाराष्ट्राचा इतिहास म्हटला की मराठी माणसाची मजल तीनशे वर्षे मागे जाते शिवाजी महाराजाच्यापर्यंत, पण त्यापूर्वीचा इतिहास, राजा रामदेवराय, राजे सातवाहन येथपर्यत आपण जातच नाही बौद्ध लेण्यातून, स्तूपातून, अजठा-वेरूळ, कार्ला-कन्हेरीतून पूर्वखुणा पाहतो पण त्याच्या मागे जातच नाही हेमाडपताचे स्थापत्य, गाथा सप्तशतीतले काव्य, लोककलातून प्रकट झालेले विचारवैभव याचा मागोवा घेऊन महाराष्ट्राचा तीन हजार वर्षांचा इतिहास असा उभा नाही का करता येणार? नालासोपारा आदी बदरात ग्रीक रोमन जहाजे येत राहिली तेथून सुरू झालेला व्यापारी मार्ग कल्याण - कामशेत - कार्ला - जुन्नर - माळशेज करत मराठवाड्यात उस्मानाबादपर्यंत पोचतो तिथे हजारो वर्षांपूर्वी ग्रीक, रोमन आणि नतर इटालियन व्यापारी येतात त्याच्या खुणा, दागिने, बाहुल्या आजही तेर नगरी – उस्मानाबाद जिल्हा इथे दिसतात भारत इतिहास सशोधन मदिर हे प्रचड नाव घेणाऱ्यानी महाराष्ट्राचा असा जिवत इतिहास उभा करायला नको का? मराठीपणाचा

वारसा सागणाऱ्यानी यासाठी काही करायला नको का ?

संग्रहालयात पहिले प्रसगचित्र आहे ते केरळमधल्या आदिमानवाचे शिकार, मासेमारी करून जगणारा, दगडा-लाकडाची ओबडधोबड शस्त्रे वापरणारा जहाजाचा उपयोग करून आफ्रिका, जावा-सुमात्रापर्यंत वसाहती करणारे द्रविड लोक इथे आले आणि स्थिर झाले खिस्तपूर्व शतकातला पहिला केरळ सम्राट नानन् इलिमाळ या राजाचे दुसरे प्रसगचित्र आहे साखळीने वाघाला बाधून हिडवणारा हा उग्र राजा, यानेच पहिले साम्राज्य स्थापन केले तिसऱ्या आणि चौथ्य प्रसगचित्रात शेतीचा विकास करणारा राजा सेनगुथुवन चेरा आणि साऱ्या दक्षिणेवर ज्याने राजसत्ता स्थापन केली त्या 'आय आदिरणराजा'ची आहेत खिस्ताब्दापूर्वी कित्येक शतके उत्तरेकडून आर्य लाकाच्या टोळ्याच्या टोळ्या दक्षिणेत विशेषत केरळात येत होत्या रामायण, महाभारतातले याबाबतीतले प्रसग फार बोलके आहेत पण खिस्तापूर्वी तिसऱ्या चौथ्या शतकातच बौद्ध आणि जैन सस्कृतीची गगा केरळच्या 'पेरियार' नदीला मिळाली होती आर्य लोकानी आपल्याबरोबर धर्म आणला, जातिसस्था, सस्कार आणि कर्मकाड आणले त्यानीच यज्ञसस्था केरळात आणली त्यानी देवळे बाधली देवळाच्या आश्रयाने चित्र, शिल्प, सगीत, नृत्य या कलाचा विकास झाला कलाश्रयाबरोबर सस्कृत विद्येची उपासना सुरू झाली यज्ञाचे प्रसगचित्र फार छान आहे खिस्ताब्दापूर्वी पन्नास एक वर्षे सेंट थॉमस इथे आला आणि या लोकगगेत खिस्ती विचारप्रवाह दाखल झाला पेरियार नदीच्या काठी, कलाडी या गावी, ७८८ साली आद्य शकराचार्यांचा जन्म झाला त्यानी अद्वैताचे तत्त्वज्ञान दिले विचारानी बौद्धमताचा पाडाव केला कर्मसिद्धान्त माडला देशाच्या चार कोपऱ्यात, बद्रिनाथ, पुरी, द्वारका आणि शृगेरीला मठस्थापना केली केवळ बत्तीस वर्षे जगलेल्या या तेजस्वी नबुद्री ब्राह्मणाने उपनिषदे सामान्य माणसाच्यापर्यंत पोचवली शकराचार्यांचे प्रसगचित्रही फार छान आहे यानतर येतो तो इ स ८०० सालचा राजा कुलशेखर अलवार याने शेवटी राजसन्यास घेतला व श्रीरगाच्या देवळात जीवन घालवले योगी राजा म्हणून गाजला त्याने विचारप्रसार केला

यानतर आर्यन आदिकल राजाने मार सापीर इसो नावाच्या फिरगी माणसाला ताम्रपत्र देऊन व्यापाराचे व धर्मस्वातत्र्याचे हक्क दिले. क्विलॉन बदरातून सिरियन, अरब, इराणी आणि यहुदी असे अनेक लोक आले आजही भारतातील सर्वांत जुने यहुदी प्रार्थनामदिर –सेनॅगॉग– कोचीनला आहे खिस्ताब्दापूर्वी १००० वर्षे आधी

राजा सालोमनचे यहुदी जहाज इथे आले ज्याना "व्हाइट ज्यू" म्हटले जाते त्यातील केवळ सव्वीस माणसे आज कोचीनमधे स्वतत्र भागात राहतात यहुदी जोसेफ रबान याला भास्कर रविवर्मा राजाने ताम्रपत्र दिले तो प्रसग फार चागला माडला आहे अकराव्या शतकात देवदासींची प्रथा सुरू झाली ही परपरा विद्याभ्यासाची, कलागौरवाची होती यातले मोहिनीआटम्चे प्रसगचित्र आणि त्या मूर्ती फार देखण्या आहेत दुर्दैवाने जातिसस्थेने या प्रथेचा पुढे दुरुपयोग केला राजा रविवर्मा सग्रामधीर याने १३०० च्या पहिल्या भागात सबध दक्षिण भारताचा सम्राट म्हणून राज्याभिषेक करवून घेतला, तर १४९८ साली मसाले आणि समृद्धीच्या शोधात वास्को-द-गामा आला, आणि १५२४ साली कोचीन येथेच मरण पावला सर्व साम्राज्यवाद्याच्याप्रमाणे त्याने कोचीन आणि कोझीकोड राज्यात भाडणे लावली फोडा आणि झोडाचा प्रयोग केला हे प्रसगचित्र उठावदार आहे माघ महिन्यातील माकम् दिवशीचा सण म्हणजे 'मामकम्' या वेळी आत्मदहनाला तयार असणाऱ्या एका अतिरेक्याने राजावर शस्त्र फेकल्याचे चित्र फारच परिणामकारक आहे नतरच्या प्रसगचित्रात केरळमधील प्रसिद्ध 'कलारी' या युद्धतत्राच्या शिक्षणाचे दृश्य आहे कलारी विद्या केरळातून चीन जपानकडे गेली आणि त्यातून कुफू, ज्युदो निर्माण झाले असे सागतात स्त्रियानाही ही प्रतिरक्षेची विद्या दिली जात असे मलिक अब्न दिनार हा मुस्लिम दर्यावर्दी प्रथम केरळात आला नतर या समाजाने पोर्तुगीजाच्या विरुद्ध मोठी लढाई दिली

मार्तंड वर्मा नावाच्या राजाने १७५० साली आपले साम्राज्य त्याचे कुलदैवत 'पद्मनाभ' या देवतेला अर्पण केले आणि तो पहिला उपभोगशून्य स्वामी झाला त्याच्या वर्णनात 'विश्वस्त' असे विशेषण वापरलेले दिसते त्यानतर टिपू सुलतानाच्या स्वाऱ्या सुरू झाला टिपूचे चित्रही छान साधले आहे कथकलीच्या प्रसगचित्रात कथी आणि थरी ही दुष्टपात्रे, पाचा हे सज्जन पात्र आणि 'मिनुकु' हे सोज्वळ स्त्रीपात्र दाखवले आहे मागे मृदुगम आणि चेंडा वादक आणि बाजूने झाझा घेऊन बसलेले गायक आहेत राजा झामोरीन किवा (समुथिरी) याच्या दरबारात भट्टदानम् समारभ होत असे या वेळी विद्वानाना पदवीदान दिले जाई उदडशास्त्री नावाचा एक उर्मट विद्वान होता तो म्हणे माझ्याशी वादविवाद करण्यापूर्वी माझ्या पोपटाला हरवून दाखवले पाहिजे दामोदरभट्ट नावाच्या तरुणाने आपल्या पोतडीतून माजर काढल्याबरोबर तो पोपट उडून गेला नतर सात दिवस चाललेल्या वादसभेत

उदडशास्त्र्याचा पराभव झाला हा प्रसग फार चागला दाखवला आहे मूर्तींच्या चेहऱ्यावरचे भाव पाहण्याजोगे आहेत नतर शकरनारायण नावाच्या खगोल शास्त्रज्ञाने शोधलेले गणिताचे व ऋतुचक्राचे सिद्धान्त बाराशे वर्षांपूर्वीच विकसित केले आहेत आधुनिक मल्याळम् भाषेचे 'शिवाजी' रामानुजन इलुथला, सोळाव्या शतकात आलेले डच व्यापारी व्हॅनरीड, थोर कीर्तनकार कुचन नबियार, पहिले धरण बाधणारा रामवर्मा, ब्रिटिशांच्या विरुद्ध बड करून बलिदान करणारा राजा केरळवर्मा (१८०५), "फदफितुरी करून प्रदेश बळकावणाऱ्या ब्रिटिशाना थारा देऊ नका" असा जाहिरनामा काढणार नेता वेलु थपी, इग्रजी शिक्षणाचा प्रसार, वाचनालयाना पुरस्कार आणि वेधशाळा काढणारा वैज्ञानिक तिरुमल, मलयाळम् भाषेत २१ पुस्तके लिहिणारा जर्मन डा हर्मन गुड्रेट, महाराष्ट्रातील स्त्रीपुरुषाना समोर ठेवून पौराणिक चित्रे रगवणारे चित्रसम्राट राजा रविवर्मा, हरिजनाच्यात जागृती करणारे जातिभेद-निर्मूलनाची मोहीम करणारे स्वामीकल आणि नारायणगुरु, एकाहाती कोचीन बदराची रचना करणारे अभियात्रिक सर रॉबर्ट ब्रिस्टो आणि मदिरप्रवेशाचा जाहिरनामा काढणारे, लोकशाही मानणारे – ज्याचे गतवर्षी निधन झाले – ते सुधारक राजे चित्र थिरुनळ बलराम वर्मा या सर्वांच्या प्रसगचित्रातून केरळचा इतिहास जिवत होत गेला प्रकाशझोतात येणारे प्रत्येक प्रसगचित्र, चित्रामागचे नेपथ्य, मूर्तींच्या चेहऱ्यावरचे जिवत भाव, व चित्रावर केली जाणारी सुदर मल्याळम आणि इग्रजीमधील धावती टिपणी, यातून आदिमानवापासून राजा बलराम वर्मा याच्यापर्यंत आपण कसे आलो कळतच नाही गमत म्हणजे मल्याळम सस्कृतीचा एकही भाग, मग ते सस्कृत काव्य असो, वेदात असो, गणित, खगोलशास्त्र, चित्रकला, यज्ञसस्था, कथकली यात दुर्लक्षिला गेलेला नाही पेरियार नदीतून सहजपणाने नाव जावी तशा पद्धतीने हा भूतकाळाचा प्रवास होतो समृद्ध सस्कृतीचा त्यातून प्रत्यय येतो

प्रदर्शन पाहून बाहेर आलो तो निरोप होता माधवन नायर याचा पलीकडेच ते राहतात मी दारात उभा राहिलो माधवन पुढे आले आमची तीस वर्षांनी भेट झाली मी त्याना ओळखत होतो तो मच्छीमार उद्योगाचे सम्राट म्हणून आज ११ हजार कोटी रुपयाचा हा केरळातील उद्योग त्याचे ते जनक सस्कृतचे अभ्यासक म्हणून मला माहिती मी विचारले, "माधवन् तुम्ही या क्षेत्रात कसे शिरला " ते म्हणाले, "तुला माहीत आहे मी एकटाच आहे कधी लग्न करायला सवड झाली

नाही खूप पैसे मिळवले मग १९८५ साली निवृत्त झालो त्यापूर्वीच मला नाद होता तो इतिहासाचा केरळच्या मुलामुलींना मातृभूमीचा खरा इतिहास कळावा त्यातून त्यानी स्फूर्ती घ्यावी म्हणून मी ७० लक्ष रुपये खर्चून हे इतिहासाचे मदिर बाधले '' मी विचारले,'' निवृत्त झाल्यावर क्लबवर जावे, गोल्फ खेळावे, खानपानात सायकाळ घालवावी हा राजमार्ग तुम्ही का पत्करला नाही ?'' माधवन् म्हणाले, ''समाजाने मला अपरपार दिले त्याची फेड करण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे'' गेली २५ वर्षे इतिहासाने झपाटलेला हा माणूस किती विनम्र वृत्तीने बोलत होता आता तीन मजली 'आर्ट गॅलरी' बाधून झाली आहे अभिजात भारतीय चित्रकला, चित्रकारी, यावर अभ्यास सशोधन यासाठी ही सस्था ते काढत आहेत पाश्चात्य चित्रकाराच्या प्रिंट्सचे वेगळे दालन आहे त्यानतर राजा रविवर्मा याच्या चित्रकलेचा शोध आणि अभ्यास, कला, सस्कृती, सस्कृतविद्या, अशा अफाट व्यासंगात गढलेला हा निवृत्त उद्योगपती आहे हे पाहून पजाबच्या इतिहासाचे प्रसगचित्र प्रदर्शन करावे म्हणून पजाबचे मत्री आले योजना झाली पण त्या मत्र्याची हत्या झाली आध्र सरकारने असे प्रदर्शन उभारायचे ठरवले आहे आता महाराष्ट्रात कोणी माधवन् नायर निघतो का ? आणि आमचा तीन हजार वर्षांचा इतिहास कोणी जागा करतो का ? कै स आ जोगळेकर याच्या 'सह्याद्री' वरच्या ग्रथानतर ते काम पुढे कोण नेणार ? याची वाट मी पाहतो आहे

• • •

भाग दुसरा

# रामकथा

# ८.

# रामकथा : अन्य देशांतील

## श्रीलका

लहानपणापासून रावण हा लकेचा राजा ही भावना मनात घर करून असल्यामुळे मी जेव्हा श्रीलकेत गेलो त्या वेळी रावणाच्या नावाची काही स्मारके दिसतात का असे पाहात होतो, पण श्रीलकेमध्ये खरोखरीच आता अर्थाने रावणाचे नावसुद्धा उरलेले नाही धनुष्यकोडी आणि रामेश्वरमपासून बाधलेले सेतूचे काही अवशेष आजही दिसतात आणि यावरून आजची श्रीलका हीच रावणाची लका असे मानले जाते आज श्रीलंकेमध्ये ज्या ठिकाणी रावणाचा राजवाडा असावा तिथे रावणकोटे नावाचे अवशेष आहेत. काही ठिकाणी सीतातलैया सीतायेलिया किवा सीताकुड हेही दिसून येते,परतु यापलीकडे रामायणाशी साक्षात सबध असणारे अवशेष दिसत नाहीत आज उत्तर श्रीलकेमध्ये नुआरा इलिया या नावाचे जे सुदर ठिकाण आहे, त्या ठिकाणी सीतेला कैद करून ठेवले होते असे सागतात रावणाने दिलेले पाणी प्यायला नको म्हणून सीतेने रागाने डोंगरावर डोके आपटले आणि त्यातून पाण्याचा एक झरा वाहू लागला तो आजही दाखवतात या ठिकाणी एक वेगळ्या तऱ्हेचे भात पिकवले जाते लोककथा अशी आहे की रावणाने दिलेले तादूळ सीतेने फेकून दिले, त्यातून हे भात उगवले या ठिकाणी माती काळीभोर आहे हनुमानाने लका दहन केल्यानतर झालेल्या कोळशामुळे ही माती काळी झाली असावी, असे मानतात

बौद्धभिक्षूच्याबरोबर पाली भाषा श्रीलकेमध्ये गेली श्रीलकेच्या कुमारदास नावाच्या कवीने जनकधरणा नावाचे एक महाकाव्य तेथील राजवशावर लिहिले कालिदासान्या रघुवशाचा छाप या कथानकावर दिसतो यावियीचा विशेष अभ्यास आनद कुमारस्वामी यानीही केलेला आहे सिधला रामायणामध्ये ज्या घरगुती सस्काराचे आणि समारभाचे वर्णन केलेले आहे त्याचा केरळमधील समारभाशी पुष्कळ सबध आहे रामकथेमध्ये मात्र थोडाफार फरक आहे सीतेने वनवासामध्ये फुलापासून जन्म झालेल्या मलय नावाच्या राजपुत्राचे लव व कुशाबरोबरच पालन केले असा उल्लेख यात सापडतो रामाला शनीचा त्रास झाला आणि त्या वेळी त्याने हत्तीचे रूप घेऊन वनात दिवस काढले असाही एक उल्लेख सापडतो हनुमानाच्याऐवजी वालीने लकेमध्ये जाऊन अशोक वनातील फुलझाडाचा सत्यानाश केला आणि वालीच्या शेपटीला चिध्या लावून आग लावण्यात आली असाही उल्लेख आहे सीता परत आल्यानतर तिचे चारित्र्य शुद्ध राहिले आहे की नाही अशी शका घेतली जाते परतु सीता अग्निदिव्य करून हा आळ खोटा असल्याचे सिद्ध करते या कथेमध्ये सीतेला तीन मुले असल्याचा उल्लेख आहे आणि ही तिन्ही मुले मलय देशात जाऊन राज्य करतात असाही उल्लेख आहे ही रामकथा पुष्कळदा बुद्ध कथेमध्येही मिसळलेली आपल्याला दिसते एक मात्र खरे की, ज्या ठिकाणाचा उल्लेख रावणाचा राजवाडा म्हणून केला जातो ते सध्याच्या नुआरे इलिया इथे आहे या ठिकाणचे सौंदर्य नदनवनाला लाजवेल असे आहे आजही लकेमध्ये रामाचा उल्लेख विष्णूचा अवतार म्हणून केला जातो

अशा तऱ्हेने रामकथा तिबेट, खेमर, मगोलिया, सैबेरिया, लाओस, काम्बोडिया, आदी आशियातील देशात सर्व दूर पसरलेली आहे

थायलडमध्ये रामायणाबाबत सर्व धर्मांच्या लोकाना आवड आहे थायलडमधील रामायण हे मूळ वाल्मिकी रामायणावरून घेतले गेले का ते मलेशिया किवा जावामधील श्रीविजय साम्राज्यातून आले हे सागणे कठीण आहे थायलडमध्ये रामायणाला थायलड राम किएन्ना किवा रामकीर्ती असे नाव आहे सुरुवातीच्या काळात ही रामकथा छायानाट्याद्वारे दाखवली जात असे कातड्याची मोठी चित्रे माणसाच्या आकाराची कापून ती पडद्यामागे धरली जात आणि छायानाट्याचा हा प्रयोग केला जाई त्याला थाय भाषेत नोंग असे म्हणतात रामायण दाखविण्याचा दुसरा प्रकार म्हणजे कथकलीसारखे झगझगीत मुखवटे लावून जे नृत्यनाट्य केले

जाते त्याला खॉर्न असे म्हणतात रामायणाच्या नृत्यनाट्यात किंवा छायानाट्यात युद्धाचे प्रकार दाखविण्याची हौस लोकाना खूप आहे त्यामुळे तऱ्हतऱ्हेची खड्गे, तऱ्हतऱ्हेचे धनुष्यबाण आणि अस्त्रे याचा उपयोग करून दाखविण्यात येतो थाय लोकाना वीररसाइतकाच शृगाररस प्रिय आहे, त्यामुळे रामायणाची कथा दाखविताना याचाही परिपोष पुष्कळच केला जातो शूर्पणखा राक्षसी रामाला भुलविण्याकरिता आली, रामाने तिचे नाक, कान कापून टाकल्यानतर तिने आपल्या मदतीला खर नावाच्या राक्षसाला बोलावले रामाने त्याचाही पाडाव केला येथे छायानाट्य सपते या भागाला म्हणजे खराच्या पाडावाला 'खर लॉमखॉर्न' असे म्हणतात याच्यातूनच थाय भाषेमध्ये एखादी गोष्ट सपली म्हणजे लॉमखॉर्न झाले किंवा भरतवाक्य झाले असा वाक्प्रचार प्रचलित झाला आहे छायानाट्यामध्ये लक्ष्मणावर फेकलेले ब्रह्मास्त्र (फ्रोमास्त्र) याचाही प्रयोग खूप लोकप्रिय आहे थाय भाषेमध्ये 'ब' किंवा भ याचा फ होतो त्यामुळे ब्रह्मास्त्राचे फ्रोमास्त्र, भोजनाचे फोजन किवा भरणी नक्षत्र हे फरणी नक्षत्र होते थाय भाषेमध्ये चेहऱ्यावर जे मुखवटे लावतात त्यालाच खॉर्न असे म्हणतात आता राम किएन्न आणि रामकीर्ती याची लिखित रूपे उपलब्ध आहेत थायलडचा पहिला राजा राम एक यानी चक्री वशाची स्थापना केली अठराव्या शतकामध्ये या राजाने रामयणाला काव्य स्वरूप दिले सर्व दरबारात किंवा महत्त्वाच्या प्रसगी ही कथा सादर केली जाते त्याचा मुलगा दुसरा राजाराम याने हीच कथा थोडी लहान केली सहाव्या रामाने वाल्मिकी रामायणाचा उपयोग करून एक नवीन रामकथा निर्माण केली थायलडच्या एका राजधानीचे नाव अयुध्या किवा आयोध्या असे आहे यापूर्वी खेमर राजाने आणखी एक आयोध्या शहर स्थापन केले होते सुप्रसिद्ध इग्रजी चित्रपट 'ब्रिज ऑन द रिव्हर क्वाई' या चित्रपटाचे चित्रण याच भागात झाले त्यानतर पुढच्या काळामध्ये राजाने लोपबुरी किवा लवपुरी नावाचे शहर स्थापन केले याच्याच जवळ बँकॉकची स्थापना झाली आजही थायलडच्या राजाला सोळावा राजाराम असे म्हटले जाते थाय कथेमध्ये रावणाला दशकठ म्हटले जाते अगदाला औकोड म्हटले जाते रावण हा प्रेताच्यावर अमृत शिपडून मेलेल्याना उठवीत असे अशीही कथा आहे बिभीषणाची मुलगी ही सीतेचे रूप घेऊन, सीतेचे प्रेत वाहात येते असा आभास निर्माण करते यातील सत्य शोधण्याकरिता हनुमत ते प्रेत जाळायला निघतो हे वानर आपल्याला जाळून टाकतील असे वाटल्यामुळे ती बिभीषणाची मुलगी चितेवरून उठते व पळून जाताना

आपला अपराध कबूल करते अशी एक उपकथा आहे सेतू बाधण्याच्या वेळी वानरानी समुद्रात टाकलेले दगड मासे खातात याचा शोध घेण्याकरता हनुमत जातो आणि त्याला रावणाची मुलगी सुवर्ण मत्स्यकन्या भेटते हनुमताचे तिच्यावर प्रेम बसते आणि तिच्या मदतीने तो सेतू बाधून पुरा करतो या साऱ्या उपकथा मोठ्या नाट्यमय रीतीने सादर केल्या जातात

रामायणातील नावाची काही बदललेली रूपे गमतीखातर पुढे देत आहे तोतसर्वत (दशरथ), कौसरिया (कौसल्या), कैरिया (कैकयी), सेमिरिया (सुमित्रा), नाराय (नारायण), वसित (वशिष्ठ), अकनिवट (अग्निवट), सीदा (सीता), सदायू (जटायू) थाय गोष्टीप्रमाणे लका ही मुळामध्ये ''रग का'' म्हणजे कावळ्याचे घरटे होते हनुमान हा स्वाहा या ऋषिकन्येचा मुलगा वायूने हनुमताला आणले आणि त्याला सर्व दैवीशक्ती दिली असाही उल्लेख आहे तीस महिन्याच्या गर्भधारणेनतर हनुमताचा जन्म झाला रामाचा वनवास, भरताचा त्याला परत येण्याचा आग्रह या गोष्टी वाल्मिकीप्रमाणेच आहेत लढाईची वर्णने मात्र स्वतत्रपणे वाचावी इतकी सुदर आहेत त्याच्या नाट्यरूपामध्ये ती अधिकच सुदर दिसतात थाय रामायणामध्ये सीतेला स्वत चे पावित्र्य सिद्ध करण्याकरिता अग्निपरीक्षा द्यावी लागली असा उल्लेख आहे चिता तयार केल्यानतर राम बाण आभाळात सोडून देवाना साक्ष म्हणून बोलावतो सीता अग्नीत उडी घेते पण तिच्या पायाखालून एक ज्वालाकमळ वर येते आणि ज्वालात राहूनही तिला ज्वालापासून अपाय होत नाही असा प्रसग नाट्यरूपात फारच छान दाखविला जातो छायानाट्य, रगभूमी किवा मुखवटे घालून केलेले नाट्य याहूनही रामकथेचा आणखी एक वेगळा आविष्कार थायलडमध्ये दिसतो आणि तो म्हणजे चित्राचा आणि शिल्पाचा ही चित्रे आणि शिल्पे देवळामध्ये आहेत कोरलेल्या चित्राप्रमाणेच दिसावी म्हणून त्यावर 'कागद घासून चित्रे तयार केली जातात ही चित्रेही (टेंपलस्क्रबिग) फार प्रसिद्ध आहेत

थायलडमध्ये भारतीय देवदेवताच्या मूर्ती फार सुदर आहेत अनेक ऋषींचे पुतळे आहेत थायलडमध्ये बँकॉकच्या विश्वविद्यालयाचे चिन्ह आहे 'हसवाहिनी वीणा धारण केलेली सरस्वती ' थायलडमध्ये गणेशाच्या मूर्ती पुष्कळ आहेत ती ज्ञानदेवता आहे बौद्ध देश असूनही त्या लोकजीवनात रामकथा फार रुजलेली आहे रामायण हे प्रत्यक्ष थायलडमध्येच घडले आहे असा थाय लोकाचा दृढ विश्वास आहे

रामकथेचा तेथील लोकमानसावर फार मोठा परिणाम झालेला आहे थायलडमध्ये आपल्याकडे असलेली ब्रह्मचारी हनुमताची कल्पना बदलून तो प्रेम करणारा गृहस्थ, एक ससारी पुरुष झाला आहे पुण्यान्मा अनेक तऱ्हेचे मारुती आहेत पण लग्न केलेला, रोमॅन्टिक मारुती हा फक्त थायलडमध्येच आपणास दिसतो थायलडच्या रामायणामध्ये हनुमान हा एक शृगारिक वीरपुरुष आहे मराठी लावणीबाबत जसे आपण म्हणतो की रग आणि रगेलपणा याला रसवतीची जोड मिळाली की लावणी होते तेथील हनुमानाच्या बाबतीत हीच गोष्ट झालेली आहे वीरता, शौर्य याचबरोबर शृगाराचा परिपोष त्याच्या उपकथानकामध्ये केला जातो याच्यामधून लोकसगीताचा आणि लोकनृत्याचा एक नवाच प्रवाह थायलडमध्ये निर्माण झाला आहे

## चीन

चिनी वाङ्मयामध्ये ज्याला प्रत्यक्ष रामकथा म्हणता येईल असे आख्यान आणि स्तोत्र उपलब्ध नाही पण सोळाव्या शतकात 'शियूची' नावाचे एक काव्य प्रसिद्ध झाले हे काव्य म्हणजे चीनमधून पश्चिमेकडे केलेल्या प्रवासाचे वर्णन असून त्याचे शीर्षक आहे 'वानर' सुप्रसिद्ध बौद्ध भिक्षूक ह्यू एन त्सग याची प्रवासवर्णने प्रसिद्ध आहेत त्यामध्ये रामायणाचा उल्लेख थोडाफार सापडतो परतु ज्या काव्याचे रामायणाशी साम्य आहे त्याचा नायक 'सून युकुग' नावाचा वानर आहे ही व्यक्तिरेखा हनुमताच्या व्यक्तिरेखेवर बेतलेली आहे असे स्पष्ट दिसते बेजिगमध्ये ''पेकिग सगीतिकेचा'' प्रयोग पाहताना मला तरी हे फार जाणवले बौद्ध वाङ्मयाचे भाषातर चिनी भाषेत झाले त्रिपिटकाचे भाषातर झाले त्यामध्ये रामकथेचा उल्लेख सापडतो जातक ही एका अनामिक राजाची कथा तेथे प्रसिद्ध आहे आणि सहा परमित स्तोत्राच्या सकलनात ही कथा प्रसिद्ध आहे पहिल्या गोष्टीमध्ये बोधिसत्त्व नावाचा एक सात्त्विक राजा असतो त्याचा दुष्ट मामा त्याचे राज्य घेण्याचा प्रयत्न करीत असतो परतु आपल्यामुळे राज्यावर आपत्ती येऊ नये या भीतीने बोधिसत्त्व राज्य सोडून पत्नीला घेऊन वनवासात जातो. रानामध्ये 'नाग' नावाचा दैत्य राणीचे अपहरण करतो एक प्रचड पख असलेला गरुड पक्षी, त्याचे पारिपत्य करू पाहतो परतु त्या गरुडाला मारून दैत्यराजा समुद्रपार करून जातो या कथेत जटायू आणि रावण याच्याशी असलेले साम्य स्पष्ट आहे आपली राणी हरवल्याचे पाहून

बोधिसख राजा शोक करू लागतो त्याला एक वानर राजा भेटतो हे वानर राणीचा शोध घेतात शोध घेत असताना त्याना जखमी झालेला गरुड पक्षी दिसतो तो त्याना राणीचा पत्ता सागतो ही वानरे समुद्रपार सेतू बाधतात आणि त्या दैत्य नागाच्या साम्राज्यावर हल्ला करतात शाक्य वानर त्या राज्यात प्रवेशून दैत्य राजाचा पराभव करतात आणि शेवटी राजाराणीचे मीलन होते पण आपली पत्नी दुसऱ्याच्या घरी राहिली असा लोक सशय घेतान, म्हणून राजा अस्वस्थ होतो, त्या वेळी ती राणी पृथ्वीची प्रार्थना करते आणि पृथ्वीच्या पोटात जाते या कथेत उत्कृष्ट प्रजापालन आणि राजाची कर्तव्ये याचा उल्लेख रामराज्यासारखा केला आहे

दुसरी कथाही अशा स्वरूपाची आहे त्या राजाचे नाव दहा रथ असणारा राजा असे आहे (दशरथ) हा जबुद्वीपावर (भारतावर) राज्य करीत असतो त्याला चार राण्या असतात त्याना चार पुत्र होतात त्याची नावे राम, लोमन (लक्ष्मण) अशीच असतात तिसऱ्या राणीला आधी दिलेल्या वराच्या पूर्तीकरिता राजा आपल्या थोरल्या मुलाचा त्याग करतो तिसरा भाऊ बारद (भरत) हा रामाला परत येण्याचा आग्रह करीत असतो इत्यादी कथा वाल्मिकीसारखीच आहे चिनी त्रिपिटकाचा अभ्यास करणाऱ्या प्राचार्य वाटानाबे या जपानी तज्ज्ञाच्या मते ही कथा एकट्यादुकट्याने लिहिलेली नसून अनेक भिक्षूनी मिळून ही कथा सागत सागत त्यात भर टाकली आहे असे दिसते चीनमध्ये रामायण भारतीय स्वरूपात दिसत नसले तरीसुद्धा एका वेगळ्या तऱ्हेने भारतीय रामायणाची छाया निश्चितपणे त्यावर आहे मात्र चिनी लोककथेत रामराजापेक्षा हनुमताला महत्त्व फार आहे नव्या कम्युनिस्ट राजवटीतसुद्धा, मुलाच्यासाठी समुद्रपार जाणाऱ्या वानराची चित्रकथा आणि पुस्तके प्रसिद्ध केली जात आहेत बेजिग संगीतिकेतही या कथेचा आविष्कार फार सुदरीतीने दाखवला जात असतो

• • •

१.

# रामकथेचा आविष्कार

भूगोलाच्या, भाषेच्या मर्यादा ओलाडून काळाचा पराजय करून रामकथा देशोदेशी रुजली परतु कथेचा मूळ आत्मा मात्र अविच्छिन्न राहिलेला आहे या रामकथेचे धागेदोरे अफगाणिस्तानपासून पूर्वेला फिलिपाईन्सपर्यंत आणि उत्तरेला मगोलियापासून खाली प्रशात महासागराच्या बेटापर्यंत गेलेले दिसतात, तेव्हा खरोखरच आश्चर्य वाटते मूळ रामायण कोणाचे, अयोध्या कोठे आहे हा वाद माझ्या दृष्टीने निरर्थक आहे रामायण भारतातील असो, थायलडमधील असो, नाही तर इडोनेशियातील असो, त्यातील मानवी मूल्याना खरे महत्त्व आहे

या रामकथेचा आविष्कार देशोदेशी कसा होतो, याचा तुलनात्मक विचार खूप महत्त्वाचा आहे भारतात नित्यनियमाने रामकथा गायली जाण्याची परपरा आहे कथा, कीर्तन, यक्षगान, लोककथा यातून ही कथा शतकानुशतके गायली जात आहे आणि मोठ्या भक्तिभावाने ऐकली जात आहे ग दि माडगूळकराच्या गीतरामायणाला सुरुवात झाल्यानतर रेडिओपुढे उदबत्त्या लावून ऐकणारे श्रोते होते, असे सागतात गायनाशिवाय या कथेचे चित्रीकरण आणि शिल्पीकरण हा रामकथेच्या आविष्काराचा दुसरा भाग आहे याविषयीची चित्रे भितीवर रगविणे, देवळाच्या ओटचावर चारी बाजूला कोरणे किवा या चित्राचे कातड्याचे कातीवकाम करणे, अशा माध्यमातून रामकथेची चित्रमालिका केली जाते थायलडमध्ये बहुतेक सर्व वटातून (देवळातून) रामकथेची प्रचड चित्रे आणि शिल्पे दिसतात अशा

तऱ्हेच्या चित्रकथा मलेशिया, ब्रह्मदेश येथे सुद्धा दृष्टीस पडतात परंतु इंडोनेशियातील वैशिष्ट्य असे की, याच्या पुढची पायरी म्हणजे तिला आता बाटीक कला म्हणून मानतात कापडावर लाकडी ठशाच्यामार्फत रामकथा रंगविण्याची पद्धत तेथेच निघाली अशा तऱ्हेची चित्रे श्रीलंकेतही दिसतात मलेशियामध्ये जवळजवळ संपूर्ण माणसाच्या आकाराची कातीव चित्रे आजही पाहावयास मिळतात अनेक जुन्या पोथ्यामधून त्या पोथ्या सचित्र करण्याची पद्धत आहे चित्रे रंगविण्याची पद्धत देशोदेशी बदलत गेलेली आहे अलीकडेच ब्रह्मदेशाच्या रामायणाची नवी आवृत्ती उपलब्ध झाली आहे ब्रह्मदेश, इंडोनेशिया किंवा थायलंड येथील रामकथा सर्वसामान्य लोकांच्यापर्यंत पोचविण्याकरिता नृत्य, संगीत, नाट्य, छायानाट्य, कळसूत्री बाहुली, चित्रे सर्व प्रकारच्या कलाविष्काराचा उपयोग केलेला आढळतो केरळमध्ये कथकली नृत्यात ही कथा मांडली जाते, त्या वेळी तिची वेशभूषा, रंगभूषा वेगळी असते परंतु या साऱ्या मागची, माणसाचे अंत करण हेलाविणारी कथा ही मात्र एकच आहे

रामकथेचा आणखी एक आविष्कार म्हणजे छाया - नाटके माझ्या दृष्टीने नाट्यकलेचा हा आदी अवतार म्हणावा लागेल एक पांढरा पडदा लावून त्याच्या मागे पात्राच्या होणाऱ्या हालचाली छायारूपाने दिसतात, अशी छायानाटके विशेष करून जावामध्ये आजही दिसून येतात छायानाटकातून विकसित झालेले रामायण हा या कलेचा वेगळाच आविष्कार आहे त्यामध्ये गाणारे गंधर्व आहेत इंद्र, प्रजापती या देवता आहेत, पण मनाला चकित करणारे हनुमंताचे उड्डाण, उपटून आणलेला पर्वताचा तुकडा हातात घेऊन आकाशमार्गे येणारा तो महान वायुदूत, लंकादहन, राम राज्याभिषेक, सुवर्णमृग इत्यादी अनेक कल्पना छायानाट्यात फार उठावाने दाखवल्या जातात कथातून, शिल्पातून, चित्रातून, गीतातून, छाया - नाटकातून, चित्रपटातून किंवा नाटकातून हजारो वर्षे या ४० देशाच्या प्रदेशात रामकथा प्रचलित आहे थायलंडमध्ये तेलकट कागद शिल्पावर घासून शिलाचित्रे करण्याची पद्धत आहे यामुळे या चित्रातून शिल्पाचा भास होत असतो रामायणातील बहुतेक सर्व भूमिका अतिशय सुंदर तऱ्हेने कागदावर शिल्परूपाने काढून विकण्याचा फार मोठा व्यवसाय थायलंडमध्ये चालतो आता अशीच कातीव - चित्रे म्हशीच्या कातड्यावर तयार करून ती विकली जातात हे कातडे कागदाइतके पातळ असल्यामुळे कातीवकाम सोपे होते आणि कातड्याचे

असल्यामुळे ही चित्रे टिकतातही पुष्कळ दिवस या चित्राच्या मागे जर प्रकाशयोजना केली तर ही चित्रे फारच उठावदार दिसतात

बौद्ध सस्कृतीचा जसजसा ठसा या जनमानसावर पडू लागला, तसतसे त्या समाजाला आवडतील असे रामकथेमध्ये थोडेफार फेरबदल करण्यात आले थायलडमधील लोक धर्माने बौद्ध, इडोनेशियातील लोक प्रामुख्याने मुसलमान त्यामुळे रामकथेच्या आविष्कारात अनेक उपकथानके जोडली गेली आहेत परतु रामकथेच्या मूळ प्रवाहात मात्र अजूनही खड पडलेला नाही आजसुद्धा या कथेचा सदर्भात, असलेले अनेक नृत्याविष्कार, चित्राविष्कार किवा शिल्पाविष्कार सर्व आशियात दिसून येतात प्रत्यक्षात राम कसा होता, त्याचे प्रत्यक्ष जीवन काय होते, हे रामालाच माहीत परतु आजसुद्धा थायलडमध्ये राम राजा आहे आणि आशियात सर्वत्र रामकथा नव्या नव्याने सस्कारित होऊन पुढे येत आहे काळाच्या प्रवाहाबरोबर कथा थोडीफार बदलते, पण कथेचा मूळ गाभा आणि तिचे सस्कारी सामर्थ्य मात्र अमर आहे गमत अशी वाटते की, कथा देशोदेशी जाऊनसुद्धा राजा राम या व्यक्तिचित्रातील साधर्म्य कायम आहे त्याहूनही आश्चर्याची गोष्ट म्हणजे मूळ वाल्मिकीने ज्या वृत्तात रामायण रचले त्याच वृत्तात अनेक भाषात रामकथा गायली जाते मूळ कथेतील प्रसगाची सख्या बदलली असेल पण नव्याने जी रामकथा पुन पुन्हा नटविली जाते, ती लोकमानसावर असलेल्या प्रभावाची निदर्शक आहे

ही रामकथा माडताना प्रत्येक कवीने किवा कलाकाराने आपापल्या वृत्तीप्रमाणे, सवेदनशीलतेप्रमाणे तिचे आविष्करण केले मैथिलीशरण गुप्त यानी वाचकाच्या डोळ्यापुढे प्रत्यक्ष चित्र उभे राहील, असे वर्णन केले पचवटी या काव्यामध्ये रामाच्यासमोर शूर्पणखा राक्षसी एका सुदरीचे रूप घेऊन येते तिचे वर्णन करताना मैथिलीशरण म्हणतात,

''चकाचौंध सी लगी देख कर,
प्रखर ज्योतिकी वह ज्वाला,
निस्सकोच खडी थी सन्मुख,
एक हास्यवदनी बाला.''

एका ज्वालेसारख्या तेजस्वी आणि सुदर असणाऱ्या स्त्रीच्या या दर्शनाने डोळे दिपविणारी वीज कडाडून समोर यावी, अशी एक प्रकारची आधी डोळ्यावर आली आणि डोळे उघडून पाहिले तो समोर एक हास्यवदना सुदरी उभी होती

हेच मैथिलीशरण साकेतमध्ये ज्या वेळी लक्ष्मणाची पत्नी उर्मिला हिच्या दु खाचे वर्णन करतात, त्या वेळी ते इतके हळवे होतात आणि म्हणतात,

“लाना लाना सखी तुली
छबी ऑखों में झूली।
आ, अंकित कर इसे दिखाऊ।
इस चितासे छुट्टी पाऊँ।
डरती हू फिर भूल न जाऊ
मैं हूँ भूली भूली।।”

“अग सखे, मला एक चित्र काढण्यासाठी एक कुचला दे माझ्या डोळ्यात राहणाऱ्या माझ्या प्रियतमाचे चित्र काढून दाखवते, म्हणजे तरी मला चितामुक्ती मिळेल आणि खरे म्हणशील तर मला भीती वाटते की, कदाचित मनी ठसलेली ती मूर्ती विसरून तर जाणार नाही ना? कारण मी तर बाई अशी विसरभोळी ” उत्कट, विरहामध्ये कधीच विसरू न शकणारी, गोष्ट विसरून जाईन म्हणणारी उर्मिला हे केवळ मैथिलीशरणच रगवू शकतात

रामायणाचा खरा अमृतयोग कुठला असेल तर तुलसी रामायण त्यामध्ये सर्व पात्रात भरताचे चरित्र फार सुदर रगविले आहे तुलसी रामायणात अयोध्याकाड हे तर चूडामणी मानले जाते त्यात महाकवी तुलसीदास म्हणतात,

“दुहुदिसी, समुझी कहत सब लोगू
सब विधि भरत सराहन जोगू ”

तुलसीदास म्हणतात की, राम आणि भरत दोघाची तुलना केल्यावर सर्व लोक म्हणतात की, कुठल्याही निकषावर भरताचे चरित्र अधिक श्रेष्ठ मानले पाहिजे आणि त्याचेच कौतुक केले पाहिजे कारण वडिलाच्या आज्ञेचे पालन म्हणून राम वनात गेला, पण बापाने राज्य देऊनसुद्धा त्याचा त्याग करून रामाच्या पादुकाची पूजा करत भरत राहिला राम आपल्या पत्नीबरोबर, बधूबरोबर वनवासात एकापरीने वैभव भोगत राहिला आणि वैभवात राहूनसुद्धा भरत हा वनवासी झाला अयोध्या काडात आलेला हा अतिम छद मला फार फार आवडतो

रामायणात असा एक प्रसग आहे की, सीता नाहीशी झाल्यानतर तिच्यासाठी शोक करीत राम फिरत असतो तो झाडाना विचारतो, आकाशाला विचारतो, की “अरे माझी सीता कोणी पाहिली का?” त्याला कोणीच उत्तर देत नाही पुन्हा

डोंगराकडे तोंड करून "सीते" अशी हाक मारल्यानतर डोंगरातून प्रतिध्वनी बाहेर येतो तेव्हा राम म्हणतो, "दु खी माणसाच्या हाकेला प्रतिसाद देण्याकरिता मोठ्या अत करणाचाच माणूस लागतो " अशी रचना इडोनेशियातील रामायणात दिसते राजसन्यास घेऊन वनात गेलेला राम समुद्राच्या लाटाना म्हणतो, "तुम्ही पुढे येता आणि मागे जाता. आता कशाकरिता माझ्याजवळ याल ? सुकलेल्या झाडाखाली बसायला कोण येणार ? राज्य नसलेल्या राजाकडे सागराच्या लाटासुद्धा येत नाहीत अधार झाला की माणसाची सावलीसुद्धा त्याच्याजवळ राहात नाही हेच खरे "

या साऱ्या कथानकातून एक श्रेष्ठ तत्त्वज्ञानाचा खास भारतीय असा धागा आहे राजा असो, परीट असो शेवटी तो मातीचा आहे 'पुत्र मानवाचा' आहे, म्हणून कविवर्य ग दि माडगूळकर म्हणतात,

"जरा - मरण यातुन सुटला कोण प्राणिजात,
दु ख मुक्त जगला का रे, कुणी जीवनात
तात स्वर्गवासी झाले, बधू ये वनात,
अतर्क्य ना झाले काही, जरी अकस्मात,
मरणकल्पनेसी थाबे, तर्क जाणत्याचा
पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा
खेळ चाललासे माझ्या पूर्वसचिताचा"

मला खात्री आहे देश बदलला, वेष बदलला, काळ बदलला, आविष्कार बदलला तरी रामकथा ही गगेच्या प्रवाहाप्रमाणे अखड वाहत राहणार आणि आशियातील लोकजीवन समृद्ध करीत राहणार

• • •

भाग तिसरा

# चीन आणि जपान

ग्रं-प्रवा
ग्रा. क्र. ६४८

१०.

# आठवण : जळणाऱ्या दोन दिवसांची

हिरोशिमा आणि नागासाकी या दोन शहरावर अणुबॉम्ब टाकण्याच्या घटनेला ४५ वर्षे झाली हिरोशिमावर ६ ऑगस्टला हा आगीचा पाऊस पडला आणि नागासाकीत ९ ऑगस्टला मृत्यूचे तांडव सुरू झाले, त्याचा शेवट जपानच्या शरणागतीत आणि दुसरे महायुद्ध संपविण्यात झाला परवा जपानमध्ये गेलो असताना टोकियोमध्ये या भीषण दिवसाच्या आठवणी चित्रित करणाऱ्या एका चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन करण्याचा योग आला या प्रदर्शनामध्ये पहिलेच चित्र इतके विलक्षण प्रभावी होते की, ते पाहताना मानवतेची वेदना त्या रेषातून प्रकट होत होती गुडघे पोटाशी घेऊन पालथी बसलेली एक आई पोटाखाली आलेल्या आपल्या दोन लहान मुलाना वाचविण्यासाठी दोन्ही हाताची पाखर त्याच्यावर घालते आहे आणि वर आभाळाकडे पाहणाऱ्या दोन जिवत मुलानी भीतीने आईच्या पाठीवर घट्ट रोवून धरलेले हात इतके बोलके आहेत की, जणू साऱ्या मानवजातीचे आक्रदन त्या मुलाच्या हातामधून दिसत राहत खिडकीतून दिसणाऱ्या आगीच्या ज्वाळा आणि पळून जाण्यासाठी बद दार ठोठावणाऱ्या पण ते न उघडल्यामुळे मरून गेलेल्या एका मुलाचे चित्रही खूप परिणामकारक होते ज्या वेळी हा बॉम्ब पडला, त्या वेळी मोडलेले एक घड्याळ अजूनही बॉम्ब पडल्याची - रात्रीचे अकरा वाजून दोन मिनिटे ही वेळ तशीच दाखवत आहे जणू सगळा काळ त्या ठिकाणी थाबून राहिला आहे

हिरोशिमा आणि नागासाकी याच्या अत करणाला डाग देणाऱ्या

अनुभवानेसुद्धा कोणी काही धडा घेतला आहे असा पुरावा अजूनही उपलब्ध नाही अमेरिका, रशिया यांची शस्त्रस्पर्धा कमी होते असे वाटावे'तोच इराकचे युद्ध पेटून उठते याविषयी चर्चा करीत असताना प्रसिद्ध तत्त्वज्ञ डॉ योशीदा म्हणत होते की, "दुसऱ्या महायुद्धानंतर जपान सपूर्ण बदलला आणि याचे कारण त्यानी घेतलेला हिरोशिमा आणि नागासाकीचा अनुभव " जपानमधील माणसे खूप काम करतात, खूप उद्योगशील आहेत, त्यामुळे भारतामधल्या फलाशारहित कर्मयोगाशी त्याचे नाते जुळलेले आहे त्या रात्री डॉ योशीदा यानी मला एका ग्रथाचे दोन भाग आणून दिले पुस्तकाचे शीर्षक आहे 'साक्ष दोन दिवसाची' या पुस्तकामध्ये या दोन दिवसात ज्या मरणभोगाचा अनुभव हिरोशिमा आणि नागासाकी इथल्या नागरिकानी घेतला त्या अनुभवाचे रोखठोक कथन आहे ही साधी माणसे आहेत या हजार माणसाच्या लिहिण्यात लालित्य नसेल, शैली नसेल, परतु हा अनुभव इतका जिवत आहे की, त्या शब्दापलीकडे आणखी काही सागावयाची गरजच उरत नाही यापुढे माणसाच्या इतिहासात पुन्हा हिरोशिमा आणि नागासाकीची वेळ येऊ नये या एकाच बुद्धीने शाततेच्या चळवळीला पाठिंबा म्हणून या लोकानी आपल्या अत करणातील व्यथा शब्दरूप केली हा अनुभव पचवून जिवत राहिलेले तेरा हजार नागरिक आज जपानमध्ये आहेत त्यापैकी एक हजारजणाचे निवडक अनुभव या पुस्तकात आहेत या दोन दिवसामध्ये जे काय घडले आणि त्यानतर तुम्ही जे अनुभवले त्याचा तुमच्या स्मृतीवर कोणता ठसा उमटलेला आहे आणि अजूनही तुम्हाला मानवजातीच्या भविष्याबद्दल चिता वाटते, ती काय आहे, या दोन प्रश्नाच्या भोवती ही आत्मकथने विणलेली आहेत

## गोठलेले दु:ख

ज्या रीतीने अणुबॉम्बच्या स्फोटात हजारो स्त्रिया आणि मुले मेली, त्याच्या मरणाला माणसाचे मरण म्हणताच येणार नाही या माणसाच्या भावना बधिर झालेल्या आहेत, त्याचे दु ख जणू इतके गोठले आहे की, त्यातून शब्द फुटू नये अनेक माणसे बॉम्बस्फोटानतर पळून गेली, त्याच्याभोवती जखमी होऊन पडलेल्या हजारो माणसाच्या 'अहो मला थेंबभर पाणी तरी द्या' असा टाहो फोडणाऱ्या मागण्याकडे दुर्लक्ष करून ही माणसे पळाली ज्यानी स्वत चा जीव वाचविला त्याच्या मनात जन्मभर अशी खत राहिली की, त्या दिवशी आपण माणुसकीला

विसरलो जे मरणाच्या भोज्याला शिवून परत आले त्याच्या दृष्टीने हा अनुभव ही जन्मभर सोसावयाच्या दु खाची केवळ सुरुवात होती ज्या ठिकाणी बॉम्ब पडला त्या 'शून्य लक्ष्य' जागेला आता 'ग्रॅाउड झीरो' म्हणतात त्या ठिकाणी कोसळलेली भग्न इमारत अजून तशीच भग्न अवस्थेत ठेवलेली आहे जणू साऱ्या जगाला सागायला की, 'नरेच केला किती हीन नर', याची जाणीव असू द्या, म्हणजे पुन्हा तुमच्या अगातला पशू जागा होणार नाही

या दोन दिवसाची शोकातिका ज्या शब्दात व्यक्त झाली त्यातले काही उतारे आज 'केसरी'च्या वाचकापुढे ठेवावेत असे वाटते हेतू इतकाच की, त्या कथन करणाऱ्याच्याच शब्दात सागायचे तर 'हे वाचून अणुबॉम्बने केलेला भीषण सहार तुमच्या डोळ्यापुढे उभा राहिला आणि मरणाऱ्या माणुसकीचे आक्रदन तुमच्या अत करणापर्यंत पोचले तरी या लेखनाचे सार्थक झाले'

## वाचवू शकलो नाही

अणुबॉम्बच्या स्फोटाच्या वेळी १६ वर्षाचा असलेला एक मुलगा लिहितो, 'आमचे घर कोसळत होते, बॉम्बच्या पहिल्याच फटक्यात ते जमीनदोस्त झाले आणि या घराखाली माझी आई चेंगरून ठेचली जाऊन मरताना माझ्या डोळ्यानी मी पाहिले मी काही कौले, तुळया बाजूला करून तिच्यापर्यत पोचायचा प्रयत्न केला, परतु पोचू शकलो नाही दोन तुळयाच्या फटीतून पालथी पडलेली आई मी पाहात होतो रक्ताळलेला चेहरा उचलून ती आक्रदत होती, 'अरे माझ्या पाठीवरचे ओझे दूर करा' आणि हे म्हणेपर्यंत आगीचा लोळ चारही बाजूनी आम्हाला पकडायला धावत येत होता शेवटी तिला सोडून मी जीव वाचवायला पळू लागलो, पण माझ्या कानावर तिची मरणकाळची प्रार्थना आणि आक्रोश येत होता माझे अत करण विदीर्ण झाले होते मला वाटते, माझ्या आईला मरताना काय वाटले असेल? अगावर पडलेल्या तुळयाचे ओझे, आणि तोंडासमोर येणारा जाळ आपली बुबळे जाळतो आहे, समोर मुलगा असूनही काही करू शकत नाही मला वाटते मला काहीतरी करता आले असते निदान तिच्याबरोबर मरता आले असते, पण तेही मी केले नाही माझ्या असहाय्यतेतून तिचे मरण ओढवले हे अणुबॉम्ब, ही अण्वस्त्रे याचा मी तिरस्कार करतो; मी युद्धाचा तिरस्कार करतो युद्ध असो, शाततेची आतरराष्ट्रीय गरज असो, या क्रौर्याचे ते समर्थन होऊच शकत नाही माझी बहीण

दहावीत होती तिला युद्धकाळात बराकी साफ करण्याचे काम दिले होते बॉम्ब पडल्यानतर मी महिनाभर तिला शोधायचा प्रयत्न केला, पण ती सापडलीच नाही मला पुष्कळदा वाटते, आपला थोरला भाऊ आपल्याला वाचवायला येईल असे तिलासुद्धा वाटले असेल, पण मी पळून गेलो, तिला शोधले नाही तिच्या मरणालाही मीच जबाबदार आहे माझा जीव वाचवून मी पळू लागलो, त्या वेळी वाटेत एक जळणारा माणूस मी पाहिला त्याचे सर्व अग पेटले होते 'धावा धावा, वाचवा वाचवा' असे म्हणून तो माझ्याकडे येऊ लागला परतु तो आपल्याला चिकटला तर आपणही पेटू म्हणून त्याच्यापासून मी आणखीनच लाब पळालो याही माणसाला मी वाचवू शकलो नाही, याची एक कडू आठवण कायम मनात रेंगाळते आहे ज्यानी अशी क्रूर कृत्ये केली ते दोषी आहेतच, परतु आपल्याबरोबरच्या लोकाना वाचवू न शकलेलो मी, मीसुद्धा याला जबाबदार नाही का ?'

हिरोशिमाजवळच असलेला व त्यातून वाचलेला ३३ वर्षांचा एक म्हणतो, 'पृथ्वीवर नरक अवतरला होता जळून कोळसा झालेली प्रेते पसरलेली होती, मरून पडलेल्याचे चेहरे इतके भेसूर होते की, जळाल्यामुळे त्याचे आकार दुप्पट - तिप्पट झाल्यासारखे वाटत होते बॉम्ब पडलेले मी पाहिले आहेत, परतु हा बॉम्ब पडल्यानतर लोकाच्या अगातून आणि जखमातून वळवळत येणारे किडे मी प्रथमच पाहिले आणि साऱ्या माणूसजातीचा, माणसाच्या तथाकथित विज्ञानाचा मी तिरस्कार करू लागलो आहे गावातल्या नदीत प्रेताचा खच पडला आहे शेकडो माणसे येऊन उलथापालथ करून कोणी आपली आई, कोणी आपले भाऊ, कोणी आपला मुलगा शोधत आहेत या सगळीकडे इतकी दुर्गंधी सुटलेली आहे की, पळून तरी कोठे जावे असा प्रश्न मनात येतो आजसुद्धा कुठेही ॲम्ब्युलन्सचा आवाज ऐकला की मनात आल्यावाचून राहात नाही की या माणसाना अजून काही वर्षे तरी जगता आले असते पण त्यानी जगून तरी काय करायचे ?

## काळा पाऊस

या बॉबमध्ये काय होते कोण जाणे ? पण या आगीत सापडलेल्या माणसाचे डोक्यावरचे सगळे केस क्षणार्धात नाहीसे झाले, त्याच्या अगावरची त्वचा डोक्यापासून पायाच्या अगठ्यापर्यंत सोलून निघाली एक जळलेला चेहरा त्यामध्ये डोळ्याचे आणि नाकाचे फक्त भोक आणि बाकी सर्व मुखवटा जळून गेलेला त्या

गावात एक आई वेडीपिशी होऊन दिवसामागून दिवस आपले मूल सापडेल म्हणून भिरभिर हिंडत होती त्या आईचे दु ख इतके तीव्र होते की. ही बाई मूल सापडत नाही म्हटल्यानतर जी गप्प झाली ती अजून बोलतच नाही माणसे जळून काळीठिक्कर झाली होती पाण्याच्या एका थेंबासाठी आक्रोश करीत होती, परतु जळालेल्या माणसाना पाणी देऊ नका, कारण त्यामुळे त्याच्या वेदना तीव्र होतील असे सागितल्यामुळे पाणी असून दिले नाही, म्हणून माणसे काही मरायची राहिली नाहीत असे वाटते की, पाणी दिले असते तर त्याना निदान शात मरण तरी आले असते आपली जवळची माणसे मरत असताना त्याना सोडून जाणे याला 'माणुसकीचे मरण पाहिले म्या डोळा' यापेक्षा वेगळे काय म्हणणार? शेकडो प्रेते एका ठिकाणी रचून त्याना अग्नी देण्यात आला तो जाळ माझ्या डोळ्यापुढे अजून आहे शेकडो विधवा, पुत्रवियोगाने वेड्या झालेल्या आया, आईबाप मेल्यामुळे पोरकी झालेली मुले, या साऱ्याचे अश्रू एकत्र करूनसुद्धा हा जाळ जळतच आहे '

पधरा वर्षांची एक मुलगी लिहिते, 'आभाळातून प्रकाशाचा लोळच्या लोळ माझ्या डोक्यावर पडला काय होते कोण जाणे पण काळ्याशार पावसाच्या धारा कोसळत होत्या त्या धडाक्याने मी जी उचलली गेले ती सामानाच्या ढिगाऱ्यात कोडून पडले माझ्या दृष्टीने कठ कोरडा पडेल इतक्या जोराने ओरडत होते, पण आईला ऐकूच जात नव्हते माझा चेहरा आणि हात यात काचाच काचा गेल्या होत्या औषध म्हणून तिने माझ्या चेहऱ्यावर आणि हातावर 'मर्क्युरी क्रोम'ची वाटलीच पालथी केली सगळीकडे आगीचा डोंब उसळत होता निष्प्राण झालेली माणसेसुद्धा जीव एकवटून पळत होती जळालेली. सुजलेली, काळीठिक्कर पडलेली, सालडी सोललेली माणसे अगाची आग विझविण्याकरिता नदीत उड्या मारत होती त्याच्या रक्ताने नदीचे पाणी लाल झाले होते फुगलेली प्रेते वाहात जात दिसताना किळसवाणे दिसत होते काही लोक काठ्यानी प्रेते एकत्र आणून त्याचा ढीग करीत होती प्रेताच्या जखमात वळवळणाऱ्या अळ्या, घोंगावणाऱ्या माश्या त्या जाळात जळून गेल्या इच्छा एवढीच की, यातून माणसाच्या मनातील किल्मिष जळून जावे आणि खाली उरावी ती दुर्मिळ माणुसकीची ओळख हे घडेल काय?'

• • •

११.

# अखेरचा सम्राट

सिनेमा पाहायला काही परदेशी जावे लागते असे नाही, परतु परदेश दौऱ्यात शनिवार, रविवार मिळाला तर मोकळेपणाने चित्रपटगृहात जाऊन बसता येते आणि नवीन नवीन चित्रपट बघायला मिळतात परदेश दौऱ्यामध्ये मी अलीकडे खूप गाजलेला चित्रपट 'शेवटचा सम्राट' (लास्ट एम्परर) पाहिला आज ना उद्या तो इकडे पाहायला मिळेल परतु ज्या चित्रपटाला जास्तीत जास्त म्हणजे नऊ ऑस्कर पारितोषिके मिळालेली आहेत, तो चित्रपट बघण्याची इच्छा तर होतीच आणि म्हणून मुद्दाम आवर्जून चीनच्या शेवटच्या सम्राटावर काढलेला हा चित्रपट पाहिला फार वर्षांत इतका चागला सिनेमा पाहायला मिळाला नाही

सिनेमाची सुरुवात मान्चूरियामधील एका घरामध्ये येणाऱ्या निरोपाने होते चीनच्या विधवा सम्राज्ञीला चीनचा नवीन सम्राट होण्याकरिता मुलगा शोधावयाचा होता आणि त्यासाठी या राजलक्षणी मुलाची निवड झालेली आहे घाईघाईने या मुलाला बीजिंगमध्ये आणले जाते राजवस्त्रे चढविली जातात आणि ज्याला 'बदिस्त नगर' (फॉरबिडन सिटी) असे म्हटले जाते, त्या चीनमध्ये नव्या सम्राटाचा प्रवेश होतो वर्टोलुची या इटॅलिअन निर्मात्याने हा चित्रपट निर्माण करून 'लास्ट टँगो इन पॅरिस' या आपल्या चित्रपटाची परपरा उच्चकोटीला नेली आहे या चित्रपटात शेवटच्या चिनी सम्राटाचे, गिओरो पु-याचे काम चागले झाले आहे या तीन - चार वर्षांच्या मुलाने कमालीचे सुदर काम केले आहे, त्याला जेव्हा गादीवर बसवितात

आणि त्याच्यासमोर एकामागून एक फर्माने वाचून दाखविली जातात, त्या वेळेला हा मुलगा बसून बसून इतका आळसावतो, जाभया देतो, इतका कटाळतो की शेवटी कलडून झोपी जातो चीनसारख्या पारपरिक समाजात सम्राट हा तर देवावतार मानला जातो त्यामुळे हा लहान मुलगा जिथे जाईल तिथे छत्रचामरे घेऊन सेवकवर्ग धावत असतो दासी मुजरे करत पळत राहतात ज्या वयात मुलाने खेळावयाचे, बागडावयाचे त्या वयात हा मुलगा परपरेच्या जोखडात बाधला जातो जुनाट परपरेचा कैदी होतो या शहराच्या मधल्या चौकात रक्षकाची सैन्यदले सम्राटाच्या रक्षणाला उभी असतात हा मुलगा दिसला की सर्वजण माना खाली घालून नमस्कार करून स्तब्ध राहतात अशाच एका प्रसगात त्या मुलाला एक रातकिडा ओरडताना ऐकू येतो आणि हा मुलगा रातकिड्याच्या शोधात त्या सैन्याच्या गर्दीत शिरतो शेवटी त्याला एक सैनिकाजवळ हा रातकिडा सापडतो तो सैनिक, सम्राट आपल्याशी बोलला, याचे अपरपार कौतुक चेहऱ्यावरून ओसडत त्या मुलाला म्हणतो, ‘‘हा रातकिडा मी पाळलेला आहे त्यासाठी एक लाकडी डबी केली आहे त्याला हवेकरिता भोके ठेवली आहेत तो मी तुम्हाला देतो पुढेमागे तुमचे लग्न होईल, त्या वेळी तुम्हाला तो तुमच्या मुलाबाळाना देता येईल '' हा छोटा राजा लाकडी डबीमधला तो रातकिडा घेऊन सिहासनावर जाऊन बसतो आणि सिहासनाच्या गादीखाली ती डबी लपवून ठेवतो या छोट्या सम्राटाला त्याच्याबरोबर खेळायला कोणीच नसते, त्यामुळे त्याने आपल्या कोटाच्या लाबलचक बाहीत एक पाढरा उदीरही पाळलेला असतो शेवटच्या सम्राटाचे हे गुपित फक्त त्याला आणि त्याच्या शिक्षकाला माहीत असते पुढे सम्राटाला शिकविण्याकरिता जॉन्स्टन म्हणून एक स्कॉटिश शिक्षक नेमले जातात ब्रिटिश विद्येच्या परपरेमध्ये पारगत असणारा हा शिक्षक या चलाख विद्यार्थ्याला उत्तम तऱ्हेने तयार करतो त्या दोघाची पहिली भेट होते, त्या वेळचे सवाद फारच प्रभावी आहेत

हा मुलगा त्या शिक्षकाना विचारतो, ‘‘तुम्ही कोठून आलात ?'' शिक्षक म्हणतात, ‘‘स्कॉटलडमधून '' छोटा सम्राट म्हणतो, ‘‘मग स्कर्ट कसा घातला नाहीत ?'' शिक्षक म्हणतात, ‘‘त्याला स्कर्ट म्हणत नाहीत त्याला किल्ट म्हणतात '' सम्राट म्हणतो, ‘‘शब्दाशब्दामध्ये काय एवढा फरक ? स्कर्ट काय किंवा किल्ट काय ?'' शिक्षक म्हणतात, ‘‘ज्याला आपले मन निश्चितपणाने व्यक्त करावयाचे असते, त्याला निश्चित शब्द माहीत असावे लागतात '' यानतर तो छोटा

सम्राट म्हणतो, "कन्फ्युशस असे म्हणतो. ज्ञान म्हणजे तरी काय? किंवा जाणणे म्हणजे तरी काय? आपल्याला काही कळत नाही हे कळणे ही तर ज्ञानाची सुरुवात "

या शिक्षकाबरोबर हा मुलगा इंग्रजी, लॅटिन, फ्रेंच शिकू लागतो पण याच वेळेला हळूहळू त्या मुलाच्या लक्षात येऊ लागते की, आपण सम्राट फक्त नावाचेच कायम या बंद शहरामध्येच राहावयाचे याच्या बाहेर जायची आपल्याला परवानगी नाही मी बाहेर पळून जाणार म्हणून हट्टाने हा मुलगा छपरावर चढतो कारण दरवाज्यातून बाहेर जायला त्याला रक्षकानी बंदी केलेली असते त्या वेळी या मुलाला चष्मा हवा, असे या शिक्षकाच्या लक्षात येते, म्हणून ते डॉक्टराना बोलावतात चष्मा हवा असे ठरल्यानतर चीनची विधवा सम्राज्ञी किंवा याची मानलेली मावशी म्हणते, "सम्राटाने चष्मा लावायचा नसतो " यावर तो शिक्षक म्हणतो, "मी सगळ्या वृत्तपत्रात जाहीरपणाने सागेन की, राजवाड्याचा लॉर्ड चेंबरलेन म्हणजे कोठारी आणि राणीसाहेब या दोघानी मुलाला चष्मा न दिल्यामुळे चीनचा सम्राट आंधळा झाला " ही धमकी दिल्यानतर चष्मा आणला जातो या राजवाड्यातल्या त्या राण्या, ते कोठारी, ते हिजडे सार्‍याचा स्वार्थ या सम्राटाला नामधारी बनवून ठेवायचा आणि आपले उखळ पाढरे करायचे यात असतो परपरेशी हा झगडा कसा वाढत जातो हे पाहणे फार मनोरजक आहे शिक्षक त्या मुलाला सायकल आणतो पुन्हा म्हटले जाते. सम्राटाने सायकलवर असायचे नसते पण हा छोटा सम्राट हट्टाने सायकल चालवतो यानतर बाहेर क्राती आल्यामुळे अध्यक्ष मोटारगाडीमधून येतो त्या वेळी हा सम्राटही म्हणतो, मला अशीच गाडी हवी, पण यानतर शिक्षक त्याला असे सुचवतो की, चीनमध्ये क्राती झालेली आहे इथे पुन्हा राजेशाही निर्माण होणे अशक्य आहे तेव्हा तो त्याला युरोपमध्ये अभ्यासासाठी जायला सुचवितो राजवाड्याच्या चौकात टेनिस खेळत असतानाच मुक्तिसेनेचे सैनिक तेथे येतात आणि म्हणतात, "तुम्हाला एक तासाचा अवधी दिलेला आहे, सामान आवरा आणि चालू लागा " याआधी मनाविरुद्ध का होईना, सम्राटाचे लग्न करून देण्यात येते त्याला एक राणी आणि शिवाय आणखी एक दुसरी बायको (कन्सॉर्ट) करून देण्यात येते सुदैवाने त्या मुलीलाही इंग्रजी आणि फ्रेंच येत असल्यामुळे आणि तिचे विचार प्रगल्भ असल्यामुळे त्याचा ससार मार्गाला लागतो असे वाटते पण इतक्यात त्याना हद्दपारीची सूचना आल्यामुळे सम्राट म्हणतो,

''आजवर या राजवाड्याच्या बाहेर जावे, जग पाहावे असे एकसारखे वाटे पळून जावे असेसुद्धा वाटे पण आज येथून जा म्हटल्यानतर माझे मन या बंदिस्त नगरात गुतलेले आहे असेच मला वाटू लागले आहे'' एक साधा मुलगा राजपरपरेत जखडला जातो खराखुरा राजा व्हायला बघतो पण या सघर्षात त्या सम्राटाची सत्ता जाते, राजपद जाते आणि शेवटी स्वातत्र्यही जाते यानतर जपानी दूतावासाच्या प्रभावाखाली येऊन सम्राट युरोपमध्ये जातो रग आणि रगेलपणात गुतून जातो गाऊ लागतो आणि त्याच वेळेला चीनमधल्या सरजामदाराच्या विरुद्ध चँग - कै - शेक यानी बड पुकारल्याची बातमी येते मी जन्मजात राजा आहे मॉन्चुरियात का होईना, जपानच्या मदतीने का होईना, पण मी पुन्हा सम्राट होईन म्हणून त्याची महत्त्वाकाक्षा उसळी घेऊन वर येते जपानी राजकारणी मडळी त्याला खतपाणी घालतात आणि हा राजा मॉन्चुरियाचा सम्राट होतो पण या साऱ्यात जपानी राजकारण असते रशिया आणि चीनवर वर्चस्व ठेवून त्या भागावर ताबा ठेवण्यासाठी त्याना एक कळसूत्री सम्राट हवा असतो जपानच्या पर्ल हार्बरवरच्या हल्ल्यानतर हिरोशिमावर बॉब टाकला जातो जपानी सम्राट शरण येतो आणि जपानी विमानातून पळून जात असताना हा शेवटचा चिनी सम्राट पकडला जातो तो तुरुगात असताना त्याला आपले चरित्र लिहायला सागितले जाते त्याचे मनोविचार बदलून तो कम्युनिस्ट व्हावा म्हणून त्याला शिकविले जाते माओ - त्से - तुगच्या पद्धतीने त्याचे पुन शिक्षण होते आणि याचा परिणाम म्हणून एकेकाळचा हा सम्राट सारे काही विसरून जाऊन एक साधा कामगार, माळी बनतो त्यात झालेल्या या सुधारणामुळे, विचाराच्या बदलामुळे त्याला तुरुगातून सोडण्यात येते एका अर्थाने 'शेवटचा सम्राट' हे एक प्रतीक आहे, त्याला चार भितींच्या आत कोंडले आहे, आपण सगळेच जण आपल्याला अशाच पिंजऱ्यात कोंडून घेत असतो

नतरच्या दृश्यामध्ये बीजिगला नेहमी जसे दिसते तसे दृश्य दिसते हजारो कामगार सायकलवरून कारखान्यात जात असताना हा सम्राटदेखील सायकलवरून जातो चित्रपटाचा शेवट फारच प्रभावशाली आहे बदिस्त असलेली ही नगरी बघायला अनेक प्रवासी येतात एक दिवस हा अखेरचा सम्राट त्या नगरात प्रवेश करतो पोक आलेला, वार्धक्याने वाकलेला हा सम्राट पायऱ्या चढत चढत दरबाराच्या सभागृहामध्ये असलेल्या त्या सिंहासनाकडे पाहतो आणि त्याच्या पायऱ्यापर्यंत पोहोचतो भोवतालची लाल दोरी ओलाडून तो पायऱ्या चढू लागतो

एवढ्यात एक लहान मुलगा ओरडतो, ''थांबा'' सम्राट त्याला विचारतो, ''तू कोण आहेस?'' तो मुलगा म्हणतो, ''मी एक 'स्काउट' स्वयंसेवक आहे हे सिंहासन चीनच्या सम्राटाचे आहे इथे राज्याभिषेक झालेला सम्राटच वर जाऊन बसू शकतो '' शेवटचा सम्राट त्याला म्हणतो की, ''अरे मीच शेवटचा सम्राट आहे या गादीवर मीच एके काळी बसलो होतो ''

तो लहान मुलगा अविश्वासाने मिस्किलपणाने हसतो आणि म्हणतो, ''कशावरून? मला सिद्ध करून दाखवा ''

आणि तो शेवटचा सम्राट पटापट पायऱ्या चढून राजगादीवर बसतो, मनमोकळे हसतो आणि गादीखालून ती लाकडी डबी काढतो की ज्यामध्ये त्याचे गुपित असते त्याने एक रातकिडा ठेवलेला असतो, ती डबी मुलाच्या हातात देत तो म्हणतो, ''आता तरी विश्वास बसेल ना? हे शेवटच्या सम्राटाचे गुपित फक्त मलाच माहितीये ''

तो मुलगा डबीचे झाकण उघडतो आत काहीच नसते इथे या प्रसंगाला फार वेगळेच वळण दिग्दर्शकाने दिलेले आहे बघता बघता त्या डबीतून खरोखरी एक रातकिडा बाहेर पडतो नकळत समाज बदलतो संदर्भ बदलतात तो मुलगा हसतो आणि मान वळवून सिंहासनाकडे बघतो तिथे सम्राट नसतो इथेच चित्रपट संपतो

एका विलक्षण ताकदीने तयार केलेला हा चित्रपट आहे. शेवटच्या सम्राटाचे शिक्षक जॉन्स्टन यांनी 'बंदिस्त शहरामधली संध्याकाळ' या नावाचे एक आठवणीचे पुस्तक लिहिले आहे त्याच्या आधारे हा चित्रपट करण्यात आला आतापर्यंत तिकिटविक्रीतून '१५० दशलक्ष डॉलर्स' मिळालेले आहेत आणि अजून किती उत्पन्न मिळेल याला अंत नाही परंतु या चित्रपटामध्ये ज्या दोन-तीन नटांनी सम्राटाचे काम केले तो लहान मुलगा, तरुण मुलगा, शिक्षक या साऱ्या नटांनी आपल्या अभिनयकौशल्याची कमाल केलेली आहे चित्रपटाचे चित्रीकरण खुद्द बीजिंगमध्येच केल्यामुळे खूप वास्तव आणि भव्य झालेले आहे

हा चित्रपट पाहून घरी येताना मी आठवत होतो की, इराणमध्ये शाह राजसत्तेवर असताना मी सल्लागार म्हणून गेलो होतो त्या वेळचे वैभव हे जनतेच्या शोषणातून आलेले असले तरी त्याचा आविष्कार शाह, शाहबानू, त्यांचे मंत्री सर्वांच्या वागण्यात दिसत असे इराणच्या समाजकल्याणमंत्री डॉ कोकाने मोराफे यांनी मी तेहरानमध्ये गेल्याबद्दल स्वागताप्रीत्यर्थ जे जेवण दिले, त्या शंभर

माणसाच्या जेवणात कॅव्हीए (अत्यत महाग असणाऱ्या माशाची अडी आणि शँपेन) अशी सुरुवात केली होती देशात क्रातीचे वादळ दिसू लागल्यावर डॉ मोराफे नवऱ्याला आजारपण आले, असे सागून उपचारासाठी अमेरिकेत निघून आल्या त्या परत गेल्याच नाहीत त्याची न्यूयॉर्कमध्ये गाठ पडल्यानतर माझ्या लक्षात आले की, बाईच्या जवळ पैसे जरी असले, तरी राजवैभव मात्र काही शिल्लक नाही त्याचा कडूपणा त्याच्या शब्दाशब्दातून व्यक्त होत होता न्यूयॉर्कच्या रस्त्यावर एका कॅफेमध्ये बसून सॅलड आणि कॉफी घेताना त्या जे सागत होत्या, ते मात्र मनात रुजून बसले आहे त्या म्हणत होत्या की, 'इराणचे शाह कॅन्सरने इतके आजारी आहेत हे जर खोमेनींना कळले असते तर त्यानी हिसक राज्यक्राती करावयाची घाई केली नसती किवा खुद्द शहाना आपल्या जीवघेण्या आजाराची जाणीव झाली असती तर कदाचित त्यानी आपणहून इतिहासाला वेगळे वळण दिले असते अर्थात नतर काय घडले हे मनात धरून, काय झाले असते हे सागण्याचे हे वेडे प्रयत्न असतात परवा चीनमधून येताना पाकिस्तानचे एक फार मोठे अधिकारी मला भेटले त्यानी 'हिदुस्थानातील परपरावादी सप्रदाय' या विषयावर प्रबध लिहिला आहे ते चीनमध्ये अभ्यासासाठी गेले होते ते सागत होते की, 'कायदेआझम जिना याना कर्करोग झाला होता आणि विशिष्ट कालमर्यादेनतर ते जगणार नाहीत, ही माहिती डॉ पटेल यानी जर आधीच जाहीर केली असती तर कदाचित हिदुस्थानची फाळणी झालीच नसती '

आजच्या वर्तमान काळाच्या डगरीवर पाय ठेवून, भूतकाळ कसा बदलला असता हे सागणे फार सोपे आहे. 'अखेरचा सम्राट' पाहताना चीनच्या इतिहासात किंवा राजकारणात असे हे झाले असते तर, काही वेगळेच घडले असते का? अशासारखे प्रश्न पुन्हा पुन्हा प्रेक्षकाच्या डोळ्यासमोर येत राहतात शेवटी मात्र हा सम्राट सागतो तेच खरे की, 'आपल्याला काही कळत नाही, हे न कळणे म्हणजेच कळण्याची खरी सुरुवात आहे '

• • •

१२.

# चित्राक्षरांतून फुलणारी व्यंगचित्रे

अलीकडेच सिगापूरच्या 'स्ट्रेट टाइम्स' या वृत्तपत्राने प्रसिद्ध केलेले एक सुदर पुस्तक हाताशी आले या पुस्तकात एक व्यगचित्रकार चिनी चित्रलिपीकडे थोडासा वात्रट, थोडासा खटयाळ होऊन बघतो आहे 'तान ह्युए पेंग' हा प्रसिद्ध व्यगचित्रकार आहे त्याने प्रत्येक चित्राक्षराच्या मागे जाऊन, त्या शब्दाचा इतिहास जिवत केला आहे चिनी चित्रलिपीचा इतिहास फार दूरवर जाणारा पुष्कळसा अज्ञाताच्या अधारात असलेला आहे चिनी सम्राटाचे एक मत्री 'काग जी' यानी चित्रलिपी प्रथम निर्माण केली अशी दतकथा आहे पक्षी अगणात येऊन, धान्य टिपून उडून गेले की त्याच्या पायाचे ठसे मऊ मातीवर उमटत प्राणी मऊ गवतावरून धावत गेले तरी पायाचे ठसे मागे राहात पक्षी आणि प्राणी याच्या पायाचे ठसे पाहताना 'काग जी' याच्या लक्षात आले की प्रत्येक पक्ष्याचा, प्रत्येक प्राण्याचा ठसा वेगळाच आहे ते ठसे कागदावर उतरवण्याचा प्रयत्न त्याने सुरू केला पण यातून प्रत्येक वस्तू, प्रत्येक प्राणी याच्या आकाराने आणि त्याच्या रचनेच्या वळणाने 'काग जी' प्रभावित झाला त्याने प्रत्येक वस्तू, प्राणी, जीवमात्र याचा आकार आणि वळण कागदावर काढायचा उद्योग सुरू केला फार फार वर्षांपूर्वी काढलेल्या या चित्राक्षराना, त्यातील मुख्य भाग कायम ठेवून, सुलभ करण्यात आले परपरेने या चित्राक्षराना एक नवा वळणदारपणा दिला त्यामुळे लिहिणे सोपे झाले थोडक्या रेषातच अर्थ कल्पना व्यक्त व्हावी अशी अक्षरे तयार करण्यात आली जुन्या

लिपीमध्ये ही अक्षरे खूप 'बोलकी' असत त्याना 'शिआंग शिंग' म्हणत याचा अर्थ प्रतीक - आकार असा होतो त्यानतर या अक्षराना चित्रलिपी किवा 'पिक्टोग्राफी' असे लिपिशास्त्रज्ञ म्हणू लागले पण काळाच्या ओघाबरोबर या अक्षरातील प्रतीके ओळखू येणार नाहीत इतकी बदलत गेली प्रत्यक्ष दिसणाऱ्या वस्तू म्हणजे झाडे, प्राणी, हत्यारे, भाडी, घर, चद्र अशाचे आकार आणि अक्षरचित्र याचे नाते स्पष्ट दिसते पण ज्या वेळी अक्षरातून, अव्यक्त अशा कल्पना (परमेश्वर) भावभावना (राग, लोभ,क्रोध) किवा वृत्ती दाखवण्याचा प्रसग आला त्या वेळी लिपिकारानी, खूपच स्वातत्र्य घेऊन, कल्पनेचा भरपूर उपयोग करून चित्राक्षरे बनवली असे दिसून येते एक गोलाकार (०) काढून सूर्य दाखवला जातो तर एक कोर काढून चद्र दाखवला जातो वाहणाऱ्या रेघा काढून पाणी (शुई) दाखवले जात तेच वाढवून नदी किवा ओढा दाखवला जातो टेकड्याची त्रिकोणी राग एका ओळीत माडून 'शान' किवा पर्वत हे चित्राक्षर होते वर ढगासाठी एक वाकलेली रेघ काढून त्यातून पडणारे पावसाचे थेंब दाखवले की 'यु' हे चित्राक्षर होते माणूस कसा दिसतो, कसा उभा राहतो यावरून 'माणूस' हे चित्राक्षर अनेक प्रकारानी काढले जाते याच्या उलट नम्रभाव दाखवण्यासाठी स्वागतासाठी वाकलेल्या, किवा गुडघ्यावर बसलेल्या स्त्रीचे रेखाचित्र काढून 'नू' किवा स्त्री दाखवली जाते अशाच रीतीने हात, डोळा, तोंड याच्या चित्रखुणा केलेल्या आहेत

## रेषाचा कल्पक वापर

प्राण्याच्यासाठी असलेली अक्षरे त्या प्राण्याचे वर्णन सागतात झाडाचे चित्राक्षर चहूबाजूला पसरणाऱ्या फाद्या दाखवतात बाबूची खाली वळणारी सळसळती लाब पाने त्या अक्षरातून व्यक्त होतात, तर विळा, गाडी, पुस्तक इत्यादी चित्राक्षरातून त्या कल्पना कशा बदलत गेल्या याची ओळख होते गाडीचेच उदाहरण घ्या चाकाच्या गाडीचे स्वरूप अनेक शतकातून कसे बदलत गेले हे त्या अक्षररूपाच्या बदलातून दिसू लागते भात खाण्याचे 'बाउल किवा भाडे', तसेच सुरापात्राचा बदलणारा अक्षराकार यातून चिनी सस्कृती कशी बदलत गेली हे पाहणे फार मनोरजक आहे या अक्षराना 'झु शी' असे म्हणतात याचा शब्दश अर्थ 'बोटानी एखादी वस्तू दाखवणे' असा आहे पूर्वी अक्षराना चित्ररूप प्रतीक मानले गेले आणि नतर ते 'दर्शक प्रतिरूप' झाले या प्रक्रियेला शब्दशास्त्री काहीही म्हणोत,

अव्यक्त कल्पना दाखवण्यासाठी चिनी अक्षरकारानी रेषाचा फार कल्पक उपयोग केला आहे रेषातून प्रतीक दाखवणे, त्यावर एखादी खूण देऊन हालचाल अभिव्यक्त करणे, मूळ विषयाचे गुण दाखवणे अशा अनेक प्रकारानी अर्थ सागितला जातो आकडे दाखवण्यासाठी मराठीत ज्याप्रमाणे दीड लिहिताना एकापुढे दोन रेघा काढतात त्याप्रमाणे आडव्या रेघानी प्रथम आकडे दाखवले जात त्यावर पूर्णांक ठेवून दशम्, शतम् दाखवले जात भाला घेतलेला माणूस, भाला फेकायच्या पवित्र्यात उभा ठाकला की सैनिक हा शब्द बदलून 'आघात' असा शब्द होतो जसजसा मानवी समाज बदलू लागला तशा अनेक 'कल्पना' चित्राक्षरात मावेनाशा झाल्या भाषेमधल्या म्हणी, वाक्प्रचार याना सामाजिक परपरेतून एक विशेष अर्थ प्राप्त झाला मराठीमध्ये आपण काही कल्पना मानतो, 'खरकटे', 'सुतक' या कल्पना चित्राक्षरात किवा प्रतीकात कशा दाखविणार? पण चिनी लिपिकारानी ध्वनी, अर्थ आणि चित्र याची सागड घालणारी नवी पद्धत शोधून काढली आणि नवीन नवीन अक्षरे निर्माण केली आजही नवीन अक्षरे शोधली जात आहेत त्यामुळे लिपीत रोजच्या रोज भर पडते आहे आज चिनी लिपी खूप वेगाने समृद्ध होत चालली आहे ध्वनी, अर्थ कल्पनाचित्र यातून अक्षराना निश्चित अर्थ येतो या त्रिवेणी पद्धतीला 'सान-शु' म्हणतात

अशा गुतागुतीच्या चिनी लिपीची अक्षरओळख करून देण्याचा यशस्वी प्रयत्न 'तान ह्यूए पेंग' या व्यगचित्रकाराने केला आहे आपला हात धरून चित्रलिपीकडे नेणाऱ्या स्त्रीचे एक व्यगचित्र त्यातून निर्माण होणारी पाहण्याजोगी आहेत

पुस्तकाचे मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ यावर सहजपणे कळेल अशी चित्रे व त्याना समातर असणारी अक्षरे आहेत काही अक्षराची वर्णने फार चपखल आहेत उदाहरण म्हणून स्त्री, बाळ या शब्दाची चित्ररूपे पाहू या मूळ चित्रामध्ये स्त्री ही स्वागतार्थ वाकलेली असे नतरच्या चित्राक्षरात ती गुडघ्यात वाकून स्वागत करते आहे, तर नव्या अक्षरात झपाट्याने चालणाऱ्या स्त्रीची प्रतिकृती काढून स्त्रीच्या समाजातील स्थानात झालेला बदल दिसतो आहे 'बाळ' या चित्राक्षरात प्रथम हातपाय पसरलेले मूल दाखवले आहे नतरच्या अक्षरात कापडाने गुडाळलेले त्याचे पाय दिसतात बालसगोपनाची चिनी कल्पना अशी आहे की, शरीराचे एक टोक कोरडे व एक टोक ओले ठेवायचे शेवटच्या चित्राक्षरात बाटलीने दूध पिणारे मूल

आहे 'माणूस' हे चित्राक्षर अधिक बोलके आहे त्यातून माणसाच्या प्रगतीचा प्रवास दिसतो माणूस हा मातीतून निर्माण झाला त्याला हात पाय कामासाठी दिले आहेत म्हणून भाताची रोपे लावून तो उदरनिर्वाह करता या उत्पादक श्रमामुळे तो स्वत च्या पायावर उभा राहतो नतर तो हातापायापेक्षा डोक्याने हालचाल करू लागतो सध्याच्या स्पर्धेच्या जीवनसघर्षात त्याचे डोके पार कामातून जाते आणि तो जगण्याच्या धावपळीत कसाबसा पळत राहतो नवरा या चित्राक्षराने वयात आलेला माणूस एक पौरुषाचे प्रतीक असणारी टोपी घालतो आपल्या केसात एक आडवी 'पीन' खोचतो त्यानतर पराक्रम करून तो नाव मिळवतो आणि मगच तो शहाणा माणूस नवरा व्हायला योग्य ठरतो 'निरतर, अक्षय' ही कल्पना सागणारे चित्राक्षर प्रतीकात्मक आहे एक पिढी येते आणि जाते पाणी अखड वाहात राहते पाण्याचा अखड अक्षय प्रवाह, पाण्याची वाफ होणे, ढगात जाणे, पाऊस पडणे आणि पाणी झऱ्यातून वाहात राहणे ही कल्पना आठ दिशाना धावणारे पाणी, त्यावर येणाऱ्या लाटा, फेस यातून दिसते लेखणीच्या धारदार आठ फटकाऱ्यातून हे अक्षर निर्माण होते

## चिनी म्हणीचे दर्शन

लाब शेपटीच्या पाखराचे प्रतीक म्हणजे 'पक्षी' हे चित्राक्षर (निआओ) यात सौंदर्य आहे स्वातत्र्य आहे पण सौंदर्य हे पक्ष्याला पुष्कळदा शाप ठरते कारण चिनी म्हण आहे की, 'सुदर पक्ष्यालाच पिजऱ्यात राहावे लागते त्यामुळे दुर्दैवाने नव्या चित्राक्षरात पिसे गळलेला पक्षी दिसतो ' बाबू (झाऊ) या चित्राक्षरात बाबूच्या पानाचे खाली वळलेले दोन झुपके दाखवले जात चिनी म्हण आहे की, 'माणूस वाकड्या चालीचा असतो, पण बाबूचे झाड मात्र सरळ वाढते ' हे झाड उपयुक्तही आहे सुदरही आहे या वेळूचीच छडी होते आपल्याकडे 'छडी लागे छमछम, विद्या येई घमघम ' अशी म्हण आहे तशीच एक चिनी म्हण आहे, 'वळणदार छडी, मुलाला सरळ करी' या चित्रात छडीचा उपयोग मुलापासून दाखवला आहे झाडाचा उपयोग काय ? त्याला फळे येतात यामुळे झाड या जुन्या चित्राक्षरात झाडाला येणारी फळे फार डौलदारपणे रेखाटलेली असत झाड खूप वाढले, त्याचा वृक्ष झाला, त्याला अपरपार फळे धरली, की पानाच्या पसाऱ्यात ती दिसेनाशी होतात पुढच्या चित्राक्षरात हे दिसते चिनी म्हण अशी आहे की, 'झाड हजार हात

अव्यक्त कल्पना दाखवण्यासाठी चिनी अक्षरकारानी रेषाचा फार कल्पक उपयोग केला आहे रेषातून प्रतीक दाखवणे, त्यावर एखादी खूण देऊन हालचाल अभिव्यक्त करणे, मूळ विषयाचे गुण दाखवणे अशा अनेक प्रकारानी अर्थ सागितला जातो आकडे दाखवण्यासाठी मराठीत ज्याप्रमाणे दीड लिहिताना एकापुढे दोन रेघा काढतात त्याप्रमाणे आडव्या रेघानी प्रथम आकडे दाखवले जात त्यावर पूर्णांक ठेवून दशम्, शतम् दाखवले जात भाला घेतलेला माणूस, भाला फेकायच्या पवित्र्यात उभा ठाकला की सैनिक हा शब्द बदलून 'आघात' असा शब्द होतो जसजसा मानवी समाज बदलू लागला तशा अनेक 'कल्पना' चित्राक्षरात मावेनाशा झाल्या भाषेमधल्या म्हणी, वाक्प्रचार याना सामाजिक परपरेतून एक विशेष अर्थ प्राप्त झाला मराठीमध्ये आपण काही कल्पना मानतो, 'खरकटे', 'सुतक' या कल्पना चित्राक्षरात किवा प्रतीकात कशा दाखविणार? पण चिनी लिपिकारानी ध्वनी, अर्थ आणि चित्र याची सागड घालणारी नवी पद्धत शोधून काढली आणि नवीन नवीन अक्षरे निर्माण केली आजही नवीन अक्षरे शोधली जात आहेत त्यामुळे लिपीत रोजच्या रोज भर पडते आहे आज चिनी लिपी खूप वेगाने समृद्ध होत चालली आहे ध्वनी, अर्थ कल्पनाचित्र यातून अक्षराना निश्चित अर्थ येतो या त्रिवेणी पद्धतीला 'सान-शु' म्हणतात

अशा गुतागुतीच्या चिनी लिपीची अक्षरओळख करून देण्याचा यशस्वी प्रयत्न 'तान ह्यूए पेंग' या व्यगचित्रकाराने केला आहे आपला हात धरून चित्रलिपीकडे नेणाऱ्या स्त्रीचे एक व्यगचित्र त्यातून निर्माण होणारी पाहण्याजोगी आहेत

पुस्तकाचे मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ यावर सहजपणे कळेल अशी चित्रे व त्याना समातर असणारी अक्षरे आहेत काही अक्षराची वर्णने फार चपखल आहेत उदाहरण म्हणून स्त्री, बाळ या शब्दाची चित्ररूपे पाहू या मूळ चित्रामध्ये स्त्री ही स्वागतार्थ वाकलेली असे नतरच्या चित्राक्षरात ती गुडघ्यात वाकून स्वागत करते आहे, तर नव्या अक्षरात झपाट्याने चालणाऱ्या स्त्रीची प्रतिकृती काढून स्त्रीच्या समाजातील स्थानात झालेला बदल दिसतो आहे 'बाळ' या चित्राक्षरात प्रथम हातपाय पसरलेले मूल दाखवले आहे नतरच्या अक्षरात कापडाने गुडाळलेले त्याचे पाय दिसतात बालसगोपनाची चिनी कल्पना अशी आहे की, शरीराचे एक टोक कोरडे व एक टोक ओले ठेवायचे शेवटच्या चित्राक्षरात बाटलीने दूध पिणारे मूल

आहे 'माणूस' हे चित्राक्षर अधिक बोलके आहे त्यातून माणसाच्या प्रगतीचा प्रवास दिसतो माणूस हा मातीतून निर्माण झाला त्याला हात पाय कामासाठी दिले आहेत म्हणून भाताची रोपे लावून तो उदरनिर्वाह करता या उत्पादक श्रमामुळे तो स्वत.च्या पायावर उभा राहतो नतर तो हातापायांपेक्षा डोक्याने हालचाल करू लागतो सध्याच्या स्पर्धेच्या जीवनसघर्षात त्याचे डोके पार कामातून जाते आणि तो जगण्याच्या धावपळीत कसाबसा पळत राहतो नवरा या चित्राक्षराने वयात आलेला माणूस एक पौरुषाचे प्रतीक असणारी टोपी घालतो आपल्या केसात एक आडवी 'पीन' खोचतो त्यानतर पराक्रम करून तो नाव मिळवतो आणि मगच तो शहाणा माणूस नवरा व्हायला योग्य ठरतो 'निरतर, अक्षय' ही कल्पना सागणारे चित्राक्षर प्रतीकात्मक आहे एक पिढी येते आणि जाते पाणी अखड वाहात राहते पाण्याचा अखड अक्षय प्रवाह, पाण्याची वाफ होणे, ढगात जाणे, पाऊस पडणे आणि पाणी झऱ्यातून वाहात राहणे ही कल्पना आठ दिशाना धावणारे पाणी, त्यावर येणाऱ्या लाटा, फेस यातून दिसते लेखणीच्या धारदार आठ फटकाऱ्यातून हे अक्षर निर्माण होते

## चिनी म्हणीचे दर्शन

लाब शेपटीच्या पाखराचे प्रतीक म्हणजे 'पक्षी' हे चित्राक्षर (निआओ) यात सौंदर्य आहे स्वातत्र्य आहे पण सौंदर्य हे पक्ष्याला पुष्कळदा शाप ठरते कारण चिनी म्हण आहे की, 'सुदर पक्ष्यालाच पिजऱ्यात राहावे लागते त्यामुळे दुर्दैवाने नव्या चित्राक्षरात पिसे गळलेला पक्षी दिसतो ' बाबू (झाऊ) या चित्राक्षरात बाबूच्या पानाचे खाली वळलेले दोन झुपके दाखवले जात चिनी म्हण आहे की, 'माणूस वाकड्या चालीचा असतो, पण बाबूचे झाड मात्र सरळ वाढते ' हे झाड उपयुक्तही आहे सुदरही आहे या वेळूचीच छडी होते आपल्याकडे 'छडी लागे छमछम, विद्या येई घमघम ' अशी म्हण आहे तशीच एक चिनी म्हण आहे, 'वळणदार छडी, मुलाला सरळ करी' या चित्रात छडीचा उपयोग मुलापासून दाखवला आहे झाडाचा उपयोग काय ? त्याला फळे येतात यामुळे झाड या जुन्या चित्राक्षरात झाडाला येणारी फळे फार डौलदारपणे रेखाटलेली असत झाड खूप वाढले, त्याचा वृक्ष झाला, त्याला अपरपार फळे धरली, की पानाच्या पसाऱ्यात ती दिसेनाशी होतात पुढच्या चित्राक्षरात हे दिसते चिनी म्हण अशी आहे की, 'झाड हजार हात

उच्च गेले तरी, त्याचे फळ शेवटी जमिनीवरच पडणार ' नव्या चित्राक्षरात ही सारी कथा दिसते

या व्यगचित्रकाराने अक्षराच्या स्वरूपात झालेला बदल, त्याच्या मागे असणारा अर्थ आणि परपरा फार मनोरजक रीतीने सागितल्या आहेत पूर्वी साक्षरताप्रसारासाठी शकरराव भागवतानी देवनागरी चित्राक्षरात क्रान्ती करून दाखविली होती नळ, गणपति, श्री ही अक्षरे अजूनही आठवतात इदूरच्या चिचाळकर गुरुजींनी लहान मुलासाठी अशी आकड्यातून चित्रे रेखाटल्याचे मला सागण्यात आले प्रसिद्ध हास्यचित्रकार वसत सरवटे यानी आकडे व अक्षराची अशी गमतीदार व्यगचित्रे यापूर्वी 'मौज'च्या दिवाळी अकात रेखाटल्याचे अनेकाना ठाऊक असेल कोणी नवा व्यगचित्रकार मराठी परपरा आणि देवनागरी अक्षरे याचा मनोरजक इतिहास सागेल का ?

• • •

१३.

# सत्याच्या शोधात झेन चित्रकला

जपानमध्ये मी गेलो त्या वेळी एका वेगळ्या प्रकारच्या बाहुलीने माझे लक्ष वेधून घेतले  या बाहुलीचे बूड गोल असते  त्या गोलाकारावर वरच्या अंगाला हात - पाय काढलेले असतात आणि एक डोके चिकटविलेले असते  चेहऱ्यावर नाक, कान, भिवया असतात  पण डोळ्याच्या जागी दोन वर्तुळाकार शून्ये असतात या विशिष्ट आकारामुळे ती बाहुली केव्हाही आडवी पडत नाही  एका बाजूने धक्का लागला की झोका खाऊन पूर्वस्थितीत उभी राहते  या बाहुलीला जपानीमध्ये 'दारुमा' असे म्हणतात  दारुमा हा शब्द 'धर्म' या संस्कृत शब्दावरून आलेला आहे  लोककथा अशी आहे की, बोधिधर्म नावाचा एक बौद्ध सन्यासी तप करावे म्हणून पद्मासन घालून बसला  तो त्याच अवस्थेमध्ये इतकी वर्षे राहिला की त्याच्या पायाची घडी कायमचीच बसली  त्याला उठता येईना की बसता येईना त्याला कसेही ढकलले तरी झोका घेऊन तो पुन्हा पहिल्याच अवस्थेत येई  अशा बौद्ध भिक्षूच्या नावावरून त्या बाहुलीला धर्माचे अपभ्रष्ट रूप म्हणजे 'दारुमा' असे नाव पडले  जपानमध्ये अशी पद्धत आहे की कोणत्याही चागल्या गोष्टीचा सकल्प सोडला की दारुमाची बाहुली आणून तिच्या चेहऱ्यावर एक डोळा रगवावयाचा आणि तो सकल्प सिद्धीला गेला की मग दुसरा डोळा रगवावयाचा  हे ऐकल्यावर माझ्या मनात आले की ज्याचे सकल्प कधीच पुरे झाले नाहीत अशा कितीतरी एकाक्ष दारुमा बाहुल्या एकाच डोळ्याने टक लावून पाहात बसल्या असतील

जपानमध्ये जी लिपी आहे ती चित्रासारखी आहे आणि काही वेळेला चित्रे ही लिपीसारखी असतात प्रत्येक देशाच्या शिल्पाचा, वास्तूचा, सगीताचा आणि चित्रकलेचा त्या त्या परपरेशी, त्या त्या सस्कृतीशी सबध असतो चीनमध्ये गेलो असताना त्याच्याकडे खलित्यासारखी गुडाळलेली लाब चिनी चित्रे पाहायला मिळाली साधारणपणे ६ इच उच आणि कित्येक फूट लाब अशी ही आडवी चित्रे आहेत या परपरागत चित्रातून मिरवणुकी, लढाया, खेड्यातील आयुष्य, आभाळ, झाडे आणि पक्षी अशा अनेक गोष्टी काढलेल्या असतात अशी गुडाळलेली चित्रे जमविण्याचा नाद अनेक लोकाना असतो जपानमध्ये मात्र चित्रे उभी गुडाळली जाणारी असतात चिनी चित्रकलेचा मला विशेष वाटला तो असा की त्या सबध चित्रामध्ये कोणतीही गोष्ट स्थिर असत नाही प्रत्येक गोष्ट, मग ते बाबूचे झाड असो वा त्याची पाने, पक्षी, ढग, उधळणारे घोडे काहीही असो, प्रत्येक चित्राचा विषय हा जिवत, सदैव हालता असा दिसतो

## 'झेन' सप्रदाय

जपानमध्ये तत्त्वज्ञानाचा एक साप्रदाय आहे त्याला 'झेन' असे म्हणतात जपानमध्ये असताना माझे एक मित्र प्रा किमुरा हे झेन तत्त्वज्ञानाचे उपासक आणि त्याच्यामुळे मलाही या विषयाची थोडी ओळख झाली त्याच्यामुळे 'नो' रगभूमी आणि झेन चित्रसप्रदाय याचा परिचय झाला

हिदुस्थानामधून चीनमध्ये आणि चीनमधून जपानमध्ये प्रवास करत करत ही तत्त्विक विचाराची पद्धती जपानमध्ये स्थिर झाली जगामध्ये बरे आणि वाईट याचे आपल्याभोवती सदैव तुबळ युद्ध चालू असताना ही ज्या वेळी आपल्या मनात एकही विचार येत नाही अशी जी स्थितप्रज्ञतेची किवा शाततेची मौनी स्थिती असते तिला जपानी तत्त्वज्ञानात 'झा' असे म्हणतात ज्या वेळी माणूस स्थिरचित्त होऊन स्वत च्याच अत करणात डोकावून पाहू लागतो आणि या प्रक्रियेत क्षणभरसुद्धा विचलित होत नाही त्या अतर्दर्शनाला 'झेन' असे म्हणतात अशा तऱ्हेची ध्यानधारणेची ही झा आणि झेन पद्धत आहे त्याच्यासाठी आसनमाडी घालून, समाधी लावून बसायलाच पाहिजे असे नाही भिक्षू हुइनेंग याने तर असे स्पष्टच सागितले आहे की, माणसाच्या शारीरिक स्थितीपेक्षा त्याची मनाची स्थिती फार महत्त्वाची असते त्यामुळे वर्षानुवर्षे पद्मासन घालून बसण्यापेक्षा सुद्धा चालताना,

बोलताना, खेळताना जर मनाची एकाग्रता स्थिर करता आली तर ती खरी साधना साधना करण्यासाठी स्थिर बसावे लागणे याचा अर्थच असा की, त्यावाचून आपण आपले मन एकाग्र करू शकत नाही त्यामुळेच झेन पद्धतीची माणसे जेवताना, खेळताना, तलवारीने युद्ध करतानासुद्धा मन कसे एकाग्र करावे याची तालीम घेत असतात ख्रिस्त शकापूर्वी सहा शतके बुद्धाची शिकवण चीनमधून जपानमध्ये गेली माणसाच्या अत करणाकडे नेणारी ही वाट आहे असे त्याचे वर्णन त्या काळी केले गेले त्याचीच परिणती म्हणजे झेन विचार या सप्रदायात असेही सागितले जाते की, भगवान बुद्धाची शिकवण समजून घेणे म्हणजे स्वत च स्वत ला समजावून घेणे –

स्वत ला समजावून घेणे
म्हणजे स्वत ला विसरणे
आणि स्वत ला विसरणे
म्हणजे आपल्याभोवतीच्या
जगामध्ये असलेले चैतन्य जाणून घेणे
हे जाणणे म्हणजे आपल्यातील चैतन्य
आणि भोवतालचे चैतन्य याची
एकात्मता ओळखणे

झेन पद्धतीमध्ये अशा तऱ्हेचे अनेक सवाद आहेत जे सवाद वरकरणी स्वत.च स्वत शी केल्यासारखे चमत्कारिक वाटतात पण त्यामधून खूप गूढ असा अर्थ निघत राहतो मराठी सतवाङ्मयामध्ये भारुडे आहेत झेन सवाद हा तसाच थोडासा प्रकार आहे'

## झेन विचार आणि कला

झेन विचार आणि कला असे सागतात की, बोधिधर्म भिक्षू झेन विचार शिकविण्याकरिता चीनमध्ये आला त्याने बुद्धधर्माचा मोठा प्रसार केला त्याच्या लक्षात असे आले की धर्ममदिरे बाधणे, जातक कथाचे अनुवाद करणे आणि बोधि धर्माची दीक्षा देणे या सगळ्यासाठी रोजच्या जीवनातील कलाचा – सगीत, चित्रकला याचाही उपयोग करायला लागतो त्या काळात एकदा राजाने बोधिधर्माला विचारले, "बौद्ध विचाराने वागून तुम्हाला काय मिळणार आहे?" आणि या

प्रश्नाला बोधिधर्माने तितक्याच स्पष्टपणाने चोख उत्तर दिले,

“काहीही नाही,
सत्कृत्याची किंमत
सत्कृत्य हीच असते
कारण ते
अंत करणामधून निघालेले असते
त्याचा संबंध
आपल्या भोवतालच्या
भौतिक गोष्टीशी नसतो
त्यामुळे चांगले वागण्याने
किती पैसे मिळतात
हाही प्रश्न उद्भवत नाही”

यावर राजाने विचारले, “मग हा धर्म म्हणजे आहे तरी काय?” बोधिधर्माने उत्तर दिले,

“धर्म म्हणजे
एक विशाल अवकाश आहे
त्यात पवित्र असे
वेगळे काही नाही
जे आहे ते सारेच पवित्र आहे
तेही आपलेच जीवन आहे”

झेन विचाराची माणसे धर्माच्या आचरणावर भर देतात, त्याच्या प्रचारावर नाही एका सूत्रामध्ये भगवान बुद्धाने असे सांगितले, “जे दिसते ते नुसते पाहावयाचे, जे ऐकू येते ते ऐकावयाचे, जे मनाला भावते ते अनुभवायचे आणि जे मनात स्फुरते ते विचाराने उमगायचे” अशाच तऱ्हेची विचारपद्धती विकसित होत होत या परंपरेला संगीत, रंगभूमी, नृत्य आणि चित्र असे अनेक कोंब फुटू लागले पुष्कळदा असे सांगतात की, आपण एखाद्या डोंगरकड्याकडे एकटक पाहू लागलो की त्या दगडाच्या आतमध्ये जिवंत असणारी स्पंदने आपल्याला जाणवू लागतात आज वरकरणी स्थिर आणि चैतन्यहीन वाटणाऱ्या लाकडाच्या टेबलाच्या अंगभूत

असणाऱ्या अणुरेणूचा विचार होतो विज्ञानात मोलिक्युलर बायॉलॉजीमधे अणुपरमाणूच्या स्पदनाचा विचार होतो किवा जेनेटिक इंजिनिअरिंगमध्येही रगसूत्राचा विचार होतो झेन तत्त्वज्ञानाच्या बाबतीत असे म्हणतात की, इतर मानवाला ही शिकवण देण्याकरिता भगवान बुद्धाने निर्वाणाचाही त्याग केला त्यामुळे झेन विचाराना बुद्धाच्या करुणेचे प्रतीक, अपेक्षाहीन प्रेमाचे अतिम स्वरूप किवा सत्त्व असे मागले जाते माडीवर माडी चढवून बसलेला, एका गालावर बोट टेकवून बसलेला बोधिसत्त्वाचा पुतळा आशियात सर्वत्र प्रसिद्ध आहे

## झेन चित्रकारी

झेन चित्रकलेमध्ये अशा तऱ्हेच्या विचाराची अनेक उदाहरणे दिसतात कमळ हे बुद्धाच्या ज्ञानमय अवस्थेचे प्रतीक आहे कमळ सूर्यप्रकाशाकडे तोंड करून चिखलातून वर येत असते तीच कल्पना घेऊन बोरूने काळ्या शाईने वर्तुळाचे चित्र काढून करुणेवाचून असणाऱ्या आयुष्याचे ओसाडपण दोन रेषाच्या फटकाऱ्यात झेन चित्रकलेत अनेकदा दाखवलेले दिसते झेन चित्रकलेत पुष्कळदा उभे चित्र आणि त्याच्या एका बाजूला लिहिलेली छोटीशी कविताही आढळते अलीकडे त्याला गूढवादी चित्रकविता असे म्हणतात बोरूच्या साहाय्याने काढलेली चित्रे झेन पद्धतीत पुष्कळच दिसतात त्याच्या दृष्टीने प्रत्येक चित्रात स्वयपूर्ण असे जग दाखविलेले असते चित्रकाराला त्याच्या मनाला जसे दिसले तसे त्याने काढले यापलीकडे या चित्राला हेतू असत नाही, आणि जो हेतू असतो तो बघणाऱ्याच्याच अत करणात उगम पावत असतो झेन विचाराचा अभ्यास करण्यापूर्वी जपानमध्ये डोगर, झरे, दगड, पाणी अशा गोष्टींकडे पाहून त्यातून मनामध्ये स्फुरणारे आकार कागदावर रगविण्याची पद्धत लोकप्रिय होती त्यामुळे पुष्कळदा ही चित्रे आणि त्यातील चित्रविषय ही अतराळात पक्षी तरगत जात असावा अशा प्रकारची वाटत समोर दिसणारी प्रत्यक्ष वस्तू आणि मनात उमटणारे त्याचे अप्रत्यक्ष प्रतिबिब याचा हा काव्यात्म सगम असतो

जपानमध्ये खड्गयुद्धाचा एक प्रकार आहे. त्याला 'केंदो' असे म्हणतात यामध्ये तलवारी घेतलेले दोन वीरपुरुष एकमेकासमोर बसतात 'दो' याचा अर्थ मार्ग आणि केंदोचा अर्थ तलवारीने धारण करावयाचा मार्ग शरीर स्वस्थ असताना

मन एकाग्र करणे हे कोणालाही शक्य होईल पण खड्गयुद्ध करत असतानाही मन स्थिर ठेवणे ही केंदो पद्धतीत साध्य करण्याची विशेष गोष्ट आहे माणूस पद्मासन घालून समोर पसरलेल्या प्रचड वाळूकडे पाहू लागला म्हणजे सागर किनाऱ्यावरच्या त्या असीम वाळूच्या चक्रानुवर्ती रेषाचे वेगवेगळे आकार त्याला दिसू लागतात अशा स्थिर अवस्थेत आपले जीवन, आणि ते वाळूतले आकार याच्यामधील सुसवाद माणूस बघू लागतो अशा तऱ्हेने झेन पद्धतीमध्ये स्थिरतेत आणि गतिमानतेत एकाग्रता साधण्याचा प्रयत्न केला जातो झेन चित्रकलेचा आणखी एक विशेष म्हणजे चिनी अक्षरावर आधारलेली चित्रकला। काळ्या शाईमध्ये ब्रशाने केलेली ही अक्षरे शाईच्या जाडीवर, अक्षराच्या तोलावर अनेक गोष्टी सागून जातात माझा झेन मित्र या रेषाच्या पोकळीत भरीवपण कसे असते हे सागू लागला त्या वेळी चडीगढचे स्थापत्य रचणाऱ्या 'कार्बूसिए'चा रिकाम्या पोकळ जागातून, इमारतीला भरीवपणाचा भास देण्याच्या सकल्पनेची मला आठवण झाली चित्रकाराचा आत्मा किती मुक्त झाला हे त्याच्या ब्रशाच्या मुक्त फटकाऱ्यावरून दिसू शकते एगभूमीवर नोह (ज्याचा उच्चार नो) असा केला जातो अशा नाटकातून झेन विचारवताच्या गोष्टी सागितल्या जातात

## झेन लोककथा आणि भारूड

ज्याचा उल्लेख मी सुरुवातीला केला त्या भिक्षू 'धर्मा'ची गोष्ट अशी सागतात की, चीनमध्ये आल्यानतर तो ९ वर्षे एका भितीकडे तोंड करून पद्मासन घालून बसला त्याला वरचेवर झोप यावयाची ती झोप येऊ नये म्हणून त्याने आपल्या पापण्याचे केस उपटून काढायला सुरुवात केली त्याने जमिनीवर टाकलेले पापण्याचे केस हे जमिनीत रुजले त्यातून प्रथम चहाची झाडे निघाली अशीही एक कथा झोप येऊ नये म्हणून चहाचे चाटण वापरायची परपरा येथलीच या भिक्षू बोधिधर्माचे प्रतीक म्हणजेच या दारुमा बाहुल्या अशा तऱ्हेची चित्रे वाळलेल्या वडाच्या पानावर काढली जातात विमलकीर्ती नावाचा एक भिक्षू ज्याला 'यूईमा' असे म्हणतात, त्याने विमलकीर्ती नावाची सूत्रे तर सागितलीच पण त्यावर आधारित अनेक चित्रे काढली त्याने भित्तिचित्रे, चित्रकविता, शिल्प या साऱ्यातून धर्मविचार माडला त्यामुळे आज झेन देवळामधून मधल्या चौकात वाळूने भरलेले चौकोन

असतात त्यात काढलेल्या रेषातून वाळूच्या केलेल्या छोट्या डोंगरातून माणसाला निसर्गाशी सुसवाद साधता येतो असे मानतात जगभर प्रसिद्ध झालेल्या 'रॉक गार्डन्स' किंवा शिला - उपवनाचा उगम या सप्रदायातच आहे झेन लोकानी जपानी पुष्परचनेलाही अशीच तत्त्विक बैठक दिली चौदाव्या शतकात नरक, पृथ्वी व स्वर्ग ह्या तीनही पातळ्या इकेबाना या पुष्परचना- पद्धतीत ते दाखवू लागले

झेन पद्धतीमध्ये जे भारुडासारखे सवाद किवा गाणी आहेत ती आजही लोकप्रिय आहेत त्याची उदाहरणे द्यावयाची झाली तर पुढील प्रश्नोत्तरे पाहावीत

झेन म्हणजे काय ?

तू कोण आहेस ?

मला माहीत नाही

तेच तर माझे तत्त्वज्ञान आहे, जे तुझाच शोध घेते

हे काय ? झेन तत्त्वज्ञान एवढेच ?

इतके पुरेसे नाही का ?

काय नाही याचा शोध घ्यायला, आणि नतर काय आहे हे शोधायला सारा जन्म पुरायचा नाही

झेन चित्रकलेमध्ये समाधिस्थ भिक्षू, खर्ज आवाजामध्ये गाणारा बेडूक, आभाळ, समुद्र याची चित्रे असतात एका चित्रावरची कविता अशी आहे :–

"खरे काय हे दुसऱ्या कोणापासूनही तुला समजणार नाही

दुसऱ्याबरोबर शोधायला गेला तर सत्याचे क्षितिज सदैव लाबच जात राहील

तू एकटाच जा

मग सत्याचे इद्रधनुष्य तुझ्या हाताला लागेल मग तुला कळेल की तू आणि तो यात फरक नाही, चैतन्य एकच आहे

तू आणि तथागत एकच आहेत"

## चित्रकविता

झेन चित्रकाराच्या मते आकाश, पर्वतराजी, झाडे आणि उडणारे पक्षी यामध्ये एक सवादी असा जिवतपणा आहे त्यामुळे चित्र पाहतानासुद्धा असे वाटते की, समोर चित्रात पाहणारा डोंगर आताच पावसात न्हाऊन निघाला आहे किवा

चित्रातल्या झाडाचे शेंडे हलवणारे दार हे पर्वतावरून येणाऱ्या सुगधी थडगार झुळकाच्या लहरी आपल्या अगावर चादण्याचा शिडकावा करीत आहेत वाळूच्या रेषा, दगडाचे आकार, बाबूच्या बेटामधले चक्राकार यामधूनही चित्रकविता केली जाते काही काही कवितामध्ये किंचित विनोदी छटाही आढळतात एका चित्रकवितेत झाडाच्या फादीला लोंबकळलेल्या एका माकडाचे चित्र आहे एका हाताने वरची फादी धरून दुसऱ्या हाताने तळ्यातल्या चद्राचे प्रतिबिब पकडायला ते माकड निघाले आहे खरा चद्र त्याला माहीतच नाही मरेपर्यंत खोट्या चद्राचा त्याचा हा नाद सुटणार नाही ज्या वेळी तो वरच्या फादीवरचा हात सोडेल त्या वेळी ते माकड पाण्यात पडून बुडून जाईल तळ्यातला चद्र तसाच प्रतिबिबात चमकत राहील खरी अडचण – सत्य काय आणि प्रतिबिब काय हे समजण्याची आहे आणि ते अतिम सत्य शोधण्याकरिताच या सर्व कलाचा उपयोग झेन विचारवतानी केलेला आहे

• • •

१४.

# स्वप्नरंगातल्या बाहुल्या

जपानमध्ये विलक्षण रंगीबेरंगी बाहुल्या, त्यांचे पोशाख, त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव आणि हातातले सुंदर पंखे पाहून अगदी वेडावून जाण्याची वेळ येते जपानला मी आणि माझी पत्नी रोहिणी प्रथम गेलो तेव्हाही या बाहुल्यांनी लक्ष वेधून घेतले होते सौ रोहिणीला तिच्या बालपणाची आठवण झाली ती म्हणाली, "आमच्या लहानपणी तुळशीबागेत लाकडाची एक त्रिकोणी बाहुली मिळायची रंग फक्त दोनच पिवळा आणि हिरवा बाहुलीचे नाकडोळे साधारण अंदाजाने ओळखायचे त्या बाहुलीला 'ठकी' म्हणत आणि या ठकीच्या लग्नासाठी सुट्टीच्या दिवशी खूप धामधूम सुरू असे थोड्याफार कुरूप दिसणाऱ्या या ठकीसारख्या बाहुलीने जर मुलींना वेड लावले असेल तर केवळ स्वप्नातच शक्य व्हावे अशा तऱ्हेची रंगमिश्रणे घेऊन तयार झालेल्या आकर्षक जपानी बाहुल्या साऱ्या जगाला वेड लावतील यात शंकाच नाही"

जपानमध्ये बाहुल्या निर्माण करणारी मुख्यत तीन शहरे टोकियो, क्योतो आणि फुकुओका यापैकी टोकियोची परंपरा कमी झाली आहे, पण क्योतो आणि फुकुओका यांनी सुंदर बाहुल्यांची परंपरा अजूनही टिकविली आहे तसे पाहिले तर बाहुल्या निर्माण करण्याची प्रक्रिया अगदी सोपी आहे, पण त्या बाहुल्या, त्यांचे केस, कपडे आणि पंखे हे सर्व रंगवण्याचे काम हाताने केले जाते ही कलमकारी फार नाजूक आणि वेळ खाणारी आहे पण त्याची खरी कसोटी आहे ती चेहऱ्यावरचे

खरेखुरे भाव दाखवण्याची या बाहुल्या करणारे कलाकार या विद्येत पारगत असल्यामुळे प्रत्येक बाहुली आपला स्वतंत्र चेहरा आणि भाव घेऊन जन्माला येते दोन माणसे सारखी नसतात त्याचप्रमाणे दोन जपानी बाहुल्यासुद्धा कधीच सारख्या नसतात प्रत्येक बाहुली स्वतंत्रपणाने रंगवली असल्याने हे शक्य होते

फुकुओका भागात निर्माण होणाऱ्या बाहुल्याना 'हाकाता' किंवा निंग्यो बाहुल्या म्हणतात खेळापेक्षासुद्धा सजावटीसाठी त्यांचा उपयोग केला जातो या भागात एक लोकगीत फार प्रसिद्ध आहे ते असे, 'तुम्ही जेव्हा क्योतो किंवा हाकाता इथे येता, त्या वेळी एकटे असता जाताना मात्र तुम्ही निश्चितपणाने दोघे असता कारण तुमच्याबरोबर हाकाताची सुंदर बाहुली असते येताना तुम्ही शुष्क, कोरडे येता जाताना मात्र स्वप्नरंगाने नटलेली बाहुल्याची दुनिया अंत करणात भरभरून घेऊन जाता' माझा वैयक्तिक अनुभव असाच आहे इतक्या सुंदर बाहुल्या मला जगात कुठेच पाहायला मिळाल्या नाहीत रशियामधली 'मातुष्का' बाहुली आपल्या ठकीसारखीच आहे अमेरिकन बाहुल्या चालतात, डोळे उघडतात, पोटातल्या रेकॉर्डप्रमाणे थोडेफार रडतात, गातात, पण काही झाले तरी त्या बाहुल्या एका साच्यातल्या, यांत्रिक आणि म्हणूनच निर्जीव वाटतात कोरियन बाहुल्या खूप नटतात हातात डमरूसारखे वाद्य घेऊन अंगाचा त्रिभंग करून उभ्या राहतात कोरियन बाहुल्याचे तलम रेशमी झगे आणि गोंडे मात्र फार दिमाखदार असतात थायलंडमधल्या बाहुल्या मुकुट घालून. धनुष्य घेऊन किंवा फुलांची परडी घेऊन नृत्यशैलीत उभ्या असतात बहुतेक थाय बाहुल्या या रामायणाच्या कथेतल्या पात्राच्या रंगरूपाच्या असतात चिनी बाहुल्या पुष्कळदा ओबडधोबड वाटतात पॅसिफिक देशात मात्र मी दगडाच्या बाहुल्या पाहिल्या, हाडातून कोरलेल्या बाहुल्या पाहिल्या, पण या सगळ्याचा विचार केला तरी जपानी बाहुल्याचे रंगसौंदर्य काही जगावेगळे आहे यात शंका नाही

कित्येक शतकापूर्वी सोशीची याकी नावाचा एक गृहस्थ बाहुल्या करत असे घरे शाकारण्याचा त्याचा उद्योग त्या वेळी कौले एकमेकाला चिकटण्याकरिता एक चिकट काळी माती वापरली जात असे त्या काळ्या चिकट मातीपासून त्याने जी पहिली बाहुली तयार केली, ती बाहुली 'काळी बाहुली' म्हणून प्रसिद्ध आहे फुकुओका गावी ज्या वेळी भुईकोट राजवाडा बांधण्यात आला, त्या वेळी त्याच्या घरभरणीच्या वेळेला ही बाहुली नजराणा म्हणून देण्यात आली या बाहुलीच्या

प्रतिकृती आजही मिळतात बाहुल्या बनविण्याची कला लोकप्रिय व्हायला आणखी दोन शतके लागली ही कला जाणणारा किशी नावाचा एक कलाकार होऊन गेला आणि त्याने प्रथम या बाहुल्या निर्माण करण्याचा व्यवसाय सुरू केला आजही ही परंपरा दाखवणाऱ्या बाहुल्या मिळतात चित्रफलकावर रंगाचे फराटे काढणे म्हणजे जशी चित्रकला नव्हे, त्याप्रमाणे बाहुल्याचे नाकडोळे रंगविणे म्हणजे हाकाता बाहुली बनविणे नव्हे बाहुलीच्या चेहऱ्यावरचे भाव समर्थपणे दाखवणे हा या कलेचा आत्मा आहे ज्याना ख्यातनाम म्हणता येईल, असे कलाकार प्रथम खूप मेहनत करून सुंदर बाहुल्या तयार करतात या बाहुलीवरून नंतर प्लॅस्टरचे साचे बनविले जातात खास मेहनत करून, मळून तयार केलेली चिकण माती या साच्यात भरली जाते साच्यातून बाहुली काढल्यावर ती वाळवली जाते आणि नंतर एक हजार फॅरनहाईट तपमानात भट्टीत भाजण्यात येते भट्टीतून बाहेर आलेल्या या बाहुल्या निर्दोष आणि गुळगुळीत असल्याची खात्री केली जाते या वेळी या बाहुल्या हस्तिदंती रंगाच्या असतात यापुढची पायरी म्हणजे रंगकाम! सर्व रंगकाम हातानी केलेले असते बाहुली रंगविताना प्रथम बाहुलीचे कपडे रंगविले जातात एका वेळी साधारणपणे २४ बाहुल्या रंगवायला घेतात हा रंग पुरा झाला की दुसरा रंग घेतात या पद्धतीमुळे वस्त्राच्या घड्या किंवा जरीकामातले बारकावे दाखविता येतात

हातपाय आणि कपडे रंगवून झाल्यावर चेहऱ्याचे रंगकाम सुरू होते रंगकामाचा हा भाग खूप अवघड आणि वेळ खाणारा आहे पाहणाऱ्याला असे वाटते की, ब्रशच्या फटकाऱ्याने डोळे, भुवया किंवा ओठ भराभर काढले जातात, परंतु चेहऱ्यावरचे भाव वास्तव वाटावे, अशी सफाई येण्याकरिता रंगकाराना किमान दहा ते बारा वर्षांचा अनुभव असावा लागतो एकाच रंगकाराने केलेल्या दोनतीन बाहुल्या जरी पाहिल्या तरी प्रत्येक बाहुलीच्या चेहऱ्यावरचा भाग अगदी वेगळा दिसतो विशेषत बाहुल्याचे डोळे रंगविणे ही फार अवघड कला आहे हाकाता बाहुल्याचे डोळे इतके जिवंत असतात की, जणू काही एखादी जिवंत मुलगी आपल्याकडे रोखून पाहते आहे, असे वाटते अजंठ्याच्या लेण्यातील एका चित्राप्रमाणे, डाव्या हातात आरसा घेऊन उजव्या हाताने आंबाड्यात आकडा घालणारी बाहुली किंवा सैल किमोनो घातलेल्या आणि समोरून कोणी तरी ओळखीचे भेटल्यावर जणू स्मितहास्याने स्वागत करणाऱ्या बाहुल्या, लग्नसमारंभासाठी नटून - थटून हसतमुखाने पण मनातल्या मनात समारंभ कसा पार

पडेल या चिंतेत असणारी बाहुली बहुधा मुलीची आई असावी रागाने दातओठ खाऊन, डोळे वटारून शत्रूच्या अंगावर जाणारा दैत्यरूपी बाहुला, जादूटोणा करणारा बाहुला यातल्या प्रत्येक बाहुल्याचा - बाहुलीचा चेहरा विलक्षण बोलका आहे यातल्या काही बाहुल्यांचे चेहरे छायाचित्र काढल्यावर इतके खरे दिसतात की, घरी येणाऱ्या पाहुण्याने विचारावे, ही मुलगी कोण ?

या बाहुल्या गृहसजावटीसाठी जगभर वापरल्या जातात सर्व जपानभर या बाहुल्या वाजवी दरात मिळतात क्वचित एखाद्या खेड्यात एखादी शे - दोनशे वर्षांपूर्वीची बाहुलीसुद्धा हाताला लागते सर्वसाधारणपणे या बाहुलीला दीडशे रुपये पडतात जपानमध्ये येणाऱ्या प्रवाश्याना अशा तऱ्हेच्या बाहुल्यांचे कारखाने बघायला मुद्दाम नेतात मिमासो हा एक प्रसिद्ध कारखाना आहे इथे काही कारणामुळे वाया गेलेल्या बाहुल्यांचे चेहरे रंगवायला प्रवाश्याना सांगितले जाते आणि मग गणपती करायला जावे आणि त्याचे माकड व्हावे अशी त्यांची स्थिती होते इथे मातीची मळणी बाहुल्यांचे साचे, भाजायच्या भट्ट्या सगळे दाखविले जाते

मला मात्र हे कारखाने बघायला आवडत नाहीत मला आवडतात त्या बाहुल्या बघायला ! त्यांच्या इवल्या इवल्या चेहऱ्यावर दिसणारे ते सुंदर भाव जणू काही आपली जन्मजन्मांतरीची जुनी दोस्ती असल्याचे सूचित करतात त्यांच्या डोळ्यात टक लावून पाहू लागलो तर त्या स्वप्नातल्या बाहुल्या जाग्या होऊ लागतात आणि मग वाटते की स्वप्नरंगातल्या या सुंदर बाहुल्यांचा ताफाच्या ताफा पुण्याला घेऊन यावा अवनी आणि मिथिला या लाडक्या नातींना या बाहुल्या द्याव्यात बाहुल्यांच्या जगात त्या एकदम गुंग होऊन जातील आणि भारत - जपान भातुकलीचा नवा महोत्सव सुरू होईल, यात शंकाच नाही !

• • •

भाग चौथा

# जगावेगळे छंद आणि प्रयोग

म्हणून 'स्त्री आणि तिचे कर्तृत्व' या शीर्षकाची चार भागाची एक मालिका लंडनहून दूरचित्रवाणीवर दाखविण्यात आली

स्टीफन रॅशब्रुक या नावाचा एक नट आहे शेक्सपियर नाटक ॲकॅडमी यामध्ये तो अभिनय शिकला आणि आज एक उत्कृष्ट नट म्हणून प्रसिद्ध आहे तीस वर्षांच्या स्टीफनचे लग्न झाले असून त्याला दोन लहान मुले आहेत एके दिवशी सकाळी तो आपल्या बायकोचा निरोप घेऊन बी बी सी च्या स्टुडिओत गेला साधी पॅंट, मोकळ्या गळ्याचा शर्ट घालून स्टीफन स्टुडिओत गेला जाताना त्याला लंडनच्या रस्त्यावर आपल्याला कोणी न्याहाळत आहे, कोणी रोखून पाहात आहे, कोणी धक्का मारत आहे असे झाले नाही, कारण तो पुरुष होता त्याला आपल्या समाजात वागण्याचा आत्मविश्वास होता त्यामुळे भर गर्दीत धक्काबुक्कीत जातानासुद्धा तो सहजपणे पुढे सरकत राहिला अडीच तीन तासाने मात्र बी बी सी च्या स्टुडिओत रंगभूषा कक्षामधून स्त्रीरूप घेऊन तो बाहेर आला तो जेन नावाची एक स्त्री बनून खरे म्हणजे त्याचा देह, त्याचे मन तेच होते परंतु स्त्रीचा वेष परिधान केल्यावर त्याला आत्मविश्वास बोथट झाल्यासारखे वाटू लागले अस्वस्थ वाटू लागले घशाला कोरड पडल्यासारखे झाले आपण असुरक्षित आहोत असे वाटू लागले याचे कारण स्टीफनला खराखुरा सांस्कृतिक भूकंपाचा धक्काच बसला होता जगाच्या दृष्टीने का होईना तो स्त्री झाला होता प्रिन्सेस डायनाप्रमाणे त्याचे काळे केस मागे वळून त्याला कुरळ्या केसाचा मोठा केशकलाप दिलेला होता गोंडस चेहऱ्याच्याभोवती रुळणारे केस पुन पुन्हा मागे सरकवण्याची लकब स्टीफनने उचलली होती खोट्या पापण्या लावून डोळ्याला निळसर रंगाची छाया देण्यात आली होती त्याच्या संबध चेहऱ्याचा मेकअप असा करण्यात आला होता की, त्याचे पुरुषीपण झाकून जावे फुलाफुलाचा ब्लाऊज, खोटी अंतर्वस्त्रे आणि निळसर रंगाचा लोकरी स्कर्ट त्याने घातला होता त्याचे नवीन रूप प्रथम दर्शनीच ही स्त्री आहे असा संपूर्ण विश्वास निर्माण करणारे होते बी बी सी च्या मालिकेत स्टीफन काम करीत होता पुरुषाच्या दुनियेमध्ये स्त्रीला वागताना कोणत्या अडचणी येतात, हे पाहण्याचा हा प्रयोग होता यामधून स्त्रियांच्याविषयी पुरुषाची कल्पना काय आहे याचे मोजमाप करण्याचा हा प्रयत्न होता आणि म्हणून स्टीफन या नटाला स्त्रीरूप देण्यात आले होते

कार्यक्रमाची सुरुवात करताना निर्मात्या पामेला स्टीफन्सन म्हणाल्या, पुरुष

असलेल्या स्टीफनला जेन या नावाच्या स्त्रीचे रूप धारण केल्यानतर पुरुषाच्या दुनियेत नेमक्या काय अडचणी येतील हे आम्ही पाहणार आहोत यासाठी जेन जिथे जाईल तिच्या पाठी-मागे एक लपविलेला कॅमेरा असेल आणि त्यामुळे जेनविषयीच्या भोवतालच्या पुरुषाच्या प्रतिक्रिया आम्हाला त्याना नकळत, पण सहजपणे टिपता येतील जेनला गाडी पार्क करताना शेजारच्या गाडीमधला ड्रायव्हर काय म्हणेल, सहजपणे जागा देईल, का जागा करून देताना आपला डावा डोळा किचित बारीक करील, बसमधून जाताना एखाद्या पुरुषी वाटणाऱ्या विनोदाला जेनला खळखळून हसता येईल का, का तिला लाजून चूर व्हावे लागेल, सध्याकाळी घरी गेल्यावर दिवसभराच्या या पुरुषी-दुनियेत वागण्याच्या श्रमाने जेनची डोकेदुखी पुन्हा उफाळून येईल की काय, या साऱ्या प्रश्नाची उत्तरे शोधायची होती अठ्ठेचाळीस तास स्त्री म्हणून वावरल्यानतर जेनचा अनुभव असा की, स्त्री म्हणून पुरुषी दुनियेत जगणे ही थट्टा नव्हे फार अवघड प्रसग आहे

परतु हा सगळाच प्रयोग कल्पनेपेक्षा अधिक यशस्वी झाला जेनच्या पाठीमागे असलेल्या लपविलेल्या कॅमेऱ्यामुळे पूर्व लडनच्या रस्त्यावरील शेकडो माणसे फसली हे स्पष्टपणाने कॅमेऱ्याने टिपले

रस्त्यावरून जाताना शेजारी एका इमारतीचे काम चालू होते ट्रकमध्ये विटा भरणाऱ्या कामगाराच्यापैकी एका धष्टपुष्ट कामगाराने तिच्याकडे पाहून एक सुदर शीळ घातली आणि म्हणाला, 'वाऽउ' फारच छान! किचित खर्ज आवाज सोडला तर काय पाखरू आहे आवाज म्हणाल तर हा सुद्धा आपल्याला एकदम पसत आहे ''

पण यापेक्षाही अगदी वेगळी प्रतिक्रिया स्त्रियाच्याकडून आली, असे जेनला दिसले अनेक स्त्रिया अगदी सहजपणाने डोळे भरून तिच्या कपड्याच्याकडे पाहात राहात पुरुषाना स्त्रीकडे बघताना जो सकोच वाटेल, जो चोरटेपणा वाटेल, त्याचा लवलेशही त्याच्या पाहण्यात नव्हता हे स्वाभाविकच आहे परतु वेशभूषा आणि रगभूषा पाहताना कोठेतरी असूया जळजळते की काय असे जेनला वाटले बी बी सी च्या वतीने जेनला एका शाही रेस्टॉरटमध्ये जेवणाकरता नेले त्या वेळी कोणालाच जेनच्या कृत्रिमपणाचा सशय आला नाही. एका कार्यालयातून ज्येष्ठ सेक्रेटरीला नव्या जागेसाठी ही मुलगी आलेली आहे असे सागितले गेले ते तिला सर्वस्वी पटले ही अधिकारी स्त्री या नवीन नोकरी मागणाऱ्या मुलीकडे पाहताना

जेनला वाटले, 'ती माझे कपडे, माझी रगभूषा आणि व्यक्तिमत्त्व याची तपासणी करीत आहे' कुठल्याही पुरुषाने केलेल्या तपासणीपेक्षा ही अधिक कडक तपासणी होती फक्त एका स्त्रीला, जेन ही स्त्री नसून तो एक चागला दिसणारा हिजडा आहे असे क्षणभर वाटले असावे असा जेनला भास झाला कारण जाता जाता आपल्या मात्रणाला ती इतकच म्हणाला, अलाकड याचा उपद्रव फारच झाला आहे आणि काही फरक कळत नाही " समाजात जेनच्या भोवती वावरणारे पुरुष मात्र अगदी वेगळे वागत असत तिच्याशी बोलताना प्रत्येकजण मुद्दाम लाघवी स्वर काढून बोलत असत ज्याना बोलण्याची सधी मिळत नसे ते जाता जाता सहजपणाने मुक्ताफळे उधळत होते या लोकाशी कसे वागावे याविषयीचे तपशीलवार शिक्षण जेनला दिलेले होते क्वचित्प्रसगी तर कोणी नकळत असा जेनच्या खाद्यावर हात ठेवी, तर हस्तादोलन करताना कोणाचा हात अधिक वेळ रेंगाळतो आहे असे जेनला वाटे. जेन म्हणाली, "याची भीती वाटत नव्हती, पण स्त्रीरूपात आपण असुरक्षित आहोत असे मात्र वाटत राही". खुर्चीवर बसल्यावर पुरुष बसतात त्याप्रमाणे पाय लाब करून बसण्याऐवजी गुडघे जवळ करून स्कर्ट खाली ओढण्याची सवय करणे जेनला प्रथम अवघडच गेले

हा प्रयोग कितपत यशस्वी झाला हे बघण्याचे काम बी बी सी च्या प्रेक्षकाच्यावर सोपविण्यात आले होते स्त्री-मुक्तीची चळवळ पुष्कळशा प्रमाणात यशस्वी झाल्यानतरसुद्धा पुरुषी दुनियेत स्त्री ही अजूनही असुरक्षित आहे काय, स्त्री कितीही कर्तृत्वसपन्न असली तरी केवळ ती स्त्री आहे म्हणून समाज तिला योग्य ते स्थान देत नाही हे खरे आहे काय, आणि पुरुषाच्या दुनियेत स्त्री ही सदैव अबलाच मानली जाते की काय, असे हे प्रश्न होते एक स्त्री म्हणाली की, कामावर जाणाऱ्या पुष्कळशा स्त्रिया एका ठरावीक रस्त्यानेच जातात, कारण त्याना सुरक्षित रस्ता हवा असतो स्त्रिया आणि त्याच्या घरातील जबाबदाऱ्या याचेही ओझे त्याच्या वागण्यावर पडत असावे, आणि आपल्या व्यावसायिक जबाबदारीमुळे घरकामाकडे किवा मुलाकडे दुर्लक्ष झाले तर एक प्रकारची अपराधीपणाची भावना स्त्रियाच्यात दिसते असे पुरुषाना कधीच वाटत नाही या प्रश्नाना सोपी उत्तरे नाहीत त्यासाठी पुरुषानी अतर्मुख होऊन विचार करायला हवा असे अनेक स्त्री- प्रेक्षकानी सागितले

स्टीफनला जेन बनवण्याकरिता वेगळ्या प्रकारचा मेकअप बी बी सी ने तयार केला होता डोक्यावर घातलेल्या खोट्या केसाच्या टोपाचा रग जुळावा म्हणून

स्टीफनच्या खऱ्या केसांना रंग दिला गेला हनुवटीवरील दाढीची रेषा दिसू नये म्हणून प्लास्टिक सर्जरीत वापरतात तशा प्रकारचे वेगळे रोपण वापरण्यात आले स्टीफनला लाजता येणार नाही म्हणून गालावर वेगळाच गुलाबी रंग वापरला गालहाडे (चिकबोन्स) दिसून यावीत म्हणून वेगळा त्वचारंग वापरण्यात आला डोळ्याच्यावरही वेगळे रंग वापरून त्याला साजेल अशी ओष्ठशलाकाही वापरण्यात आलेली होती इतकी रंगभूषा करूनसुद्धा स्टीफन हा जेनसारखा दिसत नाही म्हणून त्याच्यासाठी बारा हजार रुपये किमतीचा एक वेगळा कुरळ्या चंदेरी केसांचा टोप बनविण्यात आला मात्र हा सर्व उद्योग केल्यानंतर जेव्हा जेन होऊन स्टीफन स्टुडिओच्या बाहेर पडला तेव्हा तो जवळ जवळ स्त्री झाला होता स्टीफनने रंगभूमीवर अनेक कामे केली परंतु बी बी सी च्या या प्रयोगाचे काम संपले त्या वेळी त्याने खराखुरा सुटकेचा नि श्वास सोडला ही भूमिका फार आव्हान देणारी होती बारमेड म्हणून काम करत असताना एका माणसाने जेनला चक्क लग्नाची मागणी घातली हा त्याच्या दृष्टीने फारच नाट्यमय पण अवघड प्रसंग होता आता मात्र स्टीफन निश्चितपणे म्हणतो की मला पुन्हा स्त्री होण्याची इच्छा नाही मला आपले पुरुषच राहायला आवडेल

• • •

## १६.

# छंद हेरगिरीचा

प्रत्येक माणसाला काही ना काही तरी छंद असतो कोणी देशोदेशींची नाणी जमवितो कोणी पोस्टाची तिकिटे [illegible]

माझ्या वाचनात बोस्टनच्या एका माणसाचा जगावेगळाच छंद आला या माणसाचे नाव आहे थर्मन किंवा जॅक नायलर जॅक नायलरचा छंद आहे तो कॅमेरे जमवायचा अशी पुष्कळ माणसे मी पाहिली आहेत की, ते कॅमेरे जमवितात, घड्याळे जमवितात, पण जॅकचा छंद जगावेगळा म्हणायला हवा तो जे कॅमेरे जमवितो ते मुख्यत हेरगिरीसाठी वापरले जाणारे कॅमेरे असतात अर्थात हे सगळे कॅमेरे पाहिले म्हणजे छायाचित्रकलेचा जवळजवळ इतिहासच डोळ्यासमोर उभा राहतो पूर्वी फोटो काढावयाचा म्हणजे लाकडी तिपाईवर ठेवलेला आणि त्याच्यावर काळे फडके घातलेला कॅमेरा आणि त्याच्या आत तोंड लपवून पाठीमागे उभा राहिलेला छायाचित्रकार डोळ्यासमोर येतो या शतकाच्या सुरुवातीला प्रथमच छुपे कॅमेरे अस्तित्वात आले पॅरिस, न्यूयॉर्कच्या रस्त्यावर फिरणाऱ्या सुदर स्त्रियाचे गुपचूप फोटो काढावेत म्हणून काही गुलहौशी माणसानी असा एक कॅमेरा बनवून घेतला होता पण एकदा अशा तऱ्हेने फोटो काढता येतात हे कळल्यावर या धर्तीवर अनेक कॅमेरे बनविण्यात आले हॅटमध्ये, टायमध्ये, कबरपट्ट्यात, वॉटर बॅगमध्ये असे अनेक तऱ्हेचे कॅमेरे तयार होऊ लागले १९३७ मध्ये मिनॉक्स कपनीने कॅडबरीच्या एका चॉकलेटच्या आकाराचा चिमुकला कॅमेरा केला त्यानतर आता असे कॅमेरे

निर्माण झाले आहेत की, काडचाची पेटी, पेन, सिगरेट लायटर, छोटचा रेडिओमध्ये ते बसविले जातात

'टिक्का' कपनीचा घडचाळात बसविलेला कॅमेरा १९०८ मध्ये विक्रीला आला घडचाळाच्या मध्यभागी याची लेन्स आहे आणि घडचाळाच्या किल्लीत फिल्म गुडाळण्याची व्यवस्था आहे या कॅमेऱ्याने एकामागोमाग एक असे २० फोटो घेता येतात या कॅमेऱ्याची रचना स्वीडनमध्ये करण्यात आली आणि उत्पादन इग्लडमध्ये होते एका सिगरेटच्या पाकिटात बसविता येईल असा दुसरा कॅमेरा तेसिना या स्वीस कपनीने बनविला गुलाबाच्या मोठ्या पाकळीच्या आकाराचा पेटल कॅमेरा हा जपानी कपनीने बनविला याची फिल्म तबकडीच्या आकाराची असून, प्रत्येक चित्राबरोबर ती फिरते त्यानतर फ्रेंच कपनीने पुस्तकात लपविलेला एक कॅमेरा तयार केला पुस्तकाच्या बाधणीच्या रुदीमध्ये एका चित्राच्या आत कॅमेऱ्याचे भिग आहे आणि पानदर्शक म्हणून पुस्तकाला जी दोरी लावलेली असते ती ओढली की फोटो घेता येतात १९०८ मध्ये हातात धरावयाच्या काठीच्या मुठीमध्ये लपविलेला कॅमेरा केला गेला काठीची मूठ दाबली की, फोटो काढण्याची सोय आहे फ्रेंच महिला गुप्त हेराकरिता टायपिनसारखा कॅमेरा बनविण्यात आला त्याचा आकार मोठ्या बटनाएवढा आहे पहिल्या महायुद्धात जर्मन सैनिक कबुतराच्या पोटाशी छोटा कॅमेरा पट्टचाने बाधीत ही कबुतरे उडून शत्रूच्या छावणीभोवती फिरून परत येत आणि परत आल्यावर त्याच्या जवळचे आपोआप घेतले गेलेले फोटो जर्मन गुप्तहेराना उपलब्ध होत १९५३ मध्ये जपानी गुप्तहेरानी पेनच्या आकाराचा कॅमेरा केला त्यामुळे सहजपणे खिशातून पेन काढावा अशा रीतीने कोणालाही नकळत कागदपत्राचे फोटो घेणे शक्य झाले अशीही एक कथा सागतात की, एका लष्करी अधिकाऱ्याच्या डोळ्याचे ऑपरेशन केले गेले त्याच्या डोळ्याच्या जागी छुपा कॅमेरा बसविण्यात आला जनरलच्या हुद्द्याचा हा अधिकारी असल्यामुळे याच्या पाहण्यात खूप गुप्त कागदपत्रे येत असत आणि त्या कागदपत्राचे आपोआप फोटो घेतले जात काही यार्ड अतरावर असलेल्या मोटारीमधूनही ही दृश्ये टिपली जात आणि अनेक वर्षांपर्यंत आपल्या सैन्याची गुप्त बातमी शत्रूला कळते कशी याचा त्या जनरलला अचबा वाटत असे

१९८१ मध्ये बोटात घातलेल्या अगठीमध्ये बसविलेला कॅमेरा इटालियन कपनीने केला इग्लड आणि अमेरिकेच्या मानाने रशियन गुप्तखाते जरासे

१६.

# छंद हेरगिरीचा

प्रत्येक माणसाला काही ना काही तरी छंद असतो कोणी देशोदेशींची नाणी जमवितो, कोणी पोस्टाची तिकिटे जमवितो, कोणी सह्या जमवितो अलीकडेच माझ्या वाचनात बोस्टनच्या एका माणसाचा जगावेगळाच छंद आला या माणसाचे नाव आहे थर्मन किंवा जॅक नायलर जॅक नायलरचा छंद आहे तो कॅमेरे जमवायचा अशी पुष्कळ माणसे मी पाहिली आहेत की, ते कॅमेरे जमवितात, घड्याळे जमवितात, पण जॅकचा छंद जगावेगळा म्हणायला हवा तो जे कॅमेरे जमवितो ते मुख्यत. हेरगिरीसाठी वापरले जाणारे कॅमेरे असतात अर्थात हे सगळे कॅमेरे पाहिले म्हणजे छायाचित्रकलेचा जवळजवळ इतिहासच डोळ्यासमोर उभा राहतो पूर्वी फोटो काढावयाचा म्हणजे लाकडी तिपाईवर ठेवलेला आणि त्याच्यावर काळे फडके घातलेला कॅमेरा आणि त्याच्या आत तोंड लपवून पाठीमागे उभा राहिलेला छायाचित्रकार डोळ्यासमोर येतो या शतकाच्या सुरुवातीला प्रथमच छुपे कॅमेरे अस्तित्वात आले पॅरिस, न्यूयॉर्कच्या रस्त्यावर फिरणाऱ्या सुदर स्त्रियाचे गुपचूप फोटो काढावेत म्हणून काही गुलहौशी माणसानी असा एक कॅमेरा बनवून घेतला होता पण एकदा अशा तऱ्हेने फोटो काढता येतात हे कळल्यावर या धर्तीवर अनेक कॅमेरे बनविण्यात आले हॅटमध्ये, टायमध्ये, कबरपट्ट्यात, वॉटर बॅगमध्ये असे अनेक तऱ्हेचे कॅमेरे तयार होऊ लागले १९३७ मध्ये मिनॉक्स कपनीने कॅडबरीच्या एका चॉकलेटच्या आकाराचा चिमुकला कॅमेरा केला त्यानतर आता असे कॅमेरे

निर्माण झाले आहेत की, काडयाची पेटी, पेन, सिगरेट लायटर, छोटया रेडिओमध्ये ते बसविले जातात

'टिक्का' कपनीचा घड्याळात बसविलेला कॅमेरा १९०८ मध्ये विक्रीला आला घड्याळाच्या मध्यभागी याची लेन्स आहे आणि घड्याळाच्या किल्लीत फिल्म गुंडाळण्याची व्यवस्था आहे या कॅमेऱ्याने एकामागोमाग एक असे २० फोटो घेता येतात या कॅमेऱ्याची रचना स्वीडनमध्ये करण्यात आली आणि उत्पादन इंग्लडमध्ये होते एका सिगरेटच्या पाकिटात बसविता येईल असा दुसरा कॅमेरा तेसिना या स्वीस कपनीने बनविला गुलाबाच्या मोठ्या पाकळीच्या आकाराचा पेटल कॅमेरा हा जपानी कपनीने बनविला याची फिल्म तबकडीच्या आकाराची असून, प्रत्येक चित्राबरोबर ती फिरते त्यानतर फ्रेंच कपनीने पुस्तकात लपविलेला एक कॅमेरा तयार केला पुस्तकाच्या बाधणीच्या रुंदीमध्ये एका चित्राच्या आत कॅमेऱ्याचे भिंग आहे आणि पानदर्शक म्हणून पुस्तकाला जी दोरी लावलेली असते ती ओढली की फोटो घेता येतात १९०८ मध्ये हातात धरावयाच्या काठीच्या मुठीमध्ये लपविलेला कॅमेरा केला गेला काठीची मूठ दाबली की, फोटो काढण्याची सोय आहे फ्रेंच महिला गुप्त हेरांकरिता टायपिनसारखा कॅमेरा बनविण्यात आला त्याचा आकार मोठ्या बटनाएवढा आहे पहिल्या महायुद्धात जर्मन सैनिक कबुतराच्या पोटाशी छोटा कॅमेरा पट्टयाने बाधीत ही कबुतरे उडून शत्रूच्या छावणीभोवती फिरून परत येत आणि परत आल्यावर त्याच्या जवळचे आपोआप घेतले गेलेले फोटो जर्मन गुप्तहेराना उपलब्ध होत १९५३ मध्ये जपानी गुप्तहेरानी पेनच्या आकाराचा कॅमेरा केला त्यामुळे सहजपणे खिशातून पेन काढावा अशा रीतीने कोणालाही नकळत कागदपत्राचे फोटो घेणे शक्य झाले अशीही एक कथा सागतात की, एका लष्करी अधिकाऱ्याच्या डोळ्याचे ऑपरेशन केले गेले त्याच्या डोळ्याच्या जागी छुपा कॅमेरा बसविण्यात आला जनरलच्या हुद्द्याचा हा अधिकारी असल्यामुळे याच्या पाहण्यात खूप गुप्त कागदपत्रे येत असत आणि त्या कागदपत्राचे आपोआप फोटो घेतले जात काही यार्ड अतरावर असलेल्या मोटारीमधूनही ही दृश्ये टिपली जात, आणि अनेक वर्षांपर्यंत आपल्या सैन्याची गुप्त बातमी शत्रूला कळते कशी याचा त्या जनरलला अचबा वाटत असे

१९८१ मध्ये बोटात घातलेल्या अगठीमध्ये बसविलेला कॅमेरा इटालियन कपनीने केला इग्लड आणि अमेरिकेच्या मानाने रशियन गुप्तखाते जरासे

मागासलेलेच म्हणायला हवे कारण त्यानी तयार केलेला खूप कौशल्यपूर्ण कॅमेरा म्हणजे एका सिगरेटच्या पाकिटात बसविलेला होता ठरावीक क्रमाकाच्या सिगरेटसवर बोटाने ठोकले की, कॅमेऱ्याचे भिग दिसू लागे आणि फोटो घेतले जात १९५८ मध्ये रशियाने स्त्रियाच्या पावडर कॉम्पॅक्ट केसमध्ये कॅमेरा बसविला आणि त्याच्या स्त्री गुप्तहेराना वापरायला दिला जपानमध्ये १९५० मध्ये प्रथम सिगरेट लायटरमध्ये बसविलेला कॅमेरा विकायला आला एका फ्रेंच कपनीने असा एक कॅमेरा तयार केला की, आपण एका बाजूला बघत असताना दुसऱ्याच बाजूचे फोटो त्यात घेतले जात असतात

दुसऱ्या महायुद्धामध्ये छायाचित्रणाचे तत्र आणखी प्रगत झाले आणि सबधित पानेच्या पाने मजकूर त्याची छायाचित्रे घेऊन तो आकाराने लहान किवा मोठा करता येऊ लागला त्यामुळे जर्मन गुप्तहेर खात्याने या तत्राचा उपयोग सुरू केला गोपनीय असलेला मजकूर त्याचा फोटो घेऊन टाचणीच्या टोकाइतका बारीक छापावयाचा आणि एरवी साध्या साध्या दिसणाऱ्या पत्रात त्याचा पूर्णविराम म्हणून उपयोग करावयाचा ही पत्रे अमेरिकेत पोहोचल्यावर तेथील माणसे तो चिकटविलेला 'पूर्णविराम' सोडवून घेत आणि त्याचा आकार पुन्हा मोठा करून सर्वच्या सर्व माहिती वाचू शकत परतु ज्या वेळी एका माणसाला एकसारखी निरर्थक वाटणारी पत्रे येऊ लागली त्या वेळी पोस्टाला त्याचा सशय आला पुष्कळ प्रयत्नानी त्याना या पूर्णविरामाचे गूढ उलगडले जर्मन गुप्तहेर खात्याने अशाच तऱ्हेने कागदाचा मजकूर लहानमोठा करून कुठल्या तरी फोटोवर कळणार नाही अशा रीतीने चिकटवायला सुरुवात केली मग छायाचित्रात कोणाचे डोळे, कोणाचे कान, कोणाचा टाय यामध्ये ही गुप्त माहिती दडविलेली असे पाश्चात्त्य देशामध्ये आपल्या बायको - मुलाचे फोटो जवळ ठेवणे ही स्वाभाविक गोष्ट मानली जाते त्यामुळे अशा तऱ्हेच्या फोटोमधून काही माहिती पाठविली जात असेल अशी शकासुद्धा वरकरणी कोणाला आली नाही परतु कित्येक महिने पाठलाग केल्यानतर त्याना याचा सुगावा लागला आणि ही छायाचित्रे ताब्यात घेण्यात आली अशा तऱ्हेचा एक उपाय ब्रिटिश हेरखात्याने केला होता जगप्रसिद्ध कादबऱ्या घ्यावयाच्या आणि त्यातले मधले कुठले तरी पान काढून त्याऐवजी तोच मजकूर असलेले पान त्यावर साध्या डोळ्याला न दिसणारा मजकूर छायामुद्रित करून चिकटविलेले असे विशिष्ट प्रकारच्या किरणाच्या प्रकाशात ही अक्षरे दिसू लागतात एकाच लेखकाच्या

कादबऱ्या वारवार पोस्टाने येऊ लागल्यावर हेर खात्याला त्याचा सशय आला आणि त्याना त्या पुस्तकातले गूढ उलगडले

कॅमेऱ्यामुळे गुप्तहेराना जणू काही तिसरा डोळा उपलब्ध झाला आहे असे वाटते या सदर्भामध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या आधी घडलेली घटना अशी आहे की, एका देशातल्या अमेरिकन वकिलातीचे रशियाबरोबरचे सबध फार चागले होते त्या काळात अमेरिका - रशिया याची दोस्ती असल्यामुळे येणे - जाणे चालूच असे एकदा रशियन खात्याने आपल्या स्नेहाचे प्रतीक म्हणून अमेरिकन दूतावासाला अमेरिकन गरुडाचे राजचिन्ह भेट म्हणून देण्याचे ठरविले त्याने मोठ्या आकाराचा एक लाकडी गरुड त्याला खरोखरची पिसे लावून अमेरिकन राजदूताला अर्पण केला स्वाभाविकपणे अमेरिकन राजदूताच्या खुर्चीच्या पाठीमागे भिंतीवर त्या गरुडाला स्थानापन्न करण्यात आले त्यानतर अनेक वर्षे अमेरिकन खात्याच्या गुप्त बातम्या रशियाला कशा कळतात हे कोडे अमेरिकन सरकारला पडले होते, परतु याची एकदा पुरी चौकशी व्हावी म्हणून अमेरिकन तत्रज्ञानी दूतावासाची ज्या वेळेला सपूर्ण तपासणी केली त्या वेळेला असे लक्षात आले की, या लाकडी गरुडाचे डोळे खोटे होते आणि त्याच्या जागी एक छुपा तीव्र शक्तीचा कॅमेरा बसविलेला होता त्या गरुडाचे डोळ्याचे कोन असे होते की, राजदूतासमोर आलेल्या टेबलावरचे कागद सहजपणाने कॅमेऱ्याच्या कक्षेमध्ये येत असत आणि त्या सर्व कागदपत्राचे छायाचित्र रशियन सरकारला उपलब्ध होत असे अर्थात काहीच गाजावाजा न करता अमेरिकन सरकारने त्या गरुडाच्या डोळ्याचे ऑपरेशन करून तेथे साधे काचेचे डोळे बसविले

कॅमेऱ्याचा असा छुपा उपयोग 'स्कॉटलड - यार्ड' या ब्रिटिश गुप्तहेर सस्थेनेसुद्धा केला आहे परकीय देशाचे हेर हे दूतावासाच्या गाड्या न वापरता खासगी गाड्या वापरून कुठेतरी जात आणि कागदपत्रे गोळा करत असा सशय स्कॉटलड - यार्डला आला होता दूतावासातून बाहेर पडलेल्या माणसाचा पाठलाग करणे जवळजवळ अवघड होते, त्यामुळे ब्रिटिश गुप्तहेर खात्याने एक सोपा पण परिणामकारक उपाय योजला त्यानी दूतावासाबाहेर रेंगाळणाऱ्या टॅक्सी गाड्या या 'स्कॉटलड - यार्ड'च्याच असतील अशी व्यवस्था केली आणि या गाड्यामध्ये मागल्या बाजूला बैठकीच्या वर जो दिवा लावलेला असे, त्या दिव्याच्या जागी एक कॅमेरा बसविला हा परदेशी हेर टॅक्सी घेऊन एका विशिष्ट जागी जाई आणि तेथून

लडनमधल्या फितूर माणसाला टॅक्सीत घेऊन फिरत राही फिरता फिरता ते एकमेकाना कागदपत्राचे आदान-प्रदान करत, परतु मागे बसविलेल्या कॅमेऱ्यामुळे टॅक्सीत असलेला माणूस कोण आहे, तो कोठून येतो आणि काय कागदपत्रे देतो याचा छडा लावणे शक्य झाले तेव्हापासून स्कॉटलड-यार्डने अनेक तऱ्हेचे कॅमेरे बनवून त्याचा उपयोग आपल्या कामात केलेला आहे अलीकडे लडन ऑफिसमध्ये जी कागदपत्रे उपलब्ध झालेली आहेत त्यावरून असे दिसते की, भारतीय स्वातत्र्याच्या चळवळीमध्ये अशा तऱ्हेच्या कॅमेऱ्याचा उपयोग त्या वेळच्या ब्रिटिश हेरखात्याने केलेला होता

आजकाल छायामुद्रणामध्ये इतकी विलक्षण वैज्ञानिक प्रगती झालेली आहे की, खूपशी माहिती अगदी छोट्या आकारात लिहून ती एखाद्या पूर्णविरामाद्वारे दुसरीकडे पाठविता येते त्याचप्रमाणे गुप्त सभाषण ऐकण्याकरिताही आता नवनवीन यत्रसामग्री उपलब्ध झालेली आहे तसे पाहिले तर हेरगिरी ही एक राजकीय स्पर्धा आहे त्याला विज्ञानाचे पाठबळ मिळाले तर काय घडेल हे सागता येत नाही

• • •

## १७.

# किमया देह गोठविण्याची

आपल्या जवळचा एखादा, माणूस एखादा आप्त, एखादा परिचित मरण पावला की साहजिकच दु ख होते  दु खाबरोबर मनाला एक बोचणीही असते  हे रूप आता परत दिसणार नाही  हा चेहरा, हे बोलके डोळे, हे चालतेबोलते शरीर आता कायमचे दृष्टिआड होणार! मृत्यूनतर उरणार तो केवळ पार्थिव देह! पण हा पार्थिव देहही दीर्घकाळ जतन करता आला तर? तोच चेहरा, तेच डोळे, तोच देह वर्षानुवर्षे तसाच्या तसा पाहता आला तर?

पूर्वी कॅथलिक पथामध्ये श्रेष्ठ सताचे पार्थिव देह कायम स्वरूपात जतन करण्याचा प्रयत्न केला जात असे  गोव्यामध्ये सेंट झेवियरचे शरीर अजूनही ठेवलेले आहे  इजिप्तमध्ये कित्येक सम्राटाचे देह 'ममी' या स्वरूपात आजही ठेवलेले आहेत  चीनमध्ये ही विद्या उपलब्ध होती असा पुरावा मिळतो आहे  भारतातसुद्धा मातीच्या मोठ्या मडक्यात मृताला घालून ते पुरलेले राजण अजूनही कुठे सापडतात

गेल्या खेपेला अमेरिकेत असताना फ्लोरिडा येथे मी गेलो होतो  तेथे मृताना चिरतन जगविण्याच्या एका प्रक्रियेविषयी ऐकले होते  तेथे पाळीव प्राण्यावर केलेले प्रयोग मला पाहावयास मिळाले  कुत्र्या-माजराचे देह या प्रकारे गोठवण्याच्या प्रक्रियेसाठी आणतात  अशा तऱ्हेने गोठविलेले अल्सेशियन कुत्रे मी पाहिले  तसेच गोठवून कोरडे केलेले माजर पाहिले  हे प्राणी पाहताना ते अगदी जिवत आहेत असा भास होत होता  चागल्या तऱ्हेने हे प्राणी गोठविले होते  हे प्राणी आणखी हजार वर्षे

तरी असेच दिसत राहतील पहिला मानवी देह गोठविण्याची योजना लवकरच अमलात येत आहे त्यामुळे माणूस मेला तरीही त्याच्या पार्थिव देहाचे सुभग दर्शन आणखी काही हजार वर्षे होत राहील हा एक नवा वैज्ञानिक चमत्कारच ठरेल

हे सारे कसे सुचले असेल ? अवकाशात गेलेला माणूस अवकाशात नाहीसा झाला तर त्या विशाल अवकाशाच्या पोकळीत आपोआपच त्याच्या शरीरातील द्रवपदार्थ शुष्क होऊन तो देह कोरडा होईल केव्हा तरी अवकाशात तरंगणारा तो देह आपल्याला सापडला तर त्याच्या चेहऱ्यावरचे हेल्मेट काढेपर्यंत तो भूत आहे हे कळणार नाही इतके त्याचे शरीर जिवत दिसेल हेल्मेट काढल्यावर मात्र लक्षात येईल की हा मृतदेह आहे, कारण त्याला डोळेच नाहीत डोळे हा मुख्यत द्रवपदार्थ असल्याने कोरडे करण्याच्या प्रक्रियेत मृतदेहाचे डोळे मात्र नाहीसे झालेले असतात मृतदेह गोठविण्याच्या सगळ्या प्रक्रियेचे प्रमुख जेफ वेबर हे शास्त्रज्ञ आहेत जेफ पस्तीस वर्षांचे आहेत जेफच्या उद्योगाचे नाव 'चिरतन जीवन प्रतिष्ठान (अमेरिका)' असे आहे हा एक झपाट्याने वाढणारा उद्योग आहे

फ्लोरिडामध्ये क्लिअर वॉटर या उपनगरात जेफचे कार्यालय आहे कार्यालयात त्याच्यामागे दोन पक्षी डहाळीवर बसले आहेत ते उडून जाणे शक्यच नाही कारण त्याना गोठविले आहे या पद्धतीने गोठवून ठेवलेले कुत्रे अथवा माजरे अनेक घरात आहेत आपल्या पाळीव प्राण्यावर प्रेम करणाऱ्या या कुटुबानी या माजरासाठी थाळी ठेवली आहे रात्री थाळीत दूध घातले जाते सकाळी उठल्यावर मालकीण मनीमाऊच्या पाठीवर हात फिरवून 'झोप झाली का ?' असे विचारते अर्थातच चिरनिद्रेत असणाऱ्या मनीमाऊला जाग कधीच येणार नसते ती दूधही पिणार नसते पण मालकिणीला मात्र समाधान असते आपण तरी पितराना पिंड देताना याहून वेगळे काय करतो ? ठिकठिकाणचे लोक जेफकडे आपले पाळीव प्राणी पाठवतात काही आठवड्यानतर त्याना गोठवून, कोरडे करून एक छान 'पोझ' देऊन पेटीतून परत पाठवतात

एखादी गोष्ट खूप दिवस कशी टिकवावी याचा विचार पाकशास्त्रापासूनच सुरू झाला असला पाहिजे आपण लोणचे घालतो म्हणजे नेमके काय करतो ? मिठासारखा 'प्रिझर्व्हेट' किवा पदार्थ टिकवून ठेवणारा मसाला वापरून हे केले जाते एखादा पदार्थ गोठवून कोरडा करणे ही प्रक्रिया कॉफी टिकविण्यापासून सुरू झाली कॉफीच्या ताज्या - ताज्या बिया प्रथम गोठविल्या जातात त्याच्यामधील द्रवपदार्थ

काढून टाकले जातात नंतर कुटून त्याची पावडर केली जाते याच कॉफीवर गरम पाणी घातले की, ताज्या कॉफीचा सुगंध देणारी 'इन्स्टंट कॉफी' तयार होते या उद्योगात कोट्यवधी रुपये गुंतलेले आहेत यातून पदार्थ चिरंतन ठेवण्याचा विचार सुरू झाला आपल्या लग्नात दिलेला पुष्पगुच्छ तसाच ताजा ठेवता आला तर नातवाना दाखवायला किती बरे वाटेल ? मासेमारीमध्ये गळाला जे आमीष लावतात ते टिकविता आले किंवा वैद्यकीय अभ्यासासाठी लागणारे एखाद्याचे हृदय टिकवता आले तर ? ज्या वेळी पाळीव प्राण्याच्या मृतदेहावर निर्द्रवीकरणाचा प्रयोग झाला त्या वेळी जिवंत वाटावे इतके चांगले प्राणी तयार झाले काही प्राण्याच्या अंगावरची उबदार लव जशीच्या तशीच राहिली अंगातले द्रवपदार्थ गेल्यामुळे वजन खूप कमी झाले डोळे नाहीसे झालेले पण त्या जागी कृत्रिम बसविलेले, आणि कोरड्या शरीरात तारा बसवून एका विशिष्ट 'पोझ'मधे त्या प्राण्याला बसविले जेफच्या मते अवकाशामध्ये हीच प्रक्रिया होत असल्याने आणि तेथे गुरुत्वाकर्षण नसल्यामुळे असे लाखो देह अवकाशात साठणे शक्य आहे याच उद्योगातला फ्रेड रिकहार्ट म्हणतो, "१९९५ सालापर्यंत मला पहिला मानवी मृतदेह गोठवून कोरडा करून टिकवायचा आहे" मृतदेह 'एम्बाम' करण्याचा फ्रेडचा धंदा आहे मृत देह काही काळ चांगला टिकविण्याच्या प्रक्रियेला एम्बामिंग म्हणतात जेफच्या मताने एक देह चिरंतन करायचा ठरला तर त्याला एक वर्ष लागेल त्यासाठी पंचवीस हजार डॉलर्स खर्च येईल पण आता मायक्रोवेव्ह पद्धतीचा शोध लागल्याने हेच काम अर्ध्या वेळात होईल या शरीराभोवतीचे वातावरण खूप तापवून देहातील द्रवपदार्थ नष्ट करायचे त्यानंतर कोरडे झालेले देह गोठविण्याच्या खोलीत ठेवायचे त्याच्या दृष्टीने एका खोलीत चार देह राहू शकतात तो बोलताना म्हणाला, "या प्रक्रियेला ऐतिहासिक महत्त्व आहे ही पद्धत विकसित झाली तर आपल्याला जगातली इतिहास घडविणारी मोठी माणसे कशी दिसत होती हे बघणे शक्य होईल ही पद्धत पूर्वी विकसित झाली असती तर हिटलर कसा होता, चार्ली चॅप्लीन कसा होता हेही आपल्याला दिसू शकलं असतं "

अशाच तऱ्हेचे एक दुसरे शास्त्र आहे त्याला क्रायोजेनिक्स असे म्हणतात. काहीजणाना असा भरवसा वाटतो की वैद्यकशास्त्राची लवकरच इतकी प्रगती होईल की मृत माणसालाही जीवनदान करता यावे त्यामुळे काही लोक अमाप पैसे खर्च करून आपण मेल्यानंतर आपला मृतदेह गोठवून ठेवावा असे इच्छापत्रात लिहितात

त्यासाठी प्रचंड पैसे खर्च करतात फरक असा क्रायोजेनिक्स ही विद्या केव्हा तरी पुनरुज्जीवन शक्य होईल या देह टिकवण्याच्या आशेवर आधारलेली आहे याच्याउलट गोठवून कोरडे करण्याची प्रक्रिया ही मृतदेह टिकविण्याची क्रिया आहे अशा तऱ्हेने गोठवलेले एक मांजर वेबरच्या गाडीत असते ते इतके खरे वाटते की, विश्वास बसत नाही मात्र त्यासाठी पाळीव प्राण्याचा देह ताबडतोब वेबरच्या 'कारखान्या'त यावा लागतो आल्यानंतर त्या मृतदेहावर काम केले जाते ते काम कलावंताचे आहे असे तो मानतो त्या प्राण्याची वेगवेगळी छायाचित्रे पाहून कोणत्या अवस्थेमध्ये हा प्राणी चांगला दिसेल हे ठरवले जाते तसेच योग्य कृत्रिम डोळेही निवडले जातात त्यानंतर एका निर्वात खोलीत अठ्ठेचाळीस तास हा प्राणी गोठविला जातो नऊ फूट लांबीच्या अडीच टन वजनाच्या या यंत्राला 'चिरंजीवन यंत्र' असे तो म्हणतो उणे वीस अंश तापमानात गोठवायचे पुन्हा निर्द्रवीकरणासाठी खूप गरम तापमानाच्या चक्रात ठेवायचे एकदा बर्फ, एकदा भट्टी असे होत राहते या मृत प्राण्याच्या अंगातील द्रवपदार्थ संपल्यामुळे त्याचे वजनही खूप कमी होते फ्रेडकडे तऱ्हेतऱ्हेची माणसे येतात एका महिलेने लिहिले आहे की, 'माझा नवरा मेल्यावर त्याला गोठवून, कोरडे करून चिरंजीवन देण्याचा माझा विचार आहे त्याला ते पटत नाही तुम्ही पटवाल का?' दुसऱ्या एकाने लिहिले आहे, 'आमचे पाळीव मांजर गोठवून द्या कारण आमच्याबरोबर त्याचे दफन करावे अशी आमची इच्छा आहे' कैक वेळेला त्याच्याकडे अनेक वृद्ध स्त्रिया येऊन सांगतात की, 'आमचे पाळीव मांजर किंवा कुत्रे जर तुम्ही गोठवू शकलात तर आमच्यावर फार उपकार होतील, कारण मला माझ्या वृद्धापकाळाच्या एकटेपणात त्याची सोबत कायम राहील'

• • •

## १८.

# 'आई कुणा म्हणू मी ?'

अलीकडे ऑस्ट्रेलियात मेलबर्न येथे गेलो असताना तिथल्या कृत्रिम जीवनिर्मिती केंद्रात जाऊन आलो तिथे जे सशोधनकार्य पाहिले ते कल्पना करायलाही अवघड अशा तऱ्हेचे होते एका राखाडी रगाच्या मोठ्या पिंपातून एका शास्त्रज्ञाने एक नाजूक अशी काचेची नळी बाहेर काढली पिपातले तपमान शून्य अशाखाली असावे कारण त्या नळीभोवती धूसर बर्फाचे कण होते या नळीच्या आत दोन दिवसाचा गर्भ (एम्ब्रियो) होता तो मानवी गर्भ गोठून जाऊ नये म्हणून त्याभोवती गोठू न देणारे रसायन घातले होते दहा - बारा वर्षांपूर्वी नलिकेतून जन्म घेणारी मुले ही एक कल्पनारजित विज्ञानकथा होती परतु ती फार झपाट्याने वास्तवात येत आहे दरवर्षी कित्येक मुलाचा जन्म अशा प्रकारे होत आहे या गर्भाचे स्थलातर नतर इन्क्युबेटरमध्ये केले जाते आणि त्यानतर हा गर्भ आईच्या गर्भाशयात ठेवला जातो नतर ही मुले जन्माला येतात लुई ब्राऊन ही जगामधील पहिली टेस्टट्यूब बेबी[1] लडनमध्ये दहा वर्षांपूर्वी ती जन्मली लडनच्या एका प्रसूतिगृहात तिचा जन्म झाला या घटनेने सारे जग आश्चर्यचकित झाले होते आईच्या गर्भाशयाबाहेर स्त्रीबीज आणि पूबीज एकत्र आणून तिचा जन्म झाला होता

मानवी विकासाच्या इतिहासात प्रजननशास्त्रात (जेनेटिक्स) एक नवीन पहाट जन्माला येत होती डॉ रॉबर्ट एडवर्ड आणि डॉ पॅट्रि स्टेप्टो यानी शास्त्रालासुद्धा अशक्य वाटणारे वास्तवात घडविले होते विज्ञानाच्या दृष्टीने हा प्रचड विजय होता

ज्या जोडप्याना मुले नाहीत त्याच्या दृष्टीने हे एक मोठे वरदान होते या मुलाची वाढ कशी होते याकडे साऱ्या शास्त्रज्ञाचे लक्ष लागून राहिले होते

अलीकडच्या काळात मात्र या सशोधनाशी मेलबर्न शहराचे नाव खूपच निगडित झाले आहे मेलबर्नच्या 'इन व्हिट्रो फर्टिलायझेशन' (आय व्ही एफ ) केंद्रातील शास्त्रज्ञानी कृत्रिम जीवनिर्मितीच्या क्षेत्रात अनेक चमत्कार करून दाखविले आहेत गोठवलेल्या गर्भापासून जीवनिर्मिती, मातेच्या शरीराबाहेर गर्भधारणा, आय व्ही एफ पद्धतीची जुळी किंवा तिळी मुले, प्रजननाच्या क्षेत्रात ऑस्ट्रेलियन शास्त्रज्ञानी आघाडी मारलेली आहे त्यानी वापरलेल्या तत्रज्ञानाचा उपयोग करून सर्व जगभर एकेकाळी अपत्यहीन समजल्या जाणाऱ्या कुटुबाना अपत्यप्राप्तीचा लाभ घडवलेला आहे मेलबर्नचे हे केंद्र १९८० पासून प्रख्यात झाले जगामधली तिसरी टेम्प्टट्यूब बेबी इथे जन्माला आली या केंद्राचे जीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा कार्ल वुड आणि डॉ ॲलन ट्राऊनसन याच्या नेतृत्वाखाली या सस्थेने प्रजननाचे नवे सशोधन सुरू केले

ज्या अनेक जोडप्याना या सशोधनाचा फायदा झाला त्यापैकी एल्सा आणि तिचा पती मारिओ हे एक जोडपे या अतिश्रीमत जोडप्याला मूल होत नव्हते हे दोघेही कॅलिफोर्नियातून मेलबर्नला आले प्राथमिक तयारीनतर ते विमानाने परत जात होते जाण्यापूर्वी मारिओने पूबीज आणि एल्साने स्त्रीबीज दिलेले होते प्रयोगशाळेत त्याचे मीलन घडवून जो कृत्रिम गर्भ तयार होईल तो एल्साच्या गर्भशयात स्थलातरित करायचा होता त्यासाठी एल्सा परत येणार होती

पण मध्यतरीच्या काळात चिलीमध्ये झालेल्या एका विमान अपघातात एल्सा आणि मारिओ याचे निधन झाले इकडे प्रयोगशाळेत या जोडप्यापासून तयार झालेले कृत्रिमरीत्या सुफलित केलेले दोन गर्भ आणि पर्यायाने दोन जीव अनाथ झाले सातियागोजवळ झालेल्या या विमान अपघाताने सर्वांत खेदजनक, सर्वांत गुतागुतीची अशी वैद्यकीय आणि कायदेशीर अडचण निर्माण झालेली आहे प्रश्न असा आहे की या दोन गर्भापासून जर दोन मुले जन्माला आली तर आपल्या श्रीमत आईबापाच्या प्रचड इस्टेटीवर दोघाना हक्क सागता येईल का ? आईच्या देहाच्या बाहेर वाढलेल्या गर्भापासून जन्मलेल्या या मुलाना वारसा हक्क मिळेल का ? बाहेर वाढणारा हा गर्भ हा याच आईबापाचा आहे याची कायदेशीररीत्या खात्री कशी पटायची ? हे गर्भ आणि त्याचे भवितव्य गेली आठ वर्षे अधातरी राहिलेले आहे

व्हिक्टोरिया राज्याच्या शासनाने असा निर्णय केला आहे की, एखाद्या अपत्यहीन जोडप्याला हे गर्भ द्यावेत पण या जोडप्याला एड्‌स् या रोगाचा संसर्ग झाला होता की काय अशी कल्पना एका कायदेपंडिताच्या डोक्यात आली आईबाप जिवत नसल्यामुळे ही परीक्षा आता शक्य नाही, शिवाय इतकी वर्षे गोठवलेल्या अवस्थेत राहिलेले हे गर्भ पुढे जगतील किवा नाही याचीही कल्पना नाही या गर्भांच्या निमित्ताने असे वैद्यकीय, सामाजिक कायदेविषयक आणि नैतिक प्रश्न पुढे येत आहेत

मानवाच्या जन्माचे नैसर्गिक तत्र बदलल्यामुळे नवीन प्रजननाचे तत्र आणि त्याचे सामाजिक परिणाम याविषयी मोठाच वाद निर्माण झाला आहे अनेक अवघड प्रश्नामधला एक प्रश्न असा की जीव जन्माला आला हे निश्चित केव्हा समजायचे ? केवळ वैद्यकीय कुतूहल किवा वैज्ञानिक सशोधन यासाठी प्रत्यक्ष जिवाचा आपण खेळ माडावा का ? एखादे मूल जर काही दोष घेऊन जन्माला येणार असेल तर त्याची जबाबदारीही प्रयोगशाळा घेईल का ? त्याच्या उलट या सशोधनामधून विलक्षण अशा शक्यता निर्माण होत आहेत जी माणसे अपग होतात त्याना अवयव देण्यासाठी या गर्भाचा उपयोग करता येईल का ? दुसरा प्रश्न असा आहे की एका परीने गर्भ हा एक स्वतत्र जीव आहे, त्याचा उपयोग शरीराचे 'सुटे भाग' निर्माण करण्यासाठी करावा का ? प्रजननशास्त्राच्या या सशोधनाने नैतिक प्रश्नाचे एवढे मोठे वादळ उठविले आहे की, शास्त्रज्ञानी या सशोधनाला लगाम घालावा असे पोप जॉन यानी शास्त्रज्ञाना सागितले आहे कायदा, नीती, सामाजिक परपरा याना पेलणार नाही इतक्या वेगाने हे सशोधन पुढे झेपावत आहे

पर्यायी माता (सरोगेट मदर्स), गोठवलेले गर्भ, पेशींचे स्थलातर ही सारी नवी क्षितिजे आहेत मेलबर्नमध्ये १९८८ साली ॲलिस नावाची एक मुलगी जन्माला आली कोणा एका अनामिक दात्याचे पुबीज आणि प्रत्यक्ष आईचे स्त्रीबीज यातून गर्भकोश सुफलित झाला प्रकृतीच्या दृष्टीने हा गर्भ पोटात वाढविणे आईला शक्य नव्हते त्यामुळे तिच्या बहिणीने तो गर्भ आपल्या शरीरात स्थलातरित केला आता ॲलिसची आई कोण ? जिने स्त्रीबीज दिले ती, की जिने तिला पोटात वाढविले आणि जी नात्याने मावशी होती ती ? आता हा प्रश्न व्हिक्टोरिया राज्याच्या न्यायालयापुढे गेला आहे कारण आईने आपल्या बहिणीकडून आपलेच मूल दत्तक घेण्याचा प्रस्ताव माडला आहे कृत्रिम गर्भ आणि त्यापासून जन्मणाऱ्या मुलाचे

आरोग्य, त्याचे कायदेशीर हक्क या सगळ्या प्रश्नाचा विचार करण्याकरिता मेलबर्नच्या 'मोनाश' विद्यापीठाचे प्राध्यापक वॉलर याच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आलेली आहे

माणसाचा जन्म झाला असे केव्हा मानावे ? माणसाचे खरे आईबाप कोण ? त्याच्या आयुष्यावर अधिकार कुणाचा ? असे काही प्रश्न उपस्थित केले आहेत त्याची उत्तरे शोधताना सारे तत्त्वज्ञान, सारे समाजशास्त्र तोकडे पडते आहे अशा या प्रश्नाना या समितीला तोंड द्यावयाचे आहे मानवी शरीराच्या बाहेर एका बशीमध्ये कृत्रिम तऱ्हेने जीवनिर्मिती होऊ शकते ही या शतकामधील विज्ञानाची सगळ्यात मोठी झेप आहे या विषयाचा विचार करणारे राजकारणी, समाजशास्त्रज्ञ, विधिशास्त्रज्ञ या प्रश्नाना उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत वंध्य समजल्या जाणाऱ्या पुरुषाना इजेक्शन देऊन एका वेळेपुरते वध्यत्व घालविण्याचा प्रयोग इथेच केला जात आहे आईच्या बीजापासून गर्भाशयाबाहेर कृत्रिम गर्भ इथे वाढविले जात आहेत

आता पुढचा प्रश्न असा आहे की कोणती गुणवत्ता असणारे मूल आपल्याला हवे आहे ? उच, गोरे, बुद्धिमान ? तसा गर्भ आपल्याला निवडता येईल पण उरलेल्या गर्भाचे काय करायचे ? यातून एकसारखी दिसणारी माणसे निर्माण झाली तर काय गोंधळ होणार आहे ? एक ना दोन हजारो प्रश्न याविषयी चर्चिले जात आहेत या विद्यापीठातले एक प्राध्यापक डॉ सिग याच्या मते मानवाच्या आरोग्यासाठी ससे किवा माकडे याच्यावर प्रयोग करण्यापेक्षा गर्भावर प्रयोग करणे सोपे आणि अधिक नैतिक आहे डॉ फिलीपिनी याच्या मते कृत्रिम गर्भाच्या हक्कासाठी वेगळा कायदा करायला हवा कृत्रिम जीवनिर्मितीचे अर्थकारण वेगळेच आहे अशा कृत्रिम प्रक्रियेने जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलापाठीमागे साडेसात लक्ष रुपये खर्च होणार आहेत अर्थकारण, कायदा, नीती याची ही गुतागुत कोण सोडवणार ?

• • •

१९.

# फोन आणि टीव्ही आभाळातसुद्धा

परवा न्यूयॉर्कहून मेक्सिकोला जाताना विमानातील काही सेवासुविधाची चौकशी करताना असे कळले की, आभाळातूनही आपल्याला फोन करता येतो त्याला 'एअर फोन' पद्धत असे म्हणतात मला वाटले की, ही फार अवघड गोष्ट असेल त्याची खात्री करण्यासाठी मी आभाळातून फोन केला तसा फोन करणे फार अवघड नाही भितीला लावलेले, नाणी टाकावयाचे फोन असतात, तशाच प्रकारचा हा फोन विमानात गॅलीमध्ये भितीला बसविलेला होता इथे पैसे घालावयाच्याऐवजी तुमचे क्रेडिट कार्ड आत सरकवायचे कार्ड आत घातल्यानतर झाकण बद केले की, टेलिफोनजवळच्या पडद्यावर पुढील सूचनाची प्रकाशित अक्षरे दिसू लागतात एका सेकदातच त्याच्यावर सूचना येते 'टेलिफोन उचला' आपण कॉर्डलेस फोन बघतो तशाच तऱ्हेचा हा फोन तो फोन हातात घेऊन आपण जागेवर येऊन बसावयाचे बसल्या बसल्या 'डायल' असे लिहिलेल्या बटनावर बोट ठेवले की, डायलटोन येतो आणि ते झाल्यानतर आपल्याला हवा तो क्रमाक फिरवायचा

मी आमच्या वॉशिग्टन कार्यालयाला फोन केला आणि क्षणार्धात माझ्या सहकाऱ्याशी बोलू लागलो जे कागद मी वॉशिग्टनला विसरलो आहे, असे मला वाटत होते त्याची चौकशी केली आणि कागद आणि भाषणाच्या प्रती पुढे गेलेल्या आहेत, असे फोनवरून कळल्यावर जरा जीव भाड्यात पडला सभाषण झाल्यानतर 'हँगअप' असे बटण दाबले आणि फोन बद झाला मी पुन्हा गॅलीमध्ये गेलो आणि

'भतीवर तो फोन लटकविला  त्यावर पुन्हा प्रकाशित सूचना दिसू लागली  बोलणे किती वेळ झाले आणि त्याचे बिल किती झाले याचीही माहिती दिसू लागली  जमिनीवरून फोन करताना काही वाटत नाही, पण आभाळात विमान इतक्या वेगाने जात असताना हा सपर्क साधावयाचा ही खरोखरच विज्ञानाची एक किमया! अमेरिकेत फोन करायला पहिल्या तीन मिनिटाला साडेसात डॉलर्स म्हणजे साधारणत. १५० ते २०० रुपये आणि अमेरिकेच्या बाहेर करायला याच्या जवळजवळ दुप्पट पैसे लागतात  परतु त्या सूचना वाचताना माझ्या लक्षात आले की, आभाळातल्या फोनला घरच्या फोनसारख्या सगळ्या सोयी आहेत  म्हणजे तुम्ही डिरेक्टरी एन्क्वायरीला हवा असलेला फोन क्रमाक विचारू शकता  शून्य फिरवून फोनबाबतची कुठलीही माहिती मिळवू शकता  हा फोन करताना राहून राहून मनात आले की, जग किती जवळ आले आहे!

## तातडीचा सदेश

विमानात बसल्या बसल्या मी विचार करीत होतो की, मला जर काही तातडीचा संदेश द्यावयाचा असेल तर तो सदेश मी केसरी कार्यालयात कसा देऊ शकेन? त्या वेळी माझा सहकारी मोटारीत बसून ऑफिसला निघाला असेल, विमानातून परदेशी चालला असेल आणि ही माहिती जर त्याला वेळेवर मिळाली नाही तर कामाचे नुकसान होण्याचाही सभव आहे! समजा, तो हॉटेलमधून बाहेर निघाला आणि रस्त्याच्या गर्दीत अडकला तर तो आताच्या पद्धतीप्रमाणे तो कार्यालयात पोहोचेपर्यंत त्याला फोन मिळणार नाही, निरोपही मिळणार नाही  कारण रस्त्यात काही असा फोन नाही  तेव्हा अशा माणसाला शोधून काढावयाचे, त्याला गाठून त्याला सदेश द्यावयाचा यासाठी आता 'मेट्रोकास्ट मेसेज एक्सप्रेस' नावाचे यत्र निघाले आहे  या कामासाठी खिशात मावणारे फॅक्सचे यत्र तयार केलेले आहे  याचा आकार पैशाच्या मोठ्या पाकिटाएवढाच आहे  हे यत्र घेऊन तुम्ही कुठेही गेलात– विमानात, मोटारीत, हॉटेलात, रस्त्याच्या गर्दीत कुठेही असलात– तरी तुमचा निरोप त्या ठिकाणी, कोणत्याही दिवशी, कोणत्याही वेळी देता येतो  आपण पोस्टाने पाठविलेले पत्र किंवा सदेश हा टपालात जाईल, मग टपाल उघडले जाईल  त्याची आवक नोंद केली जाईल  मग ते स्वीय सहाय्यकामार्फत येईल इतका सारा वेळ जायला लागतो  हा संदेश म्हणजे केवळ आवाज किंवा केवळ फोन क्रमाक नाही,

तर या यंत्रावर तुम्ही नावे, गावे, आकडे, वेळापत्रक ही सगळी माहिती पाठवू शकता पैशाच्या पाकिटाच्या आकाराएवढा या यंत्राचा पडदा आहे आणि या पडद्यावर तुमचा संपूर्ण निरोप तुम्हाला मिळू शकतो त्यामुळे तुम्ही कुठे पोहोचलात किंवा नाही याची वाट पाहावयाचे कारण नाही जिथे असाल तिथे हा संदेश मिळतो आज निर्णय करणारी माणसे जगात हिंडत असतात त्यांना त्या त्या ठिकाणी ताबडतोब संदेश, माहिती पुरविणे ही आवश्यक गोष्ट आहे आणि म्हणून अशा तऱ्हेचा संदेशवाहक ही नव्या काळाची गरज झालेली आहे

## उडणारा टेलिव्हिजन

पहिल्याप्रथम रेडिओचा शोध लागला, त्या वेळी त्याच्या तारा वगैरे सगळे मिळून त्याचे धूडच्या धूड घरात ठेवावे लागे इलेक्ट्रॉनिक्सच्या प्रगतीबरोबर रेडिओचा आकार लहान लहान होत होत आता हातात मावेल असा ट्रँन्झिस्टर निघाला तोही बोजड वाटू लागला तेव्हा सोनी कंपनीने 'वॉकमन' नावाचा ट्रँन्झिस्टर काढला त्यामध्ये रेकॉर्डप्लेअर बसविला, त्यामुळे कानाला श्रवणयंत्र लावून आणि कमरपट्ट्यात हा वॉकमन अडकवून संगीताच्या तालावर झुलत झुलत जाणारी तरुण पिढी सगळीकडे दिसू लागली आहे रेडिओबरोबरच दूरचित्रवाणी संचसुद्धा आकाराने लहानलहान होत आहे आता मोटारीमध्ये छोटासा दूरचित्रवाणी संच बसविता येतो अगदी काड्यापेटीएवढासुद्धा दूरचित्रवाणी संच आहे, पण वॉकमनसारखा कुठेही घेऊन जाता येईल असा दूरचित्रवाणी संच तयार करता येईल का अशा संशोधनास सुरुवात झाली मग या दूरचित्रवाणीला व्ही सी आर जोडता येईल का ? म्हणजे कुठेही, केव्हाही कोणत्याही क्षणी, चित्रपट किंवा इतर कार्यक्रम पाहता येतील ! पण आता तेही सहज शक्य झालेले आहे अलीकडेच सोनी कंपनीने नवा दूर-चित्रवाणी संच तयार केला आहे पॅराशूटच्या साहाय्याने हवेत उडत असताना, ग्लायडिंग करीत असताना अथवा हवाई छत्र्याच्या आधाराने आभाळामध्ये स्वच्छंद फिरत असतानासुद्धा तुम्हाला दूरचित्रवाणीवर आवडेल तो कार्यक्रम पाहता येईल असा तो संच आहे. दोन हातात धरता येईल असा साधारणत ब्रेडच्या आकाराचा हा दूरचित्रवाणी संच आहे त्याला व्ही सी आर ही आहे त्यामुळे तुम्ही साडेचार तासाचा कार्यक्रम सहज पाहू शकता त्याला 'सोनी व्हिडिओ वॉकमन' असे म्हणतात या पडद्यावर तुम्ही रंगीत चित्रे पाहू शकता कृष्णधवल

चित्रे पाहू शकता चित्राचा आकार बदलू शकता एका वेळी दोन चित्रे पाहू शकता या दूरचित्रवाणी सचाचे वजन फक्त अडीच पौंड आहे एखाद्या शब्दकोशापेक्षाही कमी वजन असलेला हा दूरचित्रवाणी सच आहे या सचाला कालसूचक (टायमर) बसविलेला असल्यामुळे झोपेच्या वेळी तो बद करावयाचे आपण विसरून गेलो तरी काही वेळाने तो आपोआप बद होता वर आभाळात असतानादेखील तुम्ही याच्या कॅसेटवर आवाज, ध्वनी आणि चित्रण याचे ध्वनिमुद्रणही करू शकता या आकाराच्या सचात मावतील असे जवळ जवळ १२०० चित्रपट आता व्हिडिओ कॅसेटवर उपलब्ध आहेत

## यान्त्रिक भाषातरकार

जुन्या काळी युरोपला जाताना एक पुस्तक घ्यावे लागे इंग्लिश इन टू फ्रेंच किंवा इंग्लिश इन टू जर्मन मग खाद्याला पिशवी लटकवून आणि दुकानाच्या पायरीवर उभे राहून एखादी वस्तू केवढ्याला याचे फ्रेंच भाषातर काय होते याची चिंता करीत पुस्तकाची पाने उलटावयाची, कारण पुस्तकात कर्ता एका पानावर तर क्रियापद दुसऱ्या पानावर! ज्याला दहा किंवा पधरा देशात जायचे असेल त्याला हे सर्व भाषाचे शब्दसग्रह घेऊन जावे लागत व परदेशी जाताना बॅगमध्ये सामान भरून घ्यावयाच्या ऐवजी पुस्तकेच भरून घ्यावी लागत पण आता हा प्रश्न एका यत्राने सोडविलेला आहे साधारणपणे कॅल्क्युलेटरच्या आकाराचे हे यत्र आहे या यत्रात पाच भाषा उपलब्ध आहेत कोणत्याही बटनास हात लावून तुम्ही भाषा बदलू शकता या यत्राची रचना अशी आहे की, सर्वसाधारणपणे आपल्याला रोज लागणारे १४०० वाक्प्रयोग म्हणजे "येथून एअरपोर्ट किती लाब आहे ? चागले आणि स्वस्त जेवण कुठे मिळेल ? हॉटेलमध्ये खोली रिकामी आहे का ?" अशा तऱ्हेची १४०० वाक्ये आणि जवळ - जवळ ८००० शब्द या यत्रात साठविलेले आहेत याच्या मदतीने रस्त्यात दुसऱ्या परभाषकाशी थोडाफार सवाद करणे सहज शक्य होते जेवणाची ऑर्डर कशी द्यायची ? कुठल्या दिशेने स्टेशनवर जावे ? डॉलर्सचे रुपये किती होतात ? यासारखे सर्व प्रश्न त्या यत्रात आहेत हे भाषातर करण्याकरिता बटण दाबून आपला प्रश्न आधी या यत्रावर टाइप करावयाचा आपला प्रश्न पडद्यावर दिसू लागला आणि तो बरोबर आहे अशी खात्री वाटली की, फ्रेंच, स्पॅनिश, जर्मन, इंग्लिश, इटालियन यापैकीच्या भाषेत आपल्याला प्रश्न विचारावयाचा असेल त्या

भाषेचे बटन दाबले की, क्षणार्धात तुमच्या प्रश्नाचे भाषातर करून तो प्रश्न पडद्यावर दिसू लागतो तो तुम्ही समोरच्या दुसऱ्या भाषकाला दाखवू शकता तुम्ही जर शब्द चुकीचा लिहिला तर पडद्यावर प्रश्नचिन्ह येते तो प्रश्न तुम्हाला पुन्हा लिहिता येतो साधारण हलक्या वजनाचा आणि ५x२ (इच) आकाराचा हा भाषातरकार आहे याची किमत साधारण ८० डॉलर्स आहे या यत्राची अडचण एकच आहे आणि ती माझ्या लक्षात आली नाही माझ्या पत्नीने ती माझ्या नजरेला आणली ती म्हणाली, एक ग्लास एक डॉलर्सला, इथपर्यंत माहिती या यत्रावर मिळेल, पण एकदम डझन ग्लास घेतले तर स्वस्त देणार का, ही घासाघीस या यत्राला करता येत नाही आणि घासाघीस करता आली नाही तर ती खरेदी कसली ?

## यात्रिक डायरी

कॅसिओने एक नवीन यात्रिक डायरी काढलेली आहे या डायरीमध्ये दैनंदिन महत्त्वाची अशी माहिती साठवता येते या यत्रात ६२,००० अक्षरे साठवता येतात फोनक्रमाक विसरणे हा नेहमीचाच अनुभव असतो या पोस्टकार्ड आकाराच्या दैनंदिनीमध्ये २७०० नावे आणि दूरध्वनी क्रमाक साठविता येतात याखेरीज तुमचे रोजचे वेळापत्रक, कोणत्या तारखेला, कोणाला भेटावयाचे हा साधारणत महिन्याचा कार्यक्रम तुम्हाला पडद्यावर दिसू शकतो याशिवाय मित्राचे वाढदिवस, चलनाचे प्रमाण, विमानाचे वेळापत्रक अशी काहीही माहिती तुम्ही याच्या स्मरणात घालू शकता आणि केवळ बटनाच्या साहाय्याने ती माहिती तुम्हाला क्षणार्धात उपलब्ध होऊ शकते

## यांत्रिक छापखाना

कॅसिओ कपनीने अलीकडे एक छोटेखानी मुद्रणयत्र तयार केले आहे याचा आकार ८x३ (इच) असा आहे यामध्ये चार तऱ्हेची अक्षराची वळणे आहेत उभी, तिरकी, वळणदार आणि जोडलेली अक्षराचे आकार बदलता येतात जास्तीत जास्त एक इच आकाराची अक्षरे यात छापता येतात, त्याचप्रमाणे अगदी लहान अक्षरेही छापली जातात वर्तमानपत्रात शीर्षके करताना त्याला जसा स्क्रीन वापरला जातो, चौकट वापरली जाते ते सारे या यत्रात करता येते या यत्रात ५५०० अक्षरे साठविलेली आहेत या चिमुकल्या छापखान्यातून लाल, काळा, निळा, सोनेरी

आणि रुपेरी इतक्या रंगात मजकूर छापला जातो  याशिवाय याला स्मरणशक्तीची सोय असल्यामुळे एकदा एखादा मजकूर टाईप केला आणि त्याच्या स्मरणात घातला की दुसऱ्या खेपेला दुसऱ्यादा नुसते बटन दाबले तरी तो मजकूर आपोआप जुळला जातो, छापला जातो  छापण्याची क्रियाही फार सोपी आहे  सिगारेटच्या लायटरसारखा एक उभा चौकोन आहे  त्याच्यावरील बटन दाबून तो ठोकळा कागदावर– कोणत्याही कागदावर– सरळ ओळीत फिरवला की, सुबक अक्षरे उठू लागतात  या एका चिमुकल्या यन्त्रामध्ये 'गीतारहस्य'इतका मोठा ग्रंथ स्मरणात राहू शकतो  याला 'डिजिटल रायटर' असे नाव आहे  माझ्या कल्पनेप्रमाणे याचा उपयोग आज जरी मर्यादित छपाईसाठी होत असला, तरी कालांतराने इतक्या लहान आकाराचा 'शब्द प्रक्रियक' किंवा 'वर्ड प्रोसेसर' वापरून छपाई सुरू झाली तर काही दिवसानी माणसे हाताने लिहिण्याची कला विसरणार तर नाहीत ना अशी भीती वाटते

• • •

भाग पाचवा

# समृद्ध संध्याकाळ

२०.

# सारे काही वृद्धांसाठी !

गेल्या महिन्यात अमेरिकेला गेलो असताना एका विलक्षण सस्थेची ओळख झाली या सस्थेचे नाव 'अमेरिकन असोसिएशन ऑफ रिटायर्ड पर्सन्स' या सस्थेचे प्रमुख सचालक होरॅस डीटस् यानी मला या सस्थेत येण्याचे निमत्रण केल्यामुळे मी त्याच्याकडे गेलो होतो एका छोट्याशा घरगुती समारभात मला या सस्थेचे मानद सदस्यत्व बहाल केले आपल्याला ज्येष्ठ नागरिकाची सघटना म्हटल्यावर मनापुढे चित्र उभे राहते ते पाच - पचवीस म्हातारे आणि त्याचे अध्यात्मविषयक कार्यक्रम किवा आपल्या मुला - सुनाविषयी तक्रारी पण ए ए आर पी हा एक लोकविलक्षण अपवाद आहे अगदी साधा प्रश्न मनात आला की, या सस्थेचे सभासद किती असतील ? होरॅस म्हणाले की, तीन कोटी दहा लक्ष लोक या सस्थेचे सभासद आहेत यातला प्रत्येकजण वार्षिक वर्गणी पाच डॉलर याप्रमाणे देतो याचा अर्थ सभासद वर्गणीचे उत्पन्न दरसाल सोळा कोटी डॉलर्स आहे त्याच्या जवळजवळ पाचपट त्याचा खर्च आहे आणि स्वत च्या अनेक कपन्या आणि उद्योग चालवून हे पैसे उभे केले जातात या सर्व कपन्या मग त्या विमाविषयक असोत, प्रवासविषयक असोत किवा क्रेडिट कार्डाच्या असोत, यातून ए ए. आर पी ला नफा होत असतो केवळ वॉशिग्टनमध्ये सस्थेच्या तीन इमारती आहेत, प्रचड मुद्रणालय आहे याशिवाय पाच सहा ठिकाणी विभागीय कार्यालये आहेत मुख्य ऑफिसात जवळजवळ दोन हजार लोक काम करतात

वॉशिंग्टनला गेल्यावर सकाळी दूरचित्रवाणीवर बातम्या पाहताना मध्येच एक जाहिरात आली "आमका - तमका गव्हर्नरच्या निवडणुकीला उभा आहे त्याला कोणीही मत देऊ नका कारण वृद्धवेतनात कपात व्हावी म्हणून हा गृहस्थ प्रयत्न करतोय तेव्हा त्याला मत देऊ नका" तीन कोटी दहा लक्ष लोकाचा हा ज्येष्ठ नागरिकाचा सघ ही अमेरिकन राजकारणातली अत्यत प्रबळ शक्ती मानली जाते अमेरिकेचा अध्यक्ष कोण व्हावा हे ठरविण्यात या ज्येष्ठ मडळींचा मोठा हात असतो

## कामाचे स्वरूप

कोणत्याही ज्येष्ठ नागरिकाला या सस्थेचा सभासद होण्यात काय फायदा? यावर उत्तर म्हणून मला दोन दिवस त्यानी आपले सर्व कार्यक्रम दाखविले दर महिन्याला या सस्थेतर्फे अनेक मासिके काढली जातात त्यापैकी 'मॉडर्न मॅच्युरिटी' नावाचे रगीत मासिक बघण्याजोगे वृद्धाचे आरोग्य, निवृत्तिविषयक प्रश्न, अनेक विषयावर भरपूर छायाचित्रे, प्रवासाला कुठे जाणार, म्हातारपणी काम कुठे शोधावे अशी अनेक सदरे या मासिकात आहेत या सस्थेतर्फे प्रत्येक शहरात औषधाचे दुकान चालविले जाते आपण आपल्या डॉक्टराचे प्रिस्क्रिप्शन या औषधाच्या दुकानात पोस्टाने पाठविले की औषधे तुमच्या घरी घरपोच केली जातात नतर बिल पाठविले जाते औषधाव्यतिरिक्त आजारपणासाठी लागणाऱ्या गोष्टी, थर्मामीटर, बेडपॅन इ वस्तू घरी पोहाचविल्या जातात म्हातारपणी आपले अदाजपत्रक कसे करावे हा मोठा प्रश्न पैसे कुठे गुतवावेत, त्याचे नियमित व्याज कसे येईल यासाठी त्याचे एक वेगळे कार्यालय उघडले आहे बऱ्याच वेळा ए ए आर पी मध्येसुद्धा अशा ठेवी स्वीकारल्या जातात नियमितपणाने घरपोच व्याज दिले जाते या सस्थेच्या सदतीसशे शाखा असून याच्या नियमित सभा होतात तुम्ही कोणत्याही गावच्या सभेला सदस्य म्हणून हजर राहू शकता म्हातारपणी आजारपण कधी येईल ते सागता येत नाही एका विमा कपनीच्या साहाय्याने वृद्धाचा विमा उतरविण्याची सोय केलेली आहे एरव्ही जग बघायला झाले नाही तेव्हा म्हातारपणी प्रवासाला जाऊन जग बघावे यासाठी एका प्रवासी कपनीच्या मदतीने सस्थेची वेगळी प्रवासयत्रणा आहे स्वस्त दरात अमेरिकेत, जगात कुठेही जाता यावे यासाठी वेगळी सुविधा आहे नवराबायको एकत्र जाणार असतील तर अधिकच स्वस्त दरात सोय होते स्वत च्या मोटारीने जायचे असेल तर त्याकरिता नकाशे, प्रवासाचा आराखडा

आणि मॉटेल्समध्ये जागा राखून ठेवली जाते रोजची माहिती देण्याकरिता सस्थेचे स्वतत्र वृत्तपत्र आहे ज्येष्ठ नागरिकाच्या मदतीने अमेरिकन सरकारशी ही सस्था बोलणी करते तुमचे घर आणि तुमचे स्वत चे रक्षण करण्याकरिता सस्थेतर्फे वेगळी सोय आहे साठ वर्षानतर मोटार ड्रायव्हिग पुन्हा एकदा शिकावे असा सस्थेचा सल्ला आहे याकरिता वेगळे अभ्यासक्रम चालविले जातात तुमचे घर, तुमची गाडी आणि तुम्ही याचा विमा सस्थेमार्फत उतरविला जातो

एकेकाळी ज्येष्ठ नागरिकाना 'क्रेडिट कार्ड' मिळायला फार अडचण पडत असे पण आता सस्थेच्या मध्यस्थीमुळे प्रत्येक सदस्याला 'क्रेडिट कार्ड' दिले जाते या कार्डाची जाहिरात फार कल्पक रीतीने केली जाते ते लिहितात "पन्नाशी उलटली म्हणजे आयुष्यातील सर्वांत समृद्ध कालखडाला सुरुवात करणे असे जर तुम्ही मानत असाल तर अमेरिकेतील तीन कोटी दशलक्ष लोक तुमच्याशी सहमत आहेत " सस्थेच्या वतीने एकूण चौदा तऱ्हेचे वेगवेगळे कार्यक्रम आखले जातात या सस्थेने मध्यम वय आणि ज्येष्ठ वय यासबधीची मूलभूत माहिती एकत्र करण्याकरिता 'जेरॅटॉलॉजी रिसोअर्स सेंटर' नावाचे कॉम्प्युटर केंद्र उघडले आहे ज्येष्ठ नागरिकाविषयी झालेले सशोधन, पुस्तके, वृत्तान्त, मासिके अहवाल या केंद्रात एकत्रित केले जातात याविषयी सबधित एकूण मासिके किती आहेत, हे विचारल्यानतर इग्रजी भाषेतील तीनशे नियतकालिकाची यादी मला देण्यात आली यानी प्रसिद्ध केलेल्या शेकडो पुस्तकापैकी वानगी म्हणून एक पुस्तिका मी उचलली त्याचे शीर्षक आहे 'खाणे आरोग्यासाठी ' वाढत्या वयाबरोबर आहारातही बदल व्हायला हवा आपल्याला योग्य असे जेवण तुम्ही कसे ठेवाल याची माहिती या पुस्तिकेत आहे बाजारात मिळणाऱ्या वस्तूची लेबले आणि त्याचा अर्थ, प्रत्येक खाद्यपदार्थाच्या कॅलरीज, प्रत्येक जेवणाची किमत याचे वर्णन दिल्यानतर सकाळची न्याहारी, मधल्या वेळचे जेवण, रात्रीचे जेवण या प्रत्येकात सोडियम किती, कॅल्शियम किती, कोलेस्टेरोल किती याचा तक्ता दिलेला आहे तुमच्या वयाचे गणित माडून तुमचा तुम्ही तक्ता करायचा पुस्तिकेच्या शेवटी पदार्थ तयार कसे करतात याची पाककृतिसुद्धा दिलेली आहे अशा प्रकारचे जेवण करायचे असल्यास अनेक अन्नोत्पादन करणाऱ्या सस्था स्वस्त दरात खाद्यपदार्थ पुरवायला तयार आहेत

## कामाचे धोरण

संस्थेच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांचे निवृत्तिवेतन, भविष्यनिर्वाह निधी याबाबतीत शासनाला धोरण ठरविण्यासाठी मदत केली जाते सिनेटच्या सभासदांना हा विषय कळावा, म्हणून छोट्या-छोट्या पुस्तिका तयार करण्यात येतात अमेरिकन ज्येष्ठ नागरिकांच्या पुस्तिकेत खूप मनोरंजक आणि उद्बोधक माहिती आहे उदाहरणार्थ, १९८७ मध्ये ६५ वर्षे वय असणारे लोक किमान १७ वर्षे आणखी जगतील १९०० मध्ये जन्मलेले मूल ६५ वर्षे जगेल अशी अपेक्षा होती पण १९८७ मध्ये जन्मलेले मूल २८ वर्षे जास्त जगेल वाढत्या वयाबरोबर कुटुंबात राहणाऱ्या वृद्धांचे प्रमाण कमी होऊन एकटे राहणाऱ्या वृद्धांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे आयुष्य अधिक समृद्ध व्हावे यासाठी वैद्यकीय संशोधन करण्यासाठी भरीव आर्थिक मदत ए ए. आर पी तर्फे करण्यात येते

अलीकडे या प्रश्नांविषयीचे शासकीय धोरण निश्चित करण्यासाठी संशोधन हाती घेण्यात आले आहे 'तिसऱ्या जगातील ज्येष्ठ नागरिक' असा या संशोधनाचा विषय आहे याचे महत्त्वाचे निष्कर्ष आहेत तिसऱ्या जगातील वृद्धांची संख्या २०२० मध्ये आजच्या लोकसंख्येच्या तिप्पट होईल ग्रामीण भागातील वृद्धांची संख्या वाढत जाईल सर्वसाधारणपणे वृद्ध स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षा वाढत जाईल वाढत्या वयाबरोबर काही विशिष्ट रोगांचे प्रमाण वाढते आहे, असे दिसून येते गुडघे व सांध्यांचे रोग, दृष्टी व श्रवणशक्ती मंदावणे व स्मरणशक्ती खालावणे ही तर सामान्य लक्षणे झाली पण 'अलझायमर'सारख्या रोगाचे कोडे अजूनही सुटलेले नाही आर्थिक उत्पादनात गुंतलेल्या वृद्धांचे प्रमाण खेड्यापेक्षा शहरात जास्त आहे

या संस्थेने चालविलेल्या तीन नियतकालिकांचे अंक पाहिले तरी त्यांच्या कामाची कल्पना येते संस्थेच्या 'न्यूज बुलेटिन' या वृत्तपत्रात व्यंगचित्रे, माहिती, वाचकांचा पत्रव्यवहार, आरोग्य, विमाविषयक माहिती, वृद्धांना लागणारी तिचाकी गाडी, चाकांवरची घरे, प्रवासाची माहिती, इन्कमटॅक्स, बाजारभाव इ आहेत, तर 'मॉडर्न मॅच्युरिटी' या मासिकात लेख, प्रवासवर्णने, नवीन चित्रपटांची परीक्षणे, आजोबा आणि नातवंडे यांच्या गोष्टी, पाककिया आणि विनोदी चित्रे आणि कथा आहेत त्यांच्या 'एजिंग' या मासिकात मात्र घरच्या घरी करण्याच्या गोष्टी, रोजची कामे, रोजचा आहार, घरबांधणी, कायद्याचा सल्ला इत्यादी विषय आलेले आहेत

अमेरिकेच्या दौऱ्यामध्ये माझ्या ध्यानात प्रकर्षाने एक गोष्ट आली आणि ती

म्हणजे अमेरिकेतील निवृत्त ज्येष्ठ नागरिक हे थकलेले - भागलेले, दुसऱ्यावर अवलबून असलेले नागरिक नाहीत आनदाने आणि उत्साहाने जगण्याची तीव्र जीवनेच्छा असणारे हे ज्येष्ठ तरुण आहेत त्याना आपल्या जीवनात केवळ वर्षे वाढवायची नाहीत, तर त्या वर्षांना समृद्ध जीवन द्यायचे आहे ए ए आर पी हे ज्येष्ठ नागरिकाचे आपल्या हक्काविषयी जागरूक असणारे एक सघटित सामर्थ्य आहे

• • •

२१.

# वृद्धांची स्वप्ननगरी

निवृत्तीचा काळ जवळ आला की माणसाला अनेक समस्या भेडसावू लागतात मिळणारे पैसे कमी होणार असतात वयोमानानुसार ताकद कमी झालेली असते काही वेळा मुले स्वतत्र झालेली असतात आणि एकटेपणा खायला उठत असतो अशा वेळी आधाराची, सोबतीची आणि दैनंदिन जीवनातील बारीकसारीक गोष्टींबाबत सुरक्षिततेची नितात गरज भासते

आयुष्यभराच्या कामाचा अनुभव गाठीशी असतो मनात कुठेतरी विश्वास असतो की आजही थोडीशी प्रेमळ सोबत मिळाली, तर आपण आपला वेळ अधिक उपयुक्तपणे घालवू शकू फडाचे थोडेफार पैसे जवळ असतात आयुष्यभर कामाच्या ठिकाणी, घरात अधिकार भोगल्यावर जीवनाच्या सध्याकाळी कोणावरही अवलबून राहणे नकोसे वाटते नेमक्या अशा वेळी आपल्याच वयोगटातील उत्साही लोकाची सोबत आर्थिक, मानसिक सुरक्षितता या साऱ्या गोष्टी आणि त्याही आपल्या स्वत च्या टुमदार घरात मिळाल्या तर ?

## कल्याणकारी योजना

हे स्वप्न नाही ऑस्ट्रेलियाने हे सारे प्रत्यक्षात आणले आहे तेथे वृद्धासाठी खास एक शासकीय खाते आहे त्याच्या कल्याणाच्या कामासाठी एक आयुक्त नेमलेले आहेत अलीकडेच त्याच्याशी चर्चा करण्याचा योग आला ते म्हणाले की

वृद्धांसाठी कल्याणकारी योजना राबवणे हे आपले मुख्य काम त्याचा वार्षिक अहवाल नजरेखालून घातला त्यातले विषय पाहूनच हा देश आपल्या ज्येष्ठ नागरिकाची किती परींनी काळजी घेतो हे लक्षात येते आयुर्मान, वारसाचे प्रश्न, भविष्यकाळातील वृद्धांची संख्या, वैवाहिक स्थिती, राहण्याच्या सुविधा, जागा, धार्मिक गरजा, सामाजिक सुरक्षा व निवृत्ती, आरोग्यस्थिती, निवासासाठी इतर गरजा, मनोरंजनाचे काही नवे उपक्रम, आरोग्याची काळजी कशी घ्यावी यासारख्या माहितीपत्रकाचे बोलीभाषात रूपांतर, काही अर्थोत्पादनाचे कार्यक्रम या साऱ्यासाठी राष्ट्रीय धोरण आणि कायदे

अशा या देशात वृद्धांसाठी एक अत्यंत अभिनव आणि सुखदायी उपक्रम मी पाहिला तो म्हणजे निवृत्तांची सहकारी खेडी (रिटायरमेंट व्हिलेजेस) या वसाहतींमध्ये ज्येष्ठ नागरिकांना सवलतीच्या दराने जागा मिळते त्यावर सहकारी तत्त्वानुसार घर बांधलेले असते महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे घर वृद्धाच्या संपूर्ण मालकीचे असते सदस्य ६० वर्षांच्या वरचे असावे ही एकच अट! ही मालमत्ता सदस्य आपल्या मुलाच्या नावे करू शकतो मात्र ६० वर्षांचा झाल्यावरच त्याने तेथे यावे, अन्यथा दुसऱ्या ज्येष्ठ व्यक्तीला हे घर सहकारी नियमानुसार विकावे

## मृत्यूची वाट बघणे

महाराष्ट्रातल्या एका संस्थेत पन्नास हजार रुपये भरले की वृद्धांना राहायला आजन्म खोली मिळते या संस्थेतील खोलीत राहणाऱ्या एक आजी मला एकदा भेटल्या फार उदास होत्या या आजी म्हणाल्या, ''आता घरी काय अन् संस्थेत काय, मरणाची वाट बघायची ''

मी आश्चर्याने विचारले, ''पण आता तुमची तुम्हाला खोली आहे ना राहायला ?'' आजी वैतागून म्हणाल्या, ''खोलीचे काय घेऊन बसलास! मी केव्हा मरतेय आणि ही जागा आपल्याला केव्हा मिळते अशी कुणीतरी वाट बघतय असं मला सारखं वाटत असतं '' संस्था किंवा कोणी वाट बघत असेल, असे नव्हे पण ही भावना होती खरी

ऑस्ट्रेलियाच्या शासनाने अभियंत्याच्या मदतीने सहकारी सेवाची ही योजना तयार केली तिला वृद्धांचा भरघोस प्रतिसाद मिळाला आहे यामध्ये ऑस्ट्रेलियाची लोकसंख्याविषयक परिस्थिती लक्षात घ्यायला हवी तेथे जमीन जास्त न् माणसे

कमी आहेत एक अभिनव योजना म्हणून ऑस्ट्रेलियाचा हा उपक्रम पाहायला हवा

निवृत्तिग्रामातील या सहकारी वसाहतीमध्ये काय नाही ? स्वत चे टुमदार घर आहे हे घर हप्ते भरून विकत घ्यायचे त्या घरात वयाच्या दृष्टीने सोयीच्या अशा स्वयपाकाच्या, बाथरूमच्या, दिव्याच्या सोयी आहेत स्वयपाक करायचा कटाळा आला, तर सहकारी जेवणघर आहे, आणि तेथील जेवण चवदार आहे जे स्वत च्या घरात राहतात पण जेवण करू शकत नाहीत, त्याचीही सोय आहे फोन करायचा की 'चाकावरचे जेवण' – 'मील्स ऑन व्हील्स' हजर एकटे जेवायचाही कटाळा आला तर जेवणासोबत गप्पा मारायला कोणीतरी स्वयसेवी व्यक्ती हसतमुखाने हजर

सध्याकाळी एकत्र बसून गप्पा ठोकायला मोठा सुदर, सुशोभित हॉल आहे गोल्फ खेळा, पोहायला जा नवीन समवयस्क मित्रमैत्रिणी मिळवा काहीही करा

तब्येत ठीक नाही ? डॉक्टर फोनवर जवळच उपलब्ध आहेत सध्याकाळी थोडीफार खरेदी करायची आहे ? याच वसाहतीत खरेदी केंद्र आहे

## सोयी आणि सुविधा

या वयात अनेक गोष्टी स्वत करायचा कटाळा येतो साध्यासाध्या सेवा हाताशी चटकन् असाव्यात असे वाटते घरातील फर्निचरची साफसफाई, घरगुती दुरुस्त्या – कुठे खिडकीची खिट्टी तुटली, कुठे दाराचा कोयडा तर कुठे काय ! – या साऱ्या सेवा या ठिकाणी उपलब्ध आहेत केवळ एका निरोपाची जरुरी – तोही फोनवर द्यायचा एकदा सदस्य या सहकारी घरात आला की त्याला केंद्रस्थानी धरून सोयीसुविधा पुरविल्या जातात

इतकेच नाही तर त्याची आवडती करमणूक त्याने सागायची बहुधा ती या वसाहतीत असतेच बोटिंग असो, गोल्फ असो, ब्रिज असो, छद असोत, जुन्या आठवणी जागवणारे जुने नाच असोत की जुनी गाणी असोत येथे त्याची सोय केली जाते

या सर्व योजनाचा मूळ कल्पक निर्माता आहे डॉ एडवर्ड ऊर्फ टेड हीनान अमेरिकेत अध्यापन, सशोधन, व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रात प्रसिद्ध असलेले टेड हीनान याना ऑस्ट्रेलियाने खास बोलावून घेतले त्याच्या कल्पनेतून या सहकारी वसाहती उभ्या राहिल्या यामागचे ध्येयधोरण डॉ हीनान यानी फार अचूकपणे सागितले आहे, "निवृत्तिकाळात व्यक्तीला आरोग्यविषयक सोयी मिळवून देणे,

सेवासुविधा देणे आणि वृद्धाना आश्वासक निवारा उपलब्ध करून देणे "

यामागचे तत्त्व असे आहे तुमचे आयुष्य हे खास तुमचे असते तुम्ही वृद्ध झालात, म्हणजे तुमचे हातपाय दुबळे होतील, पण म्हणून तुमच्या आयुष्यावरचा तुमचा हक्क सपत नाही ते तुम्ही नियोजनाने अधिक सुदर करू शकता आयुष्यभर निरनिराळ्या जबाबदाऱ्या पार पाडताना, खस्ता खाताना राहून गेलेल्या गोष्टी तुम्ही सहकारी वसाहतीत सहज करू शकता

## चागली सोबत

सर्वच वृद्ध मडळी एकमेकापासून दूर राहण्यापेक्षा जवळ राहिली, तर एकमेकाना चागली सोबत देऊ शकतात परतु इतकीही जवळीक नको की त्याने खासगीपणाच नाहीसा होईल अनेक वृद्धाश्रमामधील गर्दीत असे होते 'अगदी इतुके आलो जवळ की जवळपणाचे झाले बधन' अशीच एका वेगळ्या अर्थाने गत होते काही वृद्धाश्रमात वेळापत्रक इतके कडक असते की, वृद्धाश्रमाचे तुरुगात रूपातर होते की काय अशी भीती वाटते एका वृद्धाश्रमात रात्री दहाला दिवे मालवण्याची शिस्त होती रात्री वाचन केल्याशिवाय झोप न येण्याची सवय असणाऱ्या वृद्धाने काय करावे ?

या 'खेड्या'मध्ये तसे नाही एकमेकाचा खासगीपणा जपत हे ज्येष्ठ नागरिक एकमेकाना जपत असतात कोणीतरी 'आता ही बला नको आपल्यात' असे म्हणून आश्रमात आणून टाकल्यासारखी त्याची अवस्था नसते त्याच्या सोयीसाठी हसतमुखाने इतर वृद्ध आणि इतर सेवकवर्ग तयार असतात

या वसाहतींमधून फिरताना या वृद्धाच्या चेहऱ्यावरचा उत्फुल्लपणा, तरुणपणा पाहताना मला जाणवली ती त्याची सुरक्षिततेची भावना आणि आपले आयुष्य मन पूत जगताना येणारा आनद चेहऱ्यावर, हालचालीत हा आनद विलसत असणारे हे वृद्ध – खास त्याच्यासाठी एकमजली घरे बाधून देण्याची ही अभिनव योजना सर्व स्वप्नवत् होते त्याच्या स्वत च्या बचतीतून आणि त्यावरील शासकीय व्याजातून हे स्वप्न साकारले होते आपला सपूर्ण बोजा सरकारवर किवा मुलावर टाकण्यापेक्षा ही योजना स्वाभिमान टिकविणारी आहे, हे निश्चित आपल्या आयुष्याची सध्याकाळ अशी प्रसन्न, स्वावलबी असेल, तर भूतकाळातल्या खस्ताही मृदू होत असतील

ही जीवनेच्छा आपल्याही ज्येष्ठापर्यंत पोचेल सहकारी तत्त्वावर वृद्धासाठी अनेक सोयी देऊ पाहणारे डॉ हीनान आता अमेरिकेत, भारतात आपली कल्पना प्रत्यक्षात आणायच्या प्रयत्नात आहेत

• • •

२२.

# अंधारलेले आयुष्य उजळते तेव्हा

मुबईला गेल्या महिन्यात एक जगावेगळा सोहळा झाला नागपाड्याच्या सर जे जे धर्मशाळा या सस्थेत बारा मुला/मुलींनी बारा आजी/आजोबाना दत्तक घेतले अनाथ, वृद्ध माणसाना डोक्यावर छप्पर असावे म्हणून ही सस्था सुरू झाली याला शभरावर वर्षे होऊन गेली त्या काळी निराधाराना दया म्हणून दोन घास देणे हे धनवताचे समाजकार्य होते आता काळ पालटला आहे निराधार वृद्धाची काळजी ही दयेच्या पोटी नव्हे तर सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेतून घ्यायला हवी, या बदलत्या विचाराचा आविष्कार म्हणजे परवा झालेला आजी / आजोबाना दत्तक घेण्याचा सोहळा वार्धक्यविषयक भारतीय परिषदेचे निमित्त साधून सस्थेच्या अध्यक्षा श्रीमती खोर्शेद आगा आणि सचिव सौ शशीताई राणा यानी हा कार्यक्रम घडवून आणला त्याचे कौतुक करावे तेवढे थोडे सहा / आठ महिन्यापूर्वी ही कल्पना जेव्हा मी सागितली तेव्हा लोकसत्तेने सपादकीय टिपणात लिहिले की, अनाथ मुलाच्या प्रतिपालनाचे सूत्र सागणाऱ्या डॉ गोखले यानी नवीन स्वागतार्ह प्रकल्प माडला आहे श्रीमती आगा याची जिद्द खरी की, त्यानी वृद्ध माणसाच्या गरजा आणि लहान मुला - मुलींचे सामाजिक कर्तव्याचे भान याना एका सूत्रात बाधले या सोहळ्याची सुरुवात होण्यापूर्वी मी जे जे धर्मशाळेत गेलो आणि तेथील वृद्धाना भेटलो.

मला प्रथम भेटल्या त्या गर्देकाकू नऊवारी नेसलेल्या, आपल्या खाटेवर

बसून उदासपणे आभाळाकडे बघणाऱ्या या बाई ७६ वर्षांच्या होत्या त्या म्हणाल्या, "कोकणात माझे घर होते नवरा गेल्यानतर मुलगा आणि सून यानी घराबाहेर काढले जगायला आधार तर हवा म्हणून आतेबहिणीच्या ओळखीने मुबईला आले एका चागल्या घरी स्वयपाकिणीची नोकरी केली पधरा - वीस वर्षे काम केल्यावर प्रकृती साथ देईना तेव्हा मालकानी सागितले की, असली बाई साभाळणे आम्हाला परवडणारे नाही वीस वर्षे ज्या घरात काढली, जिथल्या मुलाबाळाना प्रेमाने घास खाऊ घातला, तेही घर सुटले आणि मी रस्त्यावर आले कोणीतरी उदार मनाच्या बाईने मला या सस्थेत आणून सोडले गेली दहा वर्षे मी येथे आहे" मी काकूना विचारले, "तुमचे बाकी ठीक आहे ना? तुम्ही नीट जेवत नाही, असे शशीताई सागतात, असे का?" काकू म्हणाल्या, "अरे बाळा, इथला घास घशाखाली उतरत नाही एक तर लाचारीने मिळणारा घास घशात उतरताना पदोपदी बोचतो शिवाय इथे कोणी मास - मच्छी खातात, त्याच हातानी हाही स्वयपाक राधतात त्याच हातानी वाढतात, गजानन महाराजाची तसबीर समोर ठेवून मी जेवते सोवळे - ओवळे नाही पाळत मी म्हणते, ठीक आहे, पण मास - मच्छीच्या हातानी वाढलेला भात कसा खावा? जेवण जात नाही रे!" हातात गजानन महाराजाची पोथी घेऊन काकू सागत होत्या, सागता सागता रडत होत्या, आणि समोर वाढलेले ताट तसेच पडले होते

त्यानतर भेटले एक ७२ वर्षांचे वृद्ध गृहस्थ त्याचे नाव टाटा एकेकाळी क्रीडा - शिक्षकाचे काम करणारा हा गृहस्थ अजूनही खेळाच्या मैदानाच्या बाहेर आलेला नव्हता ट्रॅक सुटातील पँट आणि मोहन बगान फूटबॉल टीमचा टी शर्ट घालून आपण अजूनही खेळाडू आहोत, हे दाखवीत होता भायखळ्याच्या एका कॉन्व्हेंटमध्ये हा शिक्षक होता शाळेतून त्याला नाममात्र काही पेन्शनही मिळते बायको वारली मुलगा नोकरी करायला आखाती देशात निघून गेला प्रथम काही वर्षे त्याने बापाला पैसे पाठवले पण नतर मुलाची पत्रे आणि पैसे दोन्ही बद झाली तिकडेच लग्न करून रहिवासी होण्याचे त्याने ठरविले आहे असे म्हणतात खरे खोटे देव जाणे! पैसे बद झाल्यावर धाकट्या भावाने चाळीतल्या खोलीचा ताबा घेतला आणि म्हाताऱ्याला बाहेर गॅलरीत गादी घालून दिली गादीच्या पाठोपाठ म्हाताऱ्याची पेटीही बाहेर आली आणि म्हातारा टाटा बेघर झाला त्यांच्या कोणी विद्यार्थ्याने त्याची अवस्था पाहिली आणि त्याना सस्थेत आणून सोडले संस्थेत तसे

ते खूष आहेत पण त्याच्या दोन/तीन तक्रारी आहेत खेळाडूची चित्रे काढून भितीवर लावायला खोलीतील इतराची समती नाही शिवाय वर्तमानपत्रे फाडली जातात, अशीही तक्रार होते खालच्या चौकात हॉकी व फुटबॉल खेळायला बरोबरचे म्हातारे येत नाहीत एकजण येतो पण त्याला दिसत नाही मोठ्या मॅचेस पाहायला त्याला कूपरेज मैदानावर जायला कोणाची सोबतच मिळत नाही, त्यामुळे बसल्या जागी घडणाऱ्या खेळावर टीका-टिप्पणी करण्यापलीकडे किवा जुन्या गोष्टी उगाळण्यापलीकडे हा खेळाडू काही करू शकत नाही आणि तो असाच नॉट औट राहणार असे दिसते आहे

नतर भेटल्या मजुळाबाई गायकवाड मजुळाबाई या पुण्याजवळच्या एका खेड्यात राहात असत गिरणीत कामाला म्हणून नवरा मुबईत आला त्याच्याबरोबर याही आल्या नवरा मेल्यानतर त्या मुलाबरोबर राहू लागल्या काय बिनसले कोणास ठाऊक ? पण मुलगा आणि सून याच्याशी काही केल्या जमेना रोज तटा होऊ लागला मजुळाबाई तशा शिव्या देण्यात पटाईत आहेत त्या सटवीला अशी बिरुदावली सागितल्याशिवाय त्याना तोंडभर बोलल्यासारखे वाटतच नाही चूक कोणाची का असेना, मजुळाबाईंनी घर सोडले, हे खरे, आणि रागारागाने जाऊन गोल देवळात बसल्या दोन - चार दिवस लोकानी चौकशी केली, नतर मुबईच्या सवेदनाहीन, अनामिक जगात त्या सामावल्या गेल्या एकदा खूप आजारी पडल्या तापाने फणफणल्या तेव्हा कोणीतरी आणून त्याना सस्थेत ठेवले गेली १० - १५ वर्षे त्या सस्थेतच आहेत. त्या जख्ख म्हातारीचे वय आता ८२ वर्षांचे आहे पाढऱ्या केसाचा सुपारीएवढा अबाडा आणि सोडावॉटरच्या बाटलीसारखा जाड काचेचा पाढरा चष्मा मी आत गेल्यावर त्या म्हणाल्या, ''कोण रे तू ?'' मी म्हणालो, ''आई, मी तुमच्या मुलासारखा'' मजुळाबाई उसळल्या, ''त्या हलकटाचे नावसुद्धा घेऊ नको तो आला तर पायताणानी सडकून घालवून देईन, तो मला मेला'', पण मजुळाबाई आज खूष आहेत, कारण त्याना आज एक नातू मिळणार आहे

वर भेटलेल्या माणसाची नावे आणि सदर्भ मी बदलून लिहिले असले तरी त्या वृद्ध माणसाची वेदना चोख आणि जिवत आहे या माणसाना केवळ डोक्यावर छप्पर आणि दोन वेळा खायला घास मिळाला म्हणजे ही माणसे सुखी झाली का ? या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असे स्पष्टपणे दिसते सपूर्ण आयुष्य जगल्यानतर माणसाला

काय हवे असते ? केवळ निवारा ? केवळ अन्न - वस्त्र ? हे खरे नाही त्याना हवे असते कोणीतरी आपले म्हणायला सारखे वाटत असते, कोणीतरी आपल्याला बोलवावे भोवतालच्या जगाचा आपणही एक जिवत भाग आहोत हे मानावे सुखदु खाच्या चार आठवणी बोलायला, ऐकायला कोणी जवळ असावे आपल्याला काही सहजीवन असावे कारण एकलेपणाची पोकळी ही फार दु खद असते आता घरच्यानी टाकले तर या वृद्धानी जायचे कोठे ? मजुळाबाईंना काय वाटत नसेल की आपले नातवड आपण पाहावे ? आपल्या नातवाबरोबर अगणात फुटबॉल किवा हॉकी खेळायला टाटाना आवडणार नाही का ? आपल्या नातीने स्वयपाकघरात विटाळ कालवला तरी गर्दे काकू ते चालवून घेतील तिच्यासाठी घरात अडी शिजवतील खोटा त्रागा करून का होईना, त्या ते सर्व चालवून घेतील कारण काही झाले तरी नातवड म्हणजे दुधावरची साय नातू माडीवर बसावा म्हणून नवखड पृथ्वीचे सिहासनसुद्धा ही माणसे नाकारतील खरी व्यथा अशी आहे की, या माणसाना नातवडे नाहीत पण आज अचानक त्याच्या एकलेपणाच्या आगीतून फुलासारखी कोवळी स्वप्ने फुलविणारा सोहळा तेथे होणार होता आजी/आजोबाना नात/नातू मिळणार होते मुबईच्या कॅम्पियन स्कूल, भर्डा हायस्कूल आणि कॉन्व्हेंट ऑफ जीझस अँड मेरी या तीन शाळातील ६ मुले आणि ६ मुली निवडल्या गेल्या श्रीमती आगानी त्याच्या आईबापाना ही योजना समजावून सागितली मुलाची जबाबदारी इतकीच की, त्यानी दत्तक घेतलेल्या आजोबा/आजींना महिन्यातून दोनदा भेटायचे त्याच्याशी गप्पा मारायच्या त्याना वाचून दाखवायचे त्याच्याबरोबर खेळायचे त्याना शक्य झाले तर फिरवून आणायचे एखाद्या वेळेला खाऊच्या पैशातून फुले आणून द्यायची कधी पुस्तक आणून द्यायचे जमलेच तर तीन - चार महिन्यानी एकदा घरी जाऊन यायचे एक नवे प्रेमाचे भावबधन निर्माण करायचे आजोबा आणि नातू, आजी व नात याच्यातला हा दत्तकविधी कायदेशीर नव्हे पण प्रेमाचा विधी होता त्या विधीला औपचारिकतेचा रग आणावा म्हणून वकीलमडळी दस्तऐवज करतात तसा दस्तऐवज केला होता आम्ही सामाजिक कर्तव्याचे आणि प्रेमाचे वकील अशी वर नोंद होती, त्या दस्तऐवजावर आजी/आजोबा आणि नात/नातू याच्या सह्या करायच्या या समारभाला हजर राहण्याचे ज्याना भाग्य लाभले अशा माझ्यासारख्या अनेक देशी-परदेशी समाजसेवकानी त्यावर साक्षीदार म्हणून सही करायची अशी कल्पना होती

समारंभाच्या सुरुवातीला चाकाच्या खुर्चीत बसलेल्या एका अपंग वृद्धेने कापऱ्या आवाजात प्रार्थना म्हटली व्यासपीठाच्या उजव्या बाजूला सहा आजोबा आणि सहा आजी बसल्या होत्या डाव्या बाजूला सहा मुले आणि सहा मुली बसल्या होत्या त्या मुलांच्या कोवळ्या चेहऱ्यावर अपार उत्सुकता होती इकडे समोर बसलेल्या आजी/आजोबांना डोळ्यातून गळणारी आसवे थरथरत्या हाताने थांबवता येत नव्हती एकेका आजोबाचे आणि नातीचे तसेच एकेका आजीचे आणि नातवाचे नाव घेतले जाई मग तो मुलगा समोर जाऊन आजीला हार घाली नमस्कार करी मग तिचा हात धरून व्यासपीठावर तो घेऊन येई आणि ते दोघे सह्या करीत आणि नंतर डाव्या बाजूला जाऊन शेजारी शेजारी बसत अशा रीतीने सहा आजींना नातू आणि सहा आजोबांना नाती मिळाल्या आपल्या सुरकुतलेल्या हातात कोवळ्या नातवाचा हात घेताना अंत करणात झालेली कालवाकालव चेहऱ्यावर दिसत होती मन हेलावणारा हृदयस्पर्शी सोहळा होता तो त्या वेळी बोलताना मी म्हणालो, ''माझ्या डाव्या बाजूला ही कोवळी मुले, मुली बसली आहेत, त्यांच्या डोळ्यात तेज आहे, ओठावर हसू आहे, समोर समृद्ध आयुष्य उभे आहे ही मुले म्हणजे आयुष्याच्या उष कालाचे प्रतीक आहेत उजवीकडे हे वृद्ध आजी/आजोबा बसले आहेत त्यांच्याजवळ आजवर भूतकाळाशिवाय काही नव्हते जीवनाच्या संध्याकाळचे जणू काही ते प्रतीक आहेत पण आता नातवंडांच्या रूपाने त्यानाही भविष्यकाळाचा एक वाटा मिळणार आहे आजचा हा समारंभ म्हणजे आयुष्याचा उष काल आणि संध्याकाळ यांच्यात प्रेमाचा पूल बांधण्याचा सोहळा आहे अंधारलेल्या आयुष्यात रंगांची उधळण करणारे इंद्रधनुष्य निर्माण करण्याचा हा समारंभ आहे हे प्रेम लाभले तर वृद्धपणाची वर्षे ही उत्सवाची वर्षे होणार आहेत दयेचे रूपांतर कर्तव्यात, करूणेचे सेवेत करणारे हेच दु खाचे दर्शनशास्त्र आहे अश्रूंचे अध्यात्म आहे''

• • •

भाग सहावा

# काही माणसे

वा. क्र.
शाखा

२३.

# जिम परतलाच नाही !

बँकॉकला सयुक्त राष्ट्रसघाचे कार्यालय असल्यामुळे तिथे वारवार जावे लागते  तिथे मी प्रथम जिम थॉम्सनला भेटलो  थायलडच्या रेशमाचा व्यापार वाढविण्यामध्ये त्याचा बराच हात आहे  भेटलेल्या लोकविलक्षण माणसाविषयीच्या 'एशियन पोर्ट्रेट्स्' नावाच्या नव्या पुस्तकामुळे ही आठवण पुन्हा जागी झाली  जिम हा अशा विचित्र माणसापैकी एक होता

त्याला कुणी कोट्याधीश अमेरिकन म्हणत तर, काही कुणी रेशमाचा राजा म्हणत  १९६७ मध्ये एके दिवशी हा गृहस्थ जो नाहीसा झाला तो कुठे गेला, कसा गेला त्याचे काय झाले याचा आजतागायत पत्ता नाही

त्या वेळी त्याचा धदा अत्यत ऊर्जितावस्थेत होता  खूप पैसे मिळत होते  तो सुखी होता, पण पेटलेला कापूर बघता बघता नाहीसा व्हावा तसा मागे कुठलीही खूण, कसलीही निशाणी न ठेवता तो गायब झाला  त्याला शोधण्याकरिता खूप प्रयत्न करण्यात आला  विमानाचा, नावाचा उपयोग करण्यात आला  गुप्तहेरानी देखील तपास केला पण एखादी भुताटकी व्हावी तसा हा गृहस्थ जो नाहीसा झाला त्याचा आजपर्यंत पत्ता नाही

त्याचा शोध लावणाऱ्याला लक्षावधी रुपयाची बक्षिसे लावण्यात आली  ज्योतिषी, भविष्यवेत्ते, वाचासिद्धि असणारे अशा अनेक लोकानी बक्षिसासाठी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला  अनेकानी थापा मारल्या  आपल्याला परदेशात जायला मिळावे म्हणून लाबलाबच्या देशात जिम आहे असे सागितले  आपल्याला

तेथे नेले तर आपण दाखवून देऊ, असे म्हणणारेही पुष्कळ भेटले या गूढकथेत भर घालण्याकरिता जिम नाहीसा झाल्यावर सहा महिन्यानी जिमची थोरली बहीण कॅथरिन हिचा अमेरिकेत खून करण्यात आला तिची सारी कागदपत्रे उलथी - पालथी केली होती परतु घरातल्या पैशाना किंवा मूल्यवान वस्तूना हात लावला नव्हता

जिमच्या नाहीस होण्याविषयी अतिशयोक्तीच्या गोष्टी, वावड्या, वदता, सालोसाल वाढतच आहेत जिम मरण पावला अस जोपर्यंत सिद्ध होत नाही तोपर्यंत या गूढतेच्या छायेमधून एक ना एक दिवस तो अचानक येऊन समोर उभा राहील असे अनेकाना वाटते जिमच्या घरात काम करणारा त्याचा नोकर 'यी' याची ठाम समजूत आहे की, जिम जिवत आहे। त्यामुळे तो अजूनही जिमच घर झाडून स्वच्छ ठेवतो न जाणो एखादे दिवशी सध्याकाळी दरवाज्याची घटा वाजेल पाठोपाठ जिमचे खळखळणारे हसणे ऐकू येईल आणि मित्राचा गोतावळा घेऊन जिम जेवायला घरी येईल, असे यीला वाटते मग तो खरा जिम असो किवा त्याचे भूत असो

जिम नाहीसा कसा झाला याबद्दल अनेक लोक अनेक हकीकती सागतात बॅकॉकमध्ये कालव्याच्या किनाऱ्यावर जिम थॉम्सनच घर होत त्याच्या घरामध्ये एक पाढऱ्या रगाचा आणि लाल चोचीचा काकाकुवा होता रात्री - बेरात्री तो कर्कश आवाजामध्ये साद घालायचा जिमच्या घराच्या परिसरात कुणी राहिल आणि रात्री - बेरात्री जिमच्या अचानक नाहीसे होण्याच्या या गोष्टी ऐकत बसल, तर त्याच्या मनावरही एक अद्भुत गडद काळ सावट आल्यासारख वाटे

माझा मित्र 'सायोम रत्नविचित्' (शाम रत्नविचित्र)याच्या घरी आम्ही गच्चीवर बसलो होतो पलीकडे कालवा होता त्याच्याजवळ जिमचे घर। जिम नाहीसा कसा झाला याची कथा सागितल्यावर सायोम म्हणाला, ''जिम गेल्यावर बराच काळ भास होत राहायचा जिमच्या घराकडे जाणारी पावल वाजताना ऐकू यायची ''

मागे एकदा गिरसप्पा धरणाच्या वर डाकबगल्यात मी एकटाच राहिलो होतो खानसाम्यान जेवण चागल दिल जेवताना सोबत म्हणून तो उभा राहिला आणि गप्पा मारू लागला त्या जिल्हयाचा इग्रज कलेक्टर या बगल्यात कसा राहायचा, त्याची बायको त्याच्या मित्रावर कशी भाळली होती, रात्री हा मित्र व्हायोलिन वाजवायचा कलेक्टर आणि त्याची बायको कसे नाचायचे हे तो सागत होता शेवटी

भाडणात कलेक्टरने त्या दोघाना रात्री गोळी घालून ठार केल आणि त्याने स्वत गिरसप्पा धबधब्यात उडी घेऊन जीव दिला तेव्हापासून दर पोर्णिमेला या बगल्यात ते तिघे मृतात्मे येतात, ही गोष्ट सागून तो खानसामा निघून गेला त्या चादण्या रात्री डोंगरावर असलेल्या त्या एकाकी बगल्यात मी एकटाच होतो झोप काही येईना मग हळूहळू मला व्हायोलिनचे सूर, मद्याच्या पेल्याची किणकिण आणि गोळीबाराचे आवाज ऐकू येऊ लागले जिमबद्दल बोलताना हे सारे आठवले तसे पाहिले तर जिम काही भूत नव्हे पण त्याचे नाहीसे होणे मात्र भुताटकीपेक्षा विचित्र आहे, यात शकाच नाही

जिम हा अमेरिकन मुलगा लष्करात भरती झाला लढाई सपल्यानतर त्याने स्थापत्याचा अभ्यास केला घराचे नकाशे बनवून तो आपले पोट भरीत असे लष्करात असताना जिमने आशियात भटकती केली होती दुसऱ्या महायुद्धानतर जिमने ठरवल की, बँकॉकमध्ये राहायचे त्याच्या मते बँकॉक हे जगातले राहण्याजोगे एकमेव शहर! त्या वेळी तो ओरिएटल हॉटेलमध्ये राहात असे चाओफाया नदीच्या किनाऱ्यावर हे हॉटेल आहे लढाईच्या काळात जपानी लष्कराचे प्रमुख कार्यालय तिथे होते लढाईनतर हे हॉटेल विकायला काढले आणि जिमने ते विकत घेतले या हॉटेलात स्वप्ननगरी उघडायची जिमची आकाक्षा होती पण भागीदाराशी न पटल्यामुळे जिमने हाही धदा सोडला थायलडमध्ये जे रेशीम तयार होते त्याने जिमचे मन मोहून गेलेले होते त्या वेळी रेशमाचा धदा फार मोठा नव्हता पारपरिक तऱ्हेने विणकर हे रेशीम विणत अतिशय सुदर अशा रगाने रगवीत चकाकणाऱ्या रगाचे रेशमी कपडे पाहून जिम वेडाच होऊन जायचा

रेशीम विकायचे हे जिमच्या डोक्यात आल्यानतर त्याने अमेरिकेतील 'फॅशन' विषयाच्या मासिकाच्या सपादकाना, फॅशनतज्ज्ञाना बोलाविले आणि त्याच्याकडून थायलडच्या रेशमाचे कपडे शिवून घेतले त्याची फॅशनपरेड केली बघता बघता या कपड्यानी युरोपची सारी बाजारपेठ काबीज केली परतु निर्यातीला पुरेल इतके रेशीम तयार होणे शक्य नव्हते कारण हा धदा खासगी स्वरूपात केला जात असे शेवटी जिमने विणकराना आपल्या घरात नोकऱ्या दिल्या

त्याचे रेशमाचे वेड इतके पराकोटीला गेले की, त्याने रेशीम उद्योग वाढवण्याकरता सारे आयुष्य खर्च केले हा व्यवसाय त्यानतर इतका वाढला की, जिम नाहीसा झाला तेव्हा २० हजार विणकर हे काम करीत होते जिम खेड्यापाड्यात जायचा, नवे नवे रग, नवीनवी डिझाइन्स शोधून काढीत असे

त्यामुळे जगातल्या सर्व नामवंत नट्या आणि लावण्यसुंदरी यांचे थायलंडच्या रेशमाशिवाय चालेनासे झाले यासाठी जिमने 'थाय सिल्क कंपनी' काढली

स्वत च्या घरात त्याने रेशमाच्या नमुन्यांचे प्रदर्शन भरवले त्याचबरोबर तेथे थायलंडच्या संस्कृतीची सर्व प्रतीके जपायचा प्रयत्न केला

जिमचा एक चिनी मित्र होता त्याचे नाव डॉ लिंग तो आणि त्याची अमेरिकन पत्नी मध्य मलेशियात राहात असत एका बेटावर भर जंगलाच्या मध्यभागी त्यांनी पौर्णिमा कुटी नावाचे एक टुमदार घर बांधले जिम आणि त्याची बायको यांना या मित्राने इस्टरची सुट्टी घालवायला आमंत्रण दिले होते ती दोघे टॅक्सी करून कुटीकडे गेले दुसऱ्या दिवशी सकाळी डॉ लिंग म्हणाले, ''या रानात एक सुंदर पायवाट आहे '' रंगाच्या रानात हरवून टाकणारा तो राजरस्ता आहे

रविवारी सकाळी डॉ लिंग चर्चला गेले आणि जिम त्या पायवाटेने गेला थोडासा अस्वस्थ दिसत होता – असं सांगतात घरची इतर सारी मंडळी अडीचपर्यंत परत आली पण जिमचा पत्ता नव्हता संध्याकाळपर्यंत जिम आला नाही तेव्हा त्याला शोधायला माणसे पाठविण्यात आली रात्रभर शोधूनही जिम सापडला नाही तेव्हा पोलिसांना कळविले एवढा लक्षाधीश गेला तरी कुठे? दुसऱ्या दिवशी पंधराशेजणांनी त्याचा शोध सुरू केला कुणाला वाटले, तो अपघाताने गेला, कुणाला वाटले त्याला वाघाने खाल्ले, काय असेल ते असो, जिम कुणालाच सापडला नाही त्याने आत्महत्या केली की काय, त्याचा खून झाला की काय याचाही तपास झाला खरे खोटे देवाला ठाऊक परंतु प्रचंड वास्तू आणि भरमसाठ धनदौलत मागे ठेवणारा हा माणूस – त्याचा मृतदेह सुद्धा आजवर सापडला नाही कुणी म्हणतात, जिमवर प्रेम करणाऱ्या एका आदिवासी मुलीने त्याला मलायाच्या दाट जंगलामध्ये पळवून नेले कुणी म्हणतात जिमला आजगराने गिळले

एकमात्र खरे, त्या रविवारी सकाळी जिम दिसला त्यानंतर आजतागायत त्याचे दर्शन नाही जिम नाहीसा झाला पण त्याच्या आठवणीने मात्र बँकॉक झपाटले आहे बँकॉकमध्ये जेवताना, गप्पा मारताना आजसुद्धा पुन:पुन्हा प्रश्न विचारला जातो या जिमचे झाले तरी काय?

• • •

२४.

# रशियन उमरावांची आनंदगाथा

या खेपेच्या जर्मनीच्या दौऱ्यात एका लोकविलक्षण माणसाची गाठ पडली त्याचे नाव डॉ व्हलॅडमिर लिडनबर्ग भारतात रस घेणारे माझे जर्मन मित्र मॅक्स आणि सौ मथिल्डे ग्रुन्नर याच्या मते बर्लिन शहराबाहेर एका पर्णकुटीत राहणारा हा माणूस म्हणजे जवळजवळ ईश्वरी अवतार आहे त्याना मी भेटावे असा त्याचा फार दिवस आग्रह चालला होता त्यामुळे गेल्या महिन्यात बर्लिनला गेल्यानतर डॉ लिडनबर्ग याना भेटण्याची वेळ ठरविली त्याच्या घरी जाण्याकरिता आमची गाडी चक्क एका अरण्यात शिरली सध्या हिवाळा नसल्यामुळे काळसर, हिरव्या पानानी सगळे रान गच्च भरून गेले होते या अरण्याच्या बाहेर आलो तो एक प्रचड जुनी किल्ल्यासारखी गढी दिसली, ज्याला कॅसल म्हणतात तो होता याच रस्त्याने पुढे गेल्यावर एक चिमुकले टुमदार खेडे म्हणजे उपनगर म्हणा लागले त्यातही जराशी आधुनिक घरे सोडून एक वळण घेऊन आम्ही एका छोटेखानी घरापुढे थाबलो कोकणात परसात बगीचा असतो तसे बाहेर वाफे लावलेले, ओसरीवर बसायला खुर्च्या, एकमजली कौलारू घर आणि त्या घरात फक्त तीन खोल्या, विजेच्या घंटेऐवजी देवळात घटा टागलेली असते तशी, बाहेर घटा टागलेली होती ती वाजताच डॉ लिडनबर्ग याचे सहकारी स्वागतासाठी आले आणि आम्हाला आतल्या खोलीत घेऊन गेले सरासरी २०x१० फुटाच्या या खोलीत भितीलगत कॉटवर डॉ लिडनबर्ग निजलेले होते त्याना उठायला सोपे जावे म्हणून त्याना

कॉटच्या वरच्या बाजूने सर्कशीमध्ये झोके असतात तसे छोटे झोके बाधलेले होते त्या दाडीला धरायचे आणि त्याच्या आधारे बसते व्हायचे डॉ लिडनबर्ग हे दोन वर्षापासून अर्धांगाने आजारी आहेत त्यामुळे त्याचा कमरेखालचा भाग लुळा झालेला आहे सध्या त्याचे वय जवळजवळ ९० वर्षांचे आहे, परतु डोक्यावरचे पाढरेशुभ्र कुरळे केस आणि प्रचड हसणारे डोळे बघताक्षणीच त्याची छाप मनावर पडते आम्ही गेलो तेव्हा आमच्यासाठी जेवण तयार करून ते वाटच पाहात होते

या गृहस्थाच्या कॉटच्याभोवती पुस्तकेच पुस्तके होती काट, मिल्ल, शोपेनहॉवर, मॅक्समुल्लर, हुबाल्ड आणि त्याच्या खाद्याला खादा लागून राधाकृष्णन, डॉ गुरुदेव रानडे, आणि लो टिळक मला वाटले हा वृद्ध तत्त्वज्ञ अजूनही डोळे मिटून या थोराच्याशी सुखसवाद करीत डोळे मिटून बसत असावा समोर दिसेल असे कुरुक्षेत्रावर कृष्णाने अर्जुनाला केलेल्या उपदेशाचे चित्र होते त्याच्याच पलीकडे गुडघे टेकून प्रार्थना करणारा येशू ख्रिस्ताचा करुणार्त चेहरा त्याच्याच पलीकडे ख्रिस्ताला सुळावर चढवण्याचे भरतकामाने केलेले चित्र शीर्षक 'धुक्यातील गूढ' रशियन पद्धतीचे हे विणकाम डॉ लिडनबर्ग यानी स्वत च केले मी सहज विचारले, ही चित्रे कोणी काढली? डॉक्टर म्हणाले, मीच काढली मी त्याना विचारले, तुम्ही मेंदूवर शस्त्रक्रिया करणारे शल्यविशारद - न्युरो सर्जन आहात, यातून चित्र काढायला तुम्हाला वेळ होतो कसा? डॉ लिडनबर्ग म्हणाले, सध्या काही मी रोज रोगी तपासत नाही, पण आठवड्यातून तीन वेळा रुग्ण मी बघू शकतो वेळ आली तर चाकाच्या खुर्चीत बसून शस्त्रक्रिया करू शकेनही, या सगळ्यातून जेव्हा केव्हा वेळ मिळेल तेव्हा मी चित्रे काढतो, पुस्तके वाचतो, नाहीतर चितन करतो मी त्याना विचारले की, तुम्ही एवढा कशाचा विचार करता? कशाचे चितन करता? डॉ लिडनबर्ग म्हणाले, एखादा माणूस आजारी का पडतो? आजाराची लक्षणे सर्वांनाच दिसतात हे आजारीपण कसे असते, त्यावर उपचार काय याची उत्तरे वैद्यकशास्त्रात आहेत पण आजारपण मलाच का येते या प्रश्नाचे सपूर्ण उत्तर वैद्यकात नाही हा माणूस बरा होतो, यात मी काय करतो? यात वैद्यकाचा भाग किती आणि सचिताचा भाग किती? या सगळ्या प्रश्नाची उत्तरे शोधावयाची असतील तर भारतीय तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन विचार करायला पाहिजे

"तुम्हाला माहीत आहे की, जर्मनीमध्ये जवळ जवळ गेल्या दोनशे वर्षांत शभर एक जर्मन पडितानी सस्कृतचा आणि भारतीय तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास

केलेला आहे, त्यावर लिहिले आहे अलीकडेच मॅक्समुल्लर सस्थेने या पुराविद्यापडितावर एक सुरेख पुस्तक प्रसिद्ध केलेले आहे '' ते पुस्तक मला दाखवत लिडनबर्ग मला म्हणाले, ''या शभर लोकानी तत्त्वज्ञानाच्या वाटेने जीवनाचा शोध चालवला आहे पण अजूनही या वाटेचा अत दिसत नाही म्हणून मी भारतीय तत्त्वज्ञानाचा विचार करता करता भगवद्गीता आणि कर्मयोगाकडे वळलो जगात युद्धे होतात, नरसहार होतो पण कालचक्र फिरतच राहते बौद्धिक प्रगल्भता आली तरच निर्वाण आणि कर्मयोग समजणार '' मी त्याना विचारले, ''आपण काही पुस्तके लिहिली का?'' ते म्हणाले, ''वैद्यक, तत्त्वज्ञान, मनोव्यथा अशा विषयावर माझी चाळीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत त्यातली दहा ते बारा पुस्तके योग आणि वैद्यक, भारतीय तत्त्वज्ञान, गीतेचा अर्थ यावर आहेत '' यापैकी 'मानवतेची प्रार्थना' हा ग्रथ फार लोकप्रिय आहे वैधकीय दृष्टीने 'योगविचार' आणि 'जीवनाचा आनद' ही पुस्तके अनेक भाषात भाषातरित झालेली आहेत याखेरीज डॉक्टरानी इतर अनेक गोष्टींचा विचार चालविला आहे हे गृहस्थ जरा छादिष्ट आहेत असे म्हणायला हवे कोणताही विषय हा त्याना अविषय नाही रगाचा उपचारावर काय परिणाम होतो याबद्दल बोलताना ते म्हणाले, ''भारतातील सगीतामध्ये रागमाला आहेत प्रत्येक रागाचे एक चित्र आहे, प्रत्येक रागाला एक रग आहे '' त्याचप्रमाणे प्रत्येक मनोवस्थेला रग असतो का याचा अभ्यास करण्याकरता अलीकडेच याविषयीची सस्कृत पुस्तके आणून त्याचे वाचन त्यानी चालविलेले आहे ते म्हणाले, ''मला सस्कृत वाचता येत नाही, पण बर्लिन विद्यापीठातील एक प्राध्यापक येऊन मला वाचून दाखवतात आणि आमचा हा अभ्यास धीरे धीरे चालू आहे '' यासाठी वेगवेगळ्या तऱ्हेची तात्रिक चित्रेही त्यानी आणवली आहेत

मी त्याना विचारले की, याविषयी तुम्ही काही भारतीय तज्ज्ञाच्या बरोबर विचारविनिमय केला आहे का? ते म्हणाले की, दुर्दैवाने भारतात जायची मला सधी मिळालेली नाही मी आता पागळा झालेलो असलो तरी एखाद्या दिवशी येईन सुद्धा पण पुनर्जन्म जर असेल तर मला भारतात जन्म घ्यायला आवडेल डॉ राधाकृष्णन ऑक्सफर्ड विद्यापीठात शिकवीत असताना त्याच्याशी प्रथम पत्रव्यवहार केला डॉ. राजेंद्रप्रसाद याच्याशी केला, तेथपासून ते अगदी अलीकडील सत्य साईबाबा, शिवानद आणि सध्या अनेक विद्यापीठात तत्त्वज्ञानाचा विषय शिकवीत असलेले अनेक प्राध्यापक मला माहीत आहेत, 'आजही दिल्ली विश्वविद्यालयातील लोक

मला भेटायला येतात आता मात्र मला डोळ्यांनी कमी दिसते, कानानी कमी ऐकू येते, समोरच्या माणसाचा चेहरा धूसर दिसतो ' क्षणात डॉक्टरांच्या चेहऱ्यावर एक मिस्किल हास्य उमटले ते म्हणाले मला हवे ते मात्र मी पाहू शकतो ऐकू शकतो अतश्चक्षू शाबूत आहेत ना

लिडनबर्ग याच्याकडे जाण्यापूर्वी दोन दिवस आधी म्युनिकमध्ये त्याचा उपचार घेतलेले काही रुग्ण भेटले त्याच्या दृष्टीने डॉ लिडनबर्ग हे जीवनदान देणारे डॉक्टर आहेत डॉक्टरांच्याबद्दल एकूणच त्यांच्या रुग्णपरिवारात अपार विश्वास आणि श्रद्धा मला दिसली माणसाचा मेंदू आणि मन हे त्यांच्या अभ्यासाचे विषय डॉ सिगमड फ्राइड, डॉ जुग याच्या विचाराशी त्याची जवळीक आहे, पण डॉ फ्रॉइड याच्या कन्या डॉ फ्रॉइड याच्याशी तीव्र मतभेद आहेत लडनमध्ये मी ॲना फ्रॉइड याच्याकडे कार्यानुभव घेतलेला आहे हे ती सागताच ते मला म्हणाले, "ती उत्तम शिक्षिका आहे पण मनोविश्लेषक म्हणून तिच्याशी मतभेदच आहेत"

त्याच्याकडची पाहता पाहता मला रशियन पद्धतीच्या घागरीसारखी शिखरे असणाऱ्या चर्चचे एक अतिशय सुदर चित्र दिसले मी त्याना म्हटले तुम्ही रशियात गेला होता का? डॉक्टरांच्या चेहऱ्यावरचे हसू एकदम झाकोळून केले क्षणार्धात त्याच्या मनाचे निळे पाखरू भूतकाळात झेपावले कुठेतरी अतराळात पाहात ते म्हणाले, "डॉ गोखले, मी कर्मयोगाचा विद्यार्थी आहे, कर्मसिद्धान्तावर माझा विश्वास आहे माणसाचे आयुष्य कोणत्या दिशेने कसे वाहात जाते याची उत्तरे माणसाजवळ असत नाहीत माझ्यापुरते मी सागतो, मी खरा जन्माने रशियन आहे, माझे रशियन आडनाव चिलिश्चेफ" अगदी सहजपणे मी प्रश्न विचारला, "तुम्ही रशियात कुठे राहात होता?" पुढे झाला तो सवाद असा 'मॉस्कोमध्ये' 'मॉस्कोत कुठे राहात होता?' मी मॉस्कोची ओळख दाखविण्याकरिता विचारले डॉ म्हणाले, 'क्रेमलीन राजवाड्यात' मी थक्क होऊन विचारले, 'तुम्ही क्रेमलीनमध्ये काय करत होता?' डॉ म्हणाले, 'क्रेमलीन राजवाड्यात नाही तर कुठे राहावयाचे? रशियाचे पदच्युत सम्राट झार याची राणी म्हणजे झरीना तिच्या बहिणीचा मी मुलगा माझे वडील श्रेष्ठ सगीतकार होते रशियन राज्यक्रातीनतर जीव वाचवण्याकरिता माझी आई, मला आणि माझ्या बहिणीला घेऊन रशियातून पळून गेली आणि जर्मनीत आली आम्हाला मारून टाकण्याचा हुकूम होता, पण चार घोड्यांची बग्गी चालवणाऱ्या, घरी वशपरपरा काम करणाऱ्या गाडीवानाने आम्हाला पळून जाण्याची

सधी दिली रशिया सोडल्याचे मला मरणप्राय दु ख झालेले आहे जर्मनीत आल्यावर मला पकडले 'कॉन्सेन्ट्रेशन कॅम्पमध्ये' बदी म्हणून ठेवले तेथून सुटल्यावर मी वैद्यकशास्त्राचा बॉन आणि व्हिएन्ना विद्यापीठात अभ्यास केला जर्मनीमध्ये आम्ही चोरूनमारून अज्ञातवासात राहात असताना, माझ्या आईची लिडनबर्ग या जर्मन गृहस्थाबरोबर ओळख झाली आणि तिने त्याच्याशी लग्न केले लिडनबर्ग हे पूर्वी रशियन तुरुगात होते, आमचे रशियन नाव वापरल्यास इथे आम्हाला धोका होईल म्हणून मी चिलिश्चेफऐवजी लिडनबर्ग हेच नाव चालू ठेवले आता लिडनबर्गही वारले, माझी आईही वारली माझी बहीण आणि तिची मुले अमेरिकेत असतात झार वशाचा आठवणीपलीकडे काहीही सबध उरलेला नाही, पण अजूनही केव्हातरी लहानपणीच्या रशियातल्या क्रेमलीनच्या राजवाड्यातल्या आठवणी जाग्या होतात, मन उदास होते, खिन्न होते, पण माझे रुग्ण आले की त्याच्या व्यथेचे शमन करताना मी सर्व काही विसरतो पुन्हा कर्तव्याची जाणीव होते रुग्णाच्या डोळ्यातले दु.ख माझ्या मनात ठिबकू लागते दु ख निवारणानतर झालेले त्याच्या चेहऱ्यावरचे स्मितहास्य माझ्या अधारलेल्या मनावर सूर्यप्रकाशाचा झोत टाकते मी पुन्हा चित्रे काढू लागतो, चितनात गुततो, पुस्तके लिहू लागतो भारतीय तत्त्वज्ञानाचा विचार करतो, गीता सागणाऱ्या श्रीकृष्णाकडे, पर्वतावरून जीवनाचे सार सागणाऱ्या येशू ख्रिस्ताकडे पाहतो आणि मनावर आलेली वादळे शात होतात ते म्हणाले, ' माझे सगीतकार असलेले रशियन वडील मी जर्मनीत असताना हस्तेपरहस्ते पत्रही पाठवीत माझी पत्नी पचवीस वर्षांपूर्वी वारली, पण तिच्या प्रीतीचे वसतवैभव आजही ताजेतवाने आहे '

ह्या अपग तत्त्वज्ञ माणसाच्या या तीन खोल्यात काही सुदर रशियन वस्तू आहेत, त्यानी काढलेली चित्रे आहेत, पुस्तके आहेत, पत्रे आहेत, पण या सर्वांपेक्षा अतिशय गतिमान मन आणि तलवारीच्या धारेसारखी तीक्ष्ण बुद्धी आहे हा कर्मयोगी माणूस एक तत्त्वज्ञान जगतो आहे

बॉनमध्ये गेल्यावर भारतीय राजदूत मला म्हणाले की, आम्ही एक भारताचा सास्कृतिक उत्सव इथे करणार आहोत तेव्हा मी त्याना सहज विचारले की, भारतावर इतके प्रेम करणाऱ्या या माणसाची तुम्हाला माहिती आहे का? श्री माधवन मला म्हणाले, 'आम्हाला खरोखरच माहिती नाही, पण तुम्ही सागितले आहे त्याप्रमाणे आम्ही तावडतोब त्याची गाठ घेण्याचा प्रयत्न करू ' त्याना मी

म्हटले, 'प्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञानी मॅक्समुल्लर याचे प शामजी कृष्ण वर्मा याना शुभेच्छा देणारे एक सुरेख पत्र 'केसरी' ग्रथालयात आहे त्याना मदत करावी असे आवाहन करणारे ते पत्र इग्रजीत आहे, पण शेवटी मॅक्समुल्लर यानी खाली देवनागरीमध्ये स्वत ची सही केलेली आहे, ती सही 'मोक्ष मूल्लर भट्ट.' अशी आहे, आणि ते ऑक्सफर्डमध्ये काम करीत असत, म्हणून खाली पत्ता 'गोतीर्थ नगरे' असा पत्ता लिहून तारीख घातली आहे ' माधवन मला म्हणाले की, ते पत्र आम्हाला जरूर पाठवावे याचा आम्हाला या सास्कृतिक कार्यात उपयोग करता येईल याबद्दल बोलताना लिडनबर्ग विचारत होते की, डॉ मॅक्समुल्लर याचे देवनागरी अक्षर कसे आहे? मी त्याना म्हणालो की, आजच्या पिढीतील सोडाच पण जुन्या पिढीतील वळणदार अक्षराचा गर्व बाळगणारानाही हेवा वाटावा इतके ते सुदर आहे

डॉ लिडनबर्ग म्हणाले की, शेवटचा श्वास असेपर्यंत काम करीत राहावयाचे हे खरे, परतु जमविलेली पुस्तके, चित्रे या वस्तू, याचे पुढे काय होणार? मी म्हणालो, 'त्या भारतात पाठविता येतील का?' ते म्हणाले, 'अहो, त्या भारताच्याच आहेत, मी कोण पाठविणार?' डॉ लिडनबर्ग मला म्हणाले, 'तुम्ही पुन्हा पुन्हा येथे आले पाहिजे ' मी त्याना म्हणालो, 'मी काही तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी नाही ' त्यावर ते म्हणाले, 'ज्या लोकमान्य टिळकानी 'केसरी'ची स्थापना केली, ज्यानी गीतारहस्य लिहिले, त्या जागेचा काही तरी आध्यात्मिक गुण तुम्हाला लागला असेलच ना?' त्यानी मला महाभारतातील यज्ञकुडात लोळून सुवर्णमय झालेल्या मुगसाची गोष्ट सागितली त्यानतर मला ते म्हणाले, 'तुम्ही येथून जाण्यापूर्वी वाटेमध्ये जो 'कॅसल' आहे तेथे जायला हवे, बर्लिन विद्यापीठाचे सस्थापक डॉ अॅलेक्झाडर हॉबूल्ड याचे ते घर आहे त्याचा नातू फॉन हेन्झ तेथे राहतो ' कॅसलमध्ये गेल्यानतर डॉ फॉन हेन्झ यानी त्याच्या प्रासादतुल्य घरामधील रोमन पुतळे, पेंटिंग्ज् दाखविली, पण त्यापेक्षाही त्याचे ग्रथालय मला आवडले एक खोली भरून भारतीय तत्त्वज्ञानाची पुस्तके आहेत बर्लिन विद्यापीठाचे सस्थापक डॉ अॅलेक्झाडर हॉबूल्ड यानी १८२५ साली बर्लिन येथे भगवद्गीतेवर व्याख्यान दिले, त्याचे पुस्तक १८२६ साली प्रसिद्ध झाले आणि त्याची सुधारलेली आवृत्ती १८५५ साली पुन्हा प्रसिद्ध झाली डॉ हॉबूल्ड याचा भारताशी खूप जवळचा सबध होता आणि त्यानी सस्कृतचा अभ्यास केलेला होता त्या ग्रथालयातील पुस्तके चाळता चाळता राधाकृष्णन् याचे 'हिदू धर्म · एक

जीवन पद्धती' आणि लोकमान्य टिळकाचे 'गीतारहस्य' पाहून मी भारावून गेलो आजही बर्लिनमध्ये संस्कृत आणि भारतीय तत्त्वज्ञान याचा अभ्यास चालू आहे अजूनही संस्कृतमधून बातम्या देण्याची पद्धत त्याच्या रेडिओवर चालू आहे मला तर असे वाटू लागले आहे की, संस्कृत शिकावयाचे असेल तर बर्लिनला जावे हे बरे

डॉ होंबूल्ड वारले डॉ मोक्षमुल्लर भट्ट भूतकाळात जमा झाले; पण अजूनही तितक्याच 'मने मवाळे' कर्मयोगाचा विचार करणारा हा ऋषितुल्य तत्त्वज्ञ, भौतिक संस्कृतीच्या ऐन मध्यात पर्णकुटी बांधून राहतो आहे निर्वाणाचा, कर्मयोगाचा विचार, चिंतन करतो आहे भारताशी 'जननांतर- सौहार्द' सांगणारे त्याचे जीवन त्याच शांत रीतीने वाहते आहे व्होल्गा नदीचा प्रवाह गंगेला मिळतो आहे

• • •

२५.

# मनात कोरलेले बॉरिसचे हास्य

गेल्या आठवड्यात 'सार्क'च्या सभेसाठी काठमांडूला गेलो होतो. बऱ्याच वर्षांपूर्वी काठमांडूमध्ये ज्या वेळी मी प्रथम गेलो त्या वेळी तेथे अचानकपणे माझी एका रशियन माणसाशी गाठ पडली होती. त्या वेळी 'रॉयल पॅलेस' नावाचे हॉटेल आणि 'याक आणि यति' नावाचा एक बार हा गृहस्थ चालवीत होता. मनसोक्त गप्पा मारणारा, रंगीबेरंगी आठवणीत बुडवून टाकणारा आणि जगाचा लोकविलक्षण अनुभव घेतलेला, खळखळून हसणारा आणि हसवणारा हा माणूस. अलीकडे हॅरॉल्ड स्टीफन्स नावाच्या एका लेखकाने 'आशियातील व्यक्तिचित्रे' (एशियन पोर्ट्रेटस्) नावाचे सुंदर पुस्तक प्रसिद्ध केले आहे. त्यामध्ये मला माहीत असलेल्या अनेक आशियाई मित्रांची व्यक्तिचित्रे आहेत. स्वाभाविकच या वेळी काठमांडूला जाताना माझ्या मनात होते की 'बॉरिस' या गप्पिष्ट रशियन मित्राची जमली तर गाठ घ्यावी. बॉरिस मला प्रथम भेटला तो १९६८-७० मध्ये. आमचे मित्र श्री. चंद्रबीर गुरुंग यांनी त्याची ओळख करून दिली. प्रथम जेव्हा बॉरिस मला भेटला तेव्हाचे त्याचे दर्शनी चित्र आजही मनापुढे स्पष्ट आहे. साधारण मध्यम उंचीचा, डमरूसारखा जाडजूड पण त्याच्या आकाराच्या मनाने बारीक पाय असणारा हा माणूस जवळजवळ गोलाकार होता. भरगच्च जाड भिवया आणि शाळेतल्या मुलासारखी खळखळून हसायची सवय. इंग्रजी बोलू लागला म्हणजे त्याच्या जड उच्चारावरून समजे की हा रशियन असावा. गप्पा मारता मारता तो सहजपणाने एका

कालखडातून दुसऱ्या कालखडात झेप घेई झारच्या वैभवशाली जमान्यातल्या आठवणी, ब्रिटिश वसाहतवादाच्या काळातले कलकत्ता, पहिले महायुद्ध, रशियन ज्यूची ससेहोलपट, बदलणारा नेपाळ, राणा वश विरुद्ध राजवश अशी सत्तास्पर्धा, भारताचे स्वातंत्र्ययुद्ध, पडित नेहरू याची भेट रात्र सपत असे पण गप्पाचा ओघ अखड चालत राही एका सध्याकाळी तो सहज म्हणाला की, ''तुम्हाला कल्पना येणार नाही पण मी बॅले नर्तक आहे '' त्याच्या आकाराकडे पाहता मला स्वाभाविकपणे वाटले की बॉरिस माझी थट्टा करतो आहे पण नतर त्याच्या घरी गेल्यावर त्याने आपल्या 'बॅले' नृत्यपथकाचे फोटो दाखविले तेव्हा माझा विश्वास बसला मित्रमडळी जमली म्हणजे बॉरिसच्या बोलण्याचा प्रमुख विषय असे त्याचे विलक्षण अनुभव – तो कथाकथनात अगदी पटाईत होता तो बोलू लागला म्हणजे सगळ्याना अगदी खिळवून ठेवत असे रशियन क्रातीच्या आधी हा नृत्याचे शिक्षण घेत होता

त्याचे मूळ नाव 'बॉरिस लिसामेव्हीच' काळ्या समुद्रापाशी एका छोट्या खेड्यात याचा जन्म झाला लहानपणीच तो रशियन लष्करामध्ये शिक्षणासाठी दाखल झाला परतु रशियन राज्यक्रातीमुळे त्याचे शिक्षण पुरे झालेच नाही राज्यक्रातीमध्ये 'झार', त्याची राणी आणि मुले याचा खून झाला आणि पाठोपाठ क्रातिकारकाचा सारा रागरोष रशियामधल्या ज्यू किवा ज्याना 'व्हाईट रशियन' म्हणतात त्याच्याकडे वळला याचा परिणाम म्हणून श्वेत रशियन लोकाच्या झुडीच्या झुडी रशियाबाहेर पडल्या जगभर स्थलातरित झाल्या यातली अनेक मडळी राज्यक्रातीला अनुकूल नव्हती बॉरिसचे कुटुब राज्यक्रातीच्या बाजूने होते पण क्रातीच्या वादळात विचारणार कोण ? केवळ ज्यू जातीत त्याचा जन्म झाला हाच अपराध यातले पुष्कळ लोक चीनमध्ये मगोलियात गेले, पण तिथेसुद्धा त्याचा छळवाद झाला पाठलाग चालूच राहिला चीनवर जपानने हल्ला केल्यानतर त्यानी या श्वेत रशियन माणसाना हाकलून दिले या लोकाच्यापैकी काही सैनिक होते, काही इंजिनिअर्स होते, काही उद्योगधंदे चालवीत असत या सगळ्याच्या मनापुढे आठवणी होत्या त्या 'झार'च्या काळातील रशियन वैभवाच्या झुबरे लटकविलेल्या आणि सोन्याने मढवलेल्या महालामधल्या मोठ्या मेजवान्या शेकडो नर्तक असलेला बॅले, आणि ऑपेरा, व्होडका आणि कॅव्हिए ही माणसे चैनीचे आयुष्य आठवत आणि येणाऱ्या - जाणाऱ्याला रगवून सागत पण ते दिवस पुन्हा कधीही

परत येणार नाहीत याची एक खिन्न छटा त्याच्या बोलण्यात दिसे रशियातल्या पाढऱ्या हिवाळ्यासारखा खिन्नपणाचा, गतवैभवाच्या विमनस्क करणाऱ्या आठवणींचा एक गोठलेला बर्फाचा थर त्याच्या सभाषणावर असे एका अर्थाने बॉरिस थोडासा भाग्यवान, कारण ' बॅले रूस' या कपनीमध्ये तो नर्तक असल्यामुळे त्याला रशिया सोडावे लागले नाही त्याची कपनी पॅरिस, रोम, माद्रिद असे फिरत फिरत मॉन्टे कॉर्लो येथे स्थिरावली होती नृत्याच्या तालमी पाहायला युरोपमधले प्रख्यात लेखक, चित्रकार येत असत पुढे जागतिक कीर्ती मिळवलेले चित्रकार पिकासो तिथे येऊन रेखाचित्रे करत असे बॉरिस म्हणाला,'त्याने टाकून दिलेली रेखाचित्रे जरी मी जमा केली असती तर आज मी फार श्रीमान झालो असतो '

या सुमाराला कपनीचा मालक वारला आणि धडपड करत ही कपनी शाघायला गेली तिथेच बॉरिसचे आणि आशियाचे प्रेम जमले याच सुमाराला 'इगर' नावाच्या अशाच धडपडणाऱ्या युवतीवर त्याचे प्रेम बसले आणि त्यानी लग्न केले ज्या रशियन पासपोर्टवर बॉरिस फिरत असे ते रशियातले राज्य केव्हाच गेले त्यामुळे त्याला दुसऱ्या कुठल्या तरी देशाचे नागरिकत्व मिळाल्याशिवाय देशविदेश फिरणे कठीण होते, म्हणून त्याने ब्रिटिश नागरिकत्व पत्करले, आणि दुसऱ्या महायुद्धापूर्वी तो कलकत्त्याला आला बॅले नर्तकाचा धदा मागेच मपला होता लडनमध्ये 'क्लब चारशे' नावाचा मोठा क्लब आहे मग कलकत्ता येथे 'क्लब तीनशे' का असू नये? बॉरिसने क्लब काढला नर्तकाचा धदा सोडून क्लब काढल्यामुळे तो लठ्ठ झाला की लठ्ठ झाल्यामुळे त्याने नर्तकाचा धदा सोडला हे सागणे कठीण कलकत्त्याच्या बाहेर त्याने बीअर गाळण्याचा कारखाना सुरू केला याच सुमाराला नेपाळचे राजे त्रिभुवन याच्याशी बॉरिसची मैत्री जमली

नेपाळमध्ये हॉटेल काढावे, पर्यटकाना आकर्षित करावे ही कल्पना बॉरिसची नेपाळचे राजे त्रिभुवन याना ही कल्पनाच पटत नव्हती ते म्हणायचे की "आमचे महामत्री पर्यटनासाठी कलकत्त्याला जातात, तिथल्या बाजारात नव्या नव्या वस्तू घेतात आणि नेपाळला परत येतात पर्यटकानी नेपाळला यावे असे येथे काय आहे? नेपाळला कोण येणार? येथे काय बघणार?" परतु बॉरिसने राजे त्रिभुवन याना पटविले नेपाळच्या राजानी तेथे असलेल्या 'राणा' घराण्याचा एक राजवाडा त्याला दिला आणि सागितले की "इथे तू हॉटेल काढ" आणि नेपाळला पहिले हॉटेल 'रॉयल पॅलेस' सुरू झाले. या काळात म्हणजे १९५६ साली सबध नेपाळमध्ये बारा

मोटारी होत्या आणि वर्षाला फक्त सात पर्यटक आलेले होते रस्ता नसल्यामुळे माणसाना खुर्चीच्या पालखीतच बसून काठमाडूला यावे लागे हळूहळू हे हॉटेल प्रसिद्ध झाले आणि या 'रॉयल पॅलेस' हॉटेलमध्ये 'याक आणि यति' नावाचा बार सुरू झाला

पर्यटकाच्या दृष्टीने नेपाळात बघायला काय आहे हा प्रश्न मला जरासा विचित्र वाटला ते निळे खोल आभाळ, पाढरी त्रिकोणी शिखरे, त्यामागे दिसणारी चद्रकोर पाहिल्यावर ज्याच्या मनाचा गाभारा भक्तिभावाने भरणार नाही, ज्याला त्या चद्रमौळीश्वराचे स्मरण होणार नाही तो नेपाळला जाऊन फक्त 'कॅसिनो' शिवाय पाहणार तरी काय? जो अग्निकुडासारखा तृतीय नेत्र वागवतो, गगेला जटाजुटात गुतवतो, जो सहाराचे विक्राळ ताडव करतो आणि सतीच्या प्रेमाच्या नाजूक धाग्यात अत करण हरवतो, तो अर्धनारीनटेश्वर, तो रुद्र, तो भूतनाथ, पशुपती, त्याचा निवास याहून सुदर दुसरे काय असू शकणार! त्याच्या भावभक्तीत गुतून नेपाळी शिल्पकारानी लाकडावर कोरलेली नक्षी, प्राणी, फुले आणि शकराचा शृगार– सारेच विलक्षण आहे देवळाची दारे, मखरे गच्चीच्या जाळ्या, मेघडबरी शिसवी लाकडाला मेणाहून मऊ केल्यासारखी ती नक्षीकारी डोळ्याचे पारणे फेडते भगवान शकराचा शृगार– तो क्षुद्र दुर्बळाचा नाही, हे त्या कोरीव मूर्तीच्या सामर्थ्यातूनही दिसते शकराचा नदी आणि साधा बैल याच्या उभे राहण्याचा शैलीवरूनही त्याच्यामधला फरक या कातीव कामात स्पष्ट होतो हनुमान, गौरी, साऱ्या मूर्ती फार देखण्या आहेत डोंगर काय, शिल्प काय, सामर्थ्य आणि सौंदर्य एकात्म कसे होते याचेच निदर्शक आहे

याच सुमाराला बॉरिसच्या आयुष्यात दुसरी मोठी आपत्ती आली नेपाळचे राजे त्रिभुवन याचे स्वित्झर्लंडमध्ये निधन झाले नव्या राजवटीत एकाएकी बॉरिसच्या हॉटेलवर छापा घालण्यात आला आणि नव्या नेपाळी सरकारने त्याच्याकडून पावणेदोन लाख रुपये दड घ्यायचे ठरवले सरकारच्या दृष्टीने सरकारी इमारत वापरल्याचे ते भाडे होते त्याला प्रथम पोलिस मुख्यालयात अटक करून ठेवण्यात आले पण नतर एका छोटचा घरात कैद करून ठेवण्यात आले या कैदेतले गमतीचे अनुभवही तो सागतो हळूहळू या अटकेची तीव्रता कमी झाली. तुरुगातसुद्धा त्याने आपला वाढदिवस मोठ्या थाटाने साजरा केला आणि त्याची पत्नी इगर हिने एक छानसे जेवणही दिले "त्या जेवणाला काही सरकारी अधिकारीसुद्धा हजर होते"

बॉरिस डोळे मिचकावून सागत होता पर्यटन वाढवावयाचे असेल तर नेपाळमध्ये असलेल्या जुन्या कलावस्तू बाहेर न्यायला बदी करावी, असे बॉरिस याने सुचविले होते परतु नेपाळी कलावस्तूच्या आवडीचा गैरफायदा घेऊन बॉरिसने घरी जमविलेल्या वस्तू या त्याने अनधिकृतरीत्या घेतल्या असाही आरोप त्याच्यावर करण्यात आला त्यानतर सरकारच्या ध्यानात आपली चूक आली आणि बॉरिसला पुन्हा हॉटेल चालविण्यास देण्यात आले या हॉटेलमध्ये जगामधले अनेक श्रेष्ठ आणि ज्येष्ठ, राजेमहाराजे, राजकारणी लोक येऊन राहून गेले होते बॉरिसला त्याचे आदरातिथ्य करण्यात विलक्षण आनद होत असे अनेक नट, नट्या, राष्ट्राधिपती याचे स्वागत करायचा योग बॉरिसच्या कुडलीत असावा पण त्याला सगळ्यात आवडलेले पाहुणे म्हणजे एडमड हिलेरी आणि शेरपा तेनसिग हॉटेलच्या हिरवळीवर तबू ठोकूनच ते राहिले होते बॉरिसच्या घरामध्ये त्याने नानातऱ्हेची चित्रे, अनेक तऱ्हेची झुबरे, गालिचे आणि फर्निचर जमविले होते पण त्याचा खरा शौक काष्ठशिल्पे जमवण्याचा बॉरिसला दहा वर्षापूर्वी भेटलो त्या वेळेला बॉरिसची बायको इगर वारली होती आता हॉटेल चालवायला होत नाही म्हणून त्याने हॉटेलही सोडले होते परतु मनसोक्त गप्पा मारणे, खळखळून हसणे, जुन्या रशियाच्या गोष्टी सागणे यात काहीही कमी झालेले नव्हते रॉयल पॅलेस हॉटेल सोडल्यानतर त्याने स्वत चे 'याक आणि यति' नावाचे हॉटेल सुरू केले

प्रचड उच, कोरीव लाकडी नक्षीकाम केलेल्या आपल्या खोलीत बसून फायरप्लेस किंवा शेकोटीभोवती मस्त गप्पा करायचा शौक चालूच होता कलकत्त्याच्या क्लबात अमेरिकन खलाशी आले की दारू पिऊन दगा करत त्याना धाक दाखवण्याकरता बॉरिसने एका अवाढव्य पठाणाला नेमले होते मनाने शेळी असणाऱ्या एखाद्या अगडबब माणसाचे नाव वाघ असावे, असा हा पठाण होता एकदा अमेरिकन खलाशी दगा करणार असे वाटले तेव्हा बॉरिसने पठाणाला सागितले की, या खलाश्याना सही करायला अतिथि-पुस्तक दाखव, पण त्या पठाणाचा आकारउकार पाहिल्यावर त्या खलाश्याना पळता भुई थोडी झाली पण मनात मात्र तो पठाण रखवालदार कसा भ्यायला होता, प्रचड विजारीच्या आत त्याचे पाय कसे कापत होते याचे वर्णन बॉरिसनेच करावे पिकासोच्या चित्रात काय असते आणि काय नसते याचे वर्णन बॉरिसच करू जाणे खाणे, खिलवणे, गप्पात रगणे रगवणे त्याच्या बैठकीत एकदा जरी सामील झाले तरीही तो अविस्मरणीय अनुभव

ठरतो

नेपाळला जाताना मनात येत होते बॉरिस आता ऐंशी वर्षांचा झाला असेल पण तेथे गेल्यावर कळले की 'याक आणि यति' या नावाचे हॉटेल आता दुसरे लोक चालवितात बॉरिसची बायको वारली त्याचा एकुलता एक मुलगा काठमाडूमध्ये आहे पण निश्चित काय काम करतो हे कोणालाच माहीत नाही जुन्या गप्पिष्ट माणसाची एक आठवण म्हणून मी 'याक आणि यति'मध्ये जाऊन आलो पण तिथे ऐकले की बॉरिस वारल्यालाही आता दोन - तीन वर्षे झाली आता पुन्हा कधीही त्या गप्पा, ते हसणे ऐकायला मिळणार नाही काठमाडूच्या मस्त संध्याकाळी बॉरिस असणार नाही

• • •

भाग सातवा

# वास्तू

२६.

# जगावेगळे असेल सुंदर

मार्क ट्वेन हा माझा आवडता लेखक चपखळ, चुरचुरीत, विनोदी लिहाव तर त्यानीच ! मागे एकदा टेक्सासला गेलो असताना मार्क ट्वेन तेथे राहून गेल्याची साक्ष पाहिली होती आणि आता कनेक्टिकट राज्यात आल्यानतर काय पाहायच याविषयी माझ्या मनात शका नव्हती त्यामुळे डॉ सुरेश धुमाळे यानी गाडी काढताच आम्ही चक्क मार्क ट्वेनच्या घरापाशी येऊन दाखल झालो आम्ही गेलो त्या वेळी पतझड सपून झाडाना कोवळ्या पानाचा रगीबेरगी साज मिळालेला होता गर्द झाडामध्ये हे घर वसले आहे लपले आहे अस म्हणत नाही, कारण निळसर दुपट्ट्यातून एखाद्या नवजात बाळान टकटका पाहाव तस हे घर झाडातून दिसतच राहत किरमिजी, सोनेरी, पिवळ्याजर्द पानानी झाडाचा परिसर सजला होता विटानी बाधलेले हे घर आणि विटकरी रगाच्या भितीवर काढलेली पाढऱ्या रगाने आदिवासी तऱ्हेची नक्षी त्यामुळे घराची गोल वळणे पाहताना एखाद्या पुष्ट गौरागीच्या दडात किनखापी चोळी रुतावी अस दिसत होत

मार्क ट्वेन याचे मूळचे नाव सॅम्युअल क्लिमेन्स त्याने ही जागा १८७३ मध्ये घेतली त्या परिसराच्या व निसर्गाच्या इतक्या प्रेमात तो पडला की, ही जागा घेण्यावाचून आपल्याला गत्यतरच नाही असे एके ठिकाणी त्याने लिहिले हे घर कसे बाधावे याबद्दल मार्क ट्वेनच्या काही निश्चित कल्पना होत्या. तो म्हणतो की घरातल्या कोणत्याही दोन खोल्यामध्ये काहीतरी नाते असावे लागते प्रत्येक खोली स्वतत्रपणाने उभी राहिली तर ती खोल्याची गर्दी होईल, घर होणार नाही घराला

नुसत्या भिंती असत नाहीत तर त्याला आत्मा असतो म्हणूनच न्यूयॉर्कचे शिल्पशास्त्रज्ञ एडवर्ड पॉटर याच्यावर अवलबून न राहता, त्याच्यासाठी मार्क ट्वेनने आपल्या कल्पनेप्रमाणे एक आराखडाही काढून दिला होता घरामध्ये शक्य असेल तर प्रत्येक खोलीमधून सभोवतालचा हिरवागार परिसर पाहता यावा आणि घरात राहूनच जमीन आणि आभाळाशी जास्तीत जास्त नाते राहावे अशी सूचना त्याने केली होती मार्क ट्वेनची ही कल्पना विटाच्या साहाय्याने जमिनीवर उभी करण्यात एक वर्ष गेले पण १८७४ मध्ये पैसे सपल्यामुळे घराची रगरगोटी, वॉलपेपर लावण सारच राहून गेल परतु 'टॉम सॉयरच्या धाडसाच्या कथा' हे पुस्तक बरेच खपले आणि व्याख्यानाचे दौरे यशस्वी झाल्यानतर १८८१ मध्ये मार्क ट्वेनला बरेच पैसे मिळाले त्यातून त्याच्या घराची रगरगोटी, सजावट पूर्ण झाली क्लिमेन्स कुटुबाला जगावेगळ्या सुदर घरात मनासारखे राहायला मिळाले

घराबद्दल लिहिताना मार्क ट्वेनने लिहिले आहे, "घरातल्या आम्हा सगळ्याना घर ही एक भावनाशून्य पार्थिव गोष्ट आहे, असे वाटतच नाही आमच्या घराला काळीज आहे, आत्मा आहे अहो, इतकच काय, तर आमच्या वागण्याला हे घर केव्हा समती देत तर केव्हा कारे बाबा असा वागतोस ? अस विचारत कधी उदास झालो तर या घराच्या मायेचा हात आमच्या पाठीवरून फिरतो या घराची वास्तू आणि या घराची आम्ही माणस यामध्ये एक अनुच्चारित स्नेहबध आहे या घराच्या कृपाछत्राखाली आणि या घराच्या शाततेच्या आशीर्वादात आम्ही राहात असतो मी केव्हाही घरी परत आलो आणि या घराचा चेहरा उजळला नाही अस होतच नाही या घराची दारे, खिडक्या, कमानी न बोलताच अपरपार स्वागत करतात फार काय घरातले सुवास आणि घराभोवतालचा सुगध यानी आपण नकळत लपेटले जातो या घरात पाऊल टाकताच या घराच्या मायेचाचा उबदार स्पर्श जाणवल्यावाचून राहात नाही "

या घराचे जे शिल्पी होते त्यानी साध्या विटाची काय सुदर नखरेल रचना केलेली आहे घराचे कोपरे, पुढे आलेल्या विटाची नक्षी आणि दोन विटात रिकाम्या जागेचे अतर ठेवून केलेला काळ्या रगाचा आभास वाखाणण्यासारखा आहे विटाच्या बरोबरीने या घरात लाकडाचा वापर केला आहे घराभोवती चौफेर असलेल्या व्हराड्याला फुलपाखराची नक्षी असलेले कठडे आहेत, तर तुळ्याना आधार देण्याकरिता दोन्ही पाकळ्याचे हात उचावणाऱ्या कमळासारख्या खाबाचे आधार आहेत घरात आणि घराच्या भोवती हिरवीगार झाडे, वेली सोडलेल्या

आहेत कोपऱ्याला असणाऱ्या उच उभ्या खिडक्या याचा आकार साधून त्याचे जणू तटबदी असणारे मनोरे रचले आहेत अगदी वरच्या मजल्यावर पाऊस, ऊन येणार नाही पण निसर्ग तर हाताजवळ राहील अशा बेताने गच्ची केलेली आहे घरात शिरल की पहिल्याच खोलीमध्ये लाल आणि निळ्या रगात अमेरिकन - इडियन लोकाच्या कपड्यावरची ठळक नक्षी भितीवरती काढलेली आहे विटकरी रगाच्या पार्श्वभूमीवर चदेरी रगाची ही नक्षी फार सुरेख दिसते मार्क ट्वेन हा सगळ्या जगभर फिरत राहणारा सौंदर्यवेडा प्रवासी लेखक होता त्यामुळे जगाच्या ज्या ज्या भागात जे जे सुदर दिसले, त्या त्या वस्तूने, रगाने त्याच्या घराची शोभा वाढवली आहे मार्क ट्वेन हा भारतही आला होता मुबईच्या 'ताजमहाल' हॉटेलमध्ये राहिला होता गुजरात, मध्य प्रदेशात हिंडला होता दिवाणखान्यात बाधलेली फायर प्लेस किंवा हिवाळी शेगडी याच्यावर गुजरातमधील लाकडी नक्षी आहे पाहुण्याची खोली, बैठकीची खोली, जेवणघर प्रत्येक खोलीला स्वत-चे असे व्यक्तिमत्त्व आहे प्रत्येक खोलीचा वॉलपेपर, त्या खोलीतले फर्निचर आणि दिवे याच्या रगसगतीबाबत मार्क ट्वेनने खूप विचार केला त्यामुळे जेवणघरामध्ये चिनी पद्धतीची प्रतीकात्मक नक्षी आणि खाली लाल, निळ्या रगीत फरश्या बसवलेल्या आहेत

पण मला आवडली ती त्याच्या घरातली लायब्ररी आपल्या लायब्ररीबद्दल मार्क ट्वेन म्हणतो, ''युरोपमध्ये पाहिलेल्या घराची आतली सजावट मला फार भडक, बेचव किवा खर म्हणाल तर गचाळ वाटते त्यामुळे माझ्या घरात तळमजल्यावर लायब्ररी बाधताना मला असे वाटे ही खोली अशी असावी की इथे सहजपणाने बसून वेगवेगळ्या लेखकाशी, वेगवेगळ्या पुस्तकाशी सुखसवाद करता यावा खाली बसाव, खिडकीपाशी उभे राहाव, जरास लवडाव पण तुम्ही आणि तुमच्या हातातले ग्रथ यात मध्ये कोणाचा अडसर नसावा आपण चार मित्र गप्पा मारायला लागलो म्हणजे जरा वेळ एकाशी बोलतो मग दुसऱ्याशी कधी काही न बोलता मौन धरून आतल्या आत मनाचा भोवरा फिरवत राहतो सारा एक सुसवादी प्रवाह असतो तसच पुस्तकाचेही आहे या लायब्ररीमध्ये अशीच एक स्वप्नील रगसगती आणि स्नेहसगीत आहे इथे आहे शाती, नि शब्दता आणि जीवनातील खरीखुरी तृप्ती या लायब्ररीमध्ये फायर प्लेसवरचे कपाट मार्क ट्वेनने स्कॉटलडहून आणले जुन्या ऐतिहासिक घरातले हे कपाट आणि त्यावरचे पालीचे प्रतीक मार्क ट्वेनला फार आवडत असे

मुख्य दिवाणखान्यातून वरच्या मजल्यावर जाण्याकरिता जो जिना होता, त्याचा

रग बदलत हळूहळू वरच्या मजल्याच्या रगात मिसळून जातो मार्क ट्वेनने आपली सासू आणि आपण पति - पत्नींच्या झोपण्याच्या खोल्या अशा बनवून घेतल्या आहेत की तो म्हणे, 'या गादीवर झोपणाऱ्याला स्वप्नाची वाट पाहावी लागत नाही तुम्हाला नकळत आपले बोट धरून स्वप्ने आपल्याला त्याच्या रगीत राज्यात घेऊन जातात ' मुलाकरिता त्याने जी खोली बाधली, त्यात इस्रायलमधल्या खिडकीची प्रतिकृती आहे भारतातून नेलेले पामच्या पानाचे मोठे ताडपत्री पखे त्याने भितीवर लावून ठेवलेले आहेत त्याची मुले 'नाटक - नाटक' खेळताना भारतातील अनेक वस्तूचा उपयोग करीत असत धराभोवतालच्या व्हराड्यास मार्क ट्वेन उबरा म्हणतो हा ओंबरा किंवा उबरा हा शब्द कसा आला मला माहीत नाही, पण हा व्हराडा म्हणजे त्यावरच्या रगीत फुलवेलीमुळे, भोवतालच्या रम्य परिसराने, हात पसरून त्या घराला कवेत घेतल्यासारखेच वाटते एकदरीत एकदा हे घर पाहिले की, ते आपल्या मनात कायम घर करून राहत हे खर

मार्क ट्वेनच्या घरात चोराच्यासाठी एक नोटिस त्यान दारावर लावली आहे ती अशी 'या घरात आज आणि सदैव केवळ मुलामा दिलेली भाडी आहेत जेवणघरात कोपऱ्यातल्या टोपलीत माजराची पिल्ले आहेत त्यावरच्या फळीवर ही सगळी भाडी तुम्हाला मिळतील भाडी चोरताना माजरीच्या पिल्लाची झोपमोड करू नका ही पिल्ले ज्यास्त आहेत ती टोपलीच तुम्हाला हवी असेल तर ही पिल्ले पितळी भाड्यात काढून ठेवा कृपा करून घरात चोरी करताना आवाज करू नका कारण त्याने आमची झोप चाळवते ओसरीवर जिथे आपण टोप्या आणि छत्र्या ठेवतो तिथे माझे रबराचे बूट आहेत ते घातलेत तर तुमचा पायाचा आवाज होणार नाही. ज्या वेळी तुम्ही चोरी करून परत जाल त्या वेळेला जाताना कृपा करून दार मात्र लोटून घ्या '

या घरात जो कुणी चोरी करायला येईल त्याचे अत करण मात्र चोरीला जाण्याची खात्री मी देतो

आपला,

सॅम्युअल क्लिमेन्स

• • •

२७.

# अल्हम्ब्राचा राजवाडा

युरोपीय सस्कृतीचे माहेरघर स्पेनमध्ये आहे असे म्हटले तर चुकीचे होणार नाही कारण या देशाने युरोपीय सस्कृतीमधले सर्व महत्त्वाचे घटक सगीत, कविता, शृगार, चित्रकला, स्थापत्य, मदिरा याचा साराश करून जपलेले आहेत स्पेनमध्ये इतके बगीचे, राजवाडे, विश्वविद्यालये, वाचनालये आहेत आणि शिल्पकलेचे, चित्रकलेचे इतके अप्रतिम नमुने आहेत की, तिथे जाणाऱ्या माणसाला काय पाहू आणि काय नको असे होते जिप्सी वळणाचे फ्लॅमेंको नावाचे त्याचे नृत्य फार प्रसिद्ध आहे नाजूक सडपातळ पाय, त्यावर उच झगा, डाव्या बाजूला खाद्याच्या वर वाजवल्या जाणाऱ्या टाळ्या आणि काळ्या तग विजारी आणि लेस लावलेला शर्ट घालणारे पुरुष नर्तक याच्या बुटाच्या टपटप आवाजात आणि लाकडी करतालाच्या आवाजात नाचले जाणारे हे नृत्य तुम्हाला केव्हा धुद करून गेले हे लक्षातही येत नाही

स्पेनमध्ये घोड्याच्या शर्यती, शिकारी आणि त्यापेक्षाही म्हणजे मस्त बैलाबरोबर होणारी मेतादोरची झुज हा विलक्षण थरारक अनुभव आहे एका प्रचड मैदानाभोवती हजारो प्रेक्षक बसतात प्रथमत. सजवलेल्या घोडागाडीतून शहराचे महापौर या मैदानाला फेरी घालतात आणि त्यानतर महापौराच्या हस्ते मस्तीत असणाऱ्या बैलाबरोबर झुज घेणाऱ्या मेतादोर या नावाने सबोधल्या जाणाऱ्या या साहसी तरुणाला प्रेक्षकांपुढे सादर केले जाते. हातात लाल रगाचे एक चौकोनी फडके

घेऊन तो उभा असतो लाल रंग पाहून चवताळलेला बैल अंगावर आला म्हणजे चटदिशी वळून मेतादोर बाजूला होतो याखेरीज रिंगणामध्ये चिलखत घातलेले घोडे आणि त्यावर बसलेले घोडेस्वार असतात मेतादोरबरोबर झुंज घेऊन बैल दमला की, शेवटी त्याच्या वशिंडामध्ये उभी तलवार खुपसून बैलाला मारले जाते, अर्थात प्रत्येक वेळी बैल मरतोच असे नाही अनेकदा मेतादोरचीसुद्धा मरण्याची पाळी येते या साहसी तरुणाचे चापल्य आणि साहस हे प्रत्यक्ष पाहिल्यावाचून पटण्यासारखे नाही मदोन्मत्त बैलाशी झुंज घेणे हा पौरुषाला आव्हान देणारा एक विलक्षण सामर्थ्यशाली असा खेळ आहे अर्थात या खेळाच्या शेवटी बैल दमून पडला तरी भागण्याजोगे आहे त्याला कशासाठी मारायचे हे काही मला कळले नाही एक मात्र खरे ही झुंज बघताना सारे प्राण मुठीत घेऊन आपण त्या मेतादोरकडे पाहात असतो ही मेतादोर मंडळी फार उंचीपुरी असतात असेही नाही, परंतु कमावलेल्या त्यांच्या शरीरामध्ये इतकी विलक्षण चपळाई असते की, बैल अंगावर आल्यानंतर इतक्या झटकन ते भिंगरीसारखे वळतात आणि बाजूला स्तब्ध उभे राहतात की धडक मारणारा बैल आपला वेग आवरता न आल्यामुळे सुसाट वादळासारखा समोर निघून जातो मेतादोरसमोर उभा असलेला बैल हेही एक बघण्यासारखे दृश्य असते पुढील पाय किंचित तिरके करून मान खाली करून, शिंगे वर करून डोळ्यातून आग फेकत, खुराने माती उकरत, डरकाळी फोडत हा बैल जेव्हा हल्ला करायला उभा होतो तेव्हा प्रत्यक्ष काळ आपला घास घ्यायला उभा आहे असे त्या मेतादोरास काय, त्या बैलाच्या डोळ्यात पाहणाऱ्या साऱ्याच प्रेक्षकांना वाटत असते लाल चौकोन पाहून बिथरलेला तो मदोन्मत्त महानंदी विजेच्या वेगाने त्या मेतादोरच्या शरीरात धारदार शिंगे खुपसायला धावतो, प्रेक्षकातले हळवे डोळे घट्ट मिटतात एक क्षण, पण जीवघेणा तो मेतादोर सर्रकन वळतो बैलाला वेग आवरत नाही तो पुढेच जात राहतो जीवन आणि मरणाचा हा लपंडाव फार थरारक आहे शेवटी मात्र बैलाच्या खांद्यावर तलवार उभीच्या उभी खुपसली गेली की बैल तसाच हेलपाटे खात खाली पडतो हे दृश्य मात्र आपल्याला पाहवत नाही

## अल्हम्ब्राचा राजवाडा

पण स्पेनमध्ये बैलाच्या झुंजीइतकेच अधिक प्रेक्षणीय काही असेल तर तिथले जुने राजवाडे, जुनी चित्रे आणि कलाकौशल्याच्या वस्तू साठविलेली

सग्रहालये स्पेनच्या दक्षिणेला ग्रॅनडा नावाचे शहर आहे या शहरामध्ये अलहम्ब्राचा राजवाडा आहे अतिशय सुदर अशी या राजवाड्याची ख्याती असल्यामुळे हा राजवाडा मी बघायला गेलो या राजवाड्याभोवती असणारी तटबदी इतकी बुलद आणि प्रत्येक तटावरून निघालेले मनोरे इतके उच, की कुठल्याही हल्ल्याला तोंड देण्याची त्या दगडी भितीची तयारी असावी असे वाटते केवळ शत्रूलाच नव्हे तर कित्येक शतके सर्वनाशी काळालाही टक्कर देऊन काळ्या पाषाणाचे बाधलेले हे तट अजूनही तसेच उभे आहेत प्रत्यक्ष तटावर बदुका आणि तोफा ठेवून मारगिरी करण्याची सोय आहे परतु सत्तेचे आणि शक्तीचे प्रतीक असलेल्या या तटबदीच्या आत मात्र जो राजवाडा आहे त्याचे शिल्प इतके नाजूक, त्या दगडावरची कलमकारी इतकी बुट्टीदार आहे की, शिल्पकाराने दगडाचेही मेण करून हे शिल्प केले असावे असे वाटते दरवाजे, छते आणि खाब याच्यावर केलेली नक्षीकारी अप्रतिम आहे दगड, कौले आणि लाकूड वापरून हा राजवाडा उभा केला आहे तसे पाहिले तर हा अतिशय साधा माल आहे यामधून एक प्रचड शिल्पनगरी उभी करावयाचे काम या स्थापत्य शास्त्रज्ञाने कसे केले असेल हेच कळत नाही अलहम्ब्राचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या राजवाड्याची शोभा तिथे असलेले विशाल चौक, त्यातली कारजी, सुगधी फुले आणि प्रचड पुष्पवाटिका यानी वाढवलेली आहे राजवाड्याच्या प्रागणात मजूळ आवाज करत स्वच्छ पाण्याने वाहणारा झरा आहे आणि त्याच्या काठावर झाडाच्या खाली ठेवलेली एक ओबडधोबड शिला आहे इथे बसून साऱ्या राजवाड्याचे विहगम दृश्य बघता येते हा विरोधाभासाचा विचार ज्या शिल्पकाराने केला असेल तो खरोखरच फार कल्पक असला पाहिजे कारण गार्डन अर्किटेक्चर ही विसाव्या शतकात वाढलेली कला असे आपण मानतो पण अलहम्ब्राच्या राजवाड्यामध्ये या कलेचा परमोत्कर्ष झाला आहे असे वाटते नवव्या शतकाच्या सुमाराला अरब आणि स्थानिक लोक याच्यात याच जागी युद्ध झाले अकरा आणि तेराव्या शतकाच्या काळात आफ्रिकेमधून आलेल्या हल्लेखोराच्या स्वाऱ्यानी या जागी प्रचड लढाया करून आपले राज्य स्थापन केले अनेक शतके या ठिकाणी लढाया होत असल्याने नगररचना व्हायची, पुन्हा तोडली जायची असे घडत गेले परतु प्रत्येक वेळेला नवीन बाधताना नवीन सस्कृतीच्या कलाकुसरीची भर पडत गेल्याने अलहम्ब्रा राजवाड्यात भग्न अवशेषापेक्षा मिश्र शिल्पकलेचे समेलन असावे, अशीच अवस्था आहे

## ख्रिस्ती आणि इस्लामी सस्कृती

यापैकी जो मुख्य राजवाडा, तो युसूफ नावाच्या अरब राजाने बाधलेला असावा असे म्हणतात अरबाच्या आणि मूर लोकाच्या बरोबर स्पेनमध्ये इस्लाम धर्म आला आणि आजही स्पेनमध्ये इस्लाम धर्मीयाची सख्या पुष्कळ आहे तटबदीचे जे अनेक दरवाजे आहेत त्यापैकी मदिरा बेटाकडे तोंड केलेल्या एका दरवाज्याचे नाव 'मदिराद्वार' असे आहे या दरवाज्यातून आत गेले की, फरसबदी असलेला मोठा रस्ता लागतो या रस्त्यावरून थोडे पुढे गेले की, दोन मिनाराच्या मधोमध, लाबवर नजर ठेवता येईल अशी गच्ची बाधून तिथे चौकी ठेवण्यात आली आहे याच्याच पलीकडे दुसरे महाद्वार आहे यामध्ये घोड्याच्या नालाच्या आकाराची कमान विटानी बाधलेली आहे त्याच्या मध्यबिदूवर देवी फातिमाच्या हाताचे चित्र कोरलेले आहे दुसऱ्या दरवाज्यावर किल्लीचे चित्र कोरलेले आहे गर्द हिरव्या निळ्या आणि पिवळ्या चकचकीत फरश्या लावून या सर्व कमानींची शोभा वाढविलेली आहे फातिमाचा हात आणि दोन किल्ल्या या चिन्हाना एक गूढ असा अर्थ आहे, रक्षण आणि समृद्धी याची ती चिन्हे आहेत आपल्याकडे अभयहस्त असतो तसेच हे चिन्ह आहे दोन्ही दरवाज्यामध्ये एका कोनाड्यामध्ये माता माऊली आणि ख्रिस्ताचीही मूर्ती आहे ख्रिस्ती सस्कृती आणि इस्लाम सस्कृती याचे एक मनोहर मिश्रण या स्थापत्यात झालेले दिसते नेपोलियन येथे स्वारीवर आला असताना त्याने तोफ लावून उरलेले दोन दरवाजे उडवून दिले आणि आजही ते दोन्ही दरवाजे भग्न अवशेष म्हणून तसेच ठेवण्यात आलेले आहेत कुठे रोमन खाब, कुठे फ्रेंच कमानी, कुठे अरबी नक्षीकाम तर कुठे इटालियन मूर्ती स्पॅनिश लोकानी या भिन्न सस्कृतींचे अवशेष दाखविणारे भाग जसेच्या तसे ठेवून चित्र, शिल्प आणि स्थापत्यशास्त्राच्या अभ्यासकाची आणि रसिकाची फार मोठी सोय करून ठेवलेली आहे मुस्लिम भागामध्ये निळ्या, हिरव्या आणि पिवळ्या रगात केलेली नक्षी इतकी बारीक आहे, तितक्याच स्पॅनिश कमानी भव्य आहेत ख्रिस्ती भागामध्ये उच घुमट, भोवती निळ्या ताबड्या रगीत काचाच्या प्रचड खिडक्या आहेत या दोन्ही भागाच्या मधोमध एक पाण्याचे तळे आहे हे पाणी इतके स्तब्ध आहे की, आभाळाने आणि नक्षत्रानी आपला चेहरा पाहायला जमिनीवर आरसा ठेवलेला आहे, असे वाटते

राजवाड्यातील छत आणि सिहासनावरची मेघडबरी तितकीच सुदर आहे

भोवती असलेल्या कमानीवर कमलफुलाची नक्षी असून त्याखाली नाजूक लाकडी जाळ्या आहेत सिंहासनामागच्या खिडक्यातून पाठीमागे दिसणारी बुलद दगडाची तटबदी दिसते एकाच वेळी वेगवेगळे सगीत, मद स्वरात एकदम ऐकायला मिळाले म्हणजे गोंगाट न होता उलट स्वरसगीताचा एक अद्भुत कल्लोळ निर्माण झाल्यासारखे वाटते तसाच अलहम्ब्रामध्ये दृष्टिसौंदर्याचा एक कल्लोळ निर्माण होतो राजवाड्यामध्ये जी स्नानगृहे आहेत ती रोमन पद्धतीची आहेत प्रचड मोठ्या खोलीमध्ये मधोमध कारजी, भोवती पाषाणाच्या बैठका, चारही बाजूला मोठे हौद आणि पलीकडे नाजूक जाळ्या लावलेल्या कपडे बदलण्यासाठी लावलेल्या ओवऱ्या आहेत यात दिवसा सूर्यप्रकाश आत येत नाही पण उजेड मात्र भरपूर असतो रात्री नाजूक जाळीकामाच्या मागे दिवे असल्याने ठिपक्या ठिपक्याचा प्रकाश रात्री झिरपतो स्नानगृहातली ही अप्रत्यक्ष प्रकाशयोजना त्या स्थापत्यकाराच्या सौंदर्यदृष्टीची साक्ष देते

## सगीतनृत्याचा उत्सव

मुख्य सिहासनाच्या समोर मुख्य चौकात नागरिकानी बसायची उतरती माडणी आणि प्रत्येकाच्या विभागाच्या मधोमध कधी हत्ती, कधी घोडे तर कधी राजहस याच्या पाषाणमूर्तींनी पाठीवर घेतलेली कारजी आहेत खूप उच असलेल्या छतावर केलेली सोनेरी रगाची नक्षी, घुमटामध्ये लोंबत असलेली प्रचड झुबरे असा हा दरबार वेगवेगळ्या राजानी वापरला चौथ्या किवा पाचव्या चार्लसने या राजवाड्यात मुक्काम केला त्या वेळी त्याने ख्रिस्ती पद्धतीच्या मूर्ती तेथे बसविल्या अरबी तऱ्हेची कारजी, स्पॅनिश तऱ्हेचे बगीचे आणि युरोपातील नवयुगाच्या सुरुवातीला असणाऱ्या चित्रकलेची धाटणी दाखविणारी भित्तिचित्रे या साऱ्याचा सगम या दरबारात झालेला आहे प्रागणात पामची झाडे आणि पाईनची झाडे आहेत इथे जसे चर्च आहे तसेच मशिदही आहे जशी सिहासनाची जागा आहे तसे प्रार्थनास्थळही आहे इथे नाजूक मेघडबरीने नटवलेले सम्राटाचे शय्यागार जसे आहे तसे त्याच्या चिरविश्रांतीसाठी समाधिस्थानही आहे आज या राजवाड्यात जशा खूप मोठ्या प्रार्थनासभा भरतात तसे इथे सगीत समेलनही होते दरवर्षी वसतऋतूत या राजवाड्यात धार्मिक उत्सव, प्रार्थनेचे कार्यक्रम, सगीत आणि नृत्याचा महोत्सव चालू असतो. चार्लसच्या राजवाड्यात समोरच्या प्रागणात एक मोठी रगभूमी तयार केली जाते सध्याकाळी

सुरू झालेला सगीताचा महोत्सव रात्र सपली तरी सपत नाही

आम्ही सगीत महोत्सवाला गेलो तेव्हा सध्याकाळी रगीबेरगी दिसणारे झाडाचे शेंडे रात्रीच्या काळोखात नुसते कृष्णाकार दिसत होते रात्री चद्रप्रकाश नव्हता पण चादण्या होत्या सारे प्रेक्षागार त्या भव्य राजवाड्याच्या प्रागणात अधारात बसले होते प्रकाशाचा खरा झोत फक्त रगभूमीच्या मध्यभागी असणाऱ्या त्या गायकावर किवा नर्तकावर होता त्या प्रकाशझोतात व्हायोलीन घेऊन उभा राहिलेला मी एक थोर वादक पाहिला आणि ऐकला मला वाटले की त्याच्या व्हायोलीनमधून निघणारे सूर हे त्या एका व्हायोलीनमधूनच निघत नसून भोवतालच्या राजवाड्याच्या भितीतून, नक्षीतून, कारज्यातून परावर्तित होत आहेत इथे सगीताला रग, आकार आणि सुगध आलेला मी पाहिला त्या सध्याकाळी व्हायोलीनच्या पनघ व्याकुळ अत करणाच्या त्या वादकाने जे आर्त सूर ऐकवले त्याने एक चित्र मनावर उमटले माडगूळकराच्या 'कदबातळी बैसुनी शात वेळी खुळी आसवे बाळकृष्णार्थ ढाळी' – अशा विरहिणी राधेचे चित्र स्पष्ट झाले 'नसे टाळ हाती' किवा साथीला वीणा नसली तरी सोबत होता तो ''बसे शात एकात श्रोता शहाणा'' हे जाणवत होते त्या सगीत-रसिकाच्या मेळ्यात मी एकात भोगत होतो जे प्रवाही चित्र मनावर उमटले त्या चित्रात तो राजवाडा, भोवतालचा निसर्ग आणि समृद्ध दक्षिण युरोपीय सस्कृतीची परपरा एकजीव झालेली होती त्यामुळेच मी पुण्याला परत आलो तरी अल्हम्ब्राची ती सध्याकाळ मनामध्ये कायम घर करून राहिलेली आहे

• • •

२८.

# भारलेली गढी

मी कौलालपूर येथे राहात असताना एके दिवशी सध्याकाळी माझे मित्र दातो लॉरेन्स मला म्हणाले, ''एकेका माणसाला एकेका सस्कृतीचा नाद असतो त्याचा जन्म कुठेही झाला असला तरी त्या सस्कृतीत ती माणसे सहजपणाने रमून जातात '' याचे उदाहरण म्हणून त्यानी स्कॉटलडमध्ये जन्म घेतलेल्या, परतु मूर आणि इस्लामी सस्कृतीत रमून गेलेल्या एका स्कॉटिश म्हाताऱ्याची गोष्ट सागितली हा म्हातारा आणि तो राहात असलेली त्याची गढी – किल्लाच म्हणाना, याच्याभोवती भूतकाळाचे एक धूसर असे वेष्टन आहे मला त्या म्हाताऱ्याच्या कथेमध्ये इतका जिवतपणा वाटला की, आम्ही दोघानी त्या गढीला भेट देण्याचे आणि त्या म्हाताऱ्याशी गप्पा मारण्याचे ठरविले

पुढल्या रविवारी लॉरेन्सची भली दाडगी गाडी घेऊन आम्ही डोंगराकडे निघालो डोंगरकपारीला एक प्रचड, ऐतिहासिक गढी होती गढीच्या खाली एका नारळाच्या झाडाखाली प्रशस्त धोंड्यावर एक म्हातारा बसलेला होता मासे पकडायचे जाळे दुरुस्त करत कसल्या विचारात रमला होता देव जाणे लाबूनच लॉरेन्स म्हणाला, ''अरे तो बघ, गढीतला म्हातारा; साक्षात भूतकाळ जिवत झाला तर असाच दिसेल नाही?'' आमच्या अचानक येण्याने ते आजोबा जरासे दचकलेसुद्धा पण लॉरेन्सला पाहिल्यावर हातातले जाळे खाली ठेवून ते हसतमुखाने लॉरेन्सच्या स्वागताला पुढे आले त्याच्या डोक्यावर टक्कल इतके गुळगुळीत होते

की, थट्टेने आपण अडचाचे कवच डोक्यावर घातले आहे असे ते सागत होते त्यानी बारीक फ्रेंच तऱ्हेची दाढी वाढविली होती अगाने धट्टाकट्टा असणारा हा माणूस या वयातही देखणा दिसत होता चेहऱ्यावर अनेक पावसाळे, अनेक सकटे झेलल्याच्या खुणा दिसत होत्या लॉरेन्सला तो मलेशियन पद्धतीप्रमाणे म्हणाला, ''दातो (मलेशियात दातो ही आदरार्थी पदवी आहे) देवाची शाती तुला लाभो '' लॉरेन्स म्हणाला, ''आजोबा तुम्हाला भेटायला मुबईहून माझे मित्र डॉ गोखले आलेले आहेत '' आजोबा म्हणाले, ''देवाची शाती तुम्हालाही लाभो '' मी म्हणालो, ''शुकर तुमच्या या केलीच्या गढीविषयी मी लॉरेन्सकडून इतक ऐकलय की माझी उत्सुकता अनावर होऊन मी आज इकडे आलो '' आजोबा म्हणाले, ''गढीची गोष्ट ऐकण्याआधी आपण गढीवरच जाऊ या मी कपडे बदलून येतो '' लॉरेन्स मला म्हणाला, ''काय वय असेल रे याचे '' मी म्हणालो, ''साठ, जास्तीत जास्त पासष्ट '' लॉरेन्स म्हणाला, ''याचे वय ८५ वर्षांचे आहे '' ज्या चपळाईने आजोबा कपडे बदलायला गेले त्यावरून आपल वय मोजायला ते मागेच विसरले असावेत अस मला वाटल मी म्हणालो, ''आपल्या चागल्या तब्येतीच रहस्य काय?'' आजोबा सागू लागले, ''या ठिकाणी गढीच्या मागे जी विहीर आहे ती पाहा खूप खोल आहे, अधारी आहे त्यात पाहिले की तुझा - माझाच काय सगळ्या माणूस जातीचा भूतकाळ त्यात दिसेल पण अधाऱ्या विहिरीचे पाणी मात्र उजळ आहे, स्वच्छ आहे हे पाणी जो पितो त्याचे आरोग्य या भागातल्या दगडासारखे ठणठणीत राहते एक टवकासुद्धा उडायचा नाही ''

समोर दिसणारी गढी ही प्रत्यक्ष दिसते त्यापेक्षा अधिकच गूढ आहे ही गढी या भोवतालच्या डोंगरदऱ्याचा अगदी नैसर्गिक भाग असावा अशा शैलीन आणि तशाच पत्थरात बाधलेली आहे गढीच्या पायतळी लाबवर पसरलेली भाताची हिरवीगार शेत आणि मागे डोगराचा उभा कडा आहे या भागात छोटेछोटे असख्य झरे आहेत खुद्द किटा नदी दर मैलागणिक मोठी होत होत पेरेक या महानदीला जाऊन मिळते या नदीच्या काठावर ठायी ठायी इतिहासाच्या खुणा पसरलेल्या आहेत या भागात प्रथम आलेले मलेय लोक, नतर आलेले चिनी आणि त्यानतर आलेले भारतीय आणि अलीकडे आलेले इग्रज साऱ्यानी या सुदर प्रदेशात आपआपल्या सस्कृतीप्रमाणे घर बाधली आहेत, त्यामुळे वेगवेगळ्या सस्कृतींच्या गृहशिल्पाचे या दरीमध्ये एक प्रदर्शनच भरल आहे, अस म्हणायला हरकत नाही या

गढीच्या अगदी पाठीमागे इंग्रज लोकांचे एक स्मशान आहे आणि त्यामध्ये फार फार पूर्वी इथे आलेले चहाचे मळेवाले किंवा कंपनी सरकारचे इंग्रज अधिकारी चिरनिद्रा घेत आहेत पुष्कळदा या भागाला छोटे इंग्लंड असेही म्हटले जाते इथल्या स्थानिक रहिवाश्यांना मात्र या स्मशानाची आणि त्यातील फिरंगी साहेबाच्या कधीमधी दिसणाऱ्या 'भुता'ची भीती वाटते त्यांच्या दृष्टीने गढीमधला म्हातारा हा एकच त्या भुतांना न भिणारा प्राणी आहे नदीच्या काठाकाठाने गढीकडे येणारा रस्ता तिथे अमाप वाढत असलेल्या एका सुगंधी गवताने दरवळलेला आहे कुणीतरी या सुगंधाला भूतकाळाचा सुगंध असेही म्हटले आहे वळणे घेत घेत हा रस्ता एकदम या भारलेल्या गढीजवळ येऊन थांबतो या गढीच्या अंगावर अनेक पावसाळे खाऊन शेवाळे आणि प्रचंड पानांच्या वेली विस्तारल्या आहेत यामुळे ती गढी लांबून प्रथम दिसतच नाही पण जवळ आल्यानंतर मात्र या गढीच्या पाषाणसौंदर्याची कल्पना येते मूर पद्धतीचा हा एक प्रचंड राजवाडा आहे खूप उंचीचे दोन मजले डोंगरावर बांधल्यामुळे एकदम ही इमारत आभाळाला भिडल्यासारखी वाटते इमारतीला समोरच्या बाजूला उंच जाडजूड गोल खांब विटांने बांधलेले आहेत अगदी आपल्या दिल्लीच्या लोकसभेसारखे इमारतीच्या दोन्ही बाजूला उंच तीन मजली मिनार बांधलेले आहे इमारतीला उंच कमानदार खिडक्या आहेत चारी बाजूला काही खिडकींची दारे पडून गेल्यामुळे आणि आतमध्ये अंधारात एखादाच मिणमिणता दिवा असल्यामुळे त्या खिडक्या भयाण दिसत होत्या कवटीच्या डोळ्यांची भोकं असावीत तशा या सगळ्या गढीवरच एक ओसाडपणाची गूढ छाया होती

एके काळी विल्यम केली स्मिथ नावाच्या इंग्रज अधिकाऱ्याचा हा राहता वाडा होता परंतु इंग्रज सत्तेच्या पाडावानंतर या वाड्याचे वैभवही उताराला लागले

केली हे त्याच्या आईचे घरगुती नाव पण तेच नाव या सर्व मालमत्तेला लागले आपल्या या आडनावाचा बिल केलीला फार राग येई त्याला आपले स्मिथ हेच नाव आवडे परंतु काही वर्षांनंतर तोही केली या नावाला सरावला आजोबा मला सांगत होते की, ते मात्र त्याला मलेशियन आदरार्थी पद्धतीने ''तन श्री'' स्मिथ असेच म्हणत असे आता आजोबा नवे कपडे घालून आले होते चौकटीचा शर्ट, सैल पँट आणि डोक्यावर तिरकी टोपी तोंडात चिरूट दिला असता तरी जाहिरातीतल्या म्हाताऱ्यासारखे दिसले असते

आजोबा गोष्ट सांगू लागले, ''तन श्री स्मिथ हा चांगला आडवा - तिडवा

उच दाडगा माणूस होता खूप मजेत चैनीत राहण्याची त्याची सवय होती त्याने घरात खूप कोंबड्या पाळल्या होत्या आणि माझे आजोबा त्या कोंबड्यांची देखभाल करण्यासाठी इथे राहात असत इमारतीच्या एका टोकाला असलेल्या खोपटातून जवळजवळ हजार कोंबड्या होत्या असे ते म्हणत इतक्या कोंबड्या ठेवल्यावर त्या घरात माणसाला राहता तरी कसे येईल असे लहानपणी मला वाटे पण नतर माझ्या लक्षात आले की तन श्रीने खूप बदके सुद्धा पाळली होती इतकेच नाही तर गोठ्यात घोडे आणि गाई सुद्धा होत्या आणि या सगळ्या पसाऱ्यात तन श्री अगदी मजेत राहात होता इथल्या कोंबड्या सुद्धा त्याने इग्लडहून आणल्या होत्या पण लक्षात ठेवा या कोंबड्या खाण्याकरिता नव्हत्या कशाकरिता असतील ? मी अगदी आउट झाल्यासारखा चेहरा केला आजोबा सागू लागले, "तन श्री जेव्हा मलेशियात आला त्या वेळी सरासरी १५ - १६ वर्षांचा होता त्या काळात मॅक्वके, मॅक ग्रेगर, जार्डीन अशी स्कॉटलडमधील घराणी आशियात नशीब काढायला आली होती तन श्री मलेशियात आल्यावर त्याची अबु बेकर नावाच्या माणसाशी दोस्ती बनली आणि त्या दोघानी मिळून कपनी सरकारचे रस्ते बाधण्याचे कत्राट घेतले मिळालेल्या प्रचड नफ्यातून त्याने स्वतत्र घर बाधायचे ठरविले या काळात त्याला भोवतालच्या इग्रज समाजाचा, कपनी सरकारच्या अधिकाऱ्याचा आणि श्रीमत मलेय व्यापाराच्या नफेखोर स्वार्थी स्वभावाचा अगदी उबग आला होता माणसापेक्षा कोंबड्या, बदके आणि कुत्री अधिक मायाळू असतात असे त्याला वाटे म्हणून त्याने हे पाळीव प्राणी जमवले होते म्हणून जगापासून अगदी वेगळा, जिथे माणूसही दिसणार नाही अशा जगाच्या एका कोपऱ्यात घर बाधायचे म्हणून त्याने ही ३६५ एकराची जागा घेतली झाडेझुडपे तोडून त्याने गढी बाधली आणि बायकोला घेऊन तो इथे राहायला आला त्या वेळी १९०० साल असावे त्याची मुलगी हेलन इथेच जन्मली या सुमाराला मलेशियामध्ये रबराचा व्यापार सुरू झाला होता त्याच्या जमिनीवर लावलेल्या रबराच्या लागवडीमुळे तन श्री हा प्रचड श्रीमत माणूस झाला त्या काळात तन श्रीजवळ एक मोटार आणि दोन ट्रक होते गाडीच्या पुढल्या बॉनेटवर घटा लावलेल्या असायच्या आणि चालवणारा ड्रायव्हर घटा वाजवून रस्त्यावरच्या पादचाऱ्याला इशारा देत असायचा

जगामध्ये जे जे नवीन आहे, जे सुदर आहे, जे आधुनिक आहे त्या सगळ्याचा मोह तनश्रीला होता म्हणून त्याने इतका प्रचड वाडा बाधला त्याला

सगमरवराच्या भिती केल्या  या वेळी त्याला अँथनी नावाचा मुलगा होता  आजोबा म्हणाले, “हा मुलगा माझ्याबरोबर, बागेमध्ये हिडत असे ” तनश्रीने बागेमध्ये जगातल्या कानाकोपऱ्यातून सुदर सुदर फळझाडे लावली होती  वाड्यात छोटीछोटी तट्टे होती  आणि याच्यावर बसून आम्ही उच डोंगरावर जात होतो  त्या वेळी मलेशियामध्ये बाधकामाची एक लाट आलेली होती  त्यामुळे मूर पद्धतीचे प्रचड घर बाधावे असे तनश्रीने मनात धरले  हे घर बाधण्यासाठी त्याने देशोदेशीहून गवडी आणि सुतार आणले होते  इमारतीसाठी त्याने भारतातूनही गवडी आणले, परतु गढीच्या विस्ताराचे काम पूर्ण होणे त्याच्या नशिबात नव्हते  कारण स्पॅनिश हिवतापाची त्या वेळी इतकी मोठी साथ आली की गढीच्या कामावर असणारे गवडी आणि सुतार पटापट मरू लागले  ते घाबरले आणि काम सोडून पळून जाऊ लागले तनश्रीचा हिदू धर्माशी पुष्कळ परिचय होता  तो तामिळ बोलू शकत असे  देवाची अवकृपा जावी म्हणून या मजुराच्या मदतीने त्याने या आवारात हिदू पद्धतीने देऊळ बाधले  गणपती, महालक्ष्मीच्या मूर्ती बसवल्या  या सगळ्याचे रक्षण करण्याकरिता गढीच्या प्रत्येक कोपऱ्यावर हातात बदूक धरलेल्या शिपायाच्या मूर्ती बसविल्या आजही मोडकळीला आलेले ते मदिर इथे बघायला मिळते  हिदुस्थानातून आलेले गवडी आणि सुतार यानी बदूक घेतलेल्या शिपायाचा चेहरा हा तनश्रीसारखाच केलेला होता  फरक इतकाच की पुतळ्याला मिश्या आहेत  तनश्रीला नव्हत्या

या काळात वाडा बाधण्याचे काम मार्गाला लागले असे समजून तनश्री बायकामुलाना घेऊन स्कॉटलडला परत गेला  त्यानतर तनश्रीच्या मनातील महत्त्वाकाक्षा अधिकच वाढीला लागली  इडोनेशियाच्या वरच्या बाजूला तिमोर नावाच्या बेटात त्याने पोर्तुगीज सत्तेकडून मोठी जमीन विकत घेतली  तिथेही अशाच तऱ्हेची गढी बाधायचा त्याचा विचार होता  परतु तिमोरचे हवामान त्याला मानवले नाही  या नव्या गढीचा करार करण्यासाठी तो लिस्बनला गेला असताना मरण पावला  त्याच्या मरणाची बातमी गढीला पोहोचली त्या वेळी तिथे काम करणाऱ्या गवडी सुताराना असे वाटले की शेजारच्या स्मशानातील भुताची त्याला बाधा झाली असावी किवा तिमोरमधल्या पिशाच्चानी त्याला झपाटले असावे  त्यामुळे त्यानी घरातील सर्व चादी - पितळीची भाडी, काचसामान, कपडेलत्ते गोळा केले आणि किटा नदीत फेकून दिले  आजही कदाचित नदीचा तळ शोधला तर त्यातील काही वस्तू मिळायचा सभव आहे असे म्हणतात  गवडी - सुतारानी आपली हत्यारे तिथेच

टाकली आणि ते हिंदुस्थानला परतले त्यानंतर भुताटकीच्या या भयाने या गढीत राहायला कोणीच तयार होईना हळूहळू बाग उजाड झाली, कोंबड्या - बदके नाहीशी झाली यानतर तनश्रीची मुलगी मात्र गढीत कधीच परत आली नाही तिने ही गढी विकून टाकली तनश्रीचा मुलगा हाही लढाईत वारला आज या वाड्यात अस्ताव्यस्त जगल वाढलेले आहे कोणी असे म्हणतात की त्याने पाळलेल्या कोंबड्या आणि बदके जादूटोणा करण्याकरता होत्या त्यामध्ये मत्रशक्ती घालून त्याची सेवेसाठी माणसे बनविली जात आणि काम झाले की त्याना मारून टाकले जात असे आजोबा म्हणाले, हे सारे खोटे आहे या वाड्याचे छप्पर अजूनही पूर्ण झालेले नाही या जागेला शाप आहे, असे कोणी म्हणो, आजोबाचा त्याचावर विश्वास नाही या जागेचा उदय आणि अस्त याच्या कहाणीचा बौद्ध पद्धतीने अन्वयार्थ लावला जातो जगात कोणतीच गोष्ट कायम नसते प्रत्येक गोष्ट नश्वर असते याचे प्रतीक ‘अनिका’ या मलेशियन शब्दाने व्यक्त केले जाते तन श्रीची जगण्याची तीव्र इच्छा आणि या गढीवरचे प्रेम इथल्या झाडात दगडात अजूनही वसते आहे असे आजोबाना वाटते गढीतल्या देवळात आसपासची हिंदू माणसे केव्हातरी सटीसामासी येतात परतु एरवी ही गढी ओसाड पडलेली असते आजोबा सागत होते एका दगडाच्या वास्तूची कहाणी पण त्यात ते गहिवरत होते जणू या गढीचा आत्माच त्याच्या रूपाने बोलत होता एकेकाळी गजबजलेला पण आता उद्ध्वस्तपणाने भारलेल्या त्या गढीचे हुदके आम्ही ऐकत होतो

गढीतून आम्ही परतायला निघेपर्यंत रात्र पडायला लागली होती गाडीत बोलता बोलता लॉरेन्स सहजपणाने म्हणून गेला की, आपल्याला जो गढीतला म्हातारा भेटला तो सुद्धा एक भूत आहे असे इथले लोक मानतात केव्हा दिसतो, केव्हा नाही. त्याचे वय मात्र कधीच बदलत नाही मी मनातल्या मनात त्या म्हाताऱ्याचे दर्शन आठवत होतो आणि मनात येत होते की बघता बघता हा माणूस धूर होऊन हवेत मिसळून जाईल मग उरेल फक्त या सफरीची आठवण

• • •

२९.

# लंडनमधील प्रतिसृष्टी

प्रत्येक शहराला पर्यटकानी काय बघावे याची परपरागत यादी असते एखादेच असे शहर की ज्या शहरातील काही प्रेक्षणीय स्थळाचा ताजेपणा शतकानुशतके कायम राहतो तीस वर्षांपूर्वी मी विद्यार्थी म्हणून लडनला गेलो त्या वेळी मनात इच्छा होती की लडनमधील 'फॉईल्स' हे जगप्रसिद्ध पुस्तकाचे दुकान पाहावे, मदाम तुसॉ याचे मेणाच्या चित्राचे लोकविलक्षण प्रदर्शन पाहावे आणि जमले तर विन्स्टन चर्चिल आणि डॉ ॲना फ्रॉईड याना भेटावे त्या वेळी सारेच साधले लडन शहर तस प्रथमदर्शनी आपल्याला दूर ठेवणार, थोडस औपचारिक, थोडस कोरड शहर वाटत पण तिथे आम्ही ब्लॉक घेऊन राहिल्यानतर या शहराच्या प्रेमात न पडण अशक्य झाल दोन महिन्यापूर्वी मी लडनला गेलो आणि एक सुट्टी मिळताच दोन प्रेक्षणीय जागी माझे चित्त हरवून आलो एक म्हणजे सुप्रसिद्ध विचारवत कार्ल मार्क्स याचे घर आणि समाधी आणि दुसरे म्हणजे मदाम तुसॉ याच्या मेणाच्या मूर्तींचे प्रदर्शन विद्यार्थी असताना आपल्या मित्रात नवीन भारतीय आला की त्याला बनवायची ठरावीक युक्ती असते त्याला आम्ही तुसॉ याचे प्रदर्शन पाहायला पाठवताना म्हणायचे की, 'दाराशी पोलिस आहे त्याला वेळ विचार ' कारण हुबेहुब दिसणारा तो पोलिस मेणाचा केलेला होता आजसुद्धा दाराशी पोलिस आहे पण तिथे पुरुषाच्याऐवजी स्त्री पोलिसाचा पुतळा आहे या खेपेला सरकारी पाहुणा असल्यामुळे प्रदर्शनाच्या एक व्यवस्थापिका ज्युलिएट् सिमकिन्स यानी मला

प्रदर्शनाची सर्व माहिती दिली या प्रदर्शनात कोण नाही असे नाही, यासर अराफत, गोर्बाचेव्ह, केनेडी, महात्मा गाधी, इदिरा गाधी, जिना सारी माणस त्या मेणात थिजून राहिलेली आहेत, पण तरीसुद्धा ती सारी चित्रे इतकी अस्सल दिसतात की समोर येणारा माणूस लगेच आपल्याशी बोलू लागेल असेच वाटते या व्यक्तिरूपात या साऱ्या माणसाचे एरव्ही सहजासहजी लक्षात न येणारे बारकावेसुद्धा कसे टिपले असतील याचेच कौतुक वाटते प्रदर्शनातील बहुतेक माणसे एकएकटी उभी आहेत किवा बसली आहेत, पण काही पुतळे गटागटानी काही प्रसगात चित्रित केलेली आहेत एका बगीच्यात असलेल्या स्वागत समारभात इग्लडच्या राजपुत्रापासून सारी माणसे आहेत कुणी बोलत आहेत, कोणी हसत आहेत, कुणी वाईनचा ग्लास उचावून शुभेच्छा देत आहेत तर कुणी पियानोवर वाजविल्या जाणाऱ्या सगीताच्या धूनमध्ये डोळे मिटून बसलेला आहे खरे म्हणायचे तर हे प्रदर्शन पाहणे हा एक अतिवास्तववादी असा अनुभव आहे कारण तिथे एका खुर्चीत बसलेल्या ॲगाथा ख्रिस्ती या जगद्विख्यात गुप्तहेर कथा लिहिणाऱ्या लेखिकेचे मूर्तिचित्र पाहताना त्या चेहऱ्यावरचे भाव इतके खरे वाटतात की तेथून नजर ढळत नाही साऱ्या जगातील माणसाच्याकडे तुम्हाला जे कळलेले नाही ते गुप्त रहस्य मला कळलेले आहे अशा मिश्किल भावनेने पाहणारा हा चेहरा फार वास्तव वाटतो

इथेच मृत्युशय्येवर पडलेला नेपोलियनचा पुतळा आहे असे सागतात की नेपोलियनचा पराभव करणारा ड्यूक ऑफ वेलिग्टन हा सेनापती इथे येऊन मरणाऱ्या नेपोलियनकडे तासन्तास पाहात बसे काय त्याच्या मनात विचार येत असे, परतु मला विचार करण्याची सधी न देता ज्युलिएट्ने मला मुख्य दालनातून राजघराण्यातील पुतळ्याकडे नेल महामत्र्यापैकी ग्लॅड्स्टन याचा चेहरा मला फार गभीर वाटला तिथे असणाऱ्या सगळ्याच पुतळ्याविषयी तिथे काम करणाऱ्या माणसाना केवळ आपुलकीच वाटते असे नाही तर त्याची चागली दोस्तीही जमते ज्युलिएट्ला मी विचारल की बोलून चालून ही मेणाची चित्रे लोकाना यात काय आकर्षण वाटते, त्याना ती का आवडतात ? ज्युलिएट् म्हणाली, व्हिक्टोरियन काळात लोक सुशिक्षित होते, परतु वृत्तपत्रात फोटो छापण्याची प्रथा नवीन होती दूरदर्शन नव्हते त्यामुळे लोकाना जगाचा इतिहास घडविणारी माणसे बघायला फार आवडे मी पुन्हा विचारले की आता वृत्तपत्राचा किवा दूरदर्शनचा प्रसार वाढल्यानतर लोक चित्रे पाहायला का येतात ? ती म्हणाली की, दूरदर्शनच्या पडद्यावर माणसे

लहान दिसतात, खरी दिसत नाहीत चित्रपटाच्या पडद्यावर माणसे मोठी दिसतात तेही /अवास्तव आहे या प्रदर्शनात माणस जशी असतात तशी दिसतात, त्यामुळे इथे लोकाची गर्दी होते दुसरे असे की मोठमोठ्या राजकीय नेत्याना आपण व्यासपीठावर पाहतो, त्याना जवळून पाहू शकत नाही, त्याच्याकडे रोखून पाहू शकत नाही या प्रदर्शनात ते साधते मार्गारेट थॅचर याच्यापासून एका फुटाच्या अतरावर तुम्ही उभे राहू शकता त्याचे डोळे, त्याच्या पापण्या, त्याची केशभूषा अगदी जवळून पाहू शकता, म्हणून लोक इथे येतात या प्रदर्शनात जवळजवळ तीनशे पुतळे आहेत येथे कोणाचा पुतळा ठेवायचा याबद्दल खूप काळजीपूर्वक निवड करावी लागते जगप्रसिद्ध राजकीय नेते, खेळाडू, विश्वसुदरी सर्वांच्याच मते तुसॉच्या प्रदर्शनात आपले चित्र ठेवणे हा मोठाच गौरव असतो हे पुतळे तयार करण्याकरिता पुष्कळ नेते बैठक द्यायला तयार असतात त्याना समोर बसवून चित्र तयार केले जाते ज्या वेळेला हे शक्य नसते त्या वेळी फोटो, चलच्चित्रण याच्या आधाराने पुतळा तयार केला जातो ते व्यक्तिचित्र आहे की प्रसगचित्र आहे यावर त्याची रचना अवलबून असते मदाम तुसॉ याच्या नोंदवहीमध्ये जगातील थोर थोर नेत्याची अतिशय वैयक्तिक अशी माहिती नोंदलेली आहे कमरेचा घेर किती, खाद्याचे माप काय, कोणाचा एक कान मुडपलेला आहे, ही सारी सारी माहिती फार काटेकोरपणाने लिहून ठेवली जाते आणि ती माहिती सदैव गुप्त राखली जाते हे पुतळे यथार्थ व्हावेत म्हणून अनेक लोक स्वत ची अतर्वस्त्रे, कपडे, बूट, टोप्या देतात हेन्री मूर याने पुतळ्यासाठी स्वत चे बूट दिले आणि बरेच दिवस आपले बूट कोठे हरवले म्हणून तो शोधत होता प्रदर्शनाला आल्यावर त्याच्या लक्षात आले की आपल्यासारख्याच दिसणाऱ्या दुसऱ्या हेन्री मूरला आपण ते दिलेले आहेत

या प्रदर्शनाचे अतिशय मोठे आकर्षण म्हणजे 'निद्रित सुदरी' एका पलगावर शात झोपलेली ही एक अत्यत सुदर स्त्री आहे गुलाबी रगाचा झगा घातलेली ही स्त्री कुठल्या स्वप्नात गुग आहे ते कळत नाही, परतु चेहऱ्यावर अस्फुट असे हसू आहे श्वासोच्छ्‌वासाबरोबर छाती मदपणाने वर खाली होत आहे त्यामुळे पहिल्यादा प्रदर्शन पाहायला येणाऱ्या माणसाला इतका आश्चर्याचा धक्का बसतो की तो एकदम उद्‌गारतो की 'अरे! ही जिवत आहेत की' प्रदर्शनात भीतीचे दालनही आहे तेथे जगातील कुप्रसिद्ध मारेकरी, गुन्हेगार आणि खुन्याची चित्रे आहेत तिथे भीतीने माणसाच्या अगावर काटाच येतो ज्युलिएट्ला मात्र अजूनही निद्रित सुदरी हे चित्र

सर्वात आवडते, कारण यान्त्रिकी पद्धतीने हालचाल करणारे जगामधले हे पहिले चित्र आहे १९१० मध्ये या पुतळ्यामधील छातीचे वर खाली होणे हे घड्याळ्यातील यंत्रावर बसविलेले होते, आता मात्र ते विद्युत्यांत्रिकीने केले जाते

पुतळे तयार करताना सामान्य माणसे कशी निवडतात? पोलिसाचा चेहरा कसा काढतात? यावर ज्युलिएट् म्हणाली, आम्हाला जेव्हा नवीन स्त्री पोलिसाचा पुतळा करायचा होता त्या वेळी आम्ही पोलिस चौकीमध्ये जाऊन सर्व स्त्री पोलिसाना समोर उभे केले आणि ज्या चेहऱ्यावर अधिकाराचा दरारा आणि त्याच वेळी मदतीचा कळवळा असेल असा चेहरा निवडला प्रदर्शनाचा लौकिक आणि अधिकार इतका मोठा आहे की त्यासाठी मदत करायला पोलिस खात्याला काहीच वाटले नाही अधिकारच पाहायचा तर मदाम तुसॉ याचा स्वत चा पुतळा बघायला हवा १८५० मध्ये त्या वारल्या, परतु मरणापूर्वी त्यानी स्वत बैठक देऊन आपला पुतळा करवून घेतला टोकदार नाक, घट्ट मिटलेले ओठ आणि मण्यासारखे निळे डोळे या साऱ्यातून म्हातारपणीसुद्धा त्याचा अधिकार स्पष्ट दिसत होता रिचर्ड ब्रॅन्सन याने अटलांटिक महासागर एका फुग्यामध्ये बसून ओलांडला त्याच्या पुतळ्याशेजारी आज मदाम तुसॉ याचा पुतळा आहे चेहऱ्यावर मात्र भाव असा आहे की हे सारे मी पाहिलेले आहे

मदाम तुसॉ या मूळच्या फ्रेंच सोळावा लुई या राजाच्या दरबारात त्या कलाशिक्षक म्हणून आणि शिल्पकार म्हणून काम करीत होत्या मुखवटे हुबेहुब तयार करण्यात त्या फार तरबेज होत्या फ्रेंच राज्यक्रातीनतर परिस्थिती बदलली आणि नवरा आणि धाकटा मुलगा याना पॅरिसला सोडून, थोरल्या मुलाला घेऊन नशीब काढण्याकरिता त्या इग्लडमध्ये आल्या १८३५ मध्ये त्यानी बेकर स्ट्रीटवर जागा घेऊन कायम स्वरूपाचे प्रदर्शन उभारले आता या कपनीची मालकी त्याच्याच कुटुबात आहे या कामाचा पसारा आता खूप वाढला आहे ॲम्स्टरडॅम येथे अशाच स्वरूपाचे प्रदर्शन उभारले जात आहे आता रोबोटिक्स् हे नवीन शास्त्र निर्माण झाल्याने पुतळ्याच्या हालचाली, चालणे, बोलणे साऱ्यातच क्राती झाली आहे या नव्या तत्रज्ञानाचा उपयोग करून १९९३ पर्यंत लडनमध्ये हलत्या, चालत्या, बोलत्या मूर्तींचे एक प्रचड प्रदर्शन उभे केले जात आहे

ज्युलिएट्च्या मते या प्रदर्शनाचे आकर्षण आजही कायम आहे, त्याचे कारण सामान्य माणसाला आपण हात लावू शकू इतक्या जवळून जगातील मोठी माणसे

बघायला कधीच मिळत नाहीत या मूर्तीच्याकडे किती वेळ टक लावून पहिले तरी ती तक्रार करीत नाहीत अलीकडे बागेतील स्वागत समारंभ नावाचे नवीन प्रसंगचित्र करण्यात आलेले आहे आणि त्यात जगातील सगळी मोठी माणसे दिसतात जी चित्रे एकटी उभी आहेत त्याच्यासमोर बसून प्रेक्षक गप्पा मारू शकतात, बोलू शकतात, त्यामुळे हे प्रदर्शन फार लोकप्रिय आहे पावरोतीसारख्या गभीर विचारवताच्याबरोबर एक म्हातारी स्त्री बसून मनातल्या मनात सुसवाद करत असावी दुसऱ्या एका चित्राकडे एक जपानी प्रेक्षक टक लावून बसला होता, परतु अशा प्रेक्षकाच्यामुळे चित्राची हानी झाल्याची उदाहरणे मात्र नाहीत या दालनातून घाईघाईने बाहेर पडताना कोणाचा तरी धक्का लागला म्हणून मी वळून पाहिले तर ते होते ब्रिटनचे महामत्री जॉन मेजर मी चमकून पाहिले, पण तो पुतळा होता सगळ्यात सुदर अनपेक्षित प्रसंग आहे तो दालनासमोरील व्हराड्यात निवात बसलेल्या बाईचा एक टूरिस्ट बाई दमूनभागून बाकावर बसली आहे, मान मागे टेकली आहे, खाद्यावरचा कॅमेरा सरकून खाली आला आहे आपल्याला वाटते बिचारी प्रदर्शन पाहून थकलीभागली असेल पण नतर लक्षात येते की ती खरी स्त्री नाही तर तो पुतळा आहे

ज्युलिएट्‌ म्हणाली की, सर्वच चेहरे करणे अवघड आहे, परतु ज्या चेहऱ्याच्या रेषा ठळक असतात असे वृद्ध चेहरे किंवा ज्याच्या दाढीमिश्या वेगळ्या आहेत असे चेहरे करणे सोपे याउलट नाजूक त्वचा असणारे तरुण चेहरे करणे अवघड आहे यामुळेच यासर अराफत याचा पुतळा सोपा पण वास्तव आहे, आणि याउलट बेनझीर भुट्टो याचा पुतळा एखाद्या बाहुलीसारखा वाटतो ज्युलिएट्‌ म्हणाली, गोर्बाचेव्ह याना बैठक देणे शक्यच नव्हते, कारण वेळ नव्हता पिकासोसारख्या चित्रकाराने बैठकीला नकार दिला, कारण तो म्हणाला की रेम्ब्रॉसारख्या प्रख्यात चित्रकाराने बैठक दिली नाही मग मी का द्यायची ? अलीकडेच नेल्सन मडेला यानी बैठक दिली त्याची छायाचित्रे, फिल्म या साऱ्याचा उपयोग करून १९९१ च्या मध्यावधीत हा पुतळा तयार होईल असे ज्युलिएट्‌ला वाटते

ब्रिटिश मत्रिमडळातील सर्वच मत्र्याचे पुतळे का नाहीत, याचे कारण विचारल्यावर ज्युलिएट्‌ म्हणाली, सरकार इतक्या वेगाने सत्ता घेते आणि कोसळते, की पुतळे करणे शक्यच होत नाही मी तुलनेने भारताचा विचार करीत होतो इतक्यात ज्युलिएट्‌ म्हणाली, इतिहासाला भरती येते, ओहोटी येते त्याला आपण काय

करणार ? ओहोटीच्या लाटेत जे नेते अस्तगत होतात त्या सगळ्यांची मस्तके एक मोठ्या वखारीमध्ये साठवून ठेवलेली आहेत कालानुसार त्यांच्या चेहऱ्यावरचे तेज कमी होते, पण न जाणो कालचक्र पुन्हा फिरेल, पुन्हा केव्हा त्यांचे पुतळे लागतील म्हणून आम्ही ते फार जपून ठेवलेले आहेत ज्युलिएट् म्हणाली, माओत्से तुग, चँग के शैक, नासर, निक्सन सारे आता वखारीत दाखल झालेले आहेत पण जे टिकतात ते का ? या माझ्या प्रश्नावर तिने मला हसत हसत जेन सेमूर या लावण्यवतीचा पुतळा दाखविला ती म्हणाली, तो पुतळा आणि ती स्वत. शेजारी शजारी उभे असताना काढलेले हे छायाचित्र पाहा हे काही वर्षांपूर्वीचे आहे काळ जसजसा जाईल तसतशी जेन सेमूर स्वत· म्हातारी होईल पण हा पुतळा मात्र तसाच लावण्याने मुसमुसलेला राहील तिने मला महात्मा गांधींचा पुतळा दाखविला या प्रदर्शनातील इंदिरा गाधी, पंडित नेहरू यांचे पुतळे मला आवडले नाहीत, परंतु महात्मा गांधींच्या चेहऱ्यावरचा प्रसन्न आणि कृपाळू भाव आपल्या अंत करणाला भिडतो ज्युलिएट् म्हणाली, काळाच्या प्रवाहात माणसे, त्यांचे कर्तृत्व, त्यांचे नाव, गाव, चेहरा सारे काही नष्ट होऊन जाते, काळाला पुरून उरते त्याचप्रमाणे माणसाच्या अंत करणातील उदार भाव जर चेहऱ्यावर प्रतिबिंबित होत असतील तर तो पुतळा लोकप्रिय राहतो माणूस नष्ट होतो परंतु ती भावसमृद्धी काळाचा पराभव करून शिल्लक उरते म्हणूनच महात्मा गांधींचा पुतळा टिकतो त्यांच्यासारख्यांचे ते भाव, जेन सेमूरसारखे ते सौंदर्य, नेपोलियनसारखे ते कर्तृत्व येथे चित्ररूप झाले आहे म्हणूनच मदाम तुसॉ यांचे हे प्रदर्शन कालातीत झाले आहे

• • •

REFBK-0026664

प्रवेश
क्र. ६४०
२११६२
१०६/०२